# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

समाज विज्ञान विद्याशाखेतील इतिहास विषयातील आचार्य या पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंध.

## - संशोधनाचा विषय -

## *"सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास : एक चिकित्सक अध्ययन"*



: मार्गदर्शक :

**प्रा. डॉ. ग. का. माने**

इतिहास विभाग प्रमुख

केशरबाई लाहोटी महाविद्यालय,

अमरावती.

: संशोधक :

**नितीन उल्हासराव सराफ**

सहाय्यक प्राध्यापक

श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय

अंजनगाव सुर्जी.

जानेवारी २०१६

# प्रतिज्ञापत्र

प्रस्तुत शोध प्रबंध "सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास : एक चिकित्सक अध्ययन" हा असून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाज विज्ञान विद्याशाखेतील आचार्य पदवीच्या अनुग्रहार्थ सादर करण्यात येत आहे. हा प्रबंध उपलब्ध असलेल्या मूळ कागदपत्रांचा व प्रकाशित व अप्रकाशित साधनांचा सुक्ष्म वापर करुन तयार केला आहे.

संबंधित विषयावरील अन्य कोणत्याही प्रबंधाचा अनुवाद किंवा अनुकरण प्रबंधात नाही. सदर प्रबंध कोणत्याही विद्यापीठाला सादर झालेला नाही. हा प्रबंध प्रथमच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला आचार्य पदवीकरिता सादर करण्यात येत आहे.

दिनांक : १२/१/२०१६

ठिकाण : अमरावती

**संशोधक**

**नितीन उल्हासराव सराफ**

# ऋणनिर्देश

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, येथे आचार्य पदवीसाठी प्रस्तुत प्रबंध सादर करीत आहे. प्रस्तुत प्रबंध पूर्ण होण्यासाठी ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य, मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले त्या सर्वांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत प्रबंधाच्या पूर्णत्वासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. ग. का. माने, इतिहास विभाग प्रमुख, केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांनी विषय निवडीपासून तर संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांचे सहकार्य लाभल्यामुळे मी संशोधन प्रबंधाला अंतिम रुप देऊ शकलो, तसेच त्यांचे सहकार्य यापुढेही मिळण्याची अपेक्षा व्यक्त करुन मी त्यांचे आभार मानण्याऐवजी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

माझे संशोधन कार्य पूर्णत्वास जाण्यामध्ये माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एम. के. गिरी, प्रा. डॉ. पी. टी. वाकोडे, प्रा. डॉ. बी. व्ही. राठी, प्रा. डॉ. जुगल मालधुरे, प्रा. इंदल जाधव, प्रा. सत्येंद्र गडपायले, प्रा. समीर बिजवे व माझ्या महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक वृंद यांनी दिलेल्या प्रेरणेने आणि सहकार्याने माझे संशोधन कार्य पूर्ण करु शकलो, त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

मला संशोधन कार्यात सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे प्रा. डॉ. रवि वैद्य, प्रा. डॉ. गोविंद तिरमनवार, प्रा. डॉ. नितीन चांगोले, प्रा. डॉ. प्रशांत कोठे, प्रा. डॉ. संदिप राऊत, प्रा. डॉ. सुभाष मुरे, प्रा. डॉ. प्रविण सदार, प्रा. भैय्या चिखले या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रत्यक्ष संशोधनाच्या काळात डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ अभ्यासक, कोल्हापूर, डॉ. सदाशिव शिवदे, पुणे, डॉ. मंजूश्री घोरपडे, कोल्हापूर, प्रा. सुरेंद्र शिरसट, भिगवण, पुणे, प्रा. महादेव सोनटक्के, कोल्हापूर, प्रा. सचिन बोलाईकर, कराड, श्री. अभिषेक पेटकर, शिंदी, श्री. अनिरुध्द पाटील, परतवाडा, डॉ. विश्वाधार देशमुख, नांदेड,

प्रा. कैलास गायकवाड, कारंजा (लाड), प्रा. श्रीहरी पितळे, मेहकर या सर्वांनी मला केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे मला खूप काही शिकता आले, याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

माझ्या संशोधन कार्यात प्रोत्साहन व आशीर्वाद देणारे माझी आई सौ. सुरेखा सराफ व वडील श्री. उल्हासराव सराफ, माझ्या सासुबाई सौ. वैशाली नेरकर व सासरे श्री. विनयराव नेरकर, माझी पत्नी सौ. विशाखा, मुलगी कु. अमृता, बहिण सौ. रेणूका नांदेडकर, मेव्हणे श्री. भुषण नांदेडकर, शालक श्री. विशाल नेरकर यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मला खूप मदत केली आणि त्यांना भरपूर तसदी देण्याचा हक्क मी बजावला या सर्वांचा मी ऋणी आहे.

प्रबंधाची उत्कृष्ट अक्षर जुळवणी व बांधणी करण्यासाठी श्री. सचिन टी. इसोकार, तसेच टिपणात दुरुस्तीस मदत करणारे माझे मित्र श्री. प्रशांत नांदूरकर यांचा मी आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ज्यांचा सहभाग लाभला व ज्यांची नावे अनावधानाने राहून गेली त्या सर्वांचे मी कृतज्ञापुर्वक आभार मानतो.

**संशोधक**
**नितीन उल्हासराव सराफ**

# - अनुक्रमणिका -

# प्रस्तावना

# सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास : एक चिकित्सक अध्ययन

## ⊙ प्रस्तावना :

मराठ्यांच्या इतिहासात घोरपडे घराण्याची कामगिरी ही अत्यंत महत्वाची आहे. घोरपडे राजघराण्याचे पूर्वज चित्तोडच्या सिसोदे घराण्यातील होते. महाराष्ट्रावर मुसलमानी सत्तेचा अंमल चौदाव्या शतकापासून सुरु झाला. या काळात जी काही मराठी घराणी उदयाला आली, त्यांनी सुलतानांच्या लष्करात कामगिरी बजावून आपले वेगळेपण सिध्द केले. त्या घराण्यापैकी भोसले आणि घोरपडे ही दोन्ही घराणी म्हणजे एकाच वंशवृक्षाच्या दोन शाखा आहेत. सिसोदे घराण्यात १४व्या शतकात राणा भोसाजी नावाचा एक पराक्रमी पुरुष होऊन गेला, त्याच्या नावापासून सिसोदे घराण्याची दक्षिणेकडील शाखा भोसले या नावाने संबोधली जाऊ लागली. त्याचवेळी बहामनी राज्यासाठी या वंशातील कर्णसिंह आणि भिमसिंह या पितापुत्रांनी अनेक विजय मिळविले. त्यात कोकणातील विशाळगडची लढाई विशेष महत्वाची मानली जाते, कारण या लढाईत खेळणा किल्ला घोरपड लावून सर केल्याबद्दल कर्णसिंह व भिमसिंह यांना इ.स. १४७१ मध्ये ''राजा घोरपडे बहाद्दर'' ही पदवी बहामनशहाने दिली. पुढे कर्णसिंहाच्या वंशजांना 'घोरपडे' हे नाव प्राप्त झाले. तेव्हापासून 'भोसले' व 'घोरपडे' ह्या सिसोदे वंशाच्या दोन शाखा दक्षिणेत कार्य करु लागल्या.

निंबाळकर, भोसले, घोरपडे, जाधव, मोरे, सावंत, शिर्के, घाटगे, माने अशी अनेक क्षत्रिय मराठा घराणी बहामनी काळापासून दक्षिणेत प्रसिध्द पावली होती. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्यात ज्या घराण्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले, त्यामध्ये घोरपडे घराण्याचा वाटा महत्वपूर्ण आहे. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज, ताराबाई महाराणी या चारही छत्रपतींच्या राजवटीमध्ये या घराण्याने महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

इ.स. १५६५ मध्ये राक्षसतागडीच्या (तालिकोटच्या) युध्दात कर्णसिंह दुसरा मारला गेला. त्याचा मुलगा चोलराज यास पिलाजी, कानोजी व वल्लभजी असे तीन मुले होते. पैकी पिलाजी घोरपडे हा मुधोळ येथे स्थाईक झाला. त्यालाच मुधोळच्या घोरपडे घराण्याचा मुळपुरुष मानले जाते. वल्लभजी हा कापशीकर घोरपडे घराण्याचा मुळपुरुष मानला जातो. पिलाजीच्या घोरपडे घराण्यास सातकस घोरपडे तर वल्लभजीच्या घोरपडे घराण्यास नवकस घोरपडे असे संबोधण्यात येते. वल्लभजीचा नातू म्हाळोजी याने प्रथम शहाजी राजांच्या लष्करात शिलेदार म्हणून प्रवेश केला.

त्याने शहाजीपुत्र संभाजी राजे ह्यांच्या सोबतही कार्य केले, त्यामुळेच इ.स. १६५२ साली संभाजी राजांनी दिलेल्या निकालपत्रात म्हाळोजी घोरपडे यांची पाटीलकी कायम केलेली दिसते. म्हाळोजींनी शहाजी राजे, शिवाजी महाराज, संभाजी महाराज ह्यांच्या कार्यकाळात स्वराज्य स्थापन्याच्या कार्यात बहुमोल सहाय्य केले. १ फेब्रुवारी १६८९ रोजी संगमेश्वर येथे झालेल्या संघर्षात संभाजी महाराजांचे शत्रुपासून संरक्षण करतांना हा शुर मराठा सेनापती ठार झाला.

म्हाळोजी राजांना संताजी, बहिर्जी आणि मालोजी असे तीन पुत्र होते. या तीनही घोरपडे बंधुंनी राजाराम महाराजांच्या काळात अद्बितीय कामगिरी केलेली होती. या कामगिरीबद्दल घोरपडे बंधुंना राजाराम महाराजांनी मानाचे किताब दिले. संताजी घोरपडे यास ममलकतमदार, बहिर्जीराव घोरपडे यांस हिंदुराव व मालोजी घोरपडे यास अमीर उल उमराव असे किताब दिले. म्हाळोजींच्या तीनही पुत्रांनी घोरपडे घराण्याच्या तीन स्वतंत्र शाखांचा विस्तार केला.

i) सेनापती कापशीकर घोरपडे

ii) हिंदुराव गजेन्द्रगडकर घोरपडे

iii) अमीर उल उमराव दत्तवाडकर घोरपडे

वल्लभजी हे कापशीकर घोरपडे घराण्याचे मुळपुरुष मानले जातात. म्हाळोजीपुत्र संताजी ह्याने ह्या घोरपडे घराण्याच्या शाखेचा खऱ्या अर्थाने दरारा निर्माण केला. संताजी घोरपडे यांनी संभाजी महाराज व राजाराम महाराज ह्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात महत्वपूर्ण योगदान दिले. औरंगजेब हा शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर (इ.स. १६८०) दक्षिण मोहीमेवर आला. त्याने त्याची छावणी तुळापूर येथे टाकली. त्यावेळी संताजी, त्याचे दोन बंधु व विठोजी चव्हाण यांनी मध्यरात्री अचानक हल्ला करुन बादशहाच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून नेले. तसेच संताजीने मोगल सैन्यावर अनेक हल्ले चढवून व गनिमी काव्याच्या वापराने मोगल सैन्यास जेरीस आणले. त्यांच्या ह्या अवर्णनिय कार्यामुळेच त्यांच्या कापशीकर घोरपडे घराण्याला 'सेनापती' हा महत्वाचा किताब व पदही राजाराम महाराजांनी दिले. परंतु इ.स. १६९६ मध्ये धनाजी जाधव व संताजी घोरपडे या दोन महत्वपूर्ण मराठा सरदारांमध्ये वितूष्ट निर्माण झाले. त्यातच राजाराम महाराजांनी धनाजी जाधवास पाठिंबा दिल्याने संताजी नाराज झाला, दिवसेंदिवस संघर्ष वाढत गेला. त्यातूनच संताजी घोरपडे व राजाराम महाराजांमध्ये गैरसमज निर्माण झाले. म्हणूनच राजाराम महाराजांनी संताजीचे सेनापतीपद काढून घेतले. संताजीस बंडखोर म्हणून घोषित केल्याने सेनापती धनाजी जाधवांशी

त्याला लढाई करावी लागली, यात संताजीस विजय मिळाला परंतु वितूष्ट इतके विकोपाला गेले की नागोजी माने ह्या म्हसवडच्या मराठा सरदारानेच संताजी घोरपडेस निशस्त्र असतांना जून १६९७ मध्ये ठार केले.

सेनापती संताजी घोरपडे यांच्या मृत्यूने मराठी साम्राज्याची अपरिमित हानी झाली. युध्द नेतृत्व, संघटन कौशल्य, साहसी वृत्ती व अतुल पराक्रम यासारख्या गुणांनी परिपूर्ण असणारा संताजी घोरपडे सारखा दुसरा सरदार मराठेशाहीत क्वचितच झाला असेल. संताजी व बहिर्जी यांचा धाकटा बंधू मालोजी घोरपडे हा देखील थोरल्या भावांप्रमाणेच पराक्रमी होता. मालोजी घोरपडेने राजाराम महाराजांच्या जिंजीच्या प्रवासात महत्वाची भूमिका बजावली. मात्र औरंगजेबाच्या सैन्याच्या हातात मालोजी व इतर काही मराठे सरदार सापडले त्या सर्वांना औरंगजेबाने ठार केले. तत्पूर्वी मालोजींनी केलेल्या कामगिरीवर खुश होऊन त्यांना 'अमीर-उल-उमराव' असा किताब राजाराम महाराजांनी बहाल केला होता. ह्या मालोजी घोरपडे पासूनच दत्तवाडकर अमीर-उल-उमराव घोरपडे घराण्याची शाखा सुरु झाली.

संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मोगल बादशहा औरंगजेबाने मराठा साम्राज्याविरुध्द आघाडी उघडली अशावेळी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून छत्रपती राजाराम महाराजांनी कर्नाटकात जावे. जिंजीचा किल्ला हस्तगत करुन स्वराज्याच्या रक्षणाचे प्रयत्न करावे असे ठरले. छत्रपती राजाराम महाराजांना महाराष्ट्रातून कर्नाटकपर्यंतचा ५०० मैलाचा खडतर प्रवास करुन जिंजीस पोहोचविण्याची जबाबदारी बहिर्जी व मालोजी या घोरपडे बंधूंवर सोपविण्यात आली. कारण जिंजीचा प्रदेश म्हणजे तुंगभद्रा नदीचे खोरे, राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांच्या चांगलाच परिचयाचा होता, त्याच प्रदेशात त्यांची गजेन्द्रगडची जहागीर सुध्दा होती. या प्रवासात त्यांनी औरंगजेबाच्या सैन्यापासून छत्रपती राजारामाचे संरक्षण करुन जिंजीच्या किल्ल्यावर सुखरुप पोहचविले आणि स्वराज्याचा संरक्षक म्हणून भूमिका बजावली.

दरम्यानच्या काळात राजारामाचे संताजी घोरपडे बरोबरच्या संबंधात खटके उडु लागले, याचाच परिणाम म्हणून छत्रपती राजारामाने संताजीचे सेनापती पद काढून घेतले व नंतर नागोजी मानेने संताजीस दगा देऊन ठार मारले, त्यावेळी राजाराम महाराजांना सर्व घटनाक्रम माहित असुनही त्यांनी न्याय न दिल्यामुळे बहिर्जी हिंदूराव घोरपडे राजारामांचा पक्ष सोडून कर्नाटकात निघून गेले. बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांनी इ.स. १६९७ मध्ये गुत्तीचा किल्ला जिंकला आणि हिंदुराव घोरपडे

यांच्या स्वतंत्र सत्तेचा पाया घातला. बहिर्जीपुत्र सिध्दोजी यांनी वडिलांच्या मृत्यूनंतर इ.स. १७१४ मध्ये सोंडूरचा प्रदेश पाळेगारांकडून जिंकून घेतला आणि गुत्ती राज्याच्या प्रदेशाचा विस्तार घडवून आणला. सोंडूर येथे स्वतंत्र राज्याची निर्मिती केली. सिध्दोजी हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर हे महाराणी ताराबाईच्या विश्वासातील असल्यामुळे त्यांना सेनापतीपद बहाल करण्यात आले. छत्रपती शाहू महाराजांनी देखील सिध्दोजीचा पराक्रम लक्षात घेऊन त्यांना आपल्या बाजुने वळविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मात्र त्याकडे लक्ष न देता सिध्दोजीराव हिंदुराव घोरपडे हे इ.स. १७१३ पर्यंत करवीर राज्याचे सेनापती होते.

कोल्हापूर मध्ये झालेल्या संत्तातरामुळे इ.स. १७१४ मध्ये सिध्दोजीरावांनी कंटाळुन करवीर राज्याचे सेनापतीपद सोडले व कर्नाटकात जाऊन आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तेच सोंडूर राज्य होते. असे असले तरी राजे सिध्दोजीराव व छत्रपती संभाजी महाराज, करवीर यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे व सलोख्याचे होते. म्हणूनच छत्रपती संभाजी राजांनी सिध्दोजीरावांना नोव्हेंबर १७२३ मध्ये करवीर निवासिनी महालक्ष्मीची पुन:स्थापना करण्यासाठी पाचारण केले. इ.स. १७३१ मध्ये सिध्दोजीरावांचे निधन झाले. त्यानंतर तातडीने छत्रपती शाहू महाराजांनी सिध्दोजीपुत्र मुरारराव हिंदुराव घोरपडे यांना भेटीसाठी बोलावून पंचगंगा ते रामेश्वर या प्रदेशाच्या सरदेशमुखीची सनद २७ फेब्रु. १७३१ रोजी दिली.

सिध्दोजीरावांना दोन मुले होती, थोरला मुरारराव तर धाकटा दौलतराव. वडीलांच्या मृत्युनंतर कर्नाटकातील गुत्ती राज्याचा वारसा मुराररावांकडे आला आणि मुराररावांनी दौलतरावांना गजेन्द्रगडची जहागीर दिली. मुराररावांनी कोणत्याही राज्यकर्त्यांचे मांडलिकत्व पत्करले नाही की कोणाच्या आश्रयाने राज्य राखले नाही. त्यांच्या राज्याला स्वतंत्र दर्जा प्राप्त होता, त्यांच्या राज्यात सौंधा, बिदनूर, सावनूर, शिरे, श्रीरंगपट्टण, चित्तळदुर्ग, गुत्ती, सोंडूर, गुंटकल, कडाप्पा, त्रिचनापल्ली, चैन्नपट्टण, पॉंडेचरी इ. प्रदेशांचा समावेश होता. यावरुन त्यांच्या दक्षिणेतील सत्तेचे प्रभावक्षेत्र किती व्यापक होते हे स्पष्ट होते. मुराररावांच्या कर्तृत्वाचा आरंभ खऱ्या अर्थाने इ.स. १७४० पासून होतो. एप्रिल १७४० मध्ये सातारचे छत्रपती शाहू महाराजांनी कर्नाटकातील त्रिचनापल्ली वरील स्वारीची सुत्रे रघुजी भोसलेकडे दिलेली होती. या मराठी फौजांनी त्रिचनापल्लीचा किल्ला जिंकला. या किल्ल्याचा संरक्षक म्हणून मुराररावांची नेमणूक करण्यात आली, त्यामुळे मुराररावांना कर्नाटकच्या राजकारणात अधिकच

महत्व प्राप्त झाले. मुराररावांचे सातारचे छत्रपती शाहू महाराज व करवीर छत्रपती संभाजी महाराज यांचेशी उत्तम संबंध होते.

मुराररावांच्या कारकिर्दीत दक्षिण भारतात परकीय सत्तांचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. मुराररावांचे चंदासाहेबाशी जुनेच शत्रुत्व होते त्यात फ्रेंचांच्या मदतीने कर्नाटक बळकावण्याचा चंदासाहेबांचा डाव होता. त्यामुळेच मुराररावांनी नासिरजंगाची बाजू घेऊन फ्रेंचांशी व चंदासाहेबांशी युध्द केले. त्यात चंदासाहेब मारला जाऊन इ.स. १७५९ मध्ये फ्रेंच गर्व्हनर डुप्लेशी करार केला. त्यानुसार फ्रेंचांनी कर्नाटकातील मुराररावांचा चौथाईचा हक्क मंजूर करुन दरमहा दीडलाख रुपये देण्याचे कबुल केले. या युध्दात इंग्रज मुराररावांच्या बाजूने होते. मुराररावांनी इंग्रजांना अनेक वेळा सहकार्य केल्याचा उल्लेख येतो.

इ.स. १७५१ ते इ.स. १७६१ या दहा वर्षात हैदरअलीने दक्षिणेत आपली पकड मजबूत केली. त्यात इ.स. १७६१ मध्ये झालेल्या पानिपत युध्दातील पराभवामुळे मराठे खचून गेलेले होते. याचाच फायदा घेऊन हैदरअलीने मराठ्यांच्या प्रदेशामध्ये हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. माधवराव पेशव्यांनी हैदरअलीचा बंदोबस्त करण्यासाठी इ.स. १७६३ मध्ये कर्नाटक मोहीम हाती घेतली. त्यात मुराररावांनी सहभागी होऊन पराक्रम गाजविल्याने हैदरचा पराभव झाला. हैदरशी तह करुन मुरारराव आणि पटवर्धन यांना कोणताही त्रास देऊ नये असे ठरले. यानंतर दक्षिणेत मुरारराव व हैदर अली यांच्यातील संघर्षात वाढ झाली. इ.स. १७७६ मध्ये गुत्तीच्या किल्ल्याला वेढा देवून हैदर अलीने मुराररावांचा पराभव केला व त्यांना कपालदुर्गच्या किल्ल्यात कैद करुन ठेवले. तेथेच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूने दक्षिणेतील मराठ्यांचे फार मोठे कर्तृत्वस्थान संपले. एवढेच नव्हे तर कर्नाटकातील मराठेशाहीतील मराठ्यांचे नेतृत्वच नाहीसे झाले. मुराररावांनी इ.स. १७३७ पासून इ.स. १७७७ पर्यंत सुमारे चाळीस वर्ष दक्षिण भागात कर्तबगारी गाजविली. इंग्रज व फ्रेंच यांचा सत्ता संघर्ष, पेशवे-हैदरअली यांच्या लढाया, निजाम व कर्नाटकातील नबाब यांची भांडणे या सर्व प्रसंगांशी मुराररावांचा प्रत्यक्ष संबंध आला. किंबहूना दक्षिणेतील सर्व राजकीय व लष्करी हालचाली राजे मुराररावांना वगळून क्वचितच झाल्या असतील असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.

इ.स. १७७७ मध्ये राजे मुरारराव घोरपडेंच्या मृत्यूनंतर इ.स. १९२७ पर्यंत राजे, शिवराव, राजे सिध्दोजीराव दुसरे, राजे शिवराव दुसरे, राजे व्यंकटराव पहिले, राजे शिवषण्मुखराव, राजे

रामचंद्र विठ्ठलराव, राजे व्यंकटराव दुसरे या राज्यकर्त्यांनी दक्षिणेतील सोंडूरच्या हिंदुराव घोरपडे संस्थानचा राज्यकारभार सुरळीतपणे पाहिला.

२० जून १९२८ रोजी श्रीमंत यशवंतराव सोंडूरकर हिंदूराव घोरपडे सोंडूरच्या राजगादीवर विराजमान झाले. त्यांच्या कारकिर्दीत सोंडूर राज्याच्या कारभारात अनेक महत्वाच्या सामाजिक व राजकीय सुधारणा झाल्या. त्यांनी शासनव्यवस्थेच्या लोकशाहीकरणावर भर दिला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १ एप्रिल १९४९ रोजी महाराजांनी विलीनीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केली. त्यावेळी सोंडूर संस्थानाचे भारतात विलीनीकरण झाले. स्वातंत्र्योत्तर काळातही श्रीमंत यशवंतराव महाराजांनी औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाकडे लक्ष दिले. ११ ऑक्टो. १९९६ रोजी शिवविलास पॅलेस, सोंडूर येथे मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र मुरारराव दुसरे हिंदुराव घोरपडे घराण्याचे वारस झाले, ते उच्चविद्याविभूषित होते. श्रीमंत मुराररावांनी राजकीय क्षेत्रात देखील आपली छाप पाडलेली आहे. ते सलग ७ वेळा म्हणजे ३५ वर्ष कर्नाटक विधानसभेचे सदस्य होते. त्यातील तेरा वर्ष त्यांनी राज्याचे अर्थमंत्री, ग्रामविकास मंत्री म्हणून उत्कृष्ट कार्य केलेले आहे. याशिवाय कर्नाटकातील रायचूर मतदार संघातून लोकसभेवरही निवडून गेले होते. त्यांच्या ह्या प्रदिर्घ राजकीय कारकिर्दीमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यामध्ये त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. ऑक्टोंबर २०११ मध्ये श्रीमंत यशवंतराव घोरपडेंचे निधन झाले असून सध्या त्यांचे ज्येष्ठ पुत्र श्रीमंत अजयसिंह हिंदुराव घोरपडे २९ ऑक्टों. २०११ पासून घराण्याचे वारस आहेत.

दक्षिण भारतात सोंडूरकर हिंदूराव घोरपडे घराण्याने स्वत:च्या कर्तृत्वाने स्वतंत्रपणे आपला इतिहास घडविला. इतक्या विविध क्षेत्रात शौर्य गाजविणाऱ्या घराण्याचे ऐतिहासिक महत्व अनेक थोर इतिहासकारांनी गौरवाने लिहीलेले आहे. परंतु खेदाची बाब ही की महाराष्ट्र मात्र दक्षिणेतील या शुर मराठा घराण्याला विसरला आहे. मात्र रियासतकार गो. स. सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे, दक्षिणेतील हिंदुराव घोरपडे घराण्याच्या संघर्षाची योग्य दखल घेतल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास पूर्ण होऊच शकत नाही. त्यादृष्टीने सोंडूरकर हिंदूराव घोरपडे घराण्याच्या इतिहासाचा चिकित्सक अभ्यास करुन तो महाराष्ट्राला सुपरिचित व्हावा याकरीता या संशोधन विषयाची निवड केलेली आहे. सदर विषयाची वस्तूनिष्ठ व संशोधकीय दृष्टिकोनातून मांडणी करण्याचा प्रयत्न उपलब्ध संदर्भ साधने, पुरातत्त्व विभागातील साहित्य, लेखसंग्रह आणि उपलब्ध मूळ साहित्याच्या आधारे केलेला आहे.

❖❖❖

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते की, प्रा. नितीन उल्हासराव सराफ यांनी प्रस्तुत शोध प्रबंध "सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास : एक चिकित्सक अध्ययन" माझे मार्गदर्शनाखाली मुळ कागदपत्राचा व प्रकाशित व अप्रकाशित साधनांचा सातत्याने शोध घेऊन आणि स्थळांना भेटी देऊन अतिशय परिश्रमपुर्वक तयार केला आहे.

सदर प्रबंध त्यांचे स्वत:चे संशोधन कार्य असून सदर प्रबंध किंवा त्यातील अंश इतर कोणत्याही विद्यापीठात सादर केला गेला नाही किंवा प्रसिध्द झाला नाही. हा प्रबंध प्रथमच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला आचार्य पदवीकरिता सादर करण्यात येत आहे. प्रस्तुत शोधप्रबंध परिक्षणाकरीता परिक्षकांच्या स्वाधिन करतांना मला संतोष वाटत आहे.

दिनांक : १२।१।२०१६

ठिकाण : अमरावती

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. ग. का. माने**

विभाग प्रमुख

(इतिहास विभाग)

केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

# प्रकरण १ ले -

# घोरपडे वंशाचा पुर्वेतिहास

१.१ सिसोद्यांचे दक्षिणेतील आगमन

१.२ दक्षिणेतील बहामनी साम्राज्य

१.३ विजयनगरची लढाई (इ.स. १४२४)

१.४ खेळणा उर्फ विशाळगडची लढाई (इ.स. १४७०)

# प्रकरण पहिले

# घोरपडे वंशाचा पुर्वेतिहास

मराठ्यांच्या इतिहासात घोरपडे घराण्याने बजावलेली कामगिरी ही अनेक अर्थांनी गौरवास्पद ठरावी अशीच आहे. दक्षिण भारतात या घराण्याने स्वत:च्या उत्कृष्ट कामगिरीने आपला स्वतंत्र इतिहास घडविलेला दिसतो. मराठ्यांच्या इतिहासात या घराण्याला दैदिप्यमान लौकिक आणि प्रतिष्ठा लाभलेली आहे. घोरपडे घराण्याचा इतिहास जरी इ.स. १४७१ पासून सुरु होत असला तरीही घोरपडे राजघराण्याचे पुर्वज चित्तोडच्या सिसोदे घराण्यातील होते. घोरपडे घराणे उत्तरेकडून राजपुतांच्या इतिहासाशी निगडीत असुन दक्षिणेत महाराष्ट्रात मराठ्यांच्या संबंधित आहे. चित्तोडच्या सिसोदे घराण्याचे वारस उत्तरेकडील राजपाट सोडून स्वकर्तृत्वावर पराक्रम गाजविण्यास दक्षिणेत उतरले. ह्या वारसांनी दक्षिणेत गाजविलेल्या पराक्रमामुळेच दक्षिणेतील मराठ्यांच्या राज्याचा उदय-विकास मोठ्या प्रमाणात घडून आला. भोसले आणि घोरपडे ही दोन क्षात्र घराणी म्हणजे एकाच वंशाच्या दोन शाखा होत्या.[१] घोरपडे वंशातील वारसांनी दक्षिणेत सुरुवातीला बहामणी साम्राज्याची सेवा केली. बहामणी साम्राज्याच्या विघटनानंतर विजापूरच्या आदिलशहाकडे चाकरी केली आणि शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केल्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांच्या पराक्रमाने घराण्याची प्रतिष्ठा वाढवली. घोरपडे घराण्याने नंतरच्या काळात स्वत:ची स्वतंत्र राज्य (संस्थाने) निर्माण करुन मराठ्यांच्या साम्राज्यातील महत्वाचे सरदार राज्यकर्ते म्हणून ख्याती मिळवली. घोरपडे घराण्याचे मूळ हे चित्तोडच्या सिसोदे वंशातील होते.

## १.१ सिसोद्यांचे दक्षिणेत आगमन :

इ.स.च्या सहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत मेवाडवर गुहिलोत वंशाचे राज्ये होते.[२] बाराव्या शतकात त्या वंशाच्या दोन शाखा निर्माण झाल्या. एकीचे नाव रावळ व दुसरीचे राणा. रावळ रणसिंह (कर्णसिंह) याला १३ व्या शतकाच्या सुरुवातीला चित्तोडची जहागिरी मिळाली होती.

---

१. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती-डिसें. २००८, पृ. २.

२. जोशी, पं. महादेवशास्त्री, **भारतीय संस्कृतीकोश, खंड नववा,** आवृत्ती- नोव्हे. १९७६, पृ. ३६१

रणसिंहाच्या नंतर त्याचा मुलगा क्षेमसिंह चित्तोडच्या गादीवर बसला आणि रणसिंहाचा दुसरा मुलगा असलेला राहप याला सिसोदे येथील जहागीर मिळाली.[३] मेवाडच्या अधिपतींना रावळ तर सिसोदे येथील सरदारांना 'राणा' असे म्हणत असत. रावळ क्षेमसिंह यांच्या नंतर त्याचा मोठा मुलगा सामंतसिंह हा चित्तोडच्या राज्याचा अधिकारी झाला. सामंतसिंहाचा सातवा वंशज रावळ रत्नसिंह चित्तोडच्या गादीवर बसला आणि राहपाचा दहावा वंशज राणा लक्ष्मणसिंह हा सिसोदे जहागिरीची व्यवस्था पाहत होता. सिसोदे हे भारतातील राजपूत घराण्याशी संबंधित आहेत. ते सुर्यवंशी राजघराण्यातील छत्तरी प्रकारात मोडत असून त्यांनी राजस्थानातील मेवाडच्या साम्राज्यावर शासन केले आहे. घोरपडे घराण्याचे पूर्वज चित्तोडच्या सिसोदे घराण्यातील होते.[४]

उत्तर भारतात इ.स. ७१२ पासुन मुस्लीम आक्रमणांना सुरुवात झाली. इ.स. १२०६ ते इ.स. १५२६ हा कालखंड सुलतानशाहीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. याच काळातील खिलजी वंशाचा सर्वश्रेष्ठ सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने राणा रतनसिंहाच्या चित्तोडवर आक्रमण केले.[५] त्यावेळी चित्तोडवर राणा रत्नसिंह हा शासक होता. अल्लाउद्दीनने केलेल्या हल्ल्यामध्ये राणा रत्नसिंहाचा मृत्यु झाला. राणा रत्नसिंहाला त्याच्याच परिसरातील सिसोद्याचा शासक राणा लक्ष्मणसिंह याने देखील आपल्या आठ मुलांसह मदत केलेली होती. राणा लक्ष्मणसिंह हा आपल्या आठ मुलांसह सुलतान अल्लाउद्दीन खिलजीशी लढत असता तो व त्याचे सात मुलं या युध्दात ठार झाले. राणा लक्ष्मणसिंहानंतर केवळ त्याचा राणा अजयसिंह हा एकमेव मुलगा जिवंत राहिला. वडिलांच्या मृत्यूनंतर राणा अजयसिंहानेच आपल्या वडिलांची सिसोदे येथील जहागीर सांभाळण्याचे कार्य पार पाडले.

राणा अजयसिंह हा सिसोदे येथील वंशपरंपरागत मालक बनला. त्यास सुजनसिंह आणि क्षेमसिंह असे दोन पुत्र होते. अजयसिंहाच्या राज्यात मुंजा नावाचा बंडखोर दंगा करीत होता. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी त्याने आपल्या सुजनसिंह व क्षेमसिंह या दोनही मुलांना पाठविले. बऱ्याच प्रयत्नानंतरही दोघांनाही यश आले नाही. राणा अजयसिंहास राणा हमीर नावाचा पुतण्या होता. त्यास त्याच्या पुतण्याच्या विरतेवर व शौर्यावर अधिक विश्वास होता. मुलांच्या अपयशी कामगिरीनंतर

---

३. जोशी, पं. महादेवशास्त्री, **भारतीय संस्कृतीकोश, खंड नववा**, आवृत्ती- नोव्हे. १९७६, पृ. ३६१

४. गर्गे, स. मा., श. ह. वर्टीकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती- १९७४, पृ. १७

५. चंद्र, सतीश, **मध्यकालीन भारत, प्रथम भाग**, आवृत्ती- २००३, पृ. ३

त्याने मुंजा बंडखोराचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी आपला पुतण्या हमीर याचेवर सोपवली. हमीर स्वत: धाडसी व वीरवृत्तीचा होता. मुंजा बंडखोर गोडवाड प्रांतातील साभेरी गावात यात्रेस गेला असतांना राणा हमीद याने साभेरी गावावर हल्ला करुन मुंजाचा पराभव केला. त्याचे शिर कापून अजयसिंहासमोर सादर केले. राणा अजयसिंहाला राणा हमीरचे हे शौर्य अधिक आकर्षक वाटले. त्यामुळे अजयसिंहाने आपल्या जहागिरीवरील मुलांचा हक्क (सुजनसिंह आणि क्षेमसिंह) डावलून पराक्रमी पुतण्या राणा हमीर यास आपला वारस म्हणून नेमले. या घटनेमुळे दु:खी होवून सुजनसिंह लष्करात कारकिर्द करण्यासाठी दक्षिण भारताकडे इ.स. १३३४ मध्ये निघाला आणि पुढील काळात तिकडेच पराक्रम गाजवून प्रसिध्दीस पावला. राज्यविभागाकारणे आपल्या चुलत भावाशी (राणा हमीरशी) भांडत बसण्यात काही अर्थ नाही. तर स्वबाहुबलेकरुन नूतन राज्य संपादन करण्यात वास्तविक पुरुषार्थ आहे असा विचार सुजनसिंहाच्या मनात आला. त्याने सोंधवाड प्रांत काबीज करुन आपली गादी स्थापित केली.[६] याच सुजनसिंहाचा सजनशिवजी महाराणा[७], सजनसिंह तसेच सज्जनसिंह असाही काही ठिकाणी उल्लेख केलेला आढळतो. सुजनसिंहाचा भाऊ राणा क्षेमसिंह याने वडिलांच्या या कृत्याचा धसका घेवून निराश होवून आत्महत्या केली. तिकडे राणा हमीरने इ.स. १३२६ मध्ये चित्तोड ही आपल्या जहागिरीची राजधानी बनवली.

इ.स. १३३४ मध्ये सुजनसिंह आपल्या काही विश्वासू सहकाऱ्यांसह दक्षिणेकडे निघाला. त्याचा कालावधी इ.स. १२९० ते १३५५ असा सांगता येतो. त्यावेळी भारतातील प्रबळ सत्ता असलेले देवगिरीचे राज्य खिलजी वंशाचा दिल्लीचा अल्लाउद्दीन खिलजी याच्या आक्रमणामुळे नष्ट झाले. अल्लाउद्दीनने आपला सेनापती मलिक काफूरच्या नेतृत्वाखाली दोन वेळा विंध्यपर्वतापासून दक्षिणेला कृष्णा नदीपर्यंत पसरलेल्या विशाल, शक्तिशाली व धनधान्य समृध्द अशा देवगिरांच्या साम्राज्यावर आक्रमण केले. या आक्रमणामुळे देविगिरीचे सामर्थ्यशाली साम्राज्य उध्वस्त झाले. यानंतर सप्टेंबर १३२० मध्ये उत्तरेकडील दिल्लीतील खिलजी घराण्यातील राजवट सुध्दा संपुष्टात आली. तेथे गाझी मलीक नावाच्या पंजाबच्या सुभेदाराने तुघलक वंशाची सत्ता प्रस्थापित केली. इ.स. १३२५ मध्ये

---

६. केळूसकर, कृ. अ., छत्रपती शिवाजी महाराज, आवृत्ती - मे २०१०, पृ. ४.

७. भावे, लक्ष्मण विनायक, मराठी दप्तर, रुमाल पहिला, लेखांक १, आवृत्ती- शके १८३९,पृ. १.

दिल्लीच्या गादीवर महंमद तुघलक सुलतान म्हणून बसला.[८] तो सुध्दा अल्लाउद्दीन खिलजीप्रमाणे साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कर्ता होता. त्यामुळे इ.स. १३२५ ते १३५१ या त्याच्या कालखंडात सर्वत्र अनागोंदी माजलेली होती. दिल्लीपासून रामेश्वरपर्यंत पसरलेल्या राज्याची सुत्रे दिल्लीतून चालविणे त्याला कठीण जावू लागल्यामुळे त्याने आपल्या साम्राज्याची राजधानी दिल्लीवरुन दौलताबाद(देवगिरी) येथे नेली. दौलताबाद येथे राजधानीचे ठाणे केल्यामुळे दिल्ली-लाहोरकडील बंदोबस्ताकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होवू लागले. सुलतान महंमद तुघलककडे व्यवहारीपणा, निश्चयीपणा, करारीपणा, दुरदृष्टी या गोष्टींचा आणि त्याच्या अस्थिर धोरणामुळे त्याचे सरदार एक तर भयभीत असत किंवा दिल्लीच्या सत्तेविरुध्द बंडाच्या हालचाली तरी करित असत अशा या राजकीय अस्थिर वातावरणाच्या वेळी राणा सुजनसिंह दक्षिण भारतात पोहोचला.

## १.२ दक्षिणेतील बहामनी सत्ता :

तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रामध्ये देवगिरीच्या यादवांची सत्ता होती.[९] अल्लाउद्दिन खिलजीच्या आक्रमणांमुळे दक्षिणेतील यादवांच्या सत्तेचा शेवट झाला. अल्लाउद्दिनच्या आक्रमणानंतर दक्षिणेत मुसलमानांच्या स्वाऱ्या वरचेवर होवू लागल्या. महंमद तुघलकच्या कारकिर्दीत दक्षिणेत अस्वस्थता व अशांतता निर्माण होवू लागली. दक्षिणेतील मुस्लीम सरदार महंमद तुघलकाचे आदेश पाळत नसत. त्यासाठी त्यांचा बंदोबस्त करता यावा याकरीता महंमद तुघलकाने आपली उत्तरेकडील राजधानी दक्षिणेत देवगिरीस आणण्याचे इ.स. १३२६ मध्ये ठरविले. त्यासाठी देवगिरीचे नाव बदलून दौलताबाद असे ठेवले. परंतु हा बेत फसल्याने त्याने हसन उर्फ झाफरखान यास दक्षिणेच्या बंदोबस्ताकरिता नेमले.[१०]

महंमद तुघलकाच्या कारकिर्दीत दक्षिण भारतात जी अनेक स्वतंत्र राज्ये उदयास आलीत त्यापैकी एक बहामनी राज्य होय. फेरिश्ताने लिहून ठेवलेल्या माहितीवरुन बहामनी राज्याच्या उदयास्ताची हकीकत कळते. दक्षिणेतील मुस्लिम सरदारांनी एकत्र येवून इस्माईल मख या पठाण

---

८. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला**, आवृत्ती - २०१२, पृ. १४३.

९. देशपांडे, प्र. न., **छत्रपती शिवाजी महाराज**, आवृत्ती -ऑगस्ट २००२, पृ. १.

१०. ओतूरकर, रा. वि., **मराठ्यांचे साम्राज्य**, आवृत्ती- १९३७, पृ. ९.

सरदाराच्या नेतृत्वाखाली महंमद तुघलकाच्या साम्राज्याविरुध्द बंड करुन दौलताबाद येथे स्वतंत्र राज्याची निर्मिती केली. इस्माईल मख हा वृध्द असल्यामुळे त्याने आपल्या राज्याची सुत्रे हसन उर्फ झाफरखान ह्या महंमदाने दक्षिणेतील बंदोबस्तासाठी नेमलेल्या सरदाराकडे सोपविली. त्यावेळी दक्षिणेतील बंडाचा बंदोबस्त करण्यासाठी सुलतान महंमद तुघलक मोठ्या सैन्यानिशी दक्षिणेवर चालून आला. त्यावेळी हसन गंगू (झाफरखान) निवडक सैन्य आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी जमा करीत होता. त्यावेळी राणा सुजनसिंह, त्याचा पुत्र राणा दिलीपसिंह आपल्या इतर सोबत्यांसोबत हसन गंगू जवळ येवून पोहोचला. हसन गंगूलाही नव्या आणि त्याच्या दमाच्या शुर सहकाऱ्याचे पाठबळ हवेच होते. त्यामुळे हसन गंगू आणि सुजनसिंह यांचा मिलाप होण्यास वेळ लागला नाही.

हसन गंगूने राणा सुजनसिंह व त्याच्या सहकाऱ्यांना आपल्या सैन्यात नोकरीस ठेवून घेतले. हसनगंगूच्या बंडाचा बिमोड करण्यासाठी महंमद तुघलकाने फौजा पाठविल्या, बिदरच्या किल्याजवळ सुलतानाच्या फौजा व हसनगंगूच्या सैन्याची गाठ पडली. इ.स. १३४७ मध्ये दोन्ही सैन्यांमध्ये युध्द होवून महंमद तुघलकाच्या सैन्याचा पराभव झाला व हसनगंगूला मोठा विजय मिळाला. या युध्दात सुजनसिंह व दिलीपसिंह या पितापुत्रांनी मोठा पराक्रम गाजविला. इस्माईल मख हा वृध्द असल्याने त्याने नवीन राज्याची जबादारी हसनगंगू (झाफरखान) या तडफदार सरदाराच्या हाती दिली. हसनगंगूने स्वत:ला 'अब्दुल मुजफ्फर अल्लाउद्दिन बहमनशहा' असा किताब घेवून गादीवर बसला. १२ ऑगस्ट १३४७ रोजी बहामनी राज्याची स्थापना केली[११]. त्याच्या राज्यास बहामनी हे नाव देण्याची अनेक कारणे इतिहासकार देतात. परंतु इराणमधील बहामनी वंशाशी आपला संबंध आहे हे सिध्द करण्यासाठी हसनगंगूने आपल्या राज्यास बहामनी राज्य व स्वत:स बहमनशहा असे संबोधले असे व्हिन्सेट स्मिथ म्हणतो.[१२] तोच बहामनी राज्याचा संस्थापक झाला. त्याने आपल्या राज्याची राजधानी दौलताबादहून गुलबर्गा येथे नेली.

सुजनसिंह व दिलीपसिंह या पितापुत्रांनी हसनगंगू याला बहामनी सत्ता वाढविण्याच्या कामी खुप मदत केली. त्यामुळे बहामनी राज्याचा संस्थापक हसनगंगू बहामनी याचे सुजनसिंह व

---

११. गर्गे, स. मा., **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती-२०१२, पृ. २०६.

१२. ओतूरकर, रा. वि., **मराठ्यांचे साम्राज्य,** आवृत्ती - १९३७, पृ. ९.

दिलीपसिंहाशी सख्य जोडले गेले. त्याने या पितापुत्रांवर अनेक मुलकी व लष्करी कामगिऱ्या सोपविल्या आणि तेव्हापासुन सुजनसिंहांच्या घराण्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली.[१३] दक्षिणेतील मुधोळचा अधिपती नारायण हा बहामनी साम्राज्याविरुध्द कुरापती करीत असे. नारायणावरील मोहिमेत राणा सुजनसिंह व त्याचा मुलगा दिलीपसिंह यांनी सुलतानला अतिशय सहाय्य केले होते.[१४] हसनशहा बहामनी याने बहामनी साम्राज्याची सत्ता हातात घेतल्यानंतर साम्राज्य स्थापनेकरीता मदत करणाऱ्या सरदारांना व सैनिकांना सढळ हाताने इनामे दिली. राणा सुजनसिंह व त्याच्या मुलाने दाखविलेला पराक्रम व निष्ठा लक्षात घेवून बहामनीने त्यांचा उचित गौरव केला.

राणा सुजनसिंह व दिलीपसिंह यांनी आपल्या अंगच्या पराक्रमाचा विकास होण्यासाठी अनुकूल अशी परिस्थिती दक्षिणेत मुख्यत: बहामनी साम्राज्याने निर्माण करुन दिली. ह्या संधीचा त्या दोघांनीही पुरेपूर फायदा करुन घेतला आणि बहामनी राज्याच्या चिरस्थायित्वासाठी आणि विस्तारासाठी मनोभावे कार्य केले. सुजनसिहांच्या कामगिरीवर खूष होऊन हसनशहा बहामनीने इ.स. १३५२ साली त्याचा मुलगा दिलीपसिंह यास जहागीर दिली. त्या संबंधीच्या सनदेत म्हटले आहे, 'अजयसिहांचा नातू आणि सजनसिहांचा मुलगा, खाशांच्या घोडेस्वारांचा मुख्य (दिलीपसिंह) याने रणांगणावर दाखवलेल्या पराक्रमावरुन त्याच्याबद्दल विश्वास वाटतो. त्याचे पालनपोषण करणे कर्तव्य आहे, असे जाणून देवगडातर्फे पैकी मेहरट (मिरीठ) मधील दहा गावे त्यास बक्षिस दिली आहेत. तरी त्याच्या इच्छेप्रमाणे ती गावे त्याच्याकडे चालु करावी. ता २५ रमजान सन ७९३ हिजरी.' (४ नोव्हेंबर १३५२)[१५] वरील सनदेमुळे दिलीपसिंहाने अनेक विशेष पराक्रम केले असावेत हे सिध्दच होते. पण या पराक्रमांबरोबरच त्याच्या कार्याने बहमनशहा त्याच्यावर खुष होत होता आणि त्यामुळेच राणा दिलीपसिंहाला खासखेलीचाही अधिकार मिळाला होता. बहामनी बादशहाच्या संरक्षणासाठी त्यांच्या महालात आणि दरबरात वावरण्याचा ज्यांना अधिकार होता अशा लष्करी तुकडीच्या प्रमुखाला खासखेल ही संज्ञा त्यावेळी देण्यात येत होती, हा मान दिलीपसिंहाला मिळालेला होता. इ.स. १३५५ मध्ये सुजनसिहांचा मृत्यु झाला. राणा दिलीपसिंहाने आपल्या वडिलांच्या बरोबर बहामनी

१३. कुलकर्णी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला**, आवृत्ती- १९८४, पृ. ४०३.

१४. कुंटे, भ. ग., **बहामनी राज्याचा इतिहास**, आवृत्ती- जुलै १९६६, पृ. १७.

१५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. १५.

साम्राज्यासाठी खुप पराक्रम केलेला होता. अल्लाउद्दिन हसन बहमनशहा याने शहाणपणाने आणि खंबीरपणे राज्यकारभार केला. तो इ.स. १३५९ मध्ये मृत्यूमूखी पडला. त्याचा मोठा मुलगा महंमदशहा यास त्याने आपल्या हयातीतच आपला वारस म्हणून नेमलेले होते.[१६]

महंमदशहा बहमनशहा याने गादीवर आल्यावर दिलीपसिंहास पूर्वीच्या जहागिरीचे अधिकार पुन्हा दिले. सुलतानाने राज्यपदावर आल्याबरोबर इ.स. १३६० मध्ये विजयनगरच्या राजा बुक्कावर आक्रमण केले. त्यावेळी विजयनगरचा राजा बुक्क आणि तेलंगणाचा राजा कृष्ण नायक यांच्या संयुक्त फौजेने युध्द सुरु केले. महंमदशहाच्या फौजेने या संयुक्त फौजांचा कौलास येथे पराभव केला.[१७] या युध्दात दिलीपसिहांने पराक्रम गाजवून बहामनीशाहीत आपली योग्यता वाढविली. या पराभवानंतर कृष्णानायकाने १ लक्ष होन आणि ५५ हत्ती खंडणी म्हणून बहामनीना दिले. इ.स. १३६६ मध्ये विजयनगरवर केलेल्या स्वारीतही राणा दिलीपसिंहाने उत्तम पराक्रम दाखविल्यामुळे महंमदशहाने त्याचा विशेष गौरव केला. महंमदशहाच्या अठरा वर्षाच्या कारकिर्दीत राणा दिलीपसिंहाने आपल्या पराक्रमाची छाप बहामनी सुलतानांवर व साम्राज्यावर टाकलेली दिसते. त्यामुळेच दिलीपसिंहाच्या मृत्यूनंतर (इ.स.१३६७) त्याच्या जहागिरीचे अधिकार व त्याचे खासखेलचे अधिकारही त्याचा पुत्र सिध्दजी यास देवून त्याला बहामनी राज्यात नोकरीत रुजू करुन घेतले. राणा सिध्दजी आपल्या वडिलांप्रमाणेच खुप पराक्रमी होता.

महंमदशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मुजाहिद शहा हा गादीवर आला तेव्हा त्याने देखील सिध्दजीस खासखेलचे अधिकार पूर्ववत दिलेले होते. मुजाहिद व त्याचा चुलता दाऊद यांच्यात विजयनगरच्या स्वारीत संघर्ष उडाला, त्याप्रसंगी झालेल्या अपमानाचा सूड घेण्यासाठी दाऊदने मुजाहिदचा खून केला व आपल्या नावे बादशाही मिळवण्यासाठी त्याने राज्यात अंतर्गत बंडाळी माजविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सिध्दजी व त्याचा मुलगा बहिरसिंग (भोसाजी) यांनी दोघांनीही राजधानीचे संरक्षण उत्तम रितीने केले होते. मुजाहिदशहास दाऊदशहाखान याने मारेकरी घालून ठार मारले[१८] आणि तो बहामनी राज्याचा बादशहा बनला. मुजाहिदशहाची बहिण रुथ परवद आगा

---

१६. कुंटे, भ. ग., **बहामनी राज्याचा इतिहास,** आवृत्ती- जुलै १९६६, पृ. २८.

१७. **कित्ता,** पृ. ३०.

१८. गर्गे, स. मा., **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती-२०१२, पृ. २०९.

हिने आपल्या भावाच्या मृत्यूचा सूड उगविला.[१९] तिच्याच आग्रहामुळे शेवटी मुजाहिदचा भाऊ महंमदशहा दुसरा यास सुलतान म्हणून सिंहासनावर बसविले. सुलतान महंमदशहा सुस्वभावी, शांत प्रवृत्तीचा, न्यायी व विद्वान असल्यामुळे त्याच्या कार्यकाळात बहामनी साम्राज्याचा राज्यकारभार सुरळीत चालला. राणा सिध्दजी आणि राणा भोसाजी हे पितापुत्र शमसुद्दीन बहामनीच्या काळात सागरच्या किल्याचे किल्लेदार होते. मात्र त्या दोघांचीही कारकिर्द खऱ्या अर्थाने बहरली ती फिरोजशहा बहामनीच्या काळात.

१४ फेब्रुवारी १३९७ रोजी शमसुद्दीन बहमनशहा हा बादशहा म्हणून गादीवर बसला.[२०] त्यावेळी त्याचा चुलता फिरोजशहा ह्यानेही सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला होता. दरबारातील शमसुद्दीनच्या विरोधकांना एकत्रीत करुन सुलतानाच्या विरोधात कारस्थान सुरु केले. फिरोजशहाला राणा सिध्दजी आणि राणा भोसाजी यांनी मदत करण्याचे आश्वासन दिले. दोन्ही बाजूच्या सैन्याची फार मोठी लढाई झाली. झालेल्या या लढाईत सिध्दजी मरण पावला. तरीही भोसाजीने फिरोजची साथ सोडली नाही. राणा भोसाजीने फिरोजसह मोठ्या हिमंतीने वजीर व शमसुद्दीन दोघांनाही कैद केले. सुलतान शमसुद्दीन याची कारकिर्द ५ महिने आणि ७ दिवस झाली. त्यानंतर फिरोजशहाने सत्ता हाती घेतली. सत्ता हातात घेतल्यानंतर फिरोजशहा बहामनीने राणा सिध्दजीची मदत आणि राणा भोसाजीने दिलेल्या पाठिंब्यामुळे त्यांना रायबागतर्फेतील चौऱ्याऐंशी गावांची जहागीर दिली. त्यातच मुधोळचा समावेश होता. इ.स. १३९८ पासून सिसोदे घराण्यातील सुजनसिंहाच्या वंशजांची सत्ता दक्षिण भारतात सुरु झाली.

या जहागिरीसंबंधी बादशहाने राणा भोसाजीला दिलेल्या सनदेत सागर किल्ल्याच्या लढाईचे आणि त्यानंतर राणा भोसाजीने दिलेल्या पाठिंब्याचे विस्तारपुर्वक वर्णन केलेले आहे. त्या सनदेचा आशय पुढीलप्रमाणे आहे : 'या राज्याच्या काही सेवकांनी बादशाही वारसांच्या अज्ञानाचाच फायदा घेतला. काही अदूरदर्शी उमरावांनी योग्य वेळीच त्या सेवकांची कारस्थाने हाणून पाडली नाहीत. त्यांच्या हलगर्जीपणामुळे बादशाही चाकरांनी अधिक धिटाई केली. आज्ञाधारकत्वाचा गुण सोडला.

१९. कुंटे, भ. ग., **बहामनी राज्याचा इतिहास**, आवृत्ती - जुलै १९६६, पृ. ३९.
२०. गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. १५.

कृतज्ञताही त्यांच्या मनात राहीली नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून राज्याच्या कारभारात गोंधळ निर्माण झाला. भांडणे सुरु झाली. ही सर्व भांडणे नाहीशी करण्याचा बादशहाने निर्णय केला आहे. परिस्थिती काही काळ आमच्या विरुध्द होती. त्यामुळे योग्य उपाययोजने शक्य झाले नाही, दिरंगाई झाली, निष्ठावान लोकांच्या सहाय्याने राज्याच्या शत्रूंचा आणि कृतघ्न सेवकांचा नाश करावा असे आम्ही ठरविले. सागर किल्ला सर करण्यासाठी सैन्यासह त्या दिशेने कुच केले. सागरचा किल्लेदार सिध्दजी आमच्या सैन्याच्या आगमनाची बातमी ऐकून आमचे स्वागत करण्यासाठी पुढे धावून आला. आमची सेवा करण्याचे त्याने आश्वासन दिले. ते पूर्ण करण्यासाठी त्याने सैन्याची चांगली तयारी केली. त्याला जी आज्ञा करावी ती त्याने पार पाडावी असेच घडत गेले. विरोधकांनी लढाईची तयारी केली, तेव्हा या एकनिष्ठ सेवकाने आपल्या पराक्रमाची शर्थ केली. त्यापायी स्वत:चा प्राण खर्ची घातला. सिध्दजीचा मुलगा राणा भोसाजी हाही त्या लढाईत बापाबरोबर विरोधकांशी शौर्याने लढला. थोड्याच काळाने आमचा हेतू साध्य झाला. भोसाजीने आमची कृपा संपादन केली. त्यासाठी आम्ही त्यास रायबागतर्फे तील चौऱ्याऐंशी गावांसह मुधोळ कर्यात बक्षीस दिली आहे. त्याने तो मुलूख वंशपरंपरेने आपल्या ताब्यात ठेवून चाकरी करीत रहावे.'(ता. १५ जाने. १३९८)[२१]

भैरवसिंग उर्फ भोसाजी यांच्या पिढीपासून सिसोदे घराण्याच्या शाखेस 'भोसले' हे उपनाव रुढ झाले. पुढे महाराष्ट्रातील मराठ्यांच्या साम्राज्याची निर्मिती करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या वंशाचे मुळपुरुष म्हणून भोसाजींचा उल्लेख करता येतो. शुभकृष्णाच्या वंशजांना अजुनही भोसले या नावानेच ओळखतात.[२२] भोसले हे नामांतर नेमके कोणत्या कारणामुळे झाले या विषयी मात्र कोणतेही स्पष्ट कारण इतिहासात सापडत नाही. कारण त्याकाळी देण्यात येणाऱ्या सनदांवर त्या व्यक्तीचे आडनाव लिहण्याची कोणतीही पध्दती अस्तित्वात नव्हती, केवळ त्या व्यक्तीचे वडील किंवा आजोबाचे नाव लिहीण्याची प्रथा होती.

राणा भोसाजीस दोन मुले होती. देवराज आणि कर्णसिंह (पहिला) त्यांनी देखील आपल्या पित्याप्रमाणेच पराक्रम गाजवून बहामनी साम्राज्याची सेवा केली.

---

२१. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. १५.

२२. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती - एप्रिल २०११, पृ. १९.

## १.३ विजयनगरची लढाई (इ.स. १४२४):

उत्तरेस महंमद तुघलकाची सत्ता सुरु असतांना दक्षिणेत मात्र मोठ्या प्रमाणात त्याच्या विरुध्द बंड सुरु होते. त्यावेळी विजयनगर सारख्या हिंदू राज्याचा उदय दक्षिण भारतात इ.स. १३३६ मध्ये घडून आला. पुढील काळात ह्या राज्याची एकसारखी भरभराट होत गेली आणि एक बलाढ्य, ऐश्वर्यसंपन्न व उन्नतीच्या शिखरावर विराजमान झालेले साम्राज्य म्हणून ते नावारुपास आले. दक्षिणेतील वारंगळ राज्याचा शासक प्रतापरुद्रदेवाच्या पदरी असलेल्या हरिहर व बुक्क ह्या दोन भावंडांनी तत्कालीन पंडीत स्वामी विद्यारण्य उर्फ माधवानंद ह्यांच्या सल्ल्याने तुंगभद्रेच्या दक्षिण तटावर इ.स. १३३६ मध्ये विजयनगर (विद्यानगर) ची स्थापना केली.[२३] ह्या राज्यात कृष्णा व तुंगभद्रा ह्या दोन नद्यांच्या दक्षिणेकडील मुलखाचा व मलबार प्रातांचा समावेश होता.

बहामनी साम्राज्याची स्थापना इ.स. १३४७ मध्ये दक्षिणेतच झाली. त्यामुळे दक्षिणेत साम्राज्यविस्ताराच्या वेळी दोन्ही सत्ता छोट्या मोठ्या कारणांसाठी अनेकवेळा आमनेसामने येत. इ.स. १४१२ मध्ये बहामनी सुलतान फिरोजशहाने विजयनगर साम्राज्याचा सम्राट देवरायावर आक्रमण केले. घटना अशी घडली की, मुदगल येथील एका हिंदू शेतकऱ्याच्या सुरुप मुलीची इच्छा सम्राट देवरायाने केली. त्यामुळे बहामनी सुलतानाशी युध्द झाल्याचा उल्लेख आढळतो.[२४] या युध्दासाठी सुलतान फिरोजशहाने भोसाजी पुत्र देवराज व कर्णसिंह यांना पाठविले. त्यांनी पराक्रम गाजवून देवरायाचा पराभव केला. विजयनगरचा सम्राट देवरायाने सुलतानास पुष्कळशी संपत्ती, बंकापुरचा किल्ला आणि आपली मुलगी देवून कसाबसा आपला बचाव करुन घेतला. त्याचवर्षी झालेल्या रायबागच्या युध्दात कर्णसिंह पहिला मारला गेला. देवराज मात्र बहामनी साम्राज्याची इमाने इतबारे सेवा करीत होता.

राणा देवराज याने अहमदशहाला बहामनी साम्राज्याच्या गादीवर बसविण्यात महत्वाची भूमिका बजावली. देवराजाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा इंद्रसेन इ.स. १४२२ मध्ये आपल्या घराण्याचा प्रमुख बनला. त्याने बहामनी सुलतान अहमदशहा याला मोठी मदत केली. इंद्रसेन हा खुप धिप्पाड

२३. उपाध्याय, श्री. वासूदेव, **विजयनगर साम्राज्य का इतिहास,** आवृत्ती- १९४५, पृ. १०.
२४. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती- २०१२, पृ. २७७.

व रागीट असल्याने दख्खनी लोक त्यास उग्रसिंह असे म्हणत. इंद्रसेन घराण्याचा प्रमुख बनल्यामुळे त्याच्या पुर्वजांनी जहागीर वारसाहक्काने त्याच्याकडे आली. इंद्रसेन आपल्या पुर्वजाप्रमाणेच पराक्रमी होता त्याने बहामनी साम्राज्यासमोरील अडचणी सोडविण्यात सुलतानाची नेहमीच मदत केली. इ.स. १४२३ मध्ये बहामनी सुलतान अहमदशहा व विजयनगरचा राजा देवराय दूसरा यांच्यात युध्द सुरु झाले. तेव्हा देवराय दुसरा याने मोठ्या शौर्याने मुसलमानी सेनेचा मुकाबला केला. या युध्दात इंद्रसेन याने पराक्रम गाजवून हिंमतीने पुढाकार घेवून सुलतान अहमदशहाचे प्राण वाचविले.

कोकण प्रांतातील राजांना बहामनी सुलतानाचे अंकित बनविण्यासाठी सुलतानाने इंद्रसेन आणि त्याचा चुलत भाऊ प्रतापसिंह यांना कोकण मोहिमेवर पाठविले. त्यावेळी इंद्रसेनाने मोठा पराक्रम गाजविला आणि कोकणातील राज्यकर्त्यांना बहामनी सुलतानाचे मांडलिकत्व स्विकारण्यास भाग पाडले. इ.स. १४३७ मध्ये खानदेशचा प्रदेशही ताब्यात घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. खानदेशचा नसीरखान याच्या विरोधात रोहनखेड येथे युध्द झाले. या युध्दातही हसन बसरी, इंद्रसेन व प्रतापसिंह यांनी खुप पराक्रम गाजविला पण याच युध्दात हसन बसरी ठार झाला आणि इंद्रसेनाला अटक झाली. इंद्रसेनाचा मुलगा राणा कर्णसिंह व राणा शुभकृष्णसिंह यांनी इंद्रसेनाची पराक्रमाने सुटका केली.

राणा इंद्रसेनाने बहामनी सुलतानाकडे ३४ वर्ष सेवा दिली. इ.स. १४५५ मध्ये त्याचा मृत्यू झाला. राणा इंद्रसेनाने कोकण, विजयनगर तसेच खानदेशच्या मोहिमेत केलेल्या पराक्रमाविषयी सुलतानाने दिलेल्या सनदेत स्पष्ट उल्लेख केलेला दिसतो. त्या सनदेचा आशय पुढील प्रमाणे आहे.

राणा भोसाजीचा नातू आणि देवराजचा मुलगा राणा इंद्रसेन याने विजयनगरच्या लढाईत लढतांना जे शौर्य दाखविले ते बादशहाच्या मनावर कायमचे ठसले आहे. या पुर्वीही इंद्रसेनाच्या वाडवडिलांनी बहामनी राज्यासाठी निष्ठा दाखवली आणि प्रसंगी प्राणही खर्ची घातले. राणा इंद्रसेनाचा आजा राणा भोसाजी आणि पणजा सिध्दजी हे सागरच्या किल्ल्याचे किल्लेदार होते, तेव्हा त्यांनी असेच पराक्रम दाखविले. गादीवर बसवण्याच्या कामात मदत केली अशा घराण्याचे संगोपन करणे

आम्हाला उचित आहे. म्हणून बादशहाने रायबागतर्फेचे चौऱ्याऐंशी गावे मुधोळसह जहागीर म्हणून राणा भोसाजीस दिले ते व मिरठ व पाथरी यांच्या भोवतालचा जो प्रदेश इनाम म्हणून पूर्वीपासून चालू आहे तो सर्व आम्ही इंद्रसेनास बहाल करतो. त्याने अधिक सेवाचाकरी करुन आमचा विश्वास संपादन करावा. (ता. ३ सप्टें. १४२४)[२५]

### १.४ खेळणा उर्फ विशाळगडची लढाई :

सुलतान अहमदशहा याचा मृत्यू इ.स. १४३४ मध्ये झाला.[२६] त्याच्या मृत्यूनंतर गादीवर येणारे सुलतान हे मोठ्या प्रमाणात अत्याचारी व क्रुर होते. त्यामुळे बहामनी साम्राज्यात खुनांचे सत्रच सुरु होते. हुमायूंशहा (इ.स. १४५७-इ.स. १४६१) यांच्या अत्याचाराच्या कथा प्रसिध्द आहेत. हुमायूनशहाचा तीन वर्षाच्या कालावधीतच खून झाला. त्याच्यानंतर गादीवर त्याचा मुलगा निजामशहा यास बसविण्यात आले. तो अल्पवयीन असल्यामुळे बहामनी साम्राज्याची सूत्रे महंमद गवान नावाच्या हुशार आणि कर्तबगार वजीराकडे होती. दक्षिण भारतात ह्याकाळात परदेशी व देशी मुसलमान असा भेदाभेद सुरु होऊन त्यांच्यातील तणाव वाढत चालला होता. ह्या सर्व अडचणी सोडवून मुसलमानांमध्ये एकोपा घडवून आणण्याचे प्रयत्न बहामनी राज्याचा कर्तबगार व श्रेष्ठ वजीर महंमद गवानाने केले. तसेच दक्षिणेतील हिंदू आणि मुसलमान या दोन जमातींमध्ये सलोखा निर्माण करण्याचे प्रयत्न सुध्दा त्याने केले. त्यासाठीच त्याने बेळगावचा अधिपती परकत याला अमीरपद द्यावे असा सल्ला सुलतानास दिलेला होता.[२७]

राणा इंद्रसेनाचा मुलगा व राणा देवराजाचा नातू कर्णसिंह (दुसरा) हा विशेष पराक्रमी निघाला. तो बहामनी राजवटीत प्रसिध्द झाला. राणा इंद्रसेनाच्या मृत्यूनंतर (इ.स. १४५५) त्याचा मुलगा कर्णसिंह (दुसरा) हा त्याचा वारसदार होता. त्याने व त्याचा पुत्र राणा भिमसिंह या दोघांनीही बहामनी राज्याच्या वाढीसाठी व संरक्षणासाठी मोठ्या लढाया जिंकल्या.[२८] या पितापुत्रांनी तेलंगण, ओरिसा, गुजरात, माळवा आणि शेवटी कोकण अशा पाचही प्रदेशात झालेल्या लढायात आपली

२५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. १७.
२६. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला**, आवृत्ती-२०१२, पृ. २१३.
२७. कुंटे, भ. ग., **बहामणी राज्याचा इतिहास**, आवृत्ती - जुलै १९६६, पृ. १४१.
२८. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा**, आवृत्ती-१९८६, पृ. ४०४.

मर्दुमकी गाजविली[२९] व बहामनी साम्राज्याचा वचक निर्माण केला. तेलंगणा प्रदेशात सुभेदार असणाऱ्या सिकंदर खानाने अल्लाउद्दिन बहमनशहा दुसरा याच्या कारकिर्दीत बहामनी साम्राज्याविरुध्द बंड पुकारलेले होते.

राणा कर्णसिंह (दुसरा) त्याच्या ह्या बंडाचा बंदोबस्त करण्यासाठी राणा भिमसिंहास सोबत घेतले. त्यावेळी सिकंदरखानाने नलगोंड्याच्या किल्ल्यात आश्रय घेतला. किल्ल्याला राणा कर्णसिंह दुसऱ्याने वेढा दिला व त्यावर आक्रमण केले. झालेल्या झटापटीत सिकंदरखान मारला गेला व त्यामुळे राणा कर्णसिंह दुसरा आणि राणा भिमसिंह यांचे बहामनी दरबारातील महत्व वाढले. सुलतान अल्लाउद्दिन बहमनशहाच्या मृत्यूनंतर गादीवर येणारा हुमायूंशहा हा अत्यंत जुलमी व अत्याचारी होता त्याच्या कारकिर्दीत कर्णसिंह व भिमसिंह याचे सुलतानविषयीचे मन खराब झाले त्यामुळेच त्यांनी बहामनी साम्राज्याची राजधानी गुलबर्गा सोडली व ते दोघेही आपल्या कर्नाटकातील जहागिरीत निघून गेले. परंतु काही वर्षातच हुमायूंशहाचा खून करण्यात आला. त्यामुळे राजदरबाराची सर्व सूत्रे महंमद गवानाने स्वत:च्या हातात घेतली. महंमद गवानाला राणा कर्णसिंहाची योग्यता माहिती होती. त्याने कर्णसिंहाला त्याच्या जहांगीरीतून पुन्हा बहामनी साम्राज्याच्या सेवेकरिता बोलावून घेतले आणि मोठ्या सन्मानाने त्याची पदे त्याला बहाल केली.

ओरिसाच्या राज्यावर आक्रमण करुन कर्णसिंहाने विजय मिळविला. कर्णसिंहाच्या ह्या पराक्रमाची प्रशंसा स्वत: महंमद गवानाने केलेली आहे. निजामशहाची कारकिर्द दोन वर्षातच संपली. ज्या दिवशी त्याचे लग्न झाले त्याच दिवशी शहा मरण पावला.[३०] त्याच्या नंतर त्याचा भाऊ महंमदशहा दुसरा हा गादीवर बसला. त्याच्या कारकिर्दीत कर्णसिंह दुसरा व भिमसिंह यानी आपल्या पराक्रमाने स्वत:च्या घराण्याचे नाव मोठे केले. महंमदशहाच्या कारकिर्दीत गुजरात आणि माळवा परिसरात झालेल्या युध्दांमध्ये या पितापुत्रांनी पराक्रमाची शर्थ करुन वजीर महंमद गवानाची कृपा संपादन केली, तसेच संकटकाळी अल्पवयीन बादशहाचे संरक्षण केले. अशा लहान मोठ्या युध्दामुळे कर्णसिंह दुसरा व भिमसिंह हे बहामनी साम्राज्याचे महत्वाचे घटक बनले.

---

२९. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. १८.
३०. गर्गे, स. मा., **मुसलमानी रियासत, खंड पहिला**, आवृत्ती-२०१२, पृ. २१६.

बहामनी राज्याच्या वाढीसाठी आणि संरक्षणासाठी राणा कर्णसिंह दुसरा व भिमसिंह यांनी अनेक मोठमोठ्या लढाया जिंकल्या, अशाच एका लढाईत त्यांनी गाजविलेले शौर्य आणि दाखविलेली अद्धितीय कल्पना विशेष संस्मरणीय ठरली. त्या लढाईपासूनच घोरपडे हे उपनाव भोसले वंशातील कर्णसिंहाच्या वंशजांना मिळाले, ती लढाई म्हणजेच खेळणा उर्फ विशाळगडची लढाई (इ.स. १४७०)

कोल्हापूरच्या वायव्येस सुमारे ७२ कि.मी. वर शाहूवाडी तालुक्यातील गजापूर पर्वतश्रेणीत विशालगड हा किल्ला वसला आहे. त्याच्या समोर टेकड्यांची अशी काही मांडणी आहे की अगदी जवळ जाईपर्यंत तो दिसतच नाही.[३१] हा किल्ला निश्चितपणे केव्हा बांधला याविषयी तज्ञात एकमत नाही. तथापि कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यातील राजा दुसरा भोज याने दक्षिण महाराष्ट्रात सुमारे पंधरा किल्ले नव्याने बांधले, त्यातील हा एक असावा. तेराव्या शतकात देवगिरीच्या यादवांनी भोजाचा पराभव करुन या परिसरात वर्चस्व निर्माण केले. यादवांच्या अस्तानंतर हा किल्ला शिर्के आणि त्यानंतर शंकरराव मोरे (जावळीकर) यांच्या अखत्यारित होता. हा किल्ला सह्यांद्रीच्या एका अवघड सुळक्यावर बांधलेला अजिंक्य मानला जात होता. बहामनी राज्याचा वजीर महंमद गवान याने इ.स. १४६९ मध्ये कोकण प्रांतावर स्वारी केली. या मोहिमेत राणा कर्णसिंह (दुसरा) आणि त्याचा पुत्र भिमसिंह हे त्यांच्या स्वत:च्या सैन्यासह आघाडीवर होते. या कोकण मोहिमेवर येणाऱ्या सैन्यास रोखण्यासाठी संगमेश्वर व खेळणा परिसरातील राजे व अधिकाऱ्यांनी लष्कराची जमवाजमव करुन लढाईची तयारी केली. बहामनी सैन्यास अडचणीत आणता यावे याकरीता कोकण भागातील महत्वाच्या घाटांवर स्वत:चे नियंत्रण ठेवून ते रोखून ठेवले. त्यांच्या ह्या कामगिरीमुळे बहामनी सैन्यावर उपासमारीची वेळ आली, धान्याचा तुटवडा भासू लागला अशावेळी राणा कर्णसिंहाने भोवतालच्या प्रदेशात लुटमार करुन लष्करास पुरेल एवढे धान्य मिळविले. बहामनी फौजांनी खेळण्याच्या (विशाळगड) किल्ल्याला वेढा दिला.

बहामनी सैन्यासोबतच राणा कर्णसिंहाची फौजही ह्या वेढ्याच्या वेळी हजर होती. त्यांनी किल्ला हस्तगत करण्याचे निकराने प्रयत्न केले. पण किल्ला जिंकण्यात यश येण्याची चिन्हं दिसत

---

३१. घाणेकर, प्र. के., सादं सह्यांद्रीची ! भटकंती किल्ल्याची !, आवृत्ती - नोव्हें. २००७, पृ. १३३.

नव्हती. सह्यांद्रीच्या अवघड सुळक्यांवर बांधलेल्या अभेद्य किल्याचे तट आणि किल्ल्याचे दरवाजे अतिशय मजबूत होते. मुत्सद्दीपणा आणि लष्करी डावपेचात तरबेज असणाऱ्या महंमद गवान सारख्या वजीर ही ह्या किल्याची अभेद्य तटबंदी पाहून अचंबित झाला, आता हा किल्ला जिंकणे अशक्य आहे असेच सर्वांना वाटु लागले. अशा आणिबाणीच्या वेळी कर्णसिंह पुढे आला आणि त्याने हा किल्ला जिंकून देण्याची हमी घेतली.[३२] त्यावेळी महंमद गवानही आश्चर्यचकित झाला. परंतु त्याला राणा कर्णसिंहाच्या कर्तबगारीवर विश्वास होता. त्यामुळे त्याने राणा कर्णसिंहास त्याची योजना राबविण्यास परवानगी दिली.

कर्णसिंहास जेव्हा हे लक्षात आले की हा अभेद्य तटबंदी असलेला किल्ला रुढ पध्दतीने जिंकणे अवघड आहे, तेव्हा त्याने किल्ला जिंकण्यासाठी अत्यंत नाविण्यपुर्ण पध्दतीचा उपयोग केला. जो यापुर्वी कोणीही उपयोगात आणलेला नव्हता. कर्णसिंहाने आपला मुलगा राणा भिमसिंह आणि निवडक स्वार बरोबर घेतले आणि रात्रीच्या काळोखात किल्ला सर करण्याची योजना अमलात आणली. त्यावेळी त्याने इतर लष्करास काही सूचना दिल्या. त्यानुसार उर्वरित सैन्याने मध्यरात्रीच्या सुमारास किल्ल्याच्या मुख्य दरवाजा समोर हजर रहावे आणि दरवाजा आतून उघडण्याची वाट पहावी. दरवाजा उघडल्यानंतर क्षणाचाही विलंब न करता सैन्याने किल्ल्यात शिरावे आणि शत्रूच्या बेसावधपणाचा फायदा घेवून किल्ला जिंकून घ्यावा असे ठरले.[३३]

राणा कर्णसिंहाने हा किल्ला जिंकण्यासाठी नाविण्यापूर्ण पण तितक्याच साहसी मार्गाने हा किल्ला जिंकण्यात यश मिळविले. त्याने घोरपडींचा वापर करुन अतिशय कल्पकतेने हा किल्ला सर केला. घोरपड डोंगर कपारींना घट्ट पकडून बसते, इतकी घट्ट की तिच्या पाठीला दोरखंड बांधून त्या दोरखंडावरुन माणूस अत्यंत अवघड चढपण चढून जाऊ शकतो.[३४] याच नाविण्यपूर्ण पध्दतीने राणा कर्णसिंहाने अनेक घोरपडींच्या कमरेला दोरखंड बांधून त्यांना किल्ल्यावर फेकले आणि सहा टप्प्यात घोरपडींच्या सहाय्याने स्वत: कर्णसिंह, त्याचा मुलगा भिमसिंह व त्यांचे निवडक सैनिक किल्ल्यावरील तटाच्या माथ्यावर अर्ध्यारात्री चढून गेले. किल्ल्यावर पोहोचल्यावर सर्वात पहिले किल्ल्यावरील

---

३२. गर्गे, स. मा., श. ह. वर्टीकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-१९७४, पृ. २१.
३३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. २०.
३४. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. १८.

पहारेदारांना ठार करुन किल्ल्याचे दरवाजे आतून उघडून दिले. त्यावेळी किल्ल्याच्या बाहेर दारावर दबा धरुन बसलेल्या बहामनी सैन्याने किल्ल्यात शिरुन आतील सैन्य व पहारेकरांच्या गोंधळाचा फायदा घेतला. मोठ्या प्रमाणात प्राणहानी घडून आली. त्या काळोख्या रात्री झालेल्या संघर्षात राणा कर्णसिंहाचा मृत्यू झाला. परंतु राणा भिमसिंहाने या दु:खाने खचून न जाता आपल्या पित्याने दिलेला शब्द पूर्ण करुन दाखविला. सतत दोन वर्ष संघर्ष करुन महंमद गवानालाही हा किल्ला जिंकता आलेला नव्हता. तो किल्ला घोरपडीच्या सहाय्याने जिंकण्याची अदभूत कामगिरी राणा कर्णसिंह व राणा भिमसिंहाची कल्पकता, साहसीवृत्ती, स्वत:ला सिध्द करण्याची जिद्द आणि त्याचे अद्वितीय शौर्य ह्या गोष्टी महत्वाच्या होत्या.

ह्या विजयानंतर महंमदशहा बहामनीने राणा कर्णसिंहाचा मुलगा राणा भिमसिंह यास एक सनद दिली त्यात 'राणा' ऐवजी 'राजा घोरपडे बहाद्दर' हा किताब बहाल केला.* त्या सनदेत पुढील प्रमाणे माहिती होती, "महमंद गवाण याच्या सांगण्यावरुन बादशहाच्या ध्यानात असे आले की, यांनी कोकणच्या किल्ल्याच्या बाबतीत विलक्षण शौर्य प्रकट केले. त्यांनी काही घोरपडीच्या कमरांना दोऱ्या बांधून कड्यावर पाठवून काही शूर लोक वर चढविले. किल्ल्यातील पहारेकरी बेसावध होते. त्यांच्या हे लक्षात आले नाही. किल्ल्यावर चढून गेलेल्या लोकांनी दरवाजे उघडले. अडथळा करणाऱ्या लोकांना ठार केले. दरवाजाबाहेर वाट पाहत असलेले लोक किल्ल्यात शिरले. त्यांनी किल्ल्यातील लोकांना कापून काढले आणि किल्ला सर केला. या लढाईत कर्णसिंह मारला गेला. कर्णसिंहाचा स्वार्थ, त्याग आणि भिमसिंहाची निष्ठा या दोन्ही गोष्टी ध्यानात आल्या. या कुळाच्या शाश्वतेसाठी ८४ गावांसह मुधोळचा प्रदेश पूर्वीप्रमाणे बहाल करण्याचे फर्मावितो. याशिवाय किल्ला सुध्दा रायबाग आणि बेन (वाई) हे परगणेही बक्षीस देतो. 'राणा' ऐवजी 'राजा घोरपडे बहाद्दर' हा किताब बहाल करतो आणि घोरपडीच्या रंगाचे निशाण देतो. हे त्यांनी आपल्या स्वारीत ठेवावे." (ता. २० ऑक्टों. १४७१).[३५]

घोरपडे ही पदवी भिमसिंहाला इ.स. १४७१ मध्ये मिळाली. त्यापुर्वी त्याचाच पुर्वज राणा

---

३५. आपटे, द. वि., **मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती- मार्च १९३४, पृ. १६.
* परिशिष्ट क्र. १.

भोसाजी यांच्या वारसांना भोसले असे नांव लावले जात होते. मात्र १४७१ पासून पुढे कर्णसिंहाच्या वंशजांना 'घोरपडे' हे नांव प्राप्त झाले. भोसले आणि घोरपडे ही दोन्ही घराणी मुळ एकाच घराण्याच्या (सिसोदे) दोन शाखा आहेत. त्यामुळे काही इतिहासकार 'एकाच बुंध्यास फुटणाऱ्या दोन फांद्या' असे वर्णन या दोन घराण्याचे करतात. या खेळण्याच्या उर्फ विशाळगडच्या लढाईपासून सिसोदे घराण्याची ही शाखा 'घोरपडे' या नांवाने ओळखली जाऊ लागली तर शुभकृष्ण यांचे वंशज भोसले या नांवाने ओळखले जाऊ लागले.

❖❖❖

## घोरपडे राजघराण्याची वंशावळ [३६]

सुजनसिंह (१३३३ मध्ये दख्खनमध्ये स्थलांतर)

दिलीपसिंह (मृ. इ.स. १३६७)

सिध्दजी (मृ. इ.स. १३९७)

भैरवसिंह (भोसाजी) (मृ. इ.स. १४०७)

देवराज (मृ. इ.स. १४२२) | कर्णसिंह पहिला (मृ. इ.स. १४१२)

इंद्रसेन (मृ. इ.स. १४५५)

घोरपडे | भोसले

कर्णसिंह दुसरा (मृ. इ.स. १४६९) | शुभकृष्णसिंह (भोसले घराणे)

भिमसिंह (मृ. इ.स. १४९०)
(विशाळगड काबीज केल्याबद्दल राजा घोरपडे बहादूर हा किताब)

खेलोजी (मृ. इ.स. १५१४)

महालोजी (मृ. इ.स. १५३२)

अखैजी (मृ. इ.स. १५४८)

कर्णसिंह तिसरा (मृ. इ.स. १५६५)

चोलराज (मृ. इ.स. १५७८)

वल्लभजी

बहिर्जी

म्हाळोजी (मृ. इ.स.१६८९)
(शहाजी, शिवाजी व संभाजीच्या पदरी सेवा)

---

३६. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. १५.

प्रकरण २ रे

# घोरपडे घराण्याच्या विविध शाखा

२.१ मुधोळकर घोरपडे घराणे

२.२ म्हाळोजी घोरपडे ( १ फेब्रुवारी १६८९ मृत्यू)

२.२.१ कापशीकर सेनापती घोरपडे घराणे

२.२.२ अमीर-उल-उमराव दत्तवाडकर घोरपडे घराणे

२.२.३ हिंदुराव गजेन्द्रगडकर घोरपडे घराणे

# प्रकरण दुसरे

## घोरपडे घराण्याच्या विविध शाखा

सिसोदे वंशाच्या भोसले व घोरपडे या दोनही घराण्यांनी दक्षिण भारतात आपल्या पराक्रमाच्या आधारावर स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केलेले होते. त्यांनी इ.स. १३४७ मध्ये स्थापन झालेल्या बहामनी साम्राज्याच्या पतनापर्यंत बहामनी राज्यकर्त्यांची इमाने इतबारे सेवाचाकरी केली. इ.स. १४७१ मध्ये विशाळगडाच्या लढाईत राणा कर्णसिंह (दुसरा) याचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा मुलगा राजा भिमसिंह (पहिला) घोरपडे बहाद्दर याला वडीलांची संपूर्ण जहागीर तसेच आपल्या प्रत्येक स्वारीत सोबत ठेवण्यासाठी घोरपडीच्या रंगाचे निशाण मिळाले. बहामनी बादशहाने दिलेल्या सनदेत त्याचा तसा स्पष्ट उल्लेखही आहे. असे असले तरी महंमद गवानाच्या लिहिलेल्या कागदपत्रांमध्ये या विजयामध्ये अरबी, इराणी, तुर्की अशा सैनिकांच्या कर्तबगारीचे उल्लेख मोठ्या प्रमाणात आढळतात, मात्र राणा कर्णसिंह व भिमसिंहाचा उल्लेख करणे तो टाळतो. खेळण्याच्या राजाला पैसे देऊन वश केले आणि किल्ला जिंकला असे तो आपल्या पत्रामध्ये लिहितो. यावरुन घोरपडे घराण्यातील पुरुषांनी केलेल्या मोलाच्या कामगिरीबद्दल त्याने काहीही प्रशंसोद्गार काढलेले दिसत नाही.

दि. ५ एप्रिल १४८१ रोजी बहामनी शासक महंमद शहा तिसरा याने मद्यधुंद अवस्थेत बहामनी साम्राज्याचा सर्वश्रेष्ठ वजीर महंमद गवानाला मृत्यूदंडाची शिक्षा देऊन ठार मारले.[१] महंमद गवानाच्या मृत्यूनंतर १५ व्या शतकाच्या अखेरीस बहामनी साम्राज्याच्या अस्तास सुरुवात झाली. महंमदशहा तिसऱ्याच्या मृत्यूनंतर गादीवर येणारे सुलतान हे दुर्बल, चैनी असल्याने हळूहळु बहामनी राज्याचे विघटन घडून आले.

बहामनी राज्यातील अनेक सरदारांनी आपल्याला स्वतंत्र करुन घेतले. विजापूर येथे युसुफ आदिलशहाने[२] इ.स. १४९१-९२ साली आदिलशाहीची स्थापना केली. अहमदनगर येथे मलीक अहमद निजामशहा[३] याने इ.स. १४८९ मध्ये निजामशाहीची स्थापना केली. गोवळकोंडा येथे

---

१. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला**, आवृत्ती-२०१२, पृ. २१९.

२. बेंद्रे, वा. सी., (संपा.), **विजापूरची आदिलशाही**, आवृत्ती- नोव्हें. १९६८, पृ. ११.

३. Scott, Jonathan, Ferishta's History of Dekkan, Edition - 1794, Pg. 345.

कुलीकुत्ब-अलमुल्क याने कुतुबशाहीची स्थापना केली. वऱ्हाडच्या प्रदेशात फत्तेउल्ला इमादशहा याने इ.स. १४८४ मध्ये इमादशाहीची स्थापना केली. तर बिदर येथे कासीम बेरीद याने इ.स. १४९२ मध्ये बेदरशाहीची स्थापना केली.[४] अशा प्रकारे महंमद गवानाच्या मृत्यूनंतर अल्पावधीतच बहामनी साम्राज्याचे विघटन होऊन वरील पाच स्वतंत्र राज्ये उदयास आली.

बहामनी साम्राज्यात गादीवरील सुलतान हे दुर्बल व चैनी निपजल्यामुळे त्यांच्या दरबारात तसेच साम्राज्यातही अंदाधुंदी माजलेली होती, अशावेळी राजा भिमसिंह (पहिला) घोरपडे बहाद्दर यांनी आदिलशाहीचा संस्थापक युसुफ आदिलशहाला सामील होऊन त्याची सेवाचाकरी सुरु केली. त्याच्यापासूनच घोरपडे घराण्यातील वंशजांनी आदिलशाहीशी निष्ठा दाखवली. आदिलशहाच्या स्वाऱ्यांमध्ये भिमसिंह हा त्याच्या सोबतच असे भिमसिंह राजे बहाद्दर घोरपडेच्या मृत्यूनंतर (इ.स. १४९०) आदिलशहाने त्याचा मुलगा खेलोजी यास वडिलांची मनसब व जहागीर दिली. खेलोजीस या संदर्भात दिलेल्या सनदेत म्हटले आहे की, "राजा कर्णसिंह घोरपडे यांचा मुलगा जो राजा भिमसिंह त्यांचा मुलगा राजा खेलोजी घोरपडे बहाद्दर यांच्या वाडवडिलांनी बहामनी राज्यात आस्थेने व स्वार्थत्यागाने चाकरी केली त्याबद्दल चौऱ्याऐंशी गावांसह मुधोळ व वाई परगण्यातील किल्ले आणि मनसब व किताबही त्यांनी मिळविली आहेत. आता पूर्वीचीच सर्व जहागीर, मनसब व किताब राजा खेलोजी घोरपडे बहाद्दर यास बहाल केले आहेत. (ता. ३१ मे १४९१)[५]

राजा खेलोजी घोरपडे बहाद्दर याने युसुफ आदिलशहाच्या कारकिर्दीत आपले सैन्य कायमच त्याच्या दिमतीला ठेवले. ज्या-ज्या वेळी आदिलशाहीवर संकटे आली, त्यावेळी त्याने त्या संकटांचा सामना समर्थपणे केलेला दिसून येतो. विजयनगरच्या सैन्याशी नेहमीच आदिलशाहीचा संघर्ष होत असे. विजयनगरचा सम्राट नरसिंहराय हा शाल्ववंशाचा सम्राट होता त्याने आदिलशहासोबत झालेल्या संघर्षात मोठा पराक्रम गाजविला. त्यावेळी आदिलशहाच्या सैन्यासोबत राजा खेलोजी घोरपडे याचीही लष्करी तुकडी होती.[६] या युध्दानंतरही गुलबर्गा, सागर, यादगीर, आळंद, गुंजाटी या आदिलशाहीच्या परिसरातील सरदारांनी आदिलशाहीच्या विरोधात खलबते सुरु केलेली होती. त्यांचा

---

४. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती- २०१२, पृ. २२६.

५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती-ऑगस्ट-१९८३, पृ. २७.

६. **कित्ता,** पृ. २८

बंदोबस्त करण्यातही राजा खेलोजी घोरपडे याची लष्करी तुकडी आदिलशहाने कामाला लावली. राजा खेलोजी घोरपडे याच्या लष्करी कुवतीचा तसेच पराक्रमाचा अंदाज यावरुनच येतो की, त्यावेळी मोडकळीस आलेल्या बहामनी राज्याचे सुलतानाने राजा खेलोजी घोरपडेस आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. मात्र खेलोजीने मोठ्या उत्तमप्रकारे राज्यसेवा बजावली होती आणि आदिलशहाचा विश्वास संपादन केला. आदिलशहाने बेदरवर हल्ला केला होता[७] त्यावेळी खेलोजी सोबतच होता. इ.स. १५१४ मध्ये कसीम बरीद ह्या बिदरशाहीच्या शहा सोबत झालेल्या अल्लापूर नजिक झालेल्या युध्दात राजा खेलोजी ठार झाला. त्याने एकंदर पंचविस वर्षे आदिलशाहीची सेवा केली. (इ.स. १४९० ते इ.स. १५१४)

राजा खेलोजींच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राजा महालोजी घोरपडे यांच्याकडे घोरपडे घराण्याची जहागीरी आणि मनसबदारी वंशपरंपरेने आली. त्यावेळी त्याचे वय तीस वर्षापेक्षा अधिक असावे. वडिलांच्या हयातीत तो त्यांच्या प्रत्येक कार्यात सामील होता. त्याने अनेक युध्दात सहभाग घेऊन प्रसिध्दी मिळवली होती. इ.स. १५१४ मध्ये बिदरच्या शहासोबत झालेल्या युध्दात तोही त्याच्या वडिलांच्या सोबत सहभागी होता. त्याने आदिलशाहीची सेवा करतांना अनेक पराक्रम गाजविले आणि आदिलशहाची मर्जी संपादन केली. कासिम बरीदने निजामशहा व कुतूबशहाच्या मदतीने आदिलशहावर आक्रमण केले त्यावेळी राजधानीच्या जवळच्या परिसरात झालेल्या युध्दात आदिलशहा संकटात सापडलेला होता, त्याचा त्या संकटातून बचाव राजा महालोजींनी केला. आदिलशहाने रायचूरच्या व मुद्‌गलच्या किल्ल्यावर हल्ला केल्याच्या बातम्या विजयनगरच्या तोमराजास कळल्यानंतर त्याने पन्नास हजार स्वारानिशी आदिलशाही सैन्यावर हल्ला केला. कृष्णानदीच्या काठी रायचूर जवळ ही लढाई झाली. या लढाईत आदिलशहा संकटात आहे हे लक्षात येताच राजा महालोजी यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून आदिलशहास रणांगणातून सुरक्षित स्थळी हलविले व त्याचा जीव वाचविला.[८] राजा महालोजींच्या या पराक्रमी कामगिरीबद्दल आदिलशहाने घोरपडे घराण्याला वंशपरंपरागत अशा दोन देणग्या दिल्या.

---

७. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती- २०१२, पृ. २२६.

८. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती-ऑगस्ट-१९८३, पृ. २९.

आदिलशाही दरबारातील प्रथेप्रमाणे दरबारात येणाऱ्या प्रत्येकालाच जमिनीपर्यंत वाकून कुर्निसात करणे बंधनकारक होते. आदिलशहाचा जीव वाचविल्यामुळे त्याने राजा महालोजी व त्यांच्या वंशजांना कुर्निसात करण्याच्या प्रथेपासून मूक्त केले तसेच आपल्या सैन्यामध्ये मोर्चेलची राजचिन्हे वापरण्यास परवानगी देण्यात आली. या संदर्भातील उल्लेख घोरपडे घराण्याला मिळालेल्या सनदपत्रात दिसतो. एका सनदपत्रात म्हटले आहे, "जेव्हा आम्हास विजयनगरचा राजा तिम्मराज याच्याशी कृष्णेच्या तीरावर लढण्याचा प्रसंग आला तेव्हा आमचे सैन्य मोठ्या प्रमाणात जखमी झाले. शत्रूच्या गर्दीमुळे नदी उतरुन जाण्याचा सुरक्षित मार्ग सर्वच बाजूंनी बंद झाला. या परिस्थितीत आम्ही अस्वस्थ झालो. अशा आणिबाणीच्या वेळी स्वत:च्या जीवावर उदार होऊन तुम्ही आम्हाला संकटाच्या भोवऱ्यातून सुरक्षितपणे बाहेर काढले आणि आमच्या कृपेस पात्र झाला. कुर्निसात करणे तुम्हाला तापकारक वाटेल, म्हणून इतरांप्रमाणे जमिनीपर्यंत वाकून कुर्निसात करणे तुम्हाला माफ केले आहे. तसेच तुम्हाला दोन मोर्चेलही दिले आहेत."[९] इ.स. १५३२ मध्ये आदिलशाहीची अठरा वर्ष सेवा केल्यानंतर राजे महालोजींचा मृत्यू झाला. आदिलशाही आणि विजयनगर साम्राज्य यांच्या दरम्यान झालेल्या लढायांत घोरपडे सरदारांनी विजापूरच्या सुलतानाच्या बाजूने भाग घेतला होता.[१०]

राजे महालोजीनंतर त्यांचा मुलगा राजे अखयसिंह घोरपडे बहाद्दर यांस इ.स. १५३२ मध्ये मनसब मिळाली. महालोजींबरोबर अनेक लढायांमध्ये अखयसिंह हजर होता. अखयसिंहाने निजामशहा व कासीम बरीद यांचेशी झालेल्या युध्दात महत्वपूर्ण कामगिरी बजावली होती. अखयसिंहाच्या काळात आदिलशाही सैन्याला नलगौडा व अदौनी इत्यादी ठिकाणी लढाया कराव्या लागल्या. अखयसिंह या सर्व लढायांमध्ये ससैन्य हजर होता. इ.स. १५३६ मध्ये अदौनीचा किल्ला जिंकून घेण्यात अखयसिंहासोबतच त्याची मुले कर्णसिंह (तिसरा) आणि भिमसिंह (दुसरा) यांचा समावेश होता.[११] तसेच इ.स. १५४० मध्ये कासीम बरीद व बुऱ्हान निजामशहा यांच्या सैन्याला अखयसिंहाने सळो की पळो करुन सोडले होते. तसेच इ.स. १५४३ मध्ये यादगीर नजीक कुतुबशहाचा पराभव करण्यासाठी आलेल्या लष्करात अखयसिंह आपल्या लष्करासह सहभागी होता.

---

९. आपटे, द. वि., **मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-मार्च १९३४, पृ. २६.
१०. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ.२३.
११.गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती-ऑगस्ट-१९८३, पृ. ३०.

राजे अखयसिंह घोरपडे बहाद्दर यांचा मृत्यू इ.स. १५४८ मध्ये झाला. त्यांच्या मुत्यूपश्चात त्यांची दोन्हीही मुले विजापूरच्या आदिलशहाकडे कामगिरीवर रुजू झाले. त्याचवेळी इ.स. १५४७ मध्ये इब्राहिम आदिलशहा (पहिला) याचा मुलगा अली आदिलशहा त्याने राज्यकारभार हाती घेतला. त्याला लहानपणी चांगले शिक्षण मिळालेले असल्यामुळे तो अत्यंत सुस्वभावी होता. त्याच्या कारकिर्दीत राजे कर्णसिंह (तिसरा) व राजे भिमसिंह (दुसरा) यांना पूर्वीच्या जहागिरीबरोबरच दरबारात मानमरातब मिळत होता. अली आदिलशहाच्या काळात अहमदनगरच्या हुसेन निजामशहाने कल्याणी आणि सोलापूर हे दोन किल्ले जिंकून घेतले. आदिलशहाने हे किल्ले परत मिळविण्यासाठी निजामशाहीवर आक्रमण करण्याची योजना आखली. यासाठी त्याने इ.स. १५५८ मध्ये विजयनगर येथे जाऊन रामरायाची भेट घेतली,[१२] ही भेट मोठ्या थाटाची झाली. रामरायाने अलीची बडदास्त उत्तम ठेवली. या ऐतिहासिक भेटीच्या वेळी राजा कर्णसिंह सुध्दा हजर होता. रामरायाने केलेल्या सहकार्यावर अली आदिलशहाने अहमदनगरवर आक्रमण केले आणि झालेल्या तहानुसार कल्याणीचा किल्ला परत मिळविला. यासर्व हालचालींनंतर रामरायाच्या सुडबुध्दीने दक्षिणेतील सर्व मुस्लीम राज्यकर्ते अपमानीत होऊ लागली. त्याचीच परिणती २३ जाने. १५६५ मध्ये झालेल्या तालिकोटच्या (राक्षसतागडी- फरिश्ताच्या मते हे युध्द तालिकोट येथे लढले गेले परंतु या युध्दाचे वास्तविक ठिकाण राक्षस व तागडी या दोन गावांच्या मध्ये होते.)[१३] युध्दात झाली. या युध्दातही घोरपडे घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी अवर्णनिय पराक्रम केला.

दक्षिण भारतात घडून आलेले सर्वात भयंकर व विध्वंसक युध्दापैकी तालिकोटचे युध्द हे एक होते. विजयनगरचा सम्राट सदाशिवराव हा यावेळी गादीवर होता. मात्र तो नामधारीच होता. त्याच्या राज्याची सर्व सूत्रे त्याचा मंत्री रामरायाच्या हातात होती. तो अत्यंत हुशार व कपटी होता. त्याने दक्षिणेतील सर्व शाह्यांना परस्परांमध्ये संघर्षात गुंतवून ठेवलेले होते. त्यामुळे विजयनगरचा साम्राज्य विस्तार व दरारा दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात वाढला होता. या दराऱ्यामुळेच रामरायाचे आचरण गर्विष्ठपणाचे झालेले दिसते. या गोष्टींचा त्रास मुसलमानी राजांना होऊ लागला. रामरायाच्या

१२. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ३०.
१३. वर्मा, हरिश्चंद्र, **मध्यकालीन भारत, भाग-१,** आवृत्ती- २००१, पृ. २७८.

ह्या उपद्रवास अली आदिलशहा व त्याचा वजीर किश्वरखान हे फारच कंटाळून गेलेले होते. आणि त्यांनी रामरायाचा नाश करण्याचे ठरविले. त्यामुळेच फरिश्ता म्हणतो की, विजयनगरच्या पराभवाची योजना आदिलशहाची होती, परंतु तालिकोटच्या युध्दात संयुक्त मुसलमानी सेनेचे नेतृत्व अहमदनगरचा शासक हुसैन निजामशहा ह्याच्याकडे होते.[१४]

विजयनगरच्या वाढत्या सामर्थ्याने दहशतीत असलेल्या मुस्लीम राज्यकर्त्यांनी एकत्र येवून एक संयुक्तसंघ तयार केला. त्यात विजापूरचा अली आदिलशहा, अहमदनगरचा हुसैन निजामशहा, गोवळकोंड्याचा इब्राहीम कुतूबशहा तर बिदरचा अली बरीदशहा या दक्षिणेतील चार मुस्लीम सत्तांनी एकत्र येवून आपले सैन्य विजापूर शहरात एकत्र आणले.[१५] या युध्दात राजा कर्णसिंह (तिसरा) घोरपडे बहाद्दर आणि त्याचा भाऊ भिमसिंह (दुसरा) दोघेही आदिलशाहीच्या बाजूने आपल्या सैन्यासह हजर होते.[१६] या युध्दात कर्णसिंह व भिमसिंह या घोरपडे बंधूंनी आदिलशाहीच्या बाजूने 'अवर्णनीय पराक्रम' केल्याचा उल्लेख विजापूरच्या इतिहासात मोठ्या गौरवाने केला आहे.[१७] या लढाईत राज कर्णसिंह घोरपडे बहाद्दर मारला गेला. कर्णसिंहाचा मुलगा चोलराज यास सप्तहजारी मनसब आणि तोरगलपैकी काही गावांची नवी जहागीर दिली.[१८] आदिलशहाने मुधोळ, रायबाग, हुकेरी इत्यादी भागातील चौऱ्याऐंशी गावांची जहागीर पूर्ववत बहाल केली. त्याशिवाय वाई परगण्यातील चाळीस गावे आणि किल्ले पूर्ववत बहाल केले. राजा चोलराज घोरपडे बहाद्दर यांनी आदिलशाहीची इमाने इतबारे सेवाचाकरी केली. ते आपल्या वडिलांप्रमाणेच शुर व पराक्रमी होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात (इ.स. १५६५ ते इ.स. १५७८) दक्षिणेत विविध प्रदेशांवर मोहिमा आखल्या आणि आदिलशाही साम्राज्यात भर घातली. राजे चोलराज यांनी इ.स. १५६९ मध्ये आदोनीचा किल्ला त्यानंतर तोरगलचा किल्लाही जिंकून घेतला. धारवाडच्या किल्ल्यावर केलेल्या लष्करी मोहिमेत त्यांचा चुलता भिमसिंह दुसरा हा देखील सोबतच होता.

इ.स. १५७० मध्ये राजे चोलराजांनी महत्वाच्या बंकापूरच्या किल्ल्यावर आक्रमण करुन तो पराक्रमाने जिंकून घेतला. हा किल्ला विजयनगर राजाचा प्रधान वल्लभ याच्या ताब्यात होता. यावेळी

---

१४. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती - २०१२, पृ. २८१,

१५. **कित्ता,** पृ. २८२

१६. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ३१.

१७. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती - नोव्हें. १९७४, पृ. २३.

१८. कित्ता, पृ. २३.

झालेल्या युध्दात राजा कर्णसिंह तिसऱ्याचा भाऊ आणि राजा चोलराजाचा चुलता भिमसिंह धारातिर्थी पडला. या विजयानंतर चोलराजाचे आदिलशाही दरबारातील वजन व मानमरातब वाढला तसेच त्यांचे लष्करी बळ वाढले. कारण या विजयामुळेच त्यांना विजयनगर शहराच्या आसपासच्या २६ खेड्यांची नवी जहागीर[१९] आदिलशहाने दिली व त्यांचा सन्मान केला. इ.स.१५६५ च्या तालिकोटच्या युध्दात विजयनगरचे साम्राज्य लयास गेल्यामुळे त्यांच्या मांडलिक सरदारांनी स्वत:स स्वतंत्र करुन राज्यकारभारास सुरुवात केली. त्यातच तिरुमल जो सदाशिवरावांच्या बरोबर होता त्याने सदाशिवरावांचा खून करुन पेनकोंड येथे स्वतंत्र सत्ता प्रस्थापित केली.[२०] या तिरुमला बरोबरच राजा चोलराज याचा इ.स. १५७८ मध्ये संघर्ष झाला. तिरुमल हा विद्वान व शुर होता. या झालेल्या संघर्षात राजा चोलराज घोरपडे बहाद्दर यांचा मृत्यू झाला. त्याने बादशहाची चौदा वर्ष नोकरी केली.[२१]

राजा चोलराजला पिलाजी, कानोजी व वल्लभजी असे तीन मुलगे होते.[२२] घोरपडे ही उपाधी इ.स. १४७१ साली भिमसिंह पहिला यास बहामनी सुलतानने दिली होती. त्यावेळ पासून पुढील शंभर वर्षे म्हणजे चोलराजाच्या मृत्यूपर्यंत (इ.स. १५७८) घोरपडे घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी प्रथम काही वर्ष बहामनी बादशहाकडे आणि नंतर आदिलशहाकडे त्यांच्यासाठी लष्करी कामगिरी केली. या काळात राजा भिमसिंह नंतर, खेलोजी, महालोजी, अखयसिंह, कर्णसिंह आणि चोलराज अशा पराक्रमी पुरुषांची कारकिर्द होती. या शंभरवर्षाच्या काळात सातत्याने घराण्यातील वडील मुलाकडेच मनसबदारी कायम होती, तशी घराण्याची प्रथा होती. राजा चोलराजाच्या मृत्यूनंतर या प्रथेत बदल झाला आणि भाऊबंदकीचा वाद उत्पन्न झाला.[२३] राजा चोलराजाच्या पुत्रांपैकी पिलाजी घोरपडे मुधोळ येथे स्थाईक झाला. मुधोळकर घोरपडे घराण्याचा तो पूर्वज होता. कानोजी तरुणपणीच मारला गेला त्यामुळे त्याचा वंश सापडत नाही तर वल्लभजीने वाई प्रांतातील इटे परगण्याची देशमुखी हाती घेतली. वल्लभजी हा कापशीकर घोरपडे घराण्याचा मुळ पुरुष मानला जातो.[२४] चोलराजाच्या मृत्यूनंतर (इ.स.१५७८) घोरपडे घराण्याच्या विविध शाखांची निर्मिती झाली त्या शाखा पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

---

१९. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ३१.
२०. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती-२०१२, पृ. २८६.
२१. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ३१.
२२. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. २३.
२३. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ३२.
२४. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), पूर्वोक्त, पृ. २५.

## २.१ मुधोळकर घोरपडे घराणे :

भारतात एकूण ५६२ संस्थाने अस्तित्वात होती. त्यापैकी दक्षिण महाराष्ट्रात एकूण अठरा संस्थाने होती. ही अठरा संस्थाने कोल्हापूर, अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जंजिरा, जत, करुंदवाड (थोरली पाती), कुरंदवाड (धाकटी पाती), मिरज, मिरजमळा, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी, वाडी (जहागीर) पुर्वीच्या मुंबई प्रांतातील निरिनिराळ्या जिल्ह्यात विखुरलेली होती.[२५] या संस्थानपैकी मुधोळ हे एक महत्वाचे संस्थान मानले जात होते. मुधोळ हे संस्थान कोल्हापूरच्या दक्षिणेस सुमारे १०० मैलावर होते. उत्तरेस जमखंडी संस्थान, पुर्वेस बागलकोट तालुका (जिल्हा विजापूर), पश्चिमेस गोकाक तालुका व बेळगाव जिल्ह्याचा काही भाग आणि दक्षिणेस कोल्हापूर संस्थान या मुधोळकरांच्या सीमा होत्या.[२६] विजापूर जिल्ह्यातील मुधोळ हे गाव तालुक्याचे ठिकाण आणि संस्थानची राजधानी होती. या शहराभोवती तटबंदी होती. इ.स. च्या १४ व्या शतकातील हिंदू राजा नारायण याने हे मुधोळ शहर वसविले. त्या मुधोळच्या घोरपडे घराण्याकडे १४ व्या शतकापासून कित्येक शतके सत्ता अखंडीतपणे राहिली व ह्या संस्थांनाचे भारतात विलीनीकरण होईपर्यंत ती सत्ता कायम होती.[२७] मुधोळ हे कर्नाटकातील फार प्राचीन व इतिहासप्रसिध्द संस्थान आहे.

मुधोळचे घोरपडे हे मुळचे चित्तोडचे सिसोदे घराण्याचे वंशज होते. सिसोदे वंशातील सुजनसिंह व क्षेमसिंह आपले भविष्य अजमाविण्यासाठी दक्षिणेत आले. सुजनसिंहाचा मुलगा राणा दिलीपसिंह याने बहामनी सुलतान फिरोजशहाला सुलतान पदावर बसविण्यात महत्वाची भूमिका बजावल्याने फिरोजशहा बहामनीने इ.स. १३९८ मध्ये रायबागतर्फेतील ८४ गावांची जहागिरी त्यांना दिली त्यातच मुधोळचा समावेश होता. सिसोदे वंशातील राणा भोसाजीच्या नावावरुन सुरुवातीला भोसले आणि त्याच वंशातील राणा कर्णसिंह दुसरा आणि राणा भिमसिंह पहिला यांनी विशाळगडाच्या लढाईत पराक्रम गाजविल्याने त्यांना राणा ऐवजी राजा घोरपडे बहाद्दर ही उपाधी वंशपरंपरागत मिळाली. म्हणून मुधोळ येथील भोसले वंशाच्या वंशजांनी घोरपडे ही उपाधी धारण केली तेव्हापासून ते घराणे मुधोळकर घोरपडे म्हणून इतिहास प्रसिध्द झाले.

---

२५. पटवर्धन, वि. अ., **दक्षिणी संस्थांनांच्या विलीनीकरणाची** कथा, आवृत्ती- १९६६, पृ. ११३.
२६. रेगे, मे. पुं., (संपा.), **मराठी विश्वकोश, खंड सोळावा**, आवृत्ती- १९९९, पृ. ७५४.
२७. आपटे, द. वि., **मुधोळ संस्थांनच्या घोरपडे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती - मार्च १९३४, पृ. १०.

राजा चोलराजाचा मोठा मुलगा पिलाजी हा मुधोळकर घोरपडे घराण्याचा पूर्वज मानला जातो. पिलाजीच्या घराण्यास सातकस घोरपडे[२८] असे देखील संबोधले जाते. या संदर्भात मुधोळच्या इतिहासात अनेक आख्यायिका प्रसिध्द आहेत. मुधोळ शाखेतील एका पूर्वजाने एकाच वेळी सात विवाह केले तेव्हापासून मुधोळ घराण्यास सातकस असे संबोधू लागले. मुधोळकर घोरपडे घराणे प्रथम बहामनी राज्यात आणि नंतर आदिलशाही राज्यात चाकरी करुन राहिले. हे घराणे शेवटपर्यंत मुसलमानी राजवटीशी एकनिष्ठ होते. आदिलशाही नष्ट झाल्यानंतर या घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी मोगल बादशहांची सेवाचाकरी पत्करली. विजापूर दरबारात शहाजी भोसल्यांचा उत्कर्ष सहन न झाल्याने मुधोळकर घोरपडे व भोसल्यांमध्ये वैरभाव निर्माण झाला. राजा पिलाजी मुधोळकर घोरपडे याने आदिलशहाची सेवाचाकरी केली. इ.स. १५८० मध्ये अहमदनगरचा मूर्तजा निजामशहा हा आदिलशहाचे प्रांत जिंकून घेण्यासाठी पंधरा हजार सैन्य घेऊन चालून आला त्यावेळी पिलाजी व त्यांच्या बंधूंनी खुप पराक्रम गाजवला आणि मूर्तजा निजामशहाच्या सैन्याचा पराभव केला. इब्राहिम आदिलशहाच्या आदेशावरुन राजा पिलाजीने कर्नाटकातील गंगानायक व अरसप्पा नाईक यांचेवर आक्रमण करुन खंडणी वसूल करण्याचे काम केले. त्यामुळे आदिलशहा पिलाजीच्या पराक्रमावर बेहद खुश झाला. इ.स. १५९५ मध्ये अहमदनगरचा इब्राहिम निजामशहाच्या विरुध्द शाहदुर्गाजवळ झालेल्या आदिलशाहीच्या युध्दात पिलाजीने विशेष पराक्रम गाजविला. पिलाजीने आदिलशहाची १९ वर्ष अत्यंत इमाने इतबारे सेवा केली. राजे पिलाजी मुधोळकर घोरपडेचा मृत्यू इ.स. १५९७ मध्ये झाला.[२९]

पिलाजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा प्रतापराव यास विजापूरच्या आदिलशहाने सात हजारी मनसब व मुधोळची जहागिरी दिली. प्रतापराव हिशोबी व दप्तरी कामात अत्यंत निपूण होता. इब्राहिम आदिलशहाने त्याच्या हुशारीमुळेच प्रतापरावास मुख्य सेनापतीचे हिशोब, दप्तरात दिवाणगिरीचे काम आणि सारावसुली करण्याचे महत्वाचे काम दिले. यावेळी जहांगीर व जोधाबाई पुत्र मोगल बादशहा खुर्रम उर्फ शहाजहान[३०] याने दक्षिणेतील दौलताबादचा किल्ला अजीमखानाकडून

२८. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती-नोव्हें.१९७४, पृ. २५.
२९. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा**, आवृत्ती-१९८६, पृ. ४२०.
३०. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत**, आवृत्ती-२०१२, खंड २ रा, पृ. २१०.

काबीज केला. त्यात विजापूरच्या आदिलशाही सैन्याने निजामशहास मदत केल्यामुळे बादशहाची आदिलशहावर नाराजी आली म्हणून शहाजहान बादशहाने आसफखानास विजापूरवर पाठविले. मात्र आसफखानाकडून विजापूरचा पुरता बंदोबस्त झाला नाही. इ.स. १६३५ मध्ये मोगल बादशहा शहाजहान पुन्हा दक्षिणेवर चालून आला. त्यावेळी रणदुल्लाखान, राजे प्रतापराव मुधोळकर घोरपडे व त्यांचा मुलगा बाजी घोरपडे यांनी मोगल सैन्यावर हल्ले करुन त्यांना भरपूर त्रास दिला. मात्र अखेरीस महंमद आदिलशहास मोगल बादशहाबरोबर तह करावा लागला. संपूर्ण निजामशाही राज्य जिंकून घेतल्यानंतर निजामशाहीवर मोगल बादशहाचा कब्जा असावा आणि आदिलशहाने दक्षिणेत शांतता ठेवण्यासाठी बादशहास मदत करावी अशा तहाच्या अटी होत्या.

प्रतापराव व बाजी घोरपडे या पितापुत्रांनी शहाजीच्या ताब्यातील शिवनेरी किल्ला जिंकून घेण्यासाठी मोगल सैन्यास मदत केली. प्रतापरावाच्या पराक्रमांमुळेच विजापूरच्या आदिलशहाने त्यास सनद दिली. त्या सनदेतील मजकूर पुढील प्रमाणे होता.

"म्हणून आम्ही असा हुकूम करतो की, चोलराजाचा नातू प्रतापराव याने ८४ गावांसह मुधोळ, तोरगळ परगणा, कर्नाट व वऱ्हाड यातील अर्धेगाव व सातहजारी मनसब एवढा सरंजाम, आपल्या परगण्यापैकी २६ गावे, अर्धा कर्नाटक व पाच हजारी मनसब एवढा सरंजाम ठेवावा."[३१]

तिकडे निजामशाहीच्या ऱ्हासामुळेच शहाजी राजे आदिलशहाकडे चाकरीस आले. उत्तम प्रशासक, धडाडीचा कार्यकर्ता व उमदा शिपाई, लढवय्या अशी ख्याती असलेल्या शहाजी राजांना विजापूरच्या राज्याच्या उत्तरेकडील मुलुख म्हणजे पुणे, सुपे, इंदापूर व चाकण हा प्रदेश महंमद आदिलशहाने जहागीर म्हणून दिला.[३२] शहाजींनी थोड्याच दिवसात आपल्या पराक्रमामुळे दरबारात वर्चस्व निर्माण केले. त्यामुळेच शहाजीस वाटणी देण्याबद्दल आदिलशाही बादशहाने प्रतापरावास सांगितले.[३३] यावरुन शहाजी राजांचे दरबारातील प्रस्थ वाढलेले होते हे स्पष्ट होते. प्रतापराव एकदा शिकारीसाठी गेले असता त्याच्या भाऊबंदांनी पाठविलेल्या मारेकऱ्यांनी प्रतापरावावर सशस्त्र हल्ला केला, झालेल्या झटापटीत प्रतापराव मारला गेला.

---

३१. आपटे, द. वि., **मुधोळ संस्थांनच्या घोरपडे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती- मार्च १९३४, पृ. ३६.
३२. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला**, आवृत्ती-१९८४, पृ. १४१.
३३. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा**, आवृत्ती-१९८६, पृ. ४२०.

प्रतापरावानंतर त्याचा पुत्र बाजी घोरपडे यास सप्तहजारी मनसब, मोठी जहागीर आणि वजीरी दिली. बाजीरावास 'राजे घोरपडे बहाद्दर' असा किताबही परंपरेनुसार देण्यात आला. आदिलशहाने बाजीस बोलावून वडिलोपार्जीत मनसबी दिल्या व तुझ्या प्रांतास लागून 'तुझ्या घराण्यातील सरदारांना जहागीर देण्यात येणार नाही' असे वचनही दिले.[३४] बाजी घोरपडे आणि शहाजी राजे यांनी कर्नाटकात आदिलशहासाठी एकत्र स्वारी केली आणि शिरे व बंगलोर ही ठिकाणे ताब्यात घेतली.[३५] शहाजीराजे आणि बाजी घोरपडे बहाद्दर यांचे हे सख्य फार काळ टिकले नाही. इ.स. १६४६ नंतर शहाजीराजे व रणदुल्लाखान हे दक्षिणेतील खंडणी वसूली करीता कर्नाटकात व त्याच्याही पलीकडे जिंजीपर्यंतच्या मुलुखावर स्वाऱ्या करीत होते. शहाजी राजे कर्नाटकात असतांना शिवाजी राजांनी घाटमाथ्यावरील पुष्कळ किल्ले बळकाविले.[३६] हे आदिलशहास आवडले नाही, भरीसभर म्हणून आदिलशाही दरबारातील मुस्तफाखानासारख्या शहाजीच्या विरोधकांनी शहाजी विरुध्द आदिलशहाचे मन कलुषित करण्यास सुरुवात केली. शहाजीराजे कुतुबशहाशी संधान बांधीत आहे, असाही अपप्रचार त्यांच्याबद्दल केल्या गेला. यासर्व गोष्टींमुळे शहाजीराजे सुलतानच्या मर्जीतून उतरले आणि आदिलशहाने मुस्तफाखानास शहाजींना कैद करण्याचा हुकूम सोडला. मुधोळकर बाजी घोरपडे मुस्तफाखानाच्या हुकूमावरुन दोन हजार स्वारांसह शहाजींच्या पाठलागावर गेला आणि २५ जुलै १६४८[३७] रोजी शहाजीराजांस कैद केले. या प्रसंगातून पुढे अनेक वर्ष भोसले आणि मुधोळकर घोरपडे यांचे वितुष्ट कायम राहिले.

ही वार्ता समजताच आदिलशहाने बाजी घोरपडेचा गौरव करुन शहाजीला आणण्यासाठी आपला पराक्रमी सरदार अफजलखानास पाठविले. अफजलखानाने शहाजीराजांची अप्रतिष्ठा करण्यासाठी त्यांच्या पायात रुप्याच्या बेड्या घालून हत्तीवरुन मिरवत विजापूरास आणले. शहाजीराजांना देहांताचीच शिक्षा दिली जाईल असाच सर्वांचा कयास होता. पुढे १६ मे १६४९ पर्यंत शहाजीराजे आदिलशहाच्या कैदेतच होते. शिवाजी महाराज वडिलांच्या सुटकेसाठी प्रयत्नशिल होते. त्यावेळी विजापूरच्या दरबारात शहाजीराजांचे पाठीराखेही होतेच त्यांनी आदिलशहाची खातरजमा करवून

---

३४. आपटे, द. वि., **मुधोळ संस्थांनच्या घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- मार्च १९३४, पृ. २४३.
३५. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४२०.
३६. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती- २०१२, पृ. २५६.
३७. **कित्ता,** पृ. २५६.

देऊन शहाजींच्या प्रामाणिकतेचे पुरावे दिले आणि त्यांनी १६ मे १६४९ रोजी शहाजींची सुटका केली. त्याबदल्यात आदिलशाहीच्या ताब्यात असलेला सिंहगड किल्ला, जो शिवाजी महाराजांनी बळकावला होता तो परत द्यावा असे ठरले. शिवाजी महाराजांनी तो देऊन शहाजी राजांची सुटका करुन घेतली[३८] यातच बाजी घोरपडे यांच्याकडे आदिलशहाने मोगल आणि शिवाजी महाराज यांच्या विरुध्द लढाया करण्याची जबाबदारी सोपविली होती. त्यामुळे घोरपडे व भोसले यांच्यातील वितूष्ट फारच वाढले.

१० नोव्हेंबर १६५९ रोजी शिवाजी महाराजांनी आदिलशहाचा सरदार अफजलखान याचा वध केला.[३९] अफजलखानाच्या मृत्यूनंतर शिवाजी महाराजांनी कोकणातील बराच प्रांत (कुडाळ वेंगुर्ले) जिंकून घेतला. त्यामुळे शिवाजींचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी आदिलशहाने खवासखान व बाजी घोरपडे यांच्यावर सोपविली. ही बातमी कळताच शिवाजी महाराजांनी ताबडतोब आपले सैन्य घेऊन मुधोळवर हल्ला केला त्यावेळी बाजी घोरपडे खवासखानाच्या मदतीस जाण्याची तयारी करीत होता. बाजी घोरपडे आणि शिवाजी महाराज यांच्यात निकराचे युध्द झाले. युध्दात बाजी घोरपडे व त्याचा मुलगा ठार झाला.[४०](नोव्हे. १६६४) खवासखानाचे सैन्य मुधोळमार्गेच मागून येत होते. महाराजांनी त्याच्या सैन्यासही गाठले व त्याचीही धुळधाण उडवून दिली.[४१] शिवाजी महाराजांचा हल्ला इतका अनपेक्षित होता की त्यांच्या हल्ल्यात बाजी घोरपडे संपूर्ण कुटुंबासह ठार झाला. तथापि, त्याची एक पत्नी बाळंतपणासाठी गेली असल्याने ती वाचली.[४२] मालोजी व शंकराजी ही दोन मुले सुध्दा वाचली. बाजीराजे घोरपडे याने आदिलशाहीच्या रक्षणासाठी आपले सर्व आयुष्य वेचले. त्याने आदिलशाहीच्या शत्रूविरुध्द लढाया करुन पराक्रम गाजविला.

आदिलशहाने बाजी घोरपडेची मुले मालोजी आणि जयसिंग उर्फ शंकराजी यास पुर्वीच्या मुधोळ जहागिरीशिवाय आणखी परगणे व खेडी देऊन आपल्या सेवेत घेतले. मालोजी व शंकराजी या बंधूंनी शिवाजी महाराजांविरुध्द अनेक कामे केली. आदिलशहाने शिवाजींवर केलेल्या स्वारीमध्ये उभयता बंधूंनी पराक्रम करुन यश संपादन केले. बाजी घोरपडेंचा एक मुलगा शंकराजी हा शिवाजी

---

३८. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला,** आवृत्ती-१९८४, पृ. १४८.

३९. पवार, ज. भा., **मराठी सत्तेचा उदय,** आवृत्ती- १९८८, पृ. १३०.

४०. Ball, Upendra Nath, A Short History of The Marhattas, Edition- 1919, Pg. 95.

४१. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, आवृत्ती-१९८४, पृ. १६२.

४२. कुलकर्णी, म. रा., महाराष्ट्रातील प्रसिध्द सरदार घराणे, आवृत्ती- ऑक्टो. २००९, पृ. १८

महाराजांच्या विरुध्द तासगावच्या लढाईत ठार झाला. मालोजीने मात्र अखेरपर्यंत आदिलशहाचीच सेवाचाकरी केली.[४३]

मालोजी हा पराक्रमी होता. शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी मालोजी घोरपडेने आपल्या बाजूने यावे यासाठी अनेकवेळा प्रयत्न केले. कुतुबशहाने देखील याकामासाठी शिवाजी राजांना प्रोत्साहनच दिले. त्यासाठी शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडे सोबत पत्रव्यवहारही केला.* परंतु मालोजी हा आदिलशहाचा अत्यंत विश्वासू व इमानदार सरदार होता. त्याने शेवटपर्यंत स्वराज्याच्या सेवेसाठी आपले योगदान दिलेचं नाही. शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडेस लिहिलेले पत्र :

र. १५९८ फाल्गुन

इ. १६७७ मार्च

राजश्री मालोजी राजे घोरपडे प्रति राजश्री

शिवाजी राजे जोहार उपरि पूर्वी.........

विजापूरचा पातशहा धाकटा आहे. त्याला कैदेत ठेविले तेच समई पादशाही बुजली.... आणि उगीच तुम्ही तेथे आपली आदिलशाही आहे म्हणोनि गुंतून राहिला आला..... पठान देती त्यांची दुगूनी आम्ही कुतुबशहापासून तुम्हास देवीतच असे किंवा ह्याहून अधिकही होऊन येईल. तरी करुन देऊनच........... मागील दावियाचा किंतु आम्ही मनातून टाकिला..... एविसी आम्हास श्री देवाची आण असे तुम्ही नि:संदेह होऊन येणे हेबीज आपाल....... त्या हाती तुम्हासी घरेबियाचे बरे वर्तावे मागील दावियाचा किंतु मनातून टाकिब ऐसे आपला आराध्य व कुलस्वामी असेल त्याची शपथ लिहून पत्र हेजिबा हाती पाठवून देणे. आम्ही सर्वप्रकारे तुमचे गोमटे करावयाशी अंतर पंजे न देऊन बहुत काय लिहणे.[४४] मालोजीने मात्र वरील पत्राचा कुठलाही विचार केला नाही. सिकंदर आदिलशहाच्या काळात मोगल बादशहा औरंगजेबाने विजापूरावर आक्रमण केले, सिकंदर आदिलशहाने शरणागती पत्करली. औरंगजेबाने २५ ऑक्टो. १६८६ रोजी विजापूरचे राज्य मोगल राज्यात सामील केले.[४५] विजापूरची आदिलशाही संपुष्टात आल्यानंतर मालोजी घोरपडे औरंगजेबाच्या

---

४३. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४२१.

४४. पवार सुधाकर, **मराठेशाहीतील पत्ररुप गद्य,** आवृत्ती- डिसें. १९७८, पृ. २०६.

४५. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड पहिला,** आवृत्ती-२०१२, पृ. २६०.

* परिशिष्ट क्र. २.

## मुधोळकर घोरपडे घराण्याची वंशावळ[४६]

**चोलराज**

- पिलाजी घोरपडे मुधोळकर (सातकस घराणे)
  - नावजी (प्रतापराव)
    - अंबाजी
    - बाजी
      - नावजी (महालोजी)
      - मालोजी (इ.स. १७०० च्या सुमारास मृत्यु)
        - अकोजी (अखयजी) (इ.स. १७२४-२५ दरम्यान मृत्यु)
          - पिराजी
            - मालोजी
              - गोविंदराव (मृ. १७७०)
                - नारायणराव (मृ. १८१५)
                  - व्यंकटराव (मृ. १८५४)
                    - बळवंतराव (मृ. १८६२)
                      - व्यंकटराव राजे उर्फ बाळासाहेब
                  - गोविंदराव
                  - लक्ष्मणराव
              - महाराव
            - संक्रोजी
            - राणोजी
          - बाजी (दुसरा)
      - शंकराजी
    - खंडोजी
    - तुकोजी
    - विठोजी
    - नेमोजी
- कानोजी
- वल्लभजी (नवकस घराणे)

४६. घोरपडे, श्री. बा. बा. राजे, **घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- मार्च १९८०, पृ. २६५.

फौजेत दाखल झाला. औरंगजेबाने त्याला मनसब आणि इतर मानमरातब देऊन आपल्या चाकरीत ठेवले. इ.स. १७०० च्या सुमारास मालोजी मुधोळकर घोरपडेचा मृत्यु झाला. मुधोळकर घोरपडे मराठेशाहीत कधीच रमले नाही. उलट ते मुस्लीम राजवटीशी एकनिष्ठ होते. आणि शहाजी राजे, शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या विरोधातील भूमिकेतच त्यांनी धन्यता मानली त्यामुळे ह्या घराण्याचा मराठी स्वराज्यासाठी काहीही उपयोग झाला नाही. मालोजीनंतर हे घराणे निस्तेज झाले.[४७]

## २.२ म्हाळोजी घोरपडे :-

राजे चोलराज घोरपडे बहाद्दर यांच्यानंतर त्यांच्या मुलांमध्ये भाऊबंदकीचा वाद उत्पन्न झाला. आणि घोरपडे घराण्याच्या दोन प्रमुख शाखा निर्माण झाल्या. एक मोठा मुलगा पिलाजीची वंशशाखा जी मुधोळकर घोरपडे म्हणून प्रसिध्दीस पावली. दुसरी वल्लभसिंहाची वंशशाखा ज्यातून पुढे कापशीकर घोरपडे, गजेन्द्रगडकर घोरपडे आणि दत्तवाडकर घोरपडे अशा विविध शाखा निर्माण झाल्या. विजापूरच्या आदिलशहाने इ.स. १५७० च्या सुमारास घोरपडे घराण्याला वाई प्रांतातील इटे मालवणे वगैरे कर्यातींची देशमुखी आणि इतर उत्पन्न दिले होते. तेव्हापासून वल्लभजी वाई प्रांतात देशमुखी करुन राहू लागला. देशमुखी वतनाशिवाय त्याला हुकेरी प्रांतात तैनातीची काही गावेही दिलेली होती.[४८]

वल्लभजीचा नातू म्हाळोजी यांच्यापासूनच या घोरपडे घराण्याचा मराठी रियासतीच्या इतिहासाशी संबंध आला. म्हाळोजींच्या अगोदर घोरपडे घराण्यातील पुरुष शुर होते, निष्ठावंत होते आणि लढाईच्या क्षेत्रात तरबेज होते. पण त्यांचे शौर्य निष्ठा आणि युध्दकौशल्य मुख्यत: मुस्लीम राजवटीशी (बहामनी आणि आदिलशाहीशी) निगडीत होते. म्हाळोजींने प्रथम शहाजी राजांच्या लष्करात शिलेदार म्हणून काम सुरु केले. त्यावेळी शहाजी राजे स्वत: विजापूरच्या आदिलशहाच्या दरबारातील एक नामांकित सरदार म्हणून प्रसिध्द होते. शहाजीराजांना व्यक्तीची योग्य पारख होती. ते खऱ्या अर्थाने पुढे महाराष्ट्रात स्थापन झालेल्या मराठा साम्राज्याचे 'राज्य संकल्पक'[४९]होते. त्यांनी

४७. कुलकर्णी, म. रा., **महाराष्ट्रातील प्रसिध्द सरदार घराणे,** आवृत्ती-२००९, पृ. १८.
४८. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.),**कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें. १९७४, पृ. २६.
४९. पवार, ज. भा., **मराठी सत्तेचा उदय,** आवृत्ती- १९८८, पृ. ८१.

म्हाळोजींच्या अंगचे गुण पाहून त्यांना लवकरच बढती दिली व पाचशे स्वारांचा सरदार बनविले.

म्हाळोजी व शहाजी राजांचे चांगलेच सख्य होते असे दिसते त्यामुळेच मुधोळकर प्रतापराव घोरपडे म्हाळोजी घोरपडेस ठरलेला हिस्सा देत नाही हे कळल्यावर शहाजीराजांनी स्वत: आदिलशहाकडे त्याबाबत तक्रार केली होती. त्यावर आदिलशहाने देखील शहाजी राजे आणि म्हाळोजींची मनसब आणि गावे त्यास परत करण्याचा हुकूम केलेला होता. त्यानुसार "प्रतापरावाने मुधोळसह चौऱ्यांऐंशी गावे, तोरगल परगणा, कर्नाटक व कऱ्हाड यातील निम्मी गावे आणि सात हजारी मनसब एवढा सरंजाम फक्त स्वत:कडे ठेवावा. राजा शहाजी भोसले यांनी वाई परगण्यापैकी निम्मी गावे, कऱ्हाड परगण्यापैकी २६ गावे आणि अर्धा कर्नाटक आणि पाच हजारी मनसब एवढा सरंजाम ठेवावा. म्हाळोजी बिन बहिरवसिंह (बहिर्जी) यांनी विजयनगरपैकी ३० गावे व दोन हजारी मनसब आपल्या कब्जात ठेवावी."[५०]

म्हाळोजींना मिळालेली जहागीर ही कर्नाटकातील होती, पुढे त्यांच्या वारसांनी देखील कर्नाटकातच मोठ्या प्रमाणात घोरपडे घराण्याचा विस्तार केल्याचे दिसून येते. म्हाळोजी घोरपडे यांच्या कर्तबगारीसंबंधी जुन्या बखरी आणि कैफियती यात अनेक ठिकाणी गौरवोद्गार सापडतात त्यावरुन म्हाळोजींचे मराठ्यांच्या इतिहासातील स्थान लक्षात येतेच पण भोसले घराण्यातील तीन पिढ्यांशी त्यांचे किती निकटचे संबंध होते याचीही माहिती मिळते.

शहाजी भोसले सुरुवातीस अहमदनगरच्या सेवेत होते. त्यानंतर ते आदिलशहाच्या सेवेत गेले. दोन्ही ठिकाणी त्यांनी मोगलांच्या वाढत्या सामर्थ्यास उत्कृष्ट प्रकारे तोंड दिले. त्या सुमारास शहाजींचे काम मुख्यत्वेकरुन बंगळूर, कंपली आणि कनकगिरी विभागात चालायचे. पूर्व घाटाखालील किल्ल्यांकडे तसेच तंजावरच्या किनारपट्टीवरील सपाट भूप्रदेशातील किल्ल्यांकडे लक्ष पुरवून त्यांनी स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले होते.[५१] या कामात त्यांना म्हाळोजी घोरपडेंची योग्य साथही मिळाली होती.

---

५०. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ३४.

५१. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. २०.

म्हाळोजी सर्वात प्रथम आदिलशहाच्या दरबारात नोकरीस होते. त्यावेळी दरबारातील पक्षपाती वागणूक त्यांना आवडली नाही. त्यावेळी आदिलशाहीतच शहाजी राजे चाकरीस असल्यामुळे त्या दोघांमधील सलोखा वाढला आणि म्हाळोजींनी शहाजीराजांच्या लष्करात शिलेदार म्हणून प्रवेश केला.[५२] शहाजी राजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी यांची नियुक्ती पन्हाळा प्रांताचा सुभेदार म्हणून करण्यात आला. त्यावेळी शहाजीराजांनी म्हाळोजींना संभाजी राजांच्या दिमतीस ठेवले होते. संभाजी राजांनी इ.स. १६५२ साली दिलेल्या एका निकालपत्रात म्हाळोजी घोरपडे यांची पाटीलकी कायम केल्याचा उल्लेख आहे.* ही पाटीलकी कसबेवांगी येथील होती.[५३] इ.स. १६५४ मध्ये कनकगिरीचा पाळेगार आपाखान यांच्या बंडाचा मोड करण्यासाठी पाठविलेल्या विजापूरी सैन्यात अफजलखानाबरोबर संभाजीराजे होते.[५४] कनकगिरीला वेढा घालण्यात आला. विजापुरी सैन्याने किल्ला ताब्यात घेण्यासाठी केलेल्या आक्रमणात अफजलखानाने ऐनवेळी मदत न केल्याने संभाजीराजे युध्दात ठार झाले. म्हाळोजी त्यावेळी शहाजी राजांबरोबर कर्नाटकात होते. त्यावेळी महाराजांकडे शहाजी राजांनी जे अनेक कर्तबगार मुलकी व लष्करी अधिकारी पाठविले त्यात म्हाळोजींचा समावेश असावा.[५५]

म्हाळोजी राजांनी शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापन्याच्या कामी बहुमोल असे सहाय्य केले. त्यांचा दोघांचाही स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात संबंध आला त्याविषयी कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याच्या कैफियतीत म्हटले आहे की, "कापशीकर सेनापती, गजेन्द्रगडकर हिंदुराव, दत्तवाडकर अमीरुल उमराव या तीन घराण्याचे मूळ पुरुष म्हाळोजी राजे घोरपडे व शककर्ते शिवाजी महाराज यांचे वडील शहाजीराजे भोसले बादशाहीत सरदार होते. हिंदू धर्माचे कामात पादशाहीत विकल्प आलेवरुन म्हाळोजी राजे व शककर्ते शिवाजीराजे यांचे हिंदुधर्म संस्थापन करणेबद्दल एकमत होऊन बेलभंडार परस्पर देऊन तह जाहला. तेथून पादशहाचे हुकुमतीत न चालता राज्याच्या वृध्दीस आरंभ करुन प्रांत काबीज करित चालले तेव्हा मराठी फौजेचा बंदोबस्त करण्याबद्दल बादशहाकडून मुसलमान सरदार येऊन त्याजबरोबर कितीएक युध्दप्रसंग जाहले. त्यात दिवसेंदिवस मराठी फौजेस जय प्राप्त जाहला. देश दुर्ग हस्तगत केले. किती एक नवीन किल्ले बांधीले व जीर्णोध्दार

---

५२. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६ पृ. ४०५.

५३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट-१९८३, पृ. ४१.

५४. भोसले, प्रविण, **मराठ्यांची धारातिर्थे,** आवृत्ती- ऑक्टों. २०१२, पृ. १६.

५५. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती-डिसें. २००८, पृ. ९.

* परिशिष्ट क्र. ३.

केला. नंतर शके १५९६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शुध्द १३ इ.स. १६७४ यासाली रायगड येथे शिवाजी राजे यांस हिंदुपदपातशाहा छत्रपती म्हणोन राज्यभिषेक केला."[५६] यावरुन म्हाळोजी राजे संभाजीराजांच्या मृत्यूनंतर शिवाजी महाराजांच्या चाकरीत होते हे स्पष्ट होते.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न इ.स. १६४७ पासूनच सुरु झाला. म्हाळोजींनी शिवाजींच्या अनेक लष्करी मोहिमात सहभाग सुध्दा घेतला असावा. ते शिवाजी महाराजांच्या विजापूरच्या मोहिमेतही सहभागी होते.[५७] म्हाळोजी एक निष्ठावान व शुर सेनानी होते, त्यांनी आपल्या इमाने इतबारे केलेल्या सेवाचाकरीमुळे शिवाजी महाराजांचा विश्वास संपादन केला होता. ते महाराजांच्या खास विश्वासातील असावेत म्हणूनच शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीच्या शेवटी संभाजी राजास पन्हाळगडावर नजर कैदेत ठेवले त्यावेळी युवराजांवर नजर ठेवण्याचे मोठ्या जोखमींचे व नाजुक काम महाराजांनी म्हाळोजीवर सोपविले होते.[५८] महाराजांना माणसाची पारख अचूक असल्यामुळे त्यांनी म्हाळोजींच्या शौर्याचा आणि निष्ठेचा बरोबर अंदाज घेतला व त्यांच्यावर विविध जबाबदाऱ्या टाकल्या.[५९]

दि. ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर असतांना ज्वराच्या आजाराने शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला.[६०] केवळ शिवाजी महाराज नाही तर छत्रपती संभाजींचाही विश्वास म्हाळोजींनी संपादन केलेला होता. म्हाळोजींच्या स्वराज्य निष्ठेविषयी संभाजी राजांनाही खात्री वाटत होती. त्यामुळेच शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडावर सुरु झालेल्या राजकारणाचा तसेच संघर्षाचा समाचार घेण्यासाठी संभाजी राजांनी जाण्यापूर्वीच पन्हाळा किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी म्हाळोजींवर टाकली.[६१] पन्हाळ्याचा किल्ला म्हणजे त्यावेळी स्वराज्याचे दक्षिणेतील सर्वात महत्वाचे स्थान होते. संभाजी महाराजांच्या काळात म्हाळोजी घोरपडे हे पन्हाळगडावरील सरनौबत म्हणूनच काम पहात होते असे दिसते. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांच्या आयुष्यातील सर्व घटनांमध्ये म्हाळोजी घोरपडेंनी त्यांना सहाय्य केले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत म्हाळोजी घोरपडे आपल्या छत्रपतींशी एकनिष्ठ राहिले.

---

५६. गायकवाड, खं. आ., (संपा.), **करवीर सरदारांच्या कैफियती,** आवृत्ती- १९७१, पृ. १७.
५७. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४०५.
५८. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती-डिसें. २००८, पृ. ११.
५९. सरदेसाई, गो. स., (संपा.), **ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे लेख,** आवृत्ती- १९३०, पृ. ३८४
६०. देशमुख विजयराव, **शककर्ते शिवराय, खंड दुसरा,** आवृत्ती-ऑक्टों. २०१०, पृ. ३९४.
६१. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,**आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ५२.

संभाजी महाराजांनी स्वराज्याची सूत्रे हातात घेतल्यानंतर अष्टप्रधान मंडळांची नेमणूक केली. त्यातील मुख्य सेनापतीपद हंबीरराव मोहिते यांना देण्यात आले होते.[६२] १० डिसेंबर १६८५ रोजी वाई या ठिकाणी संघर्षात मारले गेले तेव्हा सेनापती हे पद संभाजी महाराजांनी म्हाळोजींना दिले असाही उल्लेख आढळतो. त्यामुळेच सोंडूरचे सत्ताधिश आजवर मराठ्यांच्या सैन्यातील सन्माननीय पद म्हणून 'सेनापती' हा किताब लावीत असत.[६३] संभाजींची कारकिर्द म्हणजे मराठ्यांसाठी अतिसंघर्षाचा कालखंडच होता. शिवरायांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने दक्षिणेत जे क्रुरसत्र सुरु केले त्याला संभाजींनी आपल्या आठ-नऊ वर्षाच्या छोट्याशा कारकिर्दीत सडेतोड उत्तर दिले. त्यामुळेच औरंगजेबाला आपल्या अर्धापाऊण लाख सैन्याला उत्तरेस परत पाठवावे लागले आणि स्वत:ची छावणी भीमेच्या पलीकडे नेऊन वसवावी लागली होती.[६४]

शिवाजी महाराजांच्या अकस्मित मृत्यूचा फायदा घेऊन शिर्क्यांनी कोकण प्रदेशात स्वराज्याविरुध्द बंडाळ्या सुरु केल्या व या कामासाठी त्याने मोगल बादशहाकडे मदतीची याचना केली. बादशहाने ह्या संधीचा फायदा घेऊन मोगल सेनाधिकारी शेख निजाम यास शिर्क्यांच्या मदतीसाठी कोकणात पाठविले. तो आपल्या सैन्यासह प्रभावळी प्रांतात उतरला.[६५] शिर्क्यांच्या सांगण्यानुसार शेख निजामाने योजना करुन पाचसातशे शिपाई संगमेश्वर जवळ आणून ठेवले. संभाजीराजांनी म्हाळोजी घोरपडेंच्या लष्करी तुकडीसोबत निजामावर हल्ला केला. परंतु पुर्वीच ठरलेल्या योजनेप्रमाणे निजामाने मागे ठेवलेले राखीव सैन्याने अचानक संभाजीवर हल्ला केला. मोगलांचे सैन्य संख्येने मराठ्यांच्या सैन्यापेक्षा कितीतरी जास्त होते. तरीही म्हाळोजींनी मोठ्या हिमतीने मोगल सैन्याचा सामना केला. त्यावेळी संगमेश्वरच्या मुक्कामी वाड्यातील तळघरात संभाजीसह अनेकांनी आश्रय घेतला. मात्र तेथे निजामाच्या मुलाने त्यांना पाहिले असावे.[६६] निजामाने वाड्यास वेढा दिला. आणि संभाजी राजांना शोधून बाहेर काढले त्यावेळी मोठी झटापट झाली. संभाजीराजे नावडी (पेठसंगमेश्वर) या गावी पकडले गेल्याचा उल्लेख पेशवे दप्तरात मिळतो.[६७]

---

६२. सोवनी, अविनाश, **स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान,** आवृत्ती-१९९८, पृ. १०५.

६३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ५२.

६४. बेंद्रे, वा. सी., **श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र,** आवृत्ती- मार्च २०१३, पृ. ७३२.

६५. गर्गे, स.मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हे. १९७४, पृ. ३०.

६६. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ५४.

६७. पवार, ज. भा., **छत्रपती संभाजी एक चिकित्सा,** आवृत्ती- जाने.२०१०, पृ. १२२.

म्हाळोजींनी स्वराज्याला संरक्षण देण्यासाठी पराक्रमाची पराकाष्ठा केली. मात्र १ फेब्रुवारी १६८९ रोजी या प्रयत्नातच मोगल सैन्याच्या हल्ल्यात म्हाळोजी घोरपडेंचा मृत्यू झाला, आणि संभाजी राजांना अटक केली गेली. यावेळी म्हाळोजीचे पुत्र संताजी, बहिर्जी, मालोजी तसेच खंडोबल्लाळ आणि इतर मंडळी सुरक्षितपणे तेथून निसटली या घटनेची नोंद राणोजी घोरपडेंना कोल्हापूरच्या संभाजी राजांनी दिलेल्या एका सनदेत आहे, त्यात म्हटले आहे, "मुळ पुरुष म्हाळोजी घोरपडे शककर्ते सीवाजी महाराज याजपाशी सरदारी करुन होते. त्यास महाराजांनी पनाळे मुक्कामी सरनोबती दिंली व पनाला किला दिल्हा होता. श्री सीवाजी महाराज यानी कैलासवास केलेवर त्यांचे चिरंजीव संभाजीमहाराज राज्य करीत असता रायगडाहून संगमेश्वरास आले तेथे त्याजवर अवरंगजेब पादशहा याजकडून फौज आली हे वर्तमान पनालेस म्हाळोजी घोरपडे यास कलताच संगमेश्वरास गेले तेथे ख्वाणहाचे फौजेची व महाराज सरकारची लढाई जाहली त्यात म्हाळोजी घोरपडे हे ठार झालेवर संभाजी महाराज यास धरुन नेहले."[६८]

घोरपडे घराण्यातील विर पुरुषाने हिंदवी स्वराज्याच्या व छत्रपतींच्या रक्षणासाठी केलेले हे पहिले आत्मबलिदान होते.[६९] म्हाळोजी घोरपड्यांच्या आयुष्याचा शेवट काहीसा अनपेक्षितपणे झाला. पण फार मोठ्या उदात्त कामासाठी ते लढता लढता मृत्यू पावले आणि त्यातच त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले. मृत्यूसमयी म्हाळोजींचे वय सुमारे ६५ वर्षाचे असावे. शहाजी राजे, शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या तिघांबरोबरही म्हाळोजी घोरपडेंनी सेवाचाकरी केलेली होती आणि तिघांच्याही विश्वासातील एक महत्वाची व्यक्ती म्हणून म्हाळोजींचा उल्लेख केला जातो. म्हाळोजींना संताजी, बहिर्जी व मालोजी अशी तीन मुले होती. ज्यांनी वडिलांच्या मृत्यूनंतर मराठ्याचे स्वातंत्र्य युध्द नेटाचे चालू ठेवले. या तिन्ही बंधूनी राजाराम महाराजांच्या काळात अद्वितीय कामगीरी केली. छत्रपती राजाराम महाराजांनी त्या तिघांच्याही कार्याची दखल घेवून संताजीस ममलकतमदार, बहिर्जीस हिंदुराव तर मालोजीस अमीर-उल-उमराव ह्या उपाध्या दिल्या. यामुळेच म्हाळोजी घोरपडेंच्या घराण्याच्या तीन शाखा निर्माण झाल्या त्या पुढीलप्रमाणे,

---

६८. वर्टिकर, श. ह., (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे**, आवृत्ती-१९७१, पृ. २०१.
६९. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे**, आवृत्ती- डिसें. २००८, पृ. ९.

## २.२.१ कापशीकर सेनापती घोरपडे घराणे :

घोरपडे घराण्यातील चोलराजपुत्र वल्लभजी हा कापशीकर घोरपडे घराण्याचा मुळपुरुष मानला जातो. वल्लभजीच्या घराण्यास नवकस घोरपडे असेही म्हणत असत असे संबोधतांना त्याविषयी अनेक आख्यायिका सुध्दा प्रसिध्द आहेत. नवकस यामुळे म्हटले जात असे की, कापशी घोरपडे घराण्याचा मूळ पुरुष वल्लभजी याच्या घराण्यातील नऊ पुरुष एकाचवेळी युध्दात कामी आले तसेच मुधोळच्या इतिहासात एक आख्यायिका अशीही दिलेली आहे की, कापशी घराण्यातील एक पूर्वजाने एकाचवेळी नऊ विवाह केले होते. आख्यायिका काहीही असल्यातरी कापशी घराण्याच्या जुन्या कागदपत्रात 'नवकस घोरपडे' असा शब्द अनेक ठिकाणी वापरण्यात आलेला आहे.[७०] वल्लभजी आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्या मिळालेल्या वाई प्रांतातील इटे परगण्याची देशमुखी करुन राहू लागला. देशमुखी वतनाशिवाय त्याला हुकेरी प्रातांत तैनातीची काही गावेही दिलेली होती. विजापूरच्या आदिलशहाकडुनच कापशीचे ठाणे व त्याभोवतालचा काही तालुका कापशीकरांकडे सरंजाम म्हणून चालत होता. तेव्हापासूनच हे घराणे कापशीकर म्हणून प्रसिध्दीस पावले त्याचप्रमाणे राजाराम महाराजांच्या काळात इ.स. १६९१ मध्ये त्यांनी संताजीस मराठा स्वराज्याचा सेनापती म्हणून नेमणूक केली.[७१] म्हणूनच या घराण्याचा उल्लेख करतांना कापशीकर सेनापती घोरपडे असा केला जातो.

म्हाळोजी घोरपडे रणांगणी पडल्यावर त्यांचा मोठा मुलगा संताजीकडे घराण्याचा वारसा चालत आला. संताजी शिवाजी महाराजांच्या काळापासूनच लष्करी मोहिमांमध्ये सहभागी होत होता. शिवकाळात संताजी हंबीरराव मोहितेंसारख्या सेनानीच्या हाताखाली लष्करी मोहिमांमध्ये सहभागी होत असे. संताजीच्या ठिकाणी असलेले लष्करी कर्तृत्व लक्षात आल्यानंतर स्वत: हंबीररावांनीच संताजीस आपल्या लष्करात घोडदळाच्या जुमलेदारांची जागा द्यावी,[७२] अशी शिफारस शिवाजी राजांकडे केली होती. यावरुन संताजीच्या पराक्रमाची चुणूक सुरुवातीच्या काळातच दिसली होती असे म्हणता येते. परंतु संभाजी महाराजांच्या वधाने मराठ्यांच्या राज्यात निर्माण झालेल्या असाधारण अस्थिर परिस्थितीत संताजी सारख्या पराक्रमी पुरुषास आपल्या अंगचे गुण दाखविण्यास योग्य संधी

---

७०. गर्गे, सं. मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४ पृ. २५.

७१. कुळकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती- १९८६, पृ. ४१०

७२. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती- डिसें. २००८, पृ. १४.

उपलब्ध होती. छत्रपती राजाराम महाराजांनी घोरपडे घराण्यातील म्हाळोजींच्या तिनही मुलांच्या पराक्रमी कामगिरीमुळे त्यांच्यावर खुश होऊन त्यांना विविध उपाध्या दिल्या. म्हाळोजी पुत्र संताजी याने कापशीकर घोरपडे घराण्याला महत्व प्राप्त करुन दिले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज या तीनही छत्रपतींच्या कारकिर्दीत संताजीने आपल्या पराक्रमाची चुणूक दाखविली.

छत्रपती संभाजी महाराजांच्या संगमेश्वर मुक्कामी झालेल्या झटापटीत म्हाळोजी मारले गेले व संभाजी राजे कैद झाले त्यावेळी संताजी सोबतच होता. संताजी, बहिर्जी, मालोजी व इतर मराठी मंडळी तेथून सुरक्षितपणे निसटली.[७३] स्वाभाविकच वडिलांच्या मृत्यूनंतर घोरपडेबंधू आपल्या पित्यांच्या खूनाची परतफेड करण्यास तयारच होते. त्यांनी पुढील काळात औरंगजेबासारख्या पातळयत्री बादशहाला व त्याच्या प्रचंड फौजेला सळो की पळो करुन सोडले. शिवरायाच्या सैन्यात संताजींनी युध्द कौशल्य आत्मसात केले होते. प्रचंडसेना, कुटिल कारस्थाने आणि धार्मिक अत्याचार या दहशत बसवणाऱ्या औरंगजेबी तंत्राला प्रचंड पराक्रमाने सणसणीत थप्पड लावून त्याच्या सैनिकांना पाणी न पिणाऱ्या घोड्यास 'पाण्यात संताजी दिसतो काय?' असे विचारायला भाग पाडणारी दहशत बसवणारे संताजी घोरपडे हे मराठ्यांच्या तसेच कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याच्या इतिहासातले एक सोनेरी पर्व होते.[७४]

इ.स. १६७७ साली शिवाजी महाराजांनी कर्नाटकातील प्रदेश जिंकण्यासाठी कर्नाटकात मोहिम काढलेली होती. या मोहिमेत हंबीरराव मोहितेंनी पराक्रम गाजविला होता त्यावेळी त्यांच्यासोबत संताजी असून त्याने देखील तलवार गाजविल्याचे उल्लेख एक्यानव कलमी बखरीत आहेत.[७५] इ.स. १६८२ मध्ये संताजी घोरपडेच्या नेतृत्वात संभाजी महाराजांनी कर्नाटकात स्वारीस पाठविले होते. कर्नाटकातील बेरड व पठाणांनी स्वराज्याविरुध्द बंडखोरी केली होती. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी संताजीने बारा हजार सैन्य सोबत घेऊन मोहिम काढली. ही मोहिम तीन महिने चालली व बेरड व पठाणांचा पराभव झाला. या मोहिमेविषयी एक महत्वाची सनद संभाजी महाराजांनी संताजीस

---

७३. गर्गे, सं. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ५४.

७४. भोसले, प्रविण, **मराठ्यांची धारातिर्थे,** आवृत्ती- ऑक्टों. २०१२, पृ. ७७.

७५. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती- डिसें. २००८, पृ. १४.

दिलेली होती. त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे.

"स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ८ दुर्मती नाम संवत्सरे पौष बहुल ३ गुरु वासरे क्षत्रिय कुलावतनस श्री शंभु छत्रपती स्वामी याणी राजमान्य राजश्री संताजी घोरपडे यासी आज्ञा केली ऐसी जी पठाण, मुसलमान, बेरड वगैरे लोक.... ठाणी घालून सातहजार घोड्यांची व फौजेची... करुन आपला देश काबीज करीत चालून मुलखात लुटा ..... उडविले साह्य होत नसता तुम्ही काटकरांची वगैरे बारा हजार सेना जमवून तीन महिने लढाई करुन सर्व शत्रूचा पराजय केला आणि तूंगभद्रा पावेतो मुलूख काबीज करुन आपली अशी सर केली. हा उपयोग राज्याचा चांगला केला आणि सर्व सरकारात चाकरी हिंमतीने आणि इमानाने केली व आपला प्राण रक्षण करुन आमचा रक्षण केला समजून तुम्हास राज्यातील राज्यापैकी चौथाई मुलूख इनाम करुन दिला असे."[७६]

संभाजी महाराजांनी संताजी घोरपडेला इ.स. १६८६ मध्ये कर्नाटकात पाठवले यापुर्वी कोप्पल परिसरात पठाण, बेरड आणि इतर जमातींनी केलेले उठाव मोडून काढले होते. या दुसऱ्या कर्नाटकाच्या स्वारीत संताजीबरोबर १२००० घोडस्वार आणि केशव त्र्यंबक पिंगळे हे सोबत होते. याचवेळी औरंगजेबाने कासीम खानाबरोबर मोठे सैन्य देऊन बंगलोरसारखे महत्वाचे शहर जिंकून घेण्यास सांगितले. संताजीने मात्र मोगल सैन्यापूर्वीच बंगलोर शहरावर हल्ला केला. त्यानंतर मागोमागच कासीमखानाचे सैन्यही तेथे पोहोचले. म्हैसूरच्या राजाने मात्र यावेळी कासीमखानाला मदत केली. विनाकारण दोन्ही सैन्यासोबत संघर्ष होवू नये यासाठी संताजीने कासीमखानाशी संघर्ष न करता आपला मोर्चा कर्नाटकातील इतर शहरांकडे वळविला. कासीमखानाने १० जुलै १६८७ रोजी बंगलोर शहर जिंकून घेतले आणि चिक्कदेवराय यास तीन लाख रुपये घेवून हे शहर विकले.[७७]

शेख निजामाने शिर्क्यांच्या मदतीने संगमेश्वरवर हल्ला करुन तेथून संभाजी महाराजांना कैद केले, त्यावेळी संताजी स्वराज्यात पोहोचण्यात यशस्वी ठरला. संगमेश्वर वरुन संताजी निसटून रायगडाकडे पोहोचले, आणि तिकडे १ मार्च १६८९ रोजी औरंगजेबाने हालहाल करुन संभाजी

---

७६.वर्टिकर, श. ह., (संपा.),**कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे,** आवृत्ती-१९७१, पृ. १७.

७७. Muddachari, B., **The Mysore-Maratha Relation**, Edition- 1969, Pg.113.

राजांना ठार केले. यावेळी रायगडावर संभाजींची राणी येसूबाई, राजाराम महाराज आणि राजघराण्यातील इतर मंडळी होती. रायगडास मोगलांचा वेढा पडलेला होता. त्यामुळे रायगडावर राहणे हे सर्वांसाठीच धोक्याचे होते. संपूर्ण स्वराज्यासमोर एक मोठे संकट उभे राहिले होते. रायगड जर मोगलांच्या हाती लागला तर सर्वच मोगलांच्या ताब्यात सापडतील, यापेक्षा छत्रपती घराणे वाचविणे महत्वाचे होते. राणी येसूबाईंनी या गंभीर संकटप्रसंगी आपले ध्येय न सोडता या आणीबाणीच्या प्रसंगी "राजाराम महाराजांनी रायगडाहून निघून जावे, बाहेर जावून त्यांनी मोगलांशी लढा चालू ठेवावा तसाच बाका प्रसंग उद्‌भवल्यास कर्नाटकात जिंजीकडे जावे, तेथे राजधानी स्थापन करुन मराठ्यांच्या राज्याचे अस्तित्व टिकवावे असा व्यवहारिकदृष्ट्या योग्य, नामी सल्ला दिला."[७८] हा सल्ला जरी राजाराम महाराजांना आवडला नाही तरी एकाचवेळी संपूर्ण छत्रपती घराण्यातील मंडळी मोगलांच्या ताब्यात आल्यास मराठी स्वराज्य संपूष्टात आले असते. त्यामुळे राणी येसूबाईंच्या सांगण्यानूसार राजाराम महाराज ५ एप्रिल १६८९ रोजी रायगड सोडून बाहेर पडले. त्यावेळी त्यांच्याबरोबर प्रल्हाद निराजी, संताजी, बहिर्जी, मालोजी हे लढवय्ये घोरपडे बंधु होते.[७९]

राजाराम महाराज आपल्या तीन राण्या आणि निवडक विश्वासू लोकांसह रायगड सोडून प्रतापगडाकडे निघाले. प्रथम जावळी आणि नंतर ते प्रतापगडावर पोहोचले. ही बातमी समजताच औरंगजेबाने राजाराम महाराजांना पकडण्याकरिता कोकणातील आपले ठाणेदार, सावंतवाडीचा खेमसावंत आणि गोव्याचे पोर्तुगीज या सर्वांना निरोप पाठवून सावध केले. तसेच कोणीही राजारामाला आश्रय देऊ नये अशी सक्त ताकीद दिली. अशावेळी प्रतापगडावर अधिक काळ राहाणे धोक्याचे असल्यामुळे वासोटा मागे सर्व मुक्काम साताऱ्यास हलविला. साताऱ्या वरुन सज्जनगडावर जावून श्रीरामदास स्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. पूजा, प्रार्थना करुन[८०] ३० जूनच्या सुमारास राजाराम महाराज सर्व लोकांसह पन्हाळगडावर पोहोचले तेथे पुढील रणनिती आखली गेली. त्यानुसार 'राजकार्य धुरंधर विश्वासु शूर महाबुध्दिमान असा जो अमात्य निळकंठ याचा पूत्र रामचंद्र याच्यावर आपला राजकारभार सोपवून आपण काही निवडक लोकांनिशी सत्वर कर्नाटकास जावे आणि निरलसपणे स्वराज्य रक्षणाचा प्रयत्न करावा.'[८१]

---

७८. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. ३६.

७९. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट-१९८३, पृ. ५८.

८०. हेरवाडकर, र. वि., **श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र, जिंजीचा प्रवास,** आवृत्ती - ऑगस्ट १९७२, पृ.५

८१. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ३७.

संभाजी महाराजांचा वध केल्यापासून मोगली सैन्य स्वराज्यावर नियमीत हल्ले करुन स्वराज्य अस्थिर करण्यात गुंतलेले होते. मराठ्यांचे आता सर्व संपले असे वाटण्याच्या या काळात त्यांची सत्ता परत खेचून आणण्याचे श्रेय संताजी घोरपडेस जाते. त्याच्यासोबत धनाजी जाधव, विठोजी चव्हाण, खंडोबल्लाळ असे अनेक शूरवीर मराठा सरदार होते. संताजी गनिमीकाव्यात पटाईत होते, आणि बालपणापासून शिवाजीच्या पदरी होते. मराठ्यांवर कोसळलेल्या बिकट परिस्थितीचा सामना करण्याचा निश्चय करुन त्यांनी अतुलनीय कौशल्य आणि शौर्य दाखवत निकराचा लढा दिला. मोठ्या भुप्रदेशात मोठ्या संख्येने विखुरलेले सैन्य हाताळण्यात त्यांचा हातखंडा होता. ते युध्दकला निपूण होते.[८२]

राजाराम महाराज पन्हाळगडावर होते. त्यांच्यामागे मोगल सैन्य पाठलाग करीत होते. पलिकडे रायगडावर मोगल सैन्याचा वेढा पडलेला होता. स्वराज्यातील अनेक किल्ले मोगलांच्या ताब्यात गेलेले होते. मोगलांच्या या आक्रमणासमोर टिकून राहण्यासाठी संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी वैशिष्ट्यपूर्ण अशा गनिमीकाव्याच्या युध्द पध्दतीने मोगल सैन्याची लांडगेतोड सुरु केली. संभाजी महाराजांचा वध केल्यापासून औरंगजेब बादशाहा भीमानदीकाठी कोरेगाव येथे छावणी करुन होता. फारसी कागदपत्रात तुळापूर असे दिलेले आहे. वस्तुत: बादशहाच्या विशाल सैन्याची छावणी तुळापूर ते वडुकोरेगाव पर्यंतच्या टापूत पसरलेली होती.[८३] घोरपडे बंधुनी बादशहाच्य छावणीवरच मोहिम काढण्याचे ठरविले. या मोहिमेत संताजी, बहिर्जी, मोलोजी हे तीन बंधू तसेच विठोजी चव्हाण यांचा समावेश होता. दोन हजार घोडस्वार सोबत घेऊन त्यांनी मध्यरात्री ही धाडसी मोहिम फत्ते केली. त्यांनी या मोहिमेत अत्यंत निवडक व विश्वासू असे सहकारी सोबत घेतलेले होते. बादशहाच्या छावणीजवळ पोहचल्यानंतर त्यांनी अचानक छावणीवर हल्ला करुन डेऱ्याचे (तंबू) तणाव तोडले आणि बादशहाच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून काढले. मध्यरात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन लुटालुट सुरु केली. त्यामुळे परिसरात गोंधळ सुरु झाला. त्याचा फायदा घेवून घोरपडे बंधू आपल्या सहकाऱ्यांसह मोगल छावणीतून बाहेर पडले. मोगलांचे पाच हत्ती, काही शस्त्रास्त्रे व सामान घेऊन घोरपडे बंधू अतिशय वेगाने पन्हाळ्याला जाऊन पोहोचले.[८४]

---

८२. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती - एप्रिल २०११, पृ. २४.
८३. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती - डिसें. २००८, पृ. २२.
८४. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ६०.

करवीर सरदारांच्या कैफियतीत या घराण्याला मिळालेल्या सनदामध्ये या घटनेविषयी स्पष्ट उल्लेख आहे, "यांनी आपले वडील मारल्याचा सूड उगवावा म्हणून द्वेष धरुन फौज जमावनिशी बादशहावर तुळापूरास जाऊन बहुत दसनस करुन बादशहाचा मोड करुन डेऱ्याचे सोन्याचे शिक्के कट्यार पाडाव करुन राजाराम महाराज यांजकडे विशाळगडी आणले."[८५]

संभाजी महाराजांच्या मृत्यूमुळे स्वराज्यातील मराठा सैन्याला एक प्रकारे मरगळ आलेली होती. संताजीच्या तुळापूरच्या मोहिमेतील अद्वितीय साहसामुळे ती मरगळ दुर होण्यास फार मोठी मदत झाली. औरंगजेबाच्या मुक्कामावर हल्ला करणे हे संताजीने स्वत:च्या जीवावर उदार होऊन केलेले साहसच होते. या मोहिमेमुळे मराठ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास फार मदत झाली. राजाराम महाराजांनी वस्त्रे, आभूषणे व सन्माननीय पदव्या देऊन संताजीस व त्याच्या सहकाऱ्यांना नावाजिले.[८६] संताजीच्या ह्या अद्वितीय साहसाबद्दल राजाराम महाराजांनी संताजी आणि त्यांचे बंधू यांना पुढील प्रमाणे मानाचे किताब दिले, "त्यावेळी महाराज खुष होऊन घोरपडे तिघे बंधू व विठोजीराव चव्हाण यास वस्त्रेभूषणे देऊन किताबती दिल्या. संताजीराव घोरपडे यांस ममलकतमदार, बहिर्जीराव घोरपडे यास हिंदूराव व मोलाजीराव घोरपडे यास अमीर-उल-उमराव आणि विठोजीराव चव्हाण यास हिंमतबहाद्दर असे किताब दिले."[८७]

या घटनेच्या वेळी राजाराम महाराज पन्हाळा गडावर होते. तेथे इतक्या धामधुमीतही दुर्गादेवीचा नवरात्र उत्सव उत्साहात साजरा केला गेला. त्यावेळी हा किल्ला काबीज करण्यासाठी औरंगजेब बादशहाने शेख निजाम यास पाठविले होते. पन्हाळगडाला मोगल सैन्याचा पडलेला वेढा पाहून गड सोडून जिंजीकडे जाण्याची तयारी मराठ्यांनी सुरु केली. त्यामुळे २६ सप्टेंबर १६८९ रोजी मोगली फौजांनी गडास वेढा दिला असतांनाही त्यांना चकमा देऊन ते किल्ल्याच्या बाहेर पडले या प्रवासात महाराजांबरोबर जीवास जीव देणारी पुष्कळ निवडक मंडळी होती.[८८] सेनापती पानसबळ प्रल्हाद निराजी, मानसिंग मोरे, कृष्णाजी अनंत, निळकंठ मोरेश्वर, खंडो बल्लाळ, कन्होजी आंसे, बाजी कदम, कृष्णाजी अनंत सभासद अशी विश्वासातील काही मोजकी मंडळी राज्यांच्या सोबत होती.

---

८५. गायकवाड, खं. आ., **करवीर सरदारांच्या कैफियती,** आवृत्ती- १९७१, पृ. १८.

८६. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती- डिसें. २००८, पृ. २४.

८७. वर्टिकर, श. ह., (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे,** आवृत्ती-१९७१, पृ. १०८.

८८. गर्गे, स.मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती- २०१२, पृ. १६०.

रस्त्यात बहिर्जी व मालोजी घोरपडे त्यांना येऊन सामील झाले. हा प्रवास अत्यंत खडतर व धोक्याचा होता. मोगलांना त्यांच्या या सर्व हालचाली समजल्यावर त्यांनी महाराजांच्या पाठलागाला सुरुवात केली. चिटणीस बखरीतील वर्णनाप्रमाणे महाराजांनी आणि त्यांच्या बरोबरच्या मंडळींनी लिंगायत वाण्याचा वेश धारण केला होता.[८९] मोगली ठाणी व लष्करांना चकमा देत नाना प्रकारची वेषांतरे करीत महाराज आपल्या सोबत्यांबरोबर तुंगभद्रेच्या अलिकडेच असणाऱ्या बिदनूरच्या राणीच्या राज्यात पोहोचले.

राजाराम महाराजांनी संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगड सोडल्यानंतर मोगलांनी हा अजिंक्य गड जिंकण्याचा निकराने प्रयत्न केला. मात्र हा गड जिंकणे मोगलांना बरेच अवघड गेले. १९ ऑक्टोंबर १६८९ रोजी फितुरांनी शत्रूला मदत केल्यामुळे रायगड मोगलांच्या हाती पडला.[९०] त्यावेळी महाराणी येसूबाई, शाहू आणि राजघराण्यातील मंडळी मोगलांच्या हातात पडली मात्र त्याचवेळी राजाराम महाराज पन्हाळगडावरुन कर्नाटकाकडे निघुन गेल्याची बातमी कळल्यामुळे औरंगजेबाच्या आनंदावर विरजण पडले. जिंजीकडे जाण्यापुर्वी महाराजांनी महाराष्ट्रातील स्वराज्याचा कारभार रामचंद्रपंत अमात्यांकडे सोपविला होता आणि त्यांच्या हाताखाली शंकराजी नारायण सचिव, संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांना मदतीसाठी नियूक्त केले.[९१]

जिंजीच्या या प्रवासात संताजी घोरपडे महाराजांसोबत नव्हता. त्याने महाराष्ट्रात थांबून बादशहाच्या फौजांचा समाचार घ्यावा असे ठरले होते.[९२] त्याचप्रमाणे मोगलांवर संताजीने हल्ले चढवून त्यांना कोल्हापूर भागातच गुंतवून ठेवल्यामुळे राजाराम महाराजांना तुंगभद्रा नदीपर्यंत झपाट्याने जाता आले. त्यानंतर त्यांनी बिदनूरची राणी चन्नमाच्या प्रदेशात प्रवेश केला.[९३] मोगल सैन्य त्यांचा पाठलाग करीतच होते. याची जाणीव असूनही हिंदूधर्माची अभिमानी असल्यामुळे तिने महाराजांचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले व त्यांना आपल्या राज्यातून प्रवास करतांना पूर्ण संरक्षण दिले. ही गोष्ट बादशहास समजताच त्याने जाननिसारखान यास मोठी फौज देवून बेन्नरुवर (बिदनूर) पाठविले. पण संताजीने ही बातमी समजताच खानाच्या फौजेवर चढाई केली. मोगल आणि संताजी

---

८९. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. ४०.
९०. **कित्ता,** पृ. ४०.
९१. बेंद्रे, वा. सी., (संपा.), **केशव पंडितकृत राजाराम चरितम् सर्ग ४, श्लोक-११,१२,१३,** आवृत्ती- शके १८५३, पृ. ४१.
९२. गर्गे, स.मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. १६१.
९३. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती- डिसें. २००८, पृ. २५.

यांचा युध्दप्रसंग घडला, निकराची मारामारी झाली. उभयपक्षाचे अनेक लोक जखमी झाले, बादशाही फौजेचा दणदणीत पराभव झाला. सगळी फौज, सामग्री व तोफखानाही गारद झाला. जाननिसारखान जखमी झाला. मोठ्या प्रयासाने तो जिवानिशी निसटला.[९४] संताजीचा हा हल्ला इतका जोरदार होता की, त्यामुळे मोगल फौजेची धुळधाण उडाली. त्यावेळी औरंगजेब बादशहाला हा अपमान सहन झाला नाही.

बिदनूरची राणी चन्नमाने बादशहाकडे विनंती केली की, राजारामाला आपल्या येथे आश्रय दिलेला नाही. मोगल सेनापती स्वत:चा पराभव लपवण्यासाठी आपल्यावर आळ घेत आहेत. तेव्हा बादशहाने आपल्याविरुध्द पाठवलेले सैन्य परत बोलावून घ्यावे, शेवटी बादशहाने राणीची विनंती मान्य केली. अर्थात त्यासाठी राणीला खंडणीचे आठ लाख रुपये आणि नजराणा म्हणून दरवर्षी पंचवीस हजार रुपये भरावे लागले.[९५] औरंगजेब बादशहाने संताजीच्या कर्नाटकातील पराक्रमचा धसका घेतला त्यासाठी त्याने संताजीचे लक्ष कर्नाटकातून काढून घेण्यासाठी रुस्तुमखान विजापूरी (सर्जाखान) या मोगल सेनापतीच्या सोबत मोठे सैन्य दिले. आणि त्यास सातारचा किल्ला जिंकून घेण्यासाठी पाठविले. संताजी, धनाजी, रामचंद्र व शंकरजी यांच्या संयुक्त फौजांनी रुस्तुमखानाच्या सैन्याचा धुवा उडवला. दिड हजार मोगल सैनिक मारले गेले. स्वत: रुस्तुमखान जखमी होवून हत्तीवरुन खाली पडला. त्याला चार हजार घोडे, आठ हत्ती आणि सैन्यांच्या संपूर्ण सादीसह कैद करण्यात आले.[९६] रुस्तुमखानाने संताजीला १ लाख होन देण्याचे कबुल केले. आणि स्वत:ची सुटका करुन घेतली. नंतर त्याची बायका मुलेही सोडून देण्यात आली.[९७] रुस्तुमखानाच्या पराभवानंतर परिस्थिती काबूत आणण्यासाठी बादशहाने लुत्फुल्लाखान उर्फ इंतफुल्लाखान यास संताजी विरुध्द पाठविले. पण त्याला सुध्दा दहा हजाराचे घोडे आणि भक्कम पायदळ घेऊन सामोऱ्या येणाऱ्या संताजी घोरपडेसमोर माघार घेणे भाग पडले.

लुत्फुल्लाखान म्हसवडच्या पूर्वेस १२ मैल व अकलुजच्या दक्षिणेस १५ मैल पिलिव मुक्कामी असतांना संताजी, धनाजी यांच्या सैन्याने त्याच्यावर हल्ला केला. यात मराठ्यांचा विजय झाला,

---

९४. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती- १९८६, पृ. ४०९.

९५. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. ४३.

९६. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती - एप्रिल २०११, पृ. २४.

९७. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल आणि मराठे,** आवृत्ती - १९६३, पृ. ४१.

त्यावेळी खुद्द लुत्फुल्लानेच औरंगजेब बादशहास पत्र लिहून आपली दुर्दशा कळविली. त्यात तो म्हणतो, "मी खटावला पोहचलो तेव्हा हेरांनी संताजीच्या हालचालीसंबंधी मला माहिती दिली. संताजीजवळ दहा ते बारा हजार घोडेस्वार आणि फार मोठे पायदळ होते. तो सातारा किल्ल्याच्या पायथ्याशी मुक्काम करुन राहिला होता. मुसळधार पाऊस पडत होता. आमच्या सैन्याला स्थिरस्थावर होऊन मोर्चेबंदी करण्याइतका वेळच मिळाला नाही. संताजीने ही संधी साधली आणि तो आपल्या लष्करासह उत्तररात्री आमच्यावर स्वारी करण्यासाठी आला. शत्रुच्या आरडाओरडीने आमचे सैन्य जागे झाले. आमचे सैन्य हत्यारबंद होऊ लागले आणि घोडेस्वार तयार होण्याच्या बेतात होते, अशा आणिबाणीच्या वेळी माझा मुलगा महंमद खलील याने शत्रूच्या हल्ल्याची भिती न बाळगता आपल्या बंदूकधाऱ्यांना संघटीत केले आणि पायदळातील शिपायाला एकत्र आणले. त्यानंतर तो शत्रूच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी उभा राहिला. पाऊस सारखा कोसळत होता. माझ्या मुलाने शत्रूवर जोरदार हल्ला चढविला आणि त्यांना मागे हटविले. शत्रूजवळ फार मोठे सैन्य होते. त्यांनी आमच्यावर निकराचा हल्ला केला. घनघोर लढाई झाली. आपले सैनिक शौर्याने लढले. एक प्रहर लढाईनंतर शत्रू मागे हटला. आपल्या सैन्याने शत्रूला वर्धनगडाच्या किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत मागे हटविले. मराठ्यांनी किल्ल्याचा आश्रय घेतला. आमचे सैनिक परत आपल्या तळावर आले. या लढाईत ५०० मराठे ठार झाले, अनेक जखमी झाले. शंभरापेक्षा अधिक पकडले गेले, त्या सर्वांना ठार करण्यात आले. मराठ्यांचे बरेचसे साहित्य आपल्या हाती लागले, आपल्या सैन्यापैकी ६७ लोक मारले गेले."[९८]

राजाराम महाराज जिंजीच्या प्रवासात असतांना कोल्हापूरच्या परिसरात ठाण मांडून बसलेल्या शेख निजामाला शिक्षा करण्यासाठी रामचंद्रपंतानी संताजीस पाठविले असा उल्लेख केशव पंडित याने केलेला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार "निजामाला जिंकण्यासाठी पाठविलेल्या संताजी घोरपड्यादिकांनी प्रथम निजामाचा पराभव करुन नंतर त्याचे हत्ती, घोडे व पुष्कळ द्रव्य हरण केले. तेव्हा सर्व ऐश्वर्याचा नाश झाला आहे. व सर्वांगावर शस्त्राच्या जखमा झाल्या आहेत असा तो खलर (निजाम) कसाबसा जीव वाचवून पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या करवीरास गेला."[९९] इकडे कर्नाटकात

९८ पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल-मराठा संघर्ष,** आवृत्ती- १९६४, पृ. ११४-११५.

९९. बेंद्रे, वा. सी., (संपा.), केशव पंडितकृत राजाराम चरितम्, सर्ग २, श्लोक-३०,३१,३२, आवृत्ती- शके १८५३, पृ. ३७.

मार्गात येणाऱ्या अनेक संकटांना तोंड देत राजाराम महाराज वेल्लोर येथे पोहोचले त्यावेळी बाजी काकडे ह्या मराठ्यांच्या कर्नाटकातील सरदाराने महाराजांना मदत केली. वेल्लोरच्या आग्नेयेस ५० मैलावर जिंजी हे स्थळ आहे.[१००] वेल्लोरवरुन राजाराम महाराज नोव्हेंबर १६८९ मध्ये जिंजीस पोहोचले. राजाराम महाराजांचे मेहूणे हरजी राजे महाडिक हे कर्नाटकातील मराठी प्रदेशावर प्रमुख कारभारी होते. त्यांचा मृत्यू झालेला असल्यामुळे आपल्या विधवा बहिणीकडून महाराजांनी जिंजीच्या कारभाराची सूत्रे हातात घेतली.[१०१]

राजाराम महाराजांनी जिंजी येथे मराठ्यांची नवी राजधानी स्थापन केली. जिंजीच्या किल्ल्याचा योग्य तो बंदोबस्त लावला. तेथेच त्यांनी आपल्या अष्टप्रधानांच्या नेमणूका सुध्दा केल्या. तसे राजाराम महाराजांनी आधीच पन्हाळगडावर असतांना सेनापदीपद महादाजी गोमाजी पानसबळ उर्फ खंडेराव यास दिलेले होते. त्याच्या मृत्यूनंतर धनाजी जाधवास सेनापतीपद द्यावे असे राजाराम महाराजांच्या मनात होते. परंतु रामचंद्रपंत अमात्य यांनी संताजीच्या कामगिरीची विशेष प्रशंसा केली आणि संताजीलाच हे पद मिळणे कसे आवश्यक आहे हे महाराजांना पटवून दिले. इ.स. १६९१ मध्ये संताजीस सेनापती पद देण्यात आले.[१०२]

संताजी घोरपडेस सेनापती पद मिळाल्यानंतर तर त्याच्या लष्करी कामगिरीचा वेग वाढला. राजाराम महाराज जिंजीस पोहचल्यानंतर औरगजेबाने जुल्फीखारखानाला मोठे लष्कर देऊन जिंजी जिंकून घेण्यास पाठविले. संताजी व धनाजी तीस हजाराच्यावर घोडदळ घेऊन जुल्फीखारखानाची परिस्थिती अत्यंत बिकट केली. जिंजीच्या परिसरात मोगल सैन्य पोहोचले खरे पण तेथे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.[१०३] राजाराम महाराजांना संताजीच्या कामगिरीची योग्य कल्पना आलेली होती. म्हणूनच त्यांनी त्या सुमाराला इ.स. १६९२ मध्ये मिरज प्रांताची देशमुखी संताजीस बहाल केली. या संदर्भातील पत्र रामचंद्रपंत अमात्यांनी मिरज प्रांताच्या मराठा सुभेदारास पाठविले.[१०४*]

---

१००. गर्गे, स.मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती- १९८५, पृ. १६१.

१०१. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती - डिसें. २००८, पृ. २६.

१०२. गर्गे, स.मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. १८१.

१०३. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें. १९७४ पृ. ५२.

१०४. पवार, ज. भा., **पूर्वोक्त,** पृ. ३२.

* परिशिष्ट क्र. ४.

त्यामध्ये संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यात निर्माण झालेल्या संकटकाळातही संताजी घोरपडेने स्वराज्यांचे रक्षण करुन औरंगजेबासारख्या शक्तीशाली मोगल बादशहास दहशत कशी बसवली याचे वर्णन केलेले आहे.

औरंगजेब बादशहाने मराठ्यांच्या राज्याचा नाश करण्यासाठी पाठविलेले जुल्फिकारखान, अलिमर्दानखान, कासीमखान ह्या मोगल सरदारांना संताजीच्या रागाचा व सैन्याच्या हल्ल्याचा सामना करावा लागला. अलिमर्दानाखानाने तर एक लाख होन खंडणी देऊन स्वत:ची सुटका करुन घेतली. कासिमखानाचीही इतकी कोंडी केली की त्याने कांचीपूरमच्या भव्य आवारात स्वत:ला कोंडून घेतले. दुसऱ्या दिवशी जुल्फिकारखानाने त्याला मदत करुन सोडवून बंदिवाशला आणले.[१०५] यावेळी राजाराम महाराजांचे व जुल्फिकारखानाचे अंतस्थ सूत जमले होते. म्हणूनच तर जानेवारी १६९३ मध्ये जिंजीपुढे मोगलांची हैराणगत झालेली होती. व सर्व मोगल सैन्य मराठी सैन्याच्या तावडीत सापडले. तरी राजाराम महाराजांनी त्यांचा नाश न करता त्यास बंदिवाशला जाऊ दिले होते.[१०६] येथुनच राजाराम महाराज व संताजी घोरपडे यांच्यात वादावादीला सुरुवात झाली. याविषयी संताजीने रामचंद्रपंत अमात्याकडे पत्र लिहून तक्रारही केली.[१०७] कशीबशी त्या दोघांमध्ये दिलजमाई झाली.

संताजीने मोगल सैन्यावर आणखी दबाव वाढावा यासाठी इ.स. १६९६ च्या मार्च महिन्यात त्रिचनापल्लीला वेढा दिला. यावेळीही संताजी व राजाराम महाराज यांच्यातील अविश्वास अधिकच वाढलेला दिसतो. प्रतिष्ठित मोगल सेनानींवर विजय मिळविल्यानंतर संताजीचा अहम वाढला असावा यातूनच तो जिंजीत असतांना राजारामाशी अद्वातद्वा बोलला. "तुमच्या हातून पराक्रम होत नाहीतर आम्ही दुसरा एखादा लायक इसम पाहून त्यास छत्रपती करु."[१०८] संताजीच्या शीघ्रकोपी स्वभावाने सर्वांना दुखविल्याने तो सर्वांच्या मनातून उतरला होता.[१०९]

इ.स. १६९६ हे वर्ष संताजीच्या आयुष्यात महान तेजस्वी पर्व मानले जाते. दुड्डेरी आणि बसवपट्टण येथे सैन्यावर मोठमोठे विजय मिळविल्यानंतर त्याच्या वागण्यात झालेला बदल राजाराम

१०५. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल आणि मराठे,** आवृत्ती - १९६३, पृ. १२०.

१०६. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,,** आवृत्ती - ऑगस्ट १९७५, पृ. ५४.

१०७.गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें. १९७४ पृ. ५५.

१०८. Sardesai, G. S., **The Shivaji Period in Maratha History**, Edition- 1974, Pg. 44.

१०९. हनवते, उत्तमराव, **सेनापती धनाजी जाधव,** आवृत्ती - २०००, पृ. ७२.

महाराजांना आवडला नाही. त्यावेळी त्या दोघात पुन्हा खटका उडाला. "चैत्रमासी राजारामाच्या दर्शनास संताजी घोरपडे चदीस गेले. जेष्ठ मासी बिघडोम कंची (कांजीवरम्) अलिकडेच भांडण झाले."[११०] परिणामी राजाराम महाराजांनी संताजीस सेनापतीदावरुन उचलबांगडी करुन धनाजी जाधवास सेनापती बनविले. या संदर्भात खुद्द राजाराम महाराजांनी रामचंद्रपंतांना लिहिलेल्या एका पत्रात म्हटले आहे, "संताजी घोरपडे यांनी स्वारीच्या पायाशी हरामखोरी केली. याकरीता त्यास सेनापतीपदाचा कार्यभाग होता तो दूर करुन फौज हुजूर आणविली."

छ. राजारामाशी वितूष्ट आल्यानंतर संताजी कर्नाटकातून महाराष्ट्रात परतला. परंतु धनाजी जाधवाशी वितूष्ट आल्यामुळे तो नेहमीच संघर्षात राहिला. एका बाजूने मोगल सैन्य, आणि दुसऱ्या बाजूने मराठा सैन्य अशा कोंडीत तो सापडला होता. त्याच्या परिपत्यासाठी मोगलाबरोबरच मराठेही त्याचा पाठलाग करु लागले.[१११] अशावेळी संताजी एकटा पडला आणि मोजक्या साथीदारांसोबत साताऱ्याच्या पुर्वेकडील शंभू महादेवाच्या टेकड्यावर त्याने आश्रय घेतला. [११२] लांबचा प्रवास करुन, थकुन भागून एका ओढ्यात तो आंघोळीसाठी उतरला असतांना बेसावध अवस्थेत म्हसवडच्या नागोजी माने (अमृतराव निंबाळकरचा मेव्हणा) याने संताजीस ठार मारले. त्याचे शीर धडापासून वेगळे केले. आजही ते ठिकाण "संताजी बावाजी जाळी"[११३] म्हणून ओळखली जाते. त्याचे शीर बादशहास भेट म्हणून दिले. संताजीसारख्या अतुलनीय वीराच्या मृत्यूने मराठ्याच्या भवितव्यास जबरदस्त धक्का पोहाचला. त्याच्या ऐतिहासिक कामगिरीचा उल्लेख मराठ्यांच्या इतिहासात तसेच मोगल इतिहासकारांनीही करुन ठेवलेला आहे. शत्रूच्या योजनेत आणि स्थितीत जसजसा बदल होत जाईल त्याचा त्वरित फायदा घेवून विशाल प्रदेशात पसरलेल्या प्रचंड सैन्याच्या हालचाली घडवून आणावयाच्या आणि त्यांच्याकडून निरनिराळ्या योजना संघटित करावयाच्या ह्या कार्यात संताजीला जन्मजातच कसब प्राप्त झालेले होते.[११४] संताजीची समाधी* त्यांच्या कापशी जहागिरीत आहे.[११५] सेनापती संताजी घोरपडेच्या निधनाने कापशीकर घोरपडे घराण्याच्या पराक्रमी परंपरेचे एक पर्व संपले.

---

११०. आपटे, द. वि., स.म. दिवेकर, (संपा.), **शिवचरित्र प्रदीप**, आवृत्ती - २००९, पृ. ३८.
१११. भोसले, प्रविण, व., **मराठ्यांची धारातीर्थे**, आवृत्ती - ऑक्टो. २०१२, पृ. ७७.
११२. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती-नोव्हें.१९७४,पृ. ७७.
११३. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे**, आवृत्ती - डिसें. २००८, पृ. १२७.
११४. कोलाकर, श. गो., (अनु.), **औरंगजेब**, आवृत्ती- २००६, पृ. ३७०.
११५. भोसले, प्रविण, पूर्वोक्त, पृ. ७६.
* परिशिष्ट क्र. १२.

संताजी घोरपडेस दोन बायका होत्या, एक सोयराबाई आणि दुसरी द्वारकाबाई. सोयराबाईचा मुलगा राणोजी आणि द्वाराकाबाईचा मुलगा पिराजी. संताजीच्या मृत्यूच्या वेळी राणोजीचे वय १७-१८ वर्षाचे असावे. तो शिपाईगिरीत आपल्या बापाच्या म्हणजे संताजीच्याही पेक्षा दोन पावले पुढे होता. असे फारशी इतिहासकारांनी म्हटले आहे.[११६] राणोजीच्या नेत्रदिपक यशाकडे इतिहासकारांचे जावे तसे लक्ष गेले नाही. राणोजीने इ.स. १७०१ व १७०२ ही वर्षे गाजवून सोडली. मलकापूर येथे बादशहाच्या सैन्याच्या पिछाडीवर त्याने धाडसी हल्ला व सातरच्या किल्ल्याला दिलेला शह या त्याच्या दोन मोठ्या कामगिऱ्या होत्या.[११७] राणोजी याने वाकिणखेडा तालुक्यातील चंदनगढीला वेढा घातला. त्यावेळी मोगल सरदार हिंमतखान याच्याशी झुंज देतांना त्याला इ.स. १७०२ मध्ये मैदानावर विरमरण आले.[११८]

महाराणी ताराबाईंनी इ.स. १७०३ मध्ये पिराजीच्या नावाने वडिलोपार्जीत सरंजाम चालू ठेवण्यासाठी नवा जाफा करुन दिला. या सरंजामात कापशी गावासंबंधीचा एक महत्वाचा उल्लेख आढळतो.[११९] पिराजी इ.स. १७२८ च्या आरंभी कर्नाटकातील पाळेगारांचा बंदोबस्त करण्यासाठी गेला असता मौजे नागपूर येथे लढाईत मारला गेला. पिराजीचे निधन ऐन तरुणपणीच झाल्यामुळे सेनापतीच्या घराण्यावर फार मोठा आघात झाला.

एका अर्थाने कापशीकर घोरपडे घराण्याची पराक्रमाची परंपरा खंडीत झाली.

---


११६. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती - १९८६, पृ. ४१३.

११७. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल दरबारची बातमीपत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती - जाने. १९८३, पृ. १०.

११८. पवार, अप्पासाहेब, **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड पहिला,** आवृत्ती- २०१२, पृ. १६०.

११९. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-१९७४,पृ. १०१.

## सेनापती घोरपडे कापशीकर घराण्याची वंशावळ[१२०]




---

१२०. गर्गे, स.मा., श.ह. वर्टीकर (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,**
आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ.८

### २.२.२ अमीर-उल-उमराव दत्तवाडकर घोरपडे घराणे :

कापशीकर सेनापती, गजेंद्रगडकर हिंदुराव, दत्तवाडकर अमीर उल उमराव या तीन घराण्याचे मुळ पुरुष म्हाळोजी घोरपडे हे होते.[१२१] त्यांनी शहाजी राजे भोसले यांच्या पायी आपली निष्ठा वाहून आपला अभ्युदय घडवून आणला. त्यांच्याच बंधूपैकी असलेल्या मुधोळकर घोरपड्यांनी मात्र आपली निष्ठा अखेरपर्यंत यवनी सत्तेच्यासाठीच वापरलेली दिसते. शहाजी राजासारख्या समर्थ सेनानी लष्करी व राजकीय डावपेच खेळून मोडलेल्या निजामशाहीची पुनर्स्थापना करुन लागला, त्यावेळे पासून म्हाळोजी त्यांच्या सहवासातून दूर गेले नाही ते स्वत:चा अखेर होईपर्यंत म्हाळोजी हा देशमुखी-पाटीलकी सारखी वतने सांभाळणारा एक सामान्य वतनदार होता.[१२२] शहाजी राजे, शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या तिघांबरोबर म्हाळोजींनी आपली कामगिरी बजावली. त्यांची या तीन पिढ्यांबरोबरची कामगिरी अनन्यसाधारण मानावी लागेल. संभाजी महाराजांच्या काळात म्हाळोजी घोरपडे हे पन्हाळ्याचे सरनौबत होते व त्यांच्या हाताखाली ५०० घोडदळ होते.[१२३] संभाजी महाराजांच्या संगमेश्वरी येथे झालेल्या शेख निजामाच्या बरोबरच्या झटापटीत या पराक्रमी मराठा सरदाराचा मृत्यू झाला व संभाजी राजे पकडले गेले.[१२४]

म्हाळोजींना तीन पुत्र होते. संताजी, बहिर्जी आणि मालोजी. मराठ्यांच्या स्वराज्यासाठी घडून आलेल्या अनेक संघर्षात या तिन्ही बंधूंच्या संयुक्त मोहिमांचा वारंवार उल्लेख येतो. शिवाजी महाराजांच्या लष्करातच त्रिवर्ग बंधूंना युध्दकला संपादन करण्याची संधीही मिळाली होती.[१२५] संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यात निर्माण झालेल्या बिकट प्रसंगाच्या वेळी हे तिन्ही घोरपडे बंधू राजाराम महाराजांच्या पाठी भक्कम उभे होते. संताजीने महाराष्ट्रात मोगलांना सळो की पळो करुन सोडले, तर बहिर्जी आणि मालोजी यांनी महाराजासोबत राहून त्यांचे संरक्षण करण्याचे महत्वाचे कार्य केले. राजाराम महाराजांनी रायगडाला मोगलांचा वेढा पडल्यानंतर जिंजीकडे जाण्याचे ठरविले

---

१२१. गायकवाड, खं. आ., (संपा.), **करवीर सरदारांच्या कैफियती,** आवृत्ती- १९७१, पृ. १७.

१२२. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती - डिसें. २००८, पृ. ८.

१२३. सरदेसाई, गो. स., **काव्येतिहाससंग्रह, ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे,** आवृत्ती- १९३०, पृ. ३८४.

१२४. गर्गे, स. मा. (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती- २०१२, पृ. ११२.

१२५. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. ३३.

त्यावेळी मालोजी व बहिर्जी हे बंधूद्वय आघाडीवर होते. या मोहिमेतील घोरपडे बंधूचे शौर्य आणि साहस अद्वितीय होते.[१२६]

औरंगजेबाच्या तुळापूर येथील छावणीवर हल्ला करुन बादशहाच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून आणून मोगल सैन्यात दहशतीचे वातावरण तयार करण्यात संताजी बरोबर घोरपडे बंधू ही होते. त्यांच्या या पराक्रमाबद्दल राजाराम महाराजांनी सर्वांनाच वस्त्रभूषणे, अलंकार व किताब दिले. त्यावेळी मालोजीरावांना अमीर-उल-उमराव हा किताब देऊन गौरविले. मालोजी घोरपडेंनी आपल्या दोन्ही थोरल्या भावांबरोबर पराक्रम गाजविला, पण त्यांना आयुष्य थोडेच लाभले होते.

राजाराम महाराजांचा रायगड ते जिंजी हा साहसी प्रवास अनेक संकटांनी भरलेला होता. या पाचशे मैलाच्या प्रवासात मोगल आणि मराठे यांच्यात निकराचे प्रसंग आले. पण धोका पत्करुन अनेक वेशांतरे करुन राजाराम महाराज व त्यांचे सोबती शिमोग्या पर्यंत पोहोचले. शिमोगा येथे मोगल सैन्याचा राजारामांभोवती गराडा पडला होता. त्यातून राजाराम महाराज निसटले पण त्यांच्यासोबत असलेल्या मंडळीपैकी मालोजी घोरपडे व इतर सरदारांसह ऐंशी मराठ्यांना अब्दुल्लाखानाने पकडले.[१२७] त्यांना औरंगजेबाकडे पाठवून दिले. तेथे त्यांना ठार करण्यात आले.[१२८]

मालोजी घोरपडे यांच्यापासून दत्तवाडकर अमीर-उल-उमराव घोरपडे घराण्याची शाखा सुरु झाली.[१२९]

---

१२६. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती- १९८६, पृ. ४०९.

१२७. गोडबोले, रवींद्र, **औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका,** आवृत्ती- २००६, पृ. १६४.

१२८. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४,पृ. ४७.

१२९. गर्गे, स. मा. (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृत्ती- २०१२, पृ. ४१९.

## दत्तवाडकर घोरपडे घराण्याची वंशावळ[१३०]

- **चोलराज**
  - पिलाजी घोरपडे मुधोळकर (सातकस घराणे)
  - कानोजी
  - वल्लभजी (नवकस घराणे)
    - बहिर्जी घोरपडे
      - म्हाळोजी घोरपडे (मृ. १६८९ संगमेश्वर येथे)
        - संताजी (मृ. १६९७)
        - बहिर्जी (मृ. १७०८)
        - मालोजी (दत्तवाडकर) (मृ. १६८९)
          - शिवराव पहिला
            - यशवंतराव पहिला (लढाईत मारला गेला)
              - शिवराव दुसरा (मृ. १७८५)
                - सिध्दोजीराव (मृ. १७९६)
              - व्यंकटकराव निपुत्रीक (पुतणा सिध्दोजीचे पालकत्व)
            - मालोजीराव दुसरा (गुत्ती येथे हैदर बरोबरच्या संघर्षात मृत्यु)
              - यशवंतराव दुसरा
                - बाळासाहेब
                - नरसिंगराव
              - खंडेराव
                - शिवराव तिसरा (मृ. २ मे १८४०)
                - भुजंगराव
                  - व्यंकटराव दुसरा
                    - शिवषण्मुखराव (मृ. ३ मे १८७८)
                    - खंडेराव बापूसाहेब (मृ. १८८०)
                    - भूजंगराव उर्फ अण्णासाहेब (अविवाहीत)
                    - रामचंद्र विठ्ठराव मृ. ३ डिसे. १८९२
                      - व्यंकटराव(तिसरा) उर्फ रावसाहेब (मृ. २४ जुलै १९२७)
                    - मालोजीराव उर्फ बाळासाहेब (पुतण्या व्यंकटराव तिसऱ्याचे पालकत्व)

---

130. France, W., **Madras District Gazetteers**, Edition- 1904, Pg. 310-11.

### २.२.३ हिंदुराव गजेन्द्रगडकर घोरपडे घराणे :

शहाजी राजांचे एकनिष्ठ अनुयायी म्हाळोजी घोरपडे यांचे पुत्र संताजी, बहिर्जी आणि मालोजी संभाजी राजांच्या सैन्यात कार्यरत होते. त्यांचे खरे पराक्रम राजाराम महाराजांच्या काळात पहावयास मिळतात. बहिर्जी आपल्या वडिलांप्रमाणे व थोरल्या भावाप्रमाणे पराक्रमी होता. राजाराम महाराजांच्या काळात निर्माण झालेल्या अत्यंत बिकट प्रसंगातही छत्रपती घराणे सुरक्षित ठेवण्याचे फार महत्वाचे कार्य बहिर्जीने केले. बहिर्जी घोरपडे 'हिंदुराव घोरपडे' घराण्याचा संस्थापक मानला जातो. संभाजी महाराजांच्या वधानंतर औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणल्याबद्दल राजाराम महाराजांनी हिंदुराव ही मानाची पदवी बहिर्जी घोरपडेस दिलेली होती.[१३१] त्यानंतर बहिर्जीस गजेन्द्रगडची जहागीरही देण्यात आली. बहिर्जीने असामान्य शौर्य, निस्सिम प्रेम आणि साहसी कल्पकता या गुणांच्या आधारावर मराठ्यांचे स्वराज्य वाचविण्याचा प्रयत्न केला.

संताजीस म्हसवडच्या नागोजी मान्याने विश्वासघाताने ठार केले. या असामान्य शूरविराचा वध मराठ्याच्या दुहीमुळे झाला, हे मराठेशाहीचे दुर्देव होय.[१३२] त्यांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांसोबत बहिर्जीच्या संबंधात कटुता निर्माण झाली. राजाराम महाराजांनी नागोजी मानेस कठोर शिक्षा करावी असे बहिर्जीस वाटत होते. मात्र तसे न घडल्याने बहिर्जी महाराष्ट्र सोडून कायमचे कर्नाटकात निघून गेले. तेथेच आपले स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची कल्पना त्यांना सूचली. आपल्या पुर्वीच्या जहागिरीच्या जवळपास कर्नाटकात हिंदुराव घोरपडे विस्तार करण्यासाठीच त्यांनी गुत्तीचा किल्ला जिंकुन घेतला. तेच त्यांच्या राज्याचे व लष्करी छावणीचे मुख्य ठिकाण बनविले.[१३३] त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा सिध्दोजीराव घोरपडे यांनी सोंडूरचा प्रदेश इ.स. १७१४ मध्ये जिंकून मूळ गुत्ती राज्याच्या प्रदेशाचा विस्तार केला. [१३४] सिध्दोजीराव हिंदुराव घोरपडे ताराबाई राणींच्या विश्वासातील होते. त्यांनी आपली कर्नाटकातील सत्ता बळकट बनविली. सिध्दोजीरावांना दोन मुले होती थोरला मुरारराव आणि धाकटा दौलतराव. मुररारावाकडे सिध्दोजीच्या राज्याचा वारसा आला आणि दौलतरावला गजेन्द्रगडची जहागीर मिळाली. म्हणूनच हिंदुराव घोरपडे घराण्याचा उल्लेख गजेन्द्रगडकर, सोंडूरकर, गुत्तीकर असे तीन वेगवेगळ्या नावांनी केला जातो. [१३५]

---

१३१. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें.१९७४, पृ.१०८.

१३२. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगस्ट १९७५, पृ. ५०.

१३३. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ७३.

१३४. **कित्ता,** पृ. ९१

१३५. गर्गे, स. मा. (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. ४१४.

## गजेन्द्रगडकर घोरपडे घराण्याची वंशावळ[१३६]

### गजेन्द्रगडकर

- बहिर्जी हिंदुराव घोरपडे (मृत्यु. १७०८)
  - सयाजीराव
  - मुरारराव
  - सिध्दोजीराव (सोंडूरकर हिंदुराव घोरपडे)
    - मुरारराव गुत्तीचा राज्यकर्ता (इ.स.१७३१ ते इ.स.१७७७)
    - दौलतराव (गजेन्द्रगडकर घोरपडे)
      - बहिर्जीराव (मृ. १८०३)
        - भुजंगराव पहिले (ब्रिटीशांकडून गजेन्द्रगड जहागिरीची मान्यता)
          - दौलतराव दुसरा (मृ. १८६३)
            - मालोजीराव
            - संभाजीराव
            - भुजंगराव दुसरे
            - यशवंतराव
              - भुजंगराव तिसरा
                - यशवंतराव इ.स. १९२८ मध्ये सोंडूरच्या गादीवर आले. (मृ. ११ ऑक्टो. १९९६)
                - दत्ताजीराव
          - नरसींगराव
          - मल्हारराव
        - सुब्बाराव
        - आनंदराव
      - संताजी उर्फ सुभानजीराव (संतती नव्हती)
    - भुजंगराव
    - गोपाळराव
  - सगुणाबाई

---

१३६. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. २२९.

# प्रकरण ३ रे

# सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास

३.१ राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे

३.१.१ राजे बहिर्जी व छत्रपती राजाराम संबंध

३.१.२ राजे बहिर्जी, हिंदुराव घोरपडे घराण्याचे संस्थापक

३.१.३ राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडेंची कामगिरी

३.१.३.१ राजे बहिर्जी व महाराणी ताराबाई


३.१.३.२ राजे बहिर्जी व पोतुगीज सत्ता

३.२ राजे सिध्दोजी हिंदुराव घोरपडे (इ.स. १७१३ ते इ.स. १७३१)

३.२.१ सोंडूर राज्याची स्थापना (इ.स. १७१४)

३.२.२ राजे सिध्दोजी व करवीर छत्रपती संबंध

३.२.३ राजे सिध्दोजी हिंदुराव घोरपडे यांची कामगिरी





**सोंडूरकर, गुत्तीकर, गजेन्द्रगडकर हिंदुराव घोरपडे घराण्याची ठिकाणे दर्शविणारा भारताचा नकाशा.**

संदर्भ : घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. १.




कर्नाटक राज्याचा नकाशा

संदर्भ : घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ९७.




बेल्लारी जिल्ह्याचा नकाशा

संदर्भ : गुगलवरुन प्राप्त.

# हिंदुराव घोरपडे राजघराण्याची वंशावळ

**म्हाळोजी (मृ. इ.स. १६८९)**

- संताजी
- **बहिर्जी हिंदुराव** (मृ. इ.स. १७०८)
  - सयाजीराव
  - मुरारराव (प.) (मृ. इ.स.१७०२)
  - सिध्दोजीराव (मृ. इ.स. १७३०)
    - मुरारराव (चिफ ऑफ गुत्ती, मृ. इ.स. १७७७)
      - शिवराव (मृ. इ.स. १७८५)
        - सिधोजीराव (मृ. इ.स. १७९६)
          - शिवराव (दु.) (मृ. इ.स. १८४०)
            - व्यंकटराव (मृ. इ.स. १८६१)
              - शिवषण्मुखराव (मृ. इ.स. १८७८)
                - विठ्ठलराव (मृ. इ.स. १८९२)
                  - व्यंकटराव (दु.) (मृ. इ.स. १९२७)
                    - **यशवंतराव** (जन्म १३-११-१९०८) (इ.स. १९२८ साली सोंडूरच्या गादीवर बसले)
                      - **१. मुरारराव** (मृ. २९.१०.२०११)
                        - अजयसिंह
                        - सुजयसिंह
                        - कर्तिकराव
                        - अनुराधाराजे
                      - २. रणजीतसिंह (ज. १६.०२.१९३३)
                      - ३. निर्मलादेवी (ज. ८.०२.१९३४)
                      - ४. विजयसिंह (ज. १८.१०.१९३७)
                      - ५. शिवराव (ज. १३.०९.१९४०)
                      - ६. गजेद्रसिंह (ज. २९.०७.१९४३) (मृ. ९.१२.१९४३)
                      - ७. विजयादेवी (ज. ५.०२.१९४७)
                      - ८. व्यंकटराव (ज. २७.०९.१९५०)
    - दौलतराव (गजेंद्रगड)
- मालोजी

# प्रकरण तिसरे

## सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास

मुसलमानी अमदानीत ज्या मराठा घराण्यांनी महत्वाची भूमिका बजावली त्यात घोरपडे घराणे हे अत्यंत महत्वाचे मानले जाते.[१] या घराण्याला वेगवेगळ्या काळात बहामनी बादशहा, आदिलशहा, तसेच छत्रपतींकडून विविध सनदा मिळालेल्या दिसतात. यावरुनच घोरपडे घराण्याचे मराठ्यांच्या इतिहासातील महत्व वेळोवेळी स्पष्ट होते. या घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी आपल्या अंगी असलेल्या गुणांमुळे राज्यकर्त्यांच्या मनात आपल्याविषयी आदर तसेच विश्वास निर्माण केला. या विश्वासामुळेच छत्रपतींनी वेगवेगळ्या जबाबदाऱ्या या घराण्यातील सरदारांवर टाकल्या होत्या. घोरपड्यांनी देखील त्या जबाबदाऱ्या योग्य पध्दतीने पुर्णत्वास नेलेल्या दिसतात. घोरपडे घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी केलेली कामगिरी ही मराठी स्वराज्याच्या अत्यंत बिकट कालखंडातील आहे आणि म्हणूनच ती अत्यंत महत्वाची आहे. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई या चारही छत्रपतींच्या राजवटीत स्वराज्याला सर्वात मोठा आधार घोरपडे घराण्याच्या शस्त्राचा वाटत होता. मराठा स्वातंत्र्य युध्दात मोगलांची दाणादाण उडवून हे स्वातंत्र्य युध्द नेटाने चालु ठेवण्यात घोरपडे घराण्यातील पराक्रमी पुरुषांचा उल्लेख प्रथमस्थानी करावा लागतो.[२]

उत्तरेकडील सिसोदे घराण्यातील कर्णसिंह दुसऱ्याने इ.स. १४७१ मध्ये खेळण्याचा किल्ला घोरपडीच्या कमरेला दोर बांधुन जिंकला व तेव्हापासून त्यांचे वंशज घोरपडे या नावाने ओळखले जाऊ लागले.[३]

कालांतराने घोरपडे घराण्याच्या विविध शाखा दक्षिण भारतात निर्माण झाल्या. ह्या सर्व एकाच बुंध्यापासून निर्माण झालेल्या होत्या. त्यात कापशीकर सेनापती घोरपडे, अमीर-उल-उमराव दत्तवाडकर घोरपडे आणि कर्नाटकातील हिंदुराव घोरपडे घराणे ही सर्वात महत्वाची घराणी मानली जातात. म्हाळोजी राजे घोरपडे यांनी शिवाजीपुत्र संभाजी महाराजांचे सरंक्षण करतांना संगमेश्वर या

१. पारसनिस, दत्तात्रय बळवंत, **मुसलमानी अमदानीतील मराठे सरदार,** आवृत्ती-नोव्हें. १९०९, पृ. ६३.
२. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ५५.
३. कुंटे, भ. ग., **बहामनी राज्याचा इतिहास,** आवृत्ती - जुलै १९६६, पृ. १४२.

ठिकाणी देह ठेवला. त्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांच्या मुलांच्या कर्तृत्वाचा काळ सुरु झाला. त्यांच्या मुलांनी वडिलांप्रमाणेच छत्रपती घराण्याची सेवाचाकरी केली आणि मराठा साम्राज्याच्या वाढीस हातभार लावला. कर्नाटकात मराठ्यांचे राज्य निर्माण करुन त्याचा दरारा व दबदबा टिकवून ठेवण्याचे कार्य पूढे या घराण्यातील वंशजांनी केले. हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडू या चार राज्यात घडला यावरुन त्यांचे कार्य आणि त्याचा व्याप किती मोठा होता याची कल्पना येते.[४]

### ३.१ राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे :

क्षात्र परंपरा व क्षात्र तेज लाभलेल्या घोरपडे घराण्यात बहिर्जी घोरपडेचा जन्म झाला[५] म्हाळोजी घोरपडेंचा तो दुसरा मुलगा होता. बहिर्जीच्या जन्माचे साल इतिहासाला ज्ञात नाही. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांनी मराठ्याच्या राज्याची स्थापना केली. त्यावेळी महाराजांबरोबर बहिर्जीचे वडील म्हाळोजी त्यांच्या कार्यात हिरीरीने सहभागी होते. स्वाभाविकच स्वराज्यनिष्ठेचे व स्वातंत्र्यप्रेमाचे उदात्त संस्कार संताजी प्रमाणेच बहिर्जीवरही झालेले होते. बहिर्जीच्या लष्करी कामगिरीचे उज्ज्वल स्वरुप राजाराम महाराजांच्या काळात व्यक्त झाले असले, तरी त्याला मुलुखगिरीचा अनुभव शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीपासून मिळत गेला होता.[६] संताजी, बहिर्जी आणि मालोजी हे तिघेही बंधू संभाजीराजांच्या सैन्यात कार्यरत होते.[७]

दक्षिण भारतात विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर (इ.स. १५६५- तालिकोटचे युध्द) हिंदुची सत्ता जणुकाही संपुष्टात आली आणि मुसलमानी सत्तेचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. अशावेळी शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. मराठ्यांचे राज्य स्थापन करण्याचे श्रेय जरी भोसले घराण्याकडे जात असले तरी त्यांच्याच मुळ सिसोदे वंशातून निर्माण झालेले भाऊबंद घराणे घोरपडे यांचाही स्वराज्य स्थापनेच्या घटनेत तेवढाचा समान भाग होता. शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी आणि नंतरही घोरपडे घराण्यातील पुरुषांनी जी कामगिरी केली तीही इतिहासाने

---

४. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ५.

५. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती- डिसें. २००८, पृ. १३.

६. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती - १९८६, पृ. ६.

७. भोसले, प्रविण, व., **मराठ्यांची धारातीर्थे,** आवृत्ती - ऑक्टो. २०१२, पृ. ८१.

मान्य केली पाहीजे.[८] अशा मोजक्या व समर्पक शब्दात रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी घोरपडे घराण्याच्या कामगिरीचे वर्णन केलेले आहे.

मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दात संताजी, बहिर्जी आणि मालोजी या तीनही घोरपडे बंधूनी एकजुटीने एकमेकांना पुरक आणि राज्यरक्षणाला पोषक अशीच कामगिरी केलेली आहे. घोरपड्यांचे सैन्य (मुख्यत: बहिर्जी आणि संताजी यांचे सैन्य) विजेसारख्या चपळ हालचाली करण्यासाठी प्रसिध्द होते. या सैन्याच्या चपळ हालचालींचा मोगल सैन्याने तर धसकाच घेतला होता. या सैन्याने सतत आठ वर्षे जवळजवळ आठशे मैलांच्या प्रदेशात म्हणजे दख्खन आणि कारोमंडलचा किनारा यांच्या दरम्यान मराठ्यांची सत्ता अबाधित ठेवण्यासाठी अतोनात प्रयत्न केलेले दिसतात. बहिर्जी घोरपडे स्वराज्यावरील मोगलांचे अत्याचारी संकट दूर करण्यासाठी सतत सतरा वर्षे लढत राहिले. या त्यांच्या असामान्य कामगिरीचा आरंभ झाला तो औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला करण्यापासून.[९]

बहिर्जी घोरपडे याने छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाई यांच्या कारकिर्दीत खऱ्या अर्थाने मोठा पराक्रम गाजविला. त्याने संताजीच्या मदतीने औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला करुन तेथून सोन्याचे कळस कापून आणले. त्यावेळी बहिर्जीच्या ह्या पराक्रमामुळे ‘हिंदुराव’ ही पदवी राजाराम महाराजांनी दिली. राजाराम महाराजांना पन्हाळा ते जिंजी या पाचशे मैलाच्या अत्यंत जिकरीच्या प्रवासात स्वत:चा जीव मुठीत घेऊन पोहोचविले जर या प्रवासात महाराजांच्या जीवितास काही हानी झाली असती तर मराठ्यांच्या स्वराज्याला फार मोठा धोका निर्माण होऊन ते नष्ट झाले असते. त्यामुळेच स. मा. गर्गे बहिर्जीस ‘स्वराज्याचे संरक्षक’ असे संबोधतात.[१०] राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर (इ.स. १७००) महाराणी ताराबाईंची साथही बहिर्जीने दिली. बहिर्जीने आपल्या कार्यकाळात छत्रपतींशी वैमनस्य उत्पन्न झाल्यावरही शत्रूपक्षाला सामील झाले नाही व मराठ्यांच्या राज्यात दुही माजेल असे कोणतेही काम त्यांनी केले नाही.[११]

---

८. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ५६.

९. **कित्ता**, पृ. ५७

१०. **कित्ता**, पृ. ६९

११. **कित्ता**, पृ. ८३

### ३.१.१ राजे बहिर्जी व छत्रपती राजाराम संबंध :-

छत्रपती संभाजी राजे काही निवडक लोकांसह संगमेश्वर मुक्कामी असतांना शेख निजामाने १ फेब्रुवारी १६८९ रोजी संभाजीराजांस कैद केले.[१२] त्यावेळी संताजी व बहिर्जी देखील त्यांच्या सोबत होते ते तेथून निसटले आणि रायगडावर पोहोचले. येथेच बहिर्जीचे वडील म्हाळोजी हे कामास आले होते. त्यावेळी अशा संकटकाळी मराठी राज्याचे नेतृत्व करण्यासाठी राणी येसूबाई व मराठी मुत्सद्दी यांनी राजकुमार राजाराम यांस ९ फेब्रुवारी १६८९ रोजी रायगडावर राज्याभिषेक करुन छत्रपती पदावर बसविले.[१३]

राजाराम महाराज रायगडावर आहेत हे समजताच लगेच इतिकादखानाच्या (एतेकादखान) नेतृत्वाखाली मोगल सैन्याने मराठ्यांच्या राजधानीला वेढा दिला.[१४] अशावेळी रायगडावर असणाऱ्या राणी येसूबाईंनी राजाराम महाराजांनी रायगड सोडून कर्नाटकात जिंजीस जावे व स्वराज्याचे मोगलापासून संरक्षण करावे असा सल्ला दिला. रायगडावर हे सगळे घडत असतांना मोगलांनी आपला वेढा अधिक मजबूत केला. त्यामुळे संकटजन्य दृश्य परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा येसूबाईंच्या सल्ल्याप्रमाणे राजाराम महाराज आपल्या राण्यांसह ५ एप्रिल १६८९ रोजी रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण आणि इतर मुत्सद्दी यांच्यासह रायगडाहून निसटले.[१५] त्यावेळी आघाडीवर बहिर्जी, संताजी व मालोजी हे तिघेही घोरपडे बंधू होते.

राजाराम महाराज रायगड सोडून प्रथम जावळी आणि नंतर प्रतापगडाकडे गेले. प्रतापगडावर राहणे धोक्याचे असल्यामुळे सर्व वासोट्यामार्गे साताऱ्यांस पोहोचले. तेथून सज्जनगडावरील समर्थांच्या समाधीचे दर्शन घेवून राजाराम महाराज ३० जूनच्या सुमारास पन्हाळगडावर पोहोचले.[१६] या सर्व प्रवासात बहिर्जी व घोरपडे बंधू राजाराम महाराजांसोबतच होते. राजाराम महाराज पन्हाळगडावर होते. रायगडाला मोगली फौजांचा वेढा पडलेला होता. त्यावेळी औरंगजेब बादशहाची छावणी तुळापूर येथे होती. तेव्हा घोरपडे बंधूंनी या छावणीवर छापा घालण्याची मोहीम आखली.[१७] दोन

१२. बेंद्रे, वा. सी., **श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र,** आवृत्ती - मार्च २०१३, पृ. ६४१.
१३. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती - २०१२, पृ. ५३.
१४. कोलारकर, श. गो., (अनु.), **औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास,** आवृत्ती- १९९९, पृ. २६३.
१५. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला,** आवृत्ती - १९८४, पृ. ४१६.
१६. हेरवाडकर, र. वि., **थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र,** आवृत्ती - १९७२, पृ. ६.
१७. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. ३८.

हजार निवडक स्वारांसोबत संताजी बहिर्जी व मालोजी आपल्या सहकाऱ्यांसह पन्हाळ्याहून तुळापूरकडे निघाले. याप्रसंगी औरंगजेब बादशहाच्या छावणीवर हल्ला करुन मध्यरात्री त्यांच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून घेतले. लगेच अंधाराचा फायदा घेऊन सिंहगड नजीकच्या डोंगरात पोहोचले. रायगडाला वेढा देऊन बसलेल्या एतेकादखानाच्या फौजेवर हल्ला चढवून त्याचे पाच हत्ती व इतर काही सामान घेऊन हे घोरपडे बंधू अतिशय वेगाने पन्हाळ्यास पोहोचले.

छत्रपती राजाराम महाराजांना तुळापूर मोहिमेविषयी माहिती मिळाल्यानंतर त्यांना घोरपडे बंधूचा अभिमानच वाटला असावा कारण संभाजीराजांच्या मृत्यूनंतर एकप्रकारे मराठ्यांचा आत्मविश्वास संपवून टाकण्यासाठीच मोगल बादशहा औरंगजेब याने अत्यंत त्वेषाने मराठ्यांच्या स्वराज्यावर हल्ले करण्यासाठी अनेक मोगल सरदारांना पाठविले होते. अशा मरगळलेल्या परिस्थितीत घोरपडे बंधूंनी तुळापूरची मोहिम यशस्वी करुन मराठी लष्करातील आत्मविश्वास वाढविला आणि पुढील काळात स्वराज्य सुरक्षित राहिल या विषयी विश्वास निर्माण केला.[१८] घोरपडे बंधूच्या या पराक्रमी कामगिरीबद्दल राजाराम महाराजांनी बहिर्जी घोरपडे यास 'हिंदुराव' हा मानाचा किताब दिला. तेव्हापासून "राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे" असे उल्लेख अनेक कागदपत्रांमध्ये पहावयास मिळतात.[१९] त्यांनी मराठ्यांच्या राज्यासाठी जी बहुमोल कामगिरी केली. त्यासाठी त्यांना गजेन्द्रगड ही जहागिर देण्यात आली.

पन्हाळा ते जिंजी हा प्रवास राजाराम महाराजांच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचा मानला जातो. महाराज जिंजीकडे निघाले हे समजताच मोगल बादशहाने त्यांचा पाठलाग करण्यासाठी सैन्य पाठविले. या सैन्याने ठिकठिकाणी राजारामांवर हल्ले केले. त्यांचा रस्ता अडविला, परंतु या संपूर्ण प्रवासात बहिर्जीचे स्वतंत्र कतृत्व खऱ्या अर्थाने समोर आले. हा पाचशे मैलांचा प्रवास अत्यंत खडतर होता. अनेकदा मोगलांच्या फौजांचा मारा चुकविण्यासाठी सरळ मार्गाने न जाता अधिक अवघड मार्गाने प्रवास करावा लागत होता. उन-वारा-पाऊस या कशाचीही तमा न बाळगता हा प्रवास करावा लागला. एका बाजुला मराठी स्वराज्य वाचविण्याची इच्छा व दुसरीकडे मोगल सैन्याच्या

---

१८. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ६१.
१९. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें. १९७४, पृ. ०८.

हल्ल्याला प्रत्युत्तर देणे या दोन्ही गोष्टींकडे लक्ष ठेवावे लागत होते. यासंपूर्ण प्रवासात राजाराम महाराजांसोबत जिवास जीव देणारी पुष्कळ निवडक मंडळी होती.[२०] त्या निवडक मंडळीतील बहिर्जी हिंदुराव यांचा महाराजांना सर्वात जास्त उपयोग झाला. किंबहुना प्रवासात जे दोन तीन जीवावरचे प्रसंग बेतले. त्यावेळी महाराजांचे संरक्षण बहिर्जींनी आपला जीव धोक्यात घालून केले नसते, तर मराठी राज्याचा सर्व ग्रंथ जिंजीच्या वाटेवरच आटोपला असता.[२१]

संताजी घोरपडेने महाराष्ट्रात मोगलांवर मोठ्या प्रमाणात हल्ले चढविले. त्यामुळे मोगल सैन्य कोल्हापूर भागातच गुंतून पडले. याचा फायदा घेऊन राजाराम महाराजांना तुंगभद्रा नदीपर्यंत पोहोचता आले. तुंगभद्रा नदीचे खोरे राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांना चांगलेच परिचीत होते. याच परिसरात त्यांची गजेन्द्रगडची जहागीर ही होती. तुंगभद्रेजवळ सुभानगड येथे मोगलांनी राजाराम महाराजास वेढा दिला.[२२] त्या वेढ्यातून बहिर्जीने महाराजांस खांद्यावर उचलून घेऊन सुरक्षित ठिकाणी नेले.[२३] तुंगभद्रेच्या तीरावर शिमोगा येथे मोगल सैन्याने राजारामास गाठले. महाराजांबरोबर रुपाजी भोसले, संताजी जगताप, बहिर्जी आणि मालोजी हे आपल्या सैन्यानिशी होते. मोगल सैन्य आणि मराठे यांची मोठी चकमक उडाली. आणि त्या हातघाईच्या लढाईत इतर सैन्याला गुंतवून बहिर्जी घोरपडे याने राजारामाला घेऊन पलायन केले. या असामान्य धाडसामुळेच ते मोगलांच्या गराड्यातून बाहेर पडले आणि यात्रेकरु बैरागी, व्यापारी असे वेशांतर करुन त्यांनी पुढचा पल्ला गाठला.[२४]

राजाराम महाराजांचा हा जिंजीचा प्रवास म्हणजे मराठ्याच्या इतिहासातील एक अत्यंत साहसी घटना मानली जाते. पाचशे मैलांचे अंतर आणि मोगलांच्या झटापटीचे अनेक निकराचे प्रसंग यांना तोंड देऊन पन्हाळ्यापासून जिंजीला पोहोचणे म्हणजे एक महान दिव्यच होते. जिवाचा धोका पत्करुन, अनेक वेशांतरे करुन त्यांनी हे दिव्य सदोतीस दिवसात पार पाडले.[२५] बहिर्जी घोरपडे महाराजांबरोबरच होते त्यांनी तुंगभद्रानदी पार करत असतांना मोगली सैन्य जवळ पोहोचून राजाराम महाराज मोगलांच्या तावडीत सापडण्याचा प्रसंग आला असतांना बहिर्जींनी राजाराम महाराजांना

---

२०. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती - २०१२, पृ. १६०.

२१. गर्गे, स.मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ६५.

२२. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. १६०.

२३. बेंद्र, वा. सी., (संपा.), **केशवपंडितकृत, श्री राजाराम चरितम्,** आवृत्ती - शके १८५३, पृ. २५.

२४. पगडी, से. तू. माधवराव, (संपा.), **मराठे व औरंगजेब,** आवृत्ती-१९९३, पृ. ४४.

२५. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें. १९७४,पृ.४७.

आपल्या पाठीवर घेऊन जावून या संकटातून वाचविले. आणि तुंगभद्रा नदी पार केली. त्यावेळी बाजी काकडे हा मराठ्यांचा कर्नाटकातील एक प्रमुख सरदार होता, तो वेल्लोरला असावा. बहिर्जीच्या प्रयत्नानेच त्यावेळी बाजी काकड्याची भेट झाली. त्याच्या मदतीनेच प्रथम वेल्लोर व नंतर १ किंवा २ नोव्हेंबर १६८९ रोजी राजाराम महाराज जिंजीस पोहोचले.[२६] याच प्रवासात शिमोगा येथे मोगल सैन्याने केलेल्या हल्ल्यात मालोजी घोरपडे व इतर काही मराठे सरदार मोगल सैन्याच्या हाती लागले. तेंव्हा त्या ऐंशी लोकांना औरंगजेबाकडे पाठविले गेले. बादशहाने त्या सर्वांचा शिरच्छेद केला.[२७] मालोजी घोरपडे बहिर्जीचा सख्खा भाऊ होता. तो देखील आपल्या वडिलांप्रमाणेच स्वराज्याच्या छत्रपतीच्या संरक्षणासाठी मृत्यूमुखी पडला व आपल्या घराण्याची शुरत्वाची परंपरा सुरु ठेवली.

राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांनी जिंजीच्या प्रवासात राजाराम महाराजांचा मित्र, मंत्री, सैनिक, सेनाधिकारी अशा सर्व भूमिका पार पाडल्या.[२८] राजारामांचा महाराष्ट्राशी संपर्क ठेवण्याचे कार्य बहिर्जी करीत होते. त्यावेळी स्वराज्यात निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे अनेक मराठा सरदार भितीपोटी औरंगजेबाला जाऊन मिळू लागले. अशा सर्व मराठा सरदारांना आपल्या बाजूस वळवून घेण्याचे काम बहिर्जी घोरपडेंनी केले.[२९] बहिर्जींच्या साहसी कृत्यांबद्दल अनेक ऐतिहासिक साधनात उल्लेख आहेत. मासीरे आलमगिरी या फारसी ग्रंथातही राजे बहिर्जी यांनी छत्रपतींना कसे सुरक्षित ठेवले याची माहिती दिलेली आहे. बहिर्जीमध्ये असामान्य शौर्य, निस्सीम स्वराज्यप्रेम आणि साहसी कल्पकता हे गुण त्यांच्या कार्यकाळात स्पष्ट दिसत होते. जिंजीच्या प्रवासात राजाराम महाराजांसोबत असणाऱ्या केशव पंडिताने लिहिलेल्या राजारामचरितम् या प्रवास वर्णनातही त्याने बहिर्जी हिंदुरावाचा गौरवपर उल्लेख केलेला आहे.

राजाराम महाराज जिंजीकडे पोहोचल्यावर त्यांनी जिंजी येथे मराठ्याची नवी राजधानी थाटली. त्यामुळे कर्नाटकातील हिंदु सत्ताधिश एक होऊन आपल्या फौजा, धन व नजराणे घेऊन त्यास सामील झाले. कारण औरंगजेब हिंदुस्थानपादाक्रांत करुन आपला हिन्दू धर्म नाहीसा करेल असा धाक संभाजीच्या वधाने कर्नाटकात निर्माण झाला होता.[३०] त्यामुळेच सर्वांनी मिळून मुसलमानांचा

२६. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें. १९७४, पृ.४६.
२७. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड दुसरा,** आवृत्ती - २०१२, पृ. १६२.
२८. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ६७.
२९. भोसले, प्रविण, व., **मराठ्यांची धारातीर्थे,** आवृत्ती - ऑक्टो. २०१२, पृ. ८१.
३०. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. १६३.

समाचार घ्यावा असे ठरले. या कालखंडात बहिर्जी यांनी राजाराम महाराजांची इमाने इतबारे सेवाचाकरी केली आणि त्यांचे जिंजीमधील स्थान बळकट केले. याबद्दल माहिती देणारे एक मराठी पत्र उपलब्ध आहे. त्यात असे म्हटले आहे की, छत्रपतींनी कर्नाटकात चाळीस हजार घोडदळ आणि एक लक्ष पंचवीस हजार पायदळ उभारले असून केसो त्रिमलबरोबर पंधरा हजार घोडदळ व पंचवीस हजार पायदळ आणि एक लाख होनाचा खजिना देऊन त्यास महाराष्ट्रात पाठविले आहे. (२२ मार्च १६९०)[३१] महाराज जिंजीस पोहोचल्याचे समजताच औरंगजेब बादशहाने जुल्फिकारखानास मोठे लष्कर घेऊन जिंजी जिंकण्यासाठी पाठविले. त्याचवेळी राजाराम महाराजांनी बहिर्जीचे ज्येष्ठ बंधू संताजी यास सेनापतीपद दिले होते. (इ.स. १६९१), [३२] संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव महाराष्ट्र ते जिंजी या प्रदेशात मोगलांचा समाचार घेत होते. आणि बहिर्जी जिंजीला वेढा घालून बसलेल्या मोगली सैन्याला बाहेरुन हल्ले करुन सतावण्याचे कार्य करीत होते.[३३]

हा जिंजीचा ऐतिहासिक वेढा ऑगस्ट १६९० मध्ये सुरु झाला. आणि भीमसेन सक्सेना म्हणतो त्याप्रमाणे हा किल्ला पुर्णपणे २ जानेवारी १६९८ रोजी मोगलांच्या ताब्यात आला.[३४] या साडेसात वर्षात हा वेढा सुरुच होता असे नाही. मात्र जुल्फिकारखान जिंजीच्या अवतीभोवती फिरुन वेढा सुरु ठेवण्याचा प्रयत्न करीत असे. या दरम्यान राजाराम महाराज व जुल्फिकारखानाचे अंतस्थ सूत जमले होते. म्हणूनच तर जानेवारी १६९३ मध्ये जिंजीपुढे मोगलांची हैराणगत अवस्था झाली व सर्व मोगल सैन्य मराठी सैन्याच्या तावडीत सापडले, तरी राजाराम महाराजांनी त्याचा नाश न करता त्यास बंदिवाशला जाऊ दिले होते. यावेळी राजारामाने आपल्या सेनापतींशी विचारविनिमय न केल्याने संताजी घोरपडेंनी राजारामांच्या मंत्र्यावर शत्रुकडून जबरदस्त लाच घेतल्याचा आरोप केला.[३५] या उपकाराची परतफेड नंतर खानानेही केली होती. हल्ला करुन जिंजी काबीज करण्यात त्यानेही कुचराई सुरु केली.[३६] राजाराम महाराजांच्या ह्या धोरणामुळे त्यांच्याशी संताजीचा खडका उडाला. ह्याचे विपरित परिणाम घडुन आले. राजारामाने संताजीस मे-जून १६९६ मध्ये सेनापती पदावरुन

---

३१. राजवाडे, वि. का., (संपा.), **मराठ्यांच्या इतिहासांची साधने,** खंड पंधरावा, आवृत्ती-१९०९, पृ. ३७६.
३२. हेरवाडकर, र. वि., (संपा.), **थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र,** आवृत्ती- ऑगस्ट १९७२, पृ. ९.
३३. भोसले, प्रविण, व., **मराठ्यांची धारातीर्थे,** आवृत्ती - ऑक्टो. २०१२, पृ. ८१.
३४. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल आणि मराठे,** आवृत्ती- १९६३, पृ. १३५.
३५. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. २४.
३६. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगस्ट १९७५, पृ. ५४.

दूर केले. त्यामुळे मराठे व मोगल ह्या दोन्ही बाजुंशी लढतांना संताजी थकुन गेला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात संताजीचा खून नागोजी मान्याने केला.

नागोजी मानेने संताजीचे शीर बादशहास नजर केल्यामुळे १५ ऑगस्ट १६९८ रोजी नागोजीस बादशहाकडून ७ लक्ष ७८ हजाराची जहागिर मिळाली. [३७] ही सर्व हालचाल राजराम महाराजांना माहिती होती. परंतु त्यांच्याकडुन कुठल्याही प्रकारे नागोजीस शिक्षा केली गेली नाही. ही गोष्ट बहिर्जींच्या अत्यंत जिव्हारी लागली. त्यामुळे छत्रपतींशी त्यांचे वैमनस्य निर्माण झाले असावे.[३८] ते उन्दिग्न मन:स्थितीत दक्षिणेकडे निघून गेले. गजेन्द्रगड आणि त्याभोवतालचा प्रदेश त्यांना जहागिर म्हणून मिळालेला होता. त्याच प्रदेशात जाऊन आपला प्रदेश सुरक्षित आणि संघटित करावा या हेतूने ते कर्नाटकात निघून गेले असावेत. महाराजांशी झालेल्या मतभेदातून कर्नाटकात आपले स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची कल्पना त्यांना सूचली. त्यासाठी त्यांनी कर्नाटकातील गुत्तीचा किल्ला जिंकला. इ.स.१६९७ च्या अखेरीस त्यांनी गुत्तीचा किल्ला आपल्या जहागिरीचे व लष्करी छावणीचे मुख्य ठाणे बनविले. [३९]

यानंतर सतत लढायात गुंतल्याने आणि मोगलांनी सतत पाठलाग केल्यामुळे २ मार्च १७०० रोजी ताप येऊन राजाराम महाराजांचा मृत्यू झाला.[४०] महाराष्ट्राबाहेर पुढील काळात चालू झालेल्या मराठ्यांच्या सत्ता विस्तारात बहिर्जींनी कर्नाटकात स्वत:च्या हिंमतीवर आपले ठाणे गुत्ती येथे स्थापन केले. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळापासून बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांनी त्यांना प्रामाणिक साथ दिली होती. परंतु भावाचा खून झाल्याने आणि राजाराम महाराजांनी योग्य न्याय न दिल्याने बहिर्जी नाराज होऊन कर्नाटकातील आपल्या गजेन्द्रगड जहागिरीत निघून गेले.

### ३.१.२ बहिर्जी घोरपडे - हिंदुराव घोरपडे घराण्याचे संस्थापक :

बहिर्जी आपल्या वडील व भावांप्रमाणेच पराक्रमी होता राजाराम महाराजांच्या काळात त्याने छत्रपतींचे घराणे बिकट प्रसंगी सुरक्षित ठेवण्याची मोठी जबाबदारी पार पाडली. वेळप्रसंगी स्वत:चा जीव धोक्यात घालून स्वराज्याच्या छत्रपतीचे संरक्षण केले. 'स्वराज्याचा संरक्षक' म्हणूनही

---

३७. पवार, ज. भा., **सेनापती संताजी घोरपडे,** आवृत्ती- डिसें. २००८, पृ. ९८.

३८. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ७३.

३९. मगदूम, दामोदर, **स्वराज्याचे शूर सेनानी,** आवृत्ती - फेब्रु. २०१४, पृ. १७३.

४०. कोलारकर, श. गो., (अनु.), **औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास,** आवृत्ती- १९९९, पृ. २९५.

त्यांच्याकडे पाहिले जाते.[४१] औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणल्याबद्दल त्याला राजाराम महाराजांनी 'हिंदुराव' ही मानाची पदवी दिली होती. त्यामुळेच बहिर्जी हा हिंदुराव घोरपडे घराण्याचा संस्थापक मानला जातो. बहिर्जीला गजेन्द्रगडची जहागीरही दिलेली होती. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दात संताजी, धनाजी आणि बहिर्जी या तिनही घोरपडे बंधूनी एकजुटीने एकमेकांना आणि स्वराज्य रक्षणाला पुरक अशीच कामगिरी केली. परंतु दुर्देवाने संताजीचा अंत मराठ्यांच्या अंत:स्थ दुहीने घडून आल्याने बहिर्जी दुखावला गेला. कारण ते दोघेही प्रत्येक मोहिमेत नेहमीच सोबत असत. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांना एकमेकांचा मोठा आधार होता. भावाच्या मृत्यूनंतर बहिर्जीने आपल्या कर्नाटकातील जहागिरीत स्वतंत्र राज्य निर्माण केले तेच हिंदुराव घोरपडे घराणे मानले जाते. इ.स. १६९६ मध्ये त्यांनी गुत्तीचा किल्ला जिंकून तेथेच आपल्या राज्याचे मुख्य ठाणे बनविले.[४२]

### ३.१.३ राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडेंची इतर कामगिरी :

राजाराम महाराजांशी आलेल्या वितूष्टामुळे बहिर्जीराजे आपल्या जहागिरीत निघून गेले. राजाराम इ.स. १६९८ मध्ये जिंजीहून निसटून महाराष्ट्रात आले. त्यामुळे स्वराज्यात पुन्हा मराठ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र वयाच्या केवळ तिसाव्या वर्षी छत्रपतींचे निधन झाले.[४३] यामुळे औरंगजेबाने पुन्हा एकदा मराठ्यांचे संपूर्ण राज्य जिंकुन घेण्याच्या महत्वाकांक्षेने आपल्या हालचालींना वेग दिला. इकडे स्वराज्यात महाराणी ताराबाई विशाळगडावर होत्या. त्यावेळी स्वराज्यात तथाकथित राज्यक्रांती घडून आली असे साकी मुस्तैदखान आणि खाफीखानासारखे मुसलमानी लेखक लिहतात. परंतु हा राज्यक्रांतीचा प्रकार खरा नसून ती एक मोगली गोटात राजारामांच्या मृत्यूनंतर पसरलेली अफवा होती.[४४] महाराजाच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या दुर्देवाने आणि मराठ्यांच्या सुदैवाने पुन्हा एकदा मराठे संघटित होऊन जोमाने लढण्यास तयार झाले. त्यांचे नेतृत्व स्वाभाविकच महाराणी ताराबाईंकडे आले.

---

४१. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ६८.
४२. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती- १९८६, पृ. ४१५.
४३. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ७४.
४४. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगस्ट १९७५, पृ. ९०.

### ३.१.३.१ राजे बहिर्जी व महाराणी ताराबाई :

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर ताराबाईंनी आपले पुत्र शिवाजी राजे (दुसरे) यांना गादीवर बसवले. ताराबाईंनी राज्याच्या कारभाराचे सर्वाधिकार आपल्याकडे घेतल्याचे व त्या स्वत: राज्यकारभार पाहू लागल्याचे अनेक उल्लेख तत्कालीन कागदपत्रात येतात. अवघ्या पंचविसाव्या वर्षी ऐन तारुण्यात वैधव्याची कुऱ्हाड ताराबाईंवर कोसळली. मराठा-मोगल संघर्षात राजारामाच्या मृत्यूने मराठ्यांची खूप हानी झाली. राजारामांच्या मृत्यूमुळे जी एक पोकळी निर्माण झाली होती. ती ताराबाईंने आपल्या कर्तृत्वाने भरुन काढली.[४५] ताराबाईने सर्वप्रथम स्वराज्य संरक्षणासाठी सर्व प्रमुख मराठ्यांना संघटित होण्याचे आवाहन केले. अनेक सरदारांना आणि सेनानींशी पत्रव्यवहार करुन त्यांना प्रोत्साहित केले. राज्यकारभारासाठी आणि मोगलांविरुध्दच्या युध्द कार्यासाठी आपल्या विश्वासातील माणसांना निवडले. यावेळी राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे आपल्या कर्नाटकातील गजेन्द्रगड व गुत्तीच्या जहागिरीच्या प्रदेशात व्यस्त होते. महाराणी ताराबाईंस बहिर्जींच्या पराक्रमाविषयी पूर्ण माहिती होती. त्यामुळेच त्यांना बहिर्जी सारख्या पराक्रमी आणि निष्ठावंत सेनानीचा विसर पडणे शक्यच नव्हते.[४६] महाराणी ताराबाईंनी बहिर्जीरावास मोगलांच्या विरोधातील मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दाकरिता साद घातली व बहिर्जींनी देखील स्वराज्य रक्षणासाठी त्यांना प्रतिसाद दिला आणि ते ताराबाईंनी हाती घेतलेल्या मोगलाविरुध्दच्या युध्दात सहभागी झाले.

इ.स. १७०२ पासून बहिर्जीचे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रात ठळकपणे आढळून येतात.[४७] बहिर्जी आणि संताजीचा मुलगा राणोजी यांची परशुरामपंत प्रतिनिधी यांनी एकी घडवून आणली. काही कारणांनी त्यांच्यामध्ये जे वितुष्ट निर्माण झाले होते ते संताजीच्या निधनानंतर कायम राहणे घोरपडे घराण्याच्या दृष्टिनेही हितकारक नव्हते. म्हणून बहिर्जी व राणोजी यांची दिलजमाई घडून आली ही गोष्ट घोरपडे घराण्यासाठी योग्य अशीच होती.[४८] स्वराज्यात औरंगजेबाने किल्ले जिंकुन घेण्यासाठी हल्ले सुरु केले. धनाजी जाधव, बहिर्जी उर्फ हिंदुराव घोरपडे, राणोजी घोरपडे अशा अनेक सरदारांनी स्वराज्यात आणि मोगली मुलखात मोठी धामधूम उडविली. मराठी सत्ता नष्ट

४५. पवार, ज. भा., **मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त,** आवृत्ती- १९८६, पृ. ९.

४६. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ७४.

४७. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती - १९८६, पृ. ४१५.

४८. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें.१९७४, पृ.४६.

होण्याची चिन्ह दिसत नव्हती. तेव्हा "या दुष्ट जमातींचे निवासस्थान म्हणजे किल्ले, ते जिंकुन घ्यावे आणि या कुटिल जमातींची पाळेमुळे खणून काढावी"[४९] अशा शेलक्या शब्दात औरंगजेबाने मोगल सैन्यास सांगितले.

मोगल बादशहा मिरजेहून पन्हाळ्याच्या पायथ्याशी वेढा टाकून असतांना धनाजी जाधव, कृष्णा मल्हार, दादो मल्हार, हिंदुराव घोरपडे व राणोजी घोरपडे यांनी पन्हाळा ते सातारा याप्रदेशात मोगल सैन्यास मिळणाऱ्या रसदी तोडण्याचे काम सुरु केले. राणोजी पन्हाळ्याच्या परिसरात वीस हजार फौजेनिशी होता. त्याच सुमारास मोगलांशी झालेल्या एका लढाईत राणोजीचा चुलता हिंदुराव मोगलांच्या कैदेत सापडला. परंतु लवकरच त्याची सुटका झाली.[५०]

इ.स. १७०२ मध्ये हिम्मतखान याच्याशी झालेल्या झुंजीत बहिर्जीचा पुतण्या व संताजीपुत्र राणोजी लढाई करतांना मारला गेला. राणोजीला पुत्र संतती नव्हती. राणोजीची आई सोयराबाई ही त्याच्या मृत्युनंतर आपल्या दिराकडे म्हणजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांच्याकडे राहू लागली.[५१] सोयराबाईस मौजे मंगावती हे गाव इनाम म्हणून व कसबे सदलगे मोकासा म्हणून दिलेला होता.[५२] अशा पध्दतीने बहिर्जीने केवळ हिंदुराव गजेन्द्रगडकर घराण्याबरोबर आपला भाऊ संताजीच्या कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याकडेही मोठा म्हणून लक्ष दिले.

महाराणी ताराबाईंनी इ.स. १७०२ पासून आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या सरदारांना महाराष्ट्राबाहेर गुजरात, माळवा, आंध्र, कर्नाटक व तामिळनाडू इत्यादी भागांमध्ये आक्रमणास पाठविले. यात हिंदुराव घोरपड्याने तोरगलच्या प्रदेशावर स्वारी केली. तोरगलचा देशमुख लिंगाप्पा देसाई मराठ्यांच्या विरुध्द बंडखोरी करुन मराठ्यांना वसूल देत नव्हता. त्याच्यावर आक्रमण करुन बहिर्जीने त्यास कैद केले. सौंध्याचे संस्थान मराठी अधिसत्तेखाली येत होते. राजाराम महाराजांनी सदाशिव नाईक यास मोठा प्रदेश देऊन या संस्थानचा अधिपती बनविले. परंतु इ.स. १७०२ मध्ये सदाशिव नाईकांच्या मृत्यूनंतर बसवलिंग नाईक सौंध्याचा राजा बनला. त्याने मराठ्यांचे नेतृत्व झुगारुन मोगल बादशहाशी हातमिळवणी केली. त्याच्या ह्या बंडखोरीचा बंदोबस्त लावण्यासाठी

---

४९. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्द,** आवृत्ती-१९६२, पृ. ४५.

५०. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगष्ट १९७५, पृ. १४५.

५१. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हें.१९७४, पृ.९६.

५२. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड पहिला,** आवृत्ती-२०१२, पृ.४२८.

बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांना पाठविले. हिंदुरावांनी बसवलिंगाकडून दरवर्षी सतरा हजार रुपये खंडणी सक्तीने वसुल करण्यास सुरुवात केली. मोगलांशी मैत्री करणे नाईकास महागात पडू लागले. त्याने तात्काळ मराठ्यांसमोर शरणागती पत्करुन आपला वकील ताराबाईकडे पाठवून तहाची याचना केली.[५३] झालेल्या वाटाघाटीत हिंदुरावांची भुमिका महत्वाची होती. त्यानुसार उभय पक्षी तह होऊन मराठ्यांनी सौंध्याच्या राज्यास उपद्रव देऊ नये आणि सौंधेकरांनी मराठ्यांना दरवर्षी पंचवीस हजार रुपये खंडणी देण्याचे मान्य केले.

इ.स. १७०४ मध्ये औरंगजेबाचा मुक्काम खेडच्या प्रदेशात होता. दक्षिणेतील युध्दासाठी बादशहास बराच खर्च येत होता. त्यासाठी त्याने उत्तरेकडून कुमक मागविली होती. हा खजिना बऱ्हाणपूरपर्यंत येऊन पोहोचला. तेव्हापासूनच मराठा सैन्य त्यांच्या मागावर होते. खजिन्याचा काफीला औरंगाबादपासून काही मैल अंतरावर फर्दापूर जवळ आला आणि लगेच त्यावर मराठ्यांनी छापा घालून तो लुटला.[५४] जून महिन्यात मराठे हैद्राबादच्या प्रदेशातही घुसले, गोवळकोंडा शहरावर हल्ला करुन ते लुटले. गोवळकोंड्याचा सुभेदार हतबल होऊन भागानगरच्या किल्ल्यात जाऊन लपला होता. परंतु मराठ्यांनी त्याची पाठ सोडली नाही. त्याला अनेक प्रकारच्या धमक्या देऊन त्यांनी त्याच्याकडून मोठी रक्कम उपटली.[५५] तेथून धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर आणि हिंदुराव घोरपडे कर्नाटक प्रांतात शिरले. (जून-जुलै १७०४)[५६]

महाराणी ताराबाईच्या कारकिर्दीत वाकिणखेड्याच्या लढाईत हिंदुराव घोरपडेंनी मोठा पराक्रम गाजविल्याचे उल्लेख भीमसेनाने आपल्या ग्रंथात केलेले आहे. विजापुरच्या पश्चिमेस कृष्णा व भीमा यांच्या दुआबात बेरड लोकांच्या वसाहती होत्या. बेरड हे अत्यंत काटक व शूर होते. त्यांचे काही सरदार आदिलशाहीत चाकरीत होते, त्यावेळी त्यांना मोगलांविरुध्दच्या युध्दात त्यांना त्रस्त करुन सोडले होते. त्यांचे तसे मुख्य ठिकाण सागर हे होते. (विजापुरच्या पुर्वेस ७२ मैलावर) परंतु मोगलांनी ते जिंकून घेतल्यामुळे बेरडांनी सागरपासून १२ मैलांवर असणाऱ्या वाकिणखेडा (सुरपूर तालुका, गुलबर्गा जिल्हा) येथे आपले प्रमुख ठाणे केले. मराठे व बेरड यांचा मोगल हा समान शत्रू

५३. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगष्ट १९७५, पृ. २२४.
५४. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ७८.
५५. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल आणि मराठे,** आवृत्ती-१९६३, पृ. १७३.
५६. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ७९.

होता. मोगल बादशहाने ८ फेब्रुवारी १७०५ रोजी वाकिणखेड्याच्या किल्याला वेढा दिला.[५७] (म.ता.२१५) महाराणी ताराबाईंनी धनाजी जाधव व हिंदुराव घोरपडे यांच्याबरोबर पाच हजार मराठी स्वार व वीस हजार बेरड पायदळ यांना वाकिणखेड्याकडे धाडले. (मार्च १७०५)[५८]

या स्वारीवर असतांना धनाजी जाधव व हिंदुराव घोरपडे यांनी आपल्या लष्करासह धारवाडच्या प्रदेशात धुमाकूळ घातला होता तर हिंदुराव घोरपड्यांच्या फौजेमधील कासीराम जमेनवीस, मानाजी बागूल व उदाजी काटकर ही मंडळी रायबागच्या प्रदेशात मोगलांशी सामना देत होती. किल्ल्यातील बेरडाच्या सैन्यास मराठ्यांची फार मोठी मदत झाल्याचे दिसते. त्यामुळेच बादशाही छावणी भोवती भक्कम भिंत उभी केल्यानंतरही मोगली सैन्य छावणीच्या बाहेर पाऊल टाकण्यास घाबरत असत.[५९] मोगल सैन्यास जुल्फिकारखान, दाऊदखान अशा कसलेल्या सरदारांसह मदत येवून पोहोचली. त्यावेळी ताराबाईंनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे पिडनायकाने आपल्या माणसांसह मराठ्यांच्या मदतीने किल्ल्यातून गुपचूप पलायन केले. (२७ एप्रिल १७०५).

इ.स. १७०५ च्या फेब्रुवारी महिन्यात गुलबर्गा जिल्ह्यातील वाकिणखेडा येथे हिंदुराव घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी मोगलांशी लढाई केली आणि त्यात मोगल सैन्य मेटाकुटीला आले असे भीमसेन सक्सेना याने म्हटले आहे.[६०] वाकिणखेडा जिंकल्यापासून बेरड आणि मराठे (विशेषत: घोरपडे) कर्नाटकात सतत धुमाकूळ घालीत होते. मराठी फौजा ओरिसा व गुजरात या प्रदेशात मोहिमा करीत होत्या. त्यावेळी मराठ्यांची एक फौज हिंदुराव घोरपडेच्या नेतृत्वाखाली कर्नाटकात धामधूम माजवीत होती. हिंदुरावाच्या सहाय्यास पिड नायक बेरडाची फौज होतीच. इ.स. १७०५ च्या मार्च मध्ये या संयुक्त फौजांनी पेनुकोंड्याचा प्रबळ किल्ला जिंकुन घेतला. हा किल्ला मोगल कर्नाटकच्या दोन्ही भागावर (विजापूर कर्नाटक आणि गोवळकोंडा कर्नाटक) लक्ष ठेवण्यास फार उपयोगी होता.[६१] ह्या किल्ल्याच्या किल्लेदारास पराभूत करुन कैद केले. तालिकोटच्या लढाईनंतर विजयनगरच्या साम्राज्याच्या वंशजांनी पेनुकोंडा ही आपली राजधानी केली होती. हे शहर आंध्रप्रदेशात अनंतपुर जिल्ह्यात आहे.

---

५७. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगष्ट १९७५, पृ. २१५.
५८. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल आणि मराठे,** आवृत्ती-१९६३, पृ. १७५.
५९. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ७९.
६०. कुलकर्णी, अ.रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती- १९८६, पृ.४१५.
६१. चौबळ, ज. स., (अनु.), **असे होते मोगल,** आवृत्ती-१९७४, पृ. ३५५.

एकंदरित राजाराम महाराजांच्या निधनानंतर मराठ्यांचे ताराबाईच्या नेतृत्वाखाली अभूतपूर्व स्वातंत्र्ययुध्द इ.स. १७०० ते इ.स. १७०७ पर्यंत सुरु होते. यामध्ये राजे बहिर्जीचा वाटा मोठा होता. त्यांनी अनेक मोक्याच्या लढायांमध्ये भाग घेऊन मोलाची कामगिरी बजावलेली दिसते, असे असले तरी इ.स. १७०७ च्या फेब्रुवारीमध्ये धनाजी जाधव आणि हिंदुराव घोरपड्यांमध्ये वैमनस्य निर्माण झाले. त्यावेळी ताराबाईंनी धनाजी जाधवाचा पक्ष घेतला. धनाजी व हिंदुरावात लढाई झाली. हिंदुरावाचा पराभव झाला त्याने आधोनीपासून दहा कोसांवर असणाऱ्या कुपगलच्या किल्ल्यात आश्रय घेतला. धनाजीने हिंदुरावाची संपत्ती लुटली, त्याचे हत्ती, घोडे धनाजीच्या ताब्यात आले. धनाजीने कुपगलच्या किल्ल्याला वेढा दिला. यावेळी संकटातून सुटका होण्याकरीता बहिर्जीने जुल्फिकारखानास मदतीचे आवाहन केले. जुल्फिकारखान या संधीची जणू वाटच पाहत होता. त्याने लगेच आपला मोर्चा तुंगभद्रा नदीकडे वळविला, तो आला आहे हे समजताच धनाजीने किल्ल्याचा वेढा उठवून निघून गेला. हिंदुराव मात्र त्याच्या मदतीसाठी धावून येणाऱ्या खानास येऊन न मिळता सोंडूरकडे निघून गेला. (फेब्रु. १७०७)[६२] त्यांनतर बहिर्जी हिंदुराव घोरपडे महाराष्ट्रात परतल्याचे उल्लेख नाही.

शाहू महाराज (छत्रपती संभाजीपुत्र) मोगलाच्या बंदिवासातून सुटून महाराष्ट्रात परतल्यानंतर ताराबाईंनी बहिर्जीना पुन्हा आपल्या मदतीसाठी बोलाविले. त्याला तसेच तत्कालीन कारणही होते. औरंगजेबाने मराठ्यांच्या छत्रपती घराण्यामध्ये संघर्ष व्हावा याकरीता शाहूस बंदिवासातून मुक्त केले. त्यावेळी शाहू आणि ताराबाई यांच्यात खेड नजीक १२ ऑक्टो. १७०७ रोजी निर्णायक लढाई झाली. शाहू महाराजांनी आधीच ताराबाईकडील अनेक मराठा सरदारांना आपल्या बाजूने करुन घेतले होते. लढाईच्या आदल्या दिवशीच धनाजी जाधवाने ताराबाईंचा पक्ष सोडून शाहूंचा पक्ष स्विकारला होता.[६३] खुद्द सेनापतीच विरोधी पक्षाला जाऊन मिळाल्याने ताराबाईंचा पराभव झाला. ज्या धनाजींवर राजाराम महाराजांपासून संपूर्ण विश्वास ठेवला होता, त्यानेच ऐनवेळी आपला पक्ष सोडला ही गोष्ट ताराबाईंना अत्यंत जिव्हारी लागली. ऐनवेळी धनाजींच्या तोलामोलाचा दुसरा

---

६२. पगडी, सेतु माधवराव, (संपा.), **मोगल आणि मराठे,** आवृत्ती-१९६३, पृ. १८७.

६३. भावे, लक्ष्मण विनायक, **मराठी दप्तर, रुमाल दुसरा, लेखांक १ ते ४,** आवृत्ती- शके १८४४, पृ. ७३.

सेनापती नसल्याने बहिर्जींना महाराणीने परत बोलावले असावे आणि त्यांची समजूत घालून त्यांच्यावर सैन्याची जबाबदारी सोपविली असावी पण बहिर्जी थोड्याच दिवसात निधन पावले.[६४]

### ३.१.३.२ राजे बहिर्जी आणि पोर्तुगीज सत्ता :

अफ्रिका खंडाच्या दक्षिण टोकास वळसा घालून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर पाऊल ठेवणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपियन होते. १७ मे १४९७ या दिवशी वास्को-दी-गामा मलबारच्या किनाऱ्यास कालिकत शहराच्या उत्तरेस आठ मैलांवर कषट नावाच्या खेड्याच्या किनाऱ्यास लागला.[६५] इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी आदिलखानाकडून गोवा शहर काबीज केले. त्यामुळे कुडाळपासून चिताकूलपर्यंतचा गोवा राज्याचा प्रदेश त्यांच्या सत्तेखाली आला.[६६] संभाजी राजांच्या काळात त्यांनी आपल्या तलवारीच्या जोरावर पोर्तुगीजांना नरमाईचे धोरण स्विकारावयास लावले. संभाजी आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये रक्तरंजित प्रदीर्घ युध्द झाल्याने उभय पक्षामधील राजनैतिक संबंध विकोपास गेले होते.[६७] राजाराम महाराजांच्या काळात त्यांना औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रुंशी संघर्ष करावा लागल्याने त्यांनी नेहमीच पोर्तुगीजांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारलेले होते. असे असले तरी शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि राजाराम या तीन छत्रपतींच्या कारकिर्दीत मराठ्यांचे पोर्तुगीजांशी असलेले संबंध फारसे मैत्रीचे नव्हते.[६८]

राजाराम महाराजांच्या निधनानंतर महाराणी ताराबाईंनी आपला पुत्र शिवाजी याला गादीवर बसवून राज्यकारभार स्वत:च्या हाती घेतला. पोर्तुगीजांशी त्यांनी पूर्वीप्रमाणे असणारेच धोरण अवलंबिलेले होते. ताराबाईंनी गोव्याच्या पोर्तुगीजांशी वाटाघाटी तसेच पत्रव्यवहार करण्याची कामगिरी बहिर्जीवर सोपविलेली होती.[६९] गोव्याच्या पोर्तुगीज व्हाईसरॉयने देखील बहिर्जीच्या मार्फतच ताराबाईंशी पत्रव्यवहार केलेला आहे. पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध टिकविण्याची मुत्सद्देगिरी राजे बहिर्जींनी दाखविली. त्यांनी पोर्तुगीजाकडे खास दुतामार्फत पाठविलेल्या पत्रात उभय पक्षांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित व्हावे अशी मागणी केलेली होती. मराठा-पोर्तुगीज संबंधात कुडाळचा देसाई खेम सावंताचा उल्लेख

६४. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ८१.
६५. देसाई, स. शं., (संपा.), **पोर्तुगीज मराठा संबंध,** आवृत्ती- १९८९, पृ. २.
६६. पिसुर्लेकर, पां.स., (संपा.), **पोर्तुगीज मराठे संबंध,** आवृत्ती - मे १९६७, पृ. १.
६७. देसाई, स. शं., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ९५
६८. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती- ऑगस्ट १९७५, पृ. २५०.
६९. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ७५.

वारंवार येतो. हा खेम सावंत नेहमीच आपल्या गट बदलु प्रवृत्तीमुळे प्रसिध्द होता. तो कधी मराठा राज्यांची सेवा, कधी मोगलांची मनसब तर कधी पोर्तुगीजांचा मांडलिक बने. त्याच्यामुळे पोर्तुगीजांचा त्याच्यावर विश्वास कमी होता, हे पोर्तुगीजांनी बहिर्जीस पाठविलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते. तरिही पोर्तुगीज मात्र मोगल व खेम सावंत या दोघांनाही मदत करीत होते.[७०]

पोर्तुगीज व्हाईसरॉयच्या चिटणीसाने बहिर्जी हिंदुरावास लिहीलेल्या पत्रात खेम सावंताविषयी सावध राहण्याचे सांगीतले आहे, "हिंदुराव यांना, हे पत्र तुम्हाला नामदार व्हाइसरॉय यांच्या आज्ञेवरुन लिहित आहे. ह्या राज्याशी तुमचे सलोख्याचे संबंध आहेत... परंतु नुकतीच त्यांना बातमी कळ्ली आहे की जाबावली येथे काही सैन्य आले असून ते राणीच्या (ताराबाई) संमतीने खेम सावंत भोसले यांच्या मदतीला आले आहे. हा निर्णय राणीने आपल्या सल्लयाने कसा घेतला याचे आम्हास आश्चर्य वाटते. खेम सावंत भोसले हे राणीचे शत्रू होते, इतकेच नव्हे तर राणीने नामदार व्हाईसरॉय यांना कळविले होते की, खेम सावंत भोसले यांचा नि:पात होईपर्यंत त्यांच्याशी युध्द करण्याचा आपला विचार आहे. आणि आता राणी खेम सावंत ह्यांना मदत पाठविते, हे कसे काय ते आम्हाला कळत नाही. खेम सावंत भोसले ह्यांनी राणीला एखादे अभिवचन दिले आहे का? तसे असेल तर तिने त्यांच्या वचनावर मुळीच विसंबून राहू नये कारण हा मनुष्य वचन पाळणारा नाही......." गोवा, १० जाने. १७०६, फ्रान्सिश्कु द आझावेद द सांद, (व्हाईसरॉयचा चिटणीस)[७१]

इ.स. १७०२ च्या ऐन पावसाळ्यात हिंदुराव घोरपड्याने कोकणात उतरुन भिमगडावर हल्ला चढविला आणि तेथील हवालदार व इतर अधिकाऱ्यांना कैद केले अशी बातमी खेम सावंत भोसले ह्यांनी गोव्याच्या गव्हर्नरला कळविली. गव्हर्नरने त्याबद्दल खेम सावंताचे आभार मानले.[७२] कोंड्यांचा महाल जिंकल्यानंतर महाराणी ताराबाईंनी महालावर सुभेदार म्हणून कृष्णाजीपंताची नेमणूक केली.[७३] परंतु कोंड्याचा किल्ला खेम सावंताने दगलबाजी करुन जिंकून घेतला. तो पोर्तुगीज जहाजांवरही हल्ला करीत असे त्यामुळे त्याचा बंदोबस्त करणे पोर्तुगीजांना गरजेचे झाले होते.[७४] असे असतांना पोर्तुगीजांनी खेम सावंतास त्याच्या कृत्याबद्दल क्षमा करावी अशी रदबदली बहिर्जी

---

७०. देसाई, स. शं., (अनु.), **पोर्तुगीज दप्तर, खंड तिसरा,** आवृत्ती-१९६८, पृ. ७४.
७१. पवार, ज. भा., **महाराणी ताराबाई,** आवृत्ती-ऑगस्ट १९७५, पृ. २३९.
७२. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. १५९.
७३. देसाई, स. शं., (अनु.), **पूर्वोक्त,** पृ. ८९.
७४. पवार, ज. भा., **पूर्वोक्त,** पृ. २५८.

हिंदुराव घोरपड्याने व्हाईसरॉयकडे केलेली आढळते.[७५] पोर्तुगीज दप्तरात हिंदुराव घोरपडे यांचा उल्लेख छत्रपतींचे सेनापती हिंदुराव घोरपडे असा केला आहे, यावरुन असे लक्षात येते की कर्नाटकात निघून गेल्यानंतर बहिर्जी पुन्हा स्वराज्याच्या कार्यात सहभागी झाले.

बहिर्जीचे त्यावेळेचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने कोकण, सागरी किनारा आणि गोवा या प्रदेशांशी संबंधित होते.[७६] पण लष्करी कार्य तेवढ्यापुरतेच मर्यादित नव्हते. बहिर्जीचे लष्करी डावपेच आणि राजकीय मुत्सद्देगिरी त्यांच्या पोर्तुगीजांविषयी असणाऱ्या धोरणात स्पष्ट होते. दक्षिण कोकण आणि बेळगाव या भागातील मराठ्यांच्या पराक्रमामुळे मोगलांची बाजू घसरत चालली होती. या कामगिरीत सिहांचा वाटा बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांचा होता. पोर्तुगीजांचा पत्रव्यवहार पाहता ते मराठ्यांशी स्नेहसंबंध स्थापित करण्यासाठी उत्सुक झालेले दिसतात. १४ डिसेंबरचे पत्र व्हाईसरॉयने हिंदुराव घोरपडे यास लिहले आहे. त्यास पोर्तुगीज व्हाईसरॉय म्हणतो की, आपल्या पत्रात आपण काही विजय मिळविले आहेत अशी बातमी आहे. ती वाचून आम्हाला आनंद झाला,[७७] असे असले तरी पोर्तुगीजांना भिती वाटत होती. मराठे आपल्या इलाख्यातील किल्ले घेतील असे त्यांना वाटत असले तरी ते परिस्थितीप्रमाणे आपले धोरण बदलत असत.[७८]

राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांच्या संपूर्ण कारकिर्दीकडे पाहिल्यानंतर त्यांच्या काही गोष्टी फार आश्चर्यकारक वाटतात. त्यांनी राजाराम महाराजांना जिंजीपर्यंत पोहोचविल्या नंतर त्यांना महाराजांनी संपूर्ण राज्याच्या सरदेशमुखीचे वतन दिले होते. तेव्हा गिरजोजी यादवास दिलेल्या वचनानुसार बहिर्जीनी त्यास स्मरणपूर्वक आपल्या वतनापैकी निम्मे वतन दिले. मध्यंतरी आठ-दहा वर्षाचा काळ गेला असला तरी बहिर्जीनी दिलेला शब्द पाळला आणि कऱ्हाडच्या सुभ्यापैकी सरदेशमुखीचे वतन गिरजोजीला लिहून दिले.[७९] ज्या काळात वतनांसाठी निष्ठा, शब्द फिरविणारे सरदार अस्तित्वात होते त्याच काळात बहिर्जीसारखा शब्दाचा पक्का माणूसही अस्तित्वात होता ही मराठ्यांसाठी अभिमानाची गोष्ट होती बहिर्जीच्या काळात त्यांचे छत्रपतींशी वैमनस्य उत्पन्न झाल्यावरही ते शत्रूपक्षाला सामील झाले नाही आणि मराठ्यांच्या राज्यात दुही माजेल असे काम त्यांनी शेवटपर्यंत केले नाही.

---

७५. देसाई, स. शं., (अनु.), **पोर्तुगीज दप्तर, खंड तिसरा,** आवृत्ती-१९६८, पृ. १०७-८.
७६. कुलकर्णी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४०२.
७७. पगडी, सेतु माधवराव, (अनु., संपा.), **मोगल दरबारची बातमी पत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती - जाने. १९८३, पृ.४३.
७८. चौबळ, ज. स., (अनु.), **असे होते मोगल,** आवृत्ती-१९७४, पृ. ३५६.
७९. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड पहिला,** आवृत्ती-२०१२, पृ. ३७६.

राजे बहिर्जींनी आपली राजमुद्रा तयार केलेली होती. इ.स. १६८९ मध्ये दिलेल्या एका आज्ञापत्रावर त्यांची राजमुद्रा आहे.* बहिर्जींनी अनेक मठ, मंदीरांना इनामपत्रे दिलेली होती. यापैकी पाटगाव येथील मौनीबाबांच्या मठाला त्यांनी आपली वालेघोळ हा गाव इनाम दिला. २८ जून १७०८ रोजी बहिर्जी घोरपडेंचे निधन झाले.[८०] त्यांची संभाव्य समाधी गजेन्द्रगड (जिल्हा गदग, कर्नाटक) येथे आहे.[८१]

बहिर्जीच्या विनंतीवरुन करवीर छत्रपती शिवाजी दुसरे ह्यांनी तारागिरी महंत गोसावी ह्यांना मौजे सौदुंत्ती हे गाव इनाम द्यावे असे पत्र २० मे १७०८ रोजी दिले होते.[८२]

## ३.२ राजे सिध्दोजी हिंदुराव घोरपडे (इ.स. १७१३ ते इ.स. १७३१):

राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांना सयाजीराव, मुरारराव (पहिला) आणि सिध्दोजीराव अशी तीन मुले होती आणि सगुणाबाई ही त्यांची मुलगी होती. सयाजीरावांचा मृत्यू कमी वयातच झाला. मुरारराव (पहिला) याचा उल्लेख कागदपत्रांमध्ये आढळतो. मुरारराव आपल्या वडिलांसोबत स्वारीत काम करीत होते. बहिर्जी राजे संताजीच्या मृत्यूनंतर कर्नाटकात निघून गेले होते.[८३] पण राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर ताराबाईंच्या आवाहनावरुन ते पुन्हा औरंगजेबाविरुध्द चाललेल्या मराठा स्वातंत्र्य युध्दात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रात परतले. त्यावेळी मुरारराव हा देखील त्यांच्यासोबत असावा. मुरारराव वयाच्या २२ व्या वर्षी इ.स. १७०२ मध्ये शत्रुशी लढाई करत असतांना मृत्यूमूखी पडले. त्याच वर्षी मोगल सरदार हिम्मतखान याच्याशी झालेल्या झुंजीत संताजीचा मुलगा राणोजी ठार झाला.[८४] ही घटना घोरपडे कुटुंबातील सर्वांवरच आघात होता. त्यावेळी राजे बहिर्जी वडिलकीच्या नात्याने संताजी घोरपडे यांच्या परिवाराचा सांभाळ करीत होते.

बहिर्जीच्या मृत्यूनंतर त्यांचा लहान मुलगा सिध्दोजी याने आपल्या घराण्याची पराक्रमी परंपरा राखली. बहिर्जी हिंदुराव यांनी गुत्तीचा किल्ला जिंकुन हिंदुराव घोरपडे घराण्याचा स्वतंत्र सत्तेचा पाया घातला होता, सिध्दोजीरावांनी स्वत:च्या कर्तूत्वाने दक्षिणेतील एक मराठ्यांच्या सत्तेला बळकटी प्राप्त करुन दिली. ज्यावेळी बहिर्जी कर्नाटकातून महाराष्ट्रात स्वराज्य संरक्षणासाठी दाखल

---

८०. मगदूम, दामोधर, **स्वराज्याचे शूर सेनानी**, आवृत्ती-फेब्रु. २०१४, पृ. १७३.
८१. भोसले, प्रवीण, व., **मराठ्यांचे धारातीर्थ**, आवृत्ती-ऑक्टो. २०१२, पृ. ८१.
८२. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड पहिला**, आवृत्ती-२०१२, पृ. २७२.
८३. France, W., **Madras District Gazetteers**, Edition-1904, Pg. 310.
८४. गर्गे, स.मा., श.ह. वर्टिकर, (संपा.),कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, आवृत्ती-नोव्हें.१९७४,पृ.९६.
* परिशिष्ट क्र. १४.

झाले. त्याचवेळी सिध्दोजी त्यांच्या सोबत होते. वेगवेगळ्या लढ्यांमध्ये सहभागी देखील होते. अहमदनगरच्या मुक्कामी असतांना औरंगजेब २० फेब्रु. १७०७ रोजी मरण पावला. लगेच त्याच्या आजमशहा या पुत्राने आपण बादशहा झाल्याचे जाहीर केले.[८५] तेव्हा माळव्याजवळ असतांना त्याने आपले प्रमुख शत्रू असणाऱ्या मराठी राज्यात भेद-नीतीचा प्रादुर्भाव करण्याच्या हेतूने कैदेत असलेल्या संभाजी पुत्र शाहूची सुटका केली.[८६] शाहूने कैदेतून सुटल्याबरोबर मराठी सरदारांना पत्रे लिहून आपल्या सेवेत रुजू होण्याचे आवाहन करु लागला. अहमदनगरला पोहचल्यानंतर शाहूमहाराजांनी ताराबाईंशी राज्याच्या वाटाघाटी सुरु केल्या पण राज्याच्या अधिकारासंबंधीची ताराबाईंची भूमिका निश्चित झालेली होती. मराठ्यांच्या राज्यावर शाहूमहाराजांचा काहीच हक्क नाही असे ताराबाई आग्रहाने प्रतिपादन करीत असत.

शाहू महाराजांच्या आवाहनाला महाराष्ट्रातील अनेक सरदारांनी आणि सेनानींनी चांगलाच प्रतिसाद दिला. परसोजी भोसले, कान्होजी भोसले, मानसिंग मोरे, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर आदी मराठे सरदार प्रारंभीच्या काळात शाहूच्या सेवेत रुजू झाले. अशावेळी शाहूचा पाडाव करण्यासाठी ताराबाईनेही जय्यत तयारी सुरु केली. धनाजी जाधवासारख्या पराक्रमी सेनानी तिच्यासोबत असल्याने काळजीचे काही कारण नव्हते. शाहू महाराजांनी नगर सोडून आपला मुक्काम 'खेड' वर केला. महाराणी ताराबाई सोबत १२ ऑक्टोंबर १७०७ रोजी धनत्रयोदशीच्या दिवशी शाहूंची लढाई झाली.[८७] लढाईच्या ऐन रणधुमाळीत धनाजी जाधव शाहूंच्या पक्षास जाऊन मिळाला. पंतप्रतिनिधी (परशुराम त्र्यंबक) ताराबाईंशी एकनिष्ठ राहिला, परंतु त्याचा निभाव लागला नाही. या युध्दात ताराबाईचा पराभव झाला, पण तिने हार मानली नाही. खेडच्या लढाईनंतर शाहू महाराजांच्या फौजांनी सातारा जिंकले आणि तेथेच राजधानी स्थापन करुन स्वत:ला १२ जाने. १७०८ रोजी राज्यभिषेक करुन घेतले.[८८] शाहू आणि ताराबाई यांच्या संघर्षात वाडीकर खेमसावंत, कान्होजी आंग्रे, सिध्दोजी घोरपडे यांनी ताराबाईचा पक्ष घेतला.[८९]

---

८५. पवार, ज. भा., **मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त**, आवृत्ती - १९८६, पृ. २२.
८६. कुलकर्णी, अ.रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड दुसरा**, आवृत्ती-१९८५, पृ. १२८.
८७. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा**, आवृत्ती-२०१२, पृ. ४६.
८८. पवार ज. भा., **पूर्वोक्त**, पृ. २५.
८९. कुलकर्णी, अ.रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा**, आवृत्ती-१९८६, पृ. ४१६.

खेडच्या लढाईत झालेल्या पराभवानंतरही महाराणी ताराबाई आपला पक्षच खरा असल्याचा दावा करीत होत्या. दुसरीकडे शाहू महाराजांना मराठा सरदारांचा पाठींबा मोठ्या प्रमाणात मिळू लागला. ताराबाई मात्र शाहूंनी मोगलांकडून सनदा मिळवून केवळ दक्षिणेची सुभेदारी पत्करली त्यामुळे त्यांना मराठ्यांचे केवळ दक्षिणेची सुभेदारी पत्करली त्यामुळे त्यांना मराठ्यांचे छत्रपतीपद मिळण्याचा अधिकारचं उरत नाही ही भूमिका मांडू लागल्या.[९०] ताराबाईंनी इ.स. १७१० मध्ये कोल्हापूर आणि त्या भोवतालच्या प्रदेशात येऊन पन्हाळा येथे छत्रपतींची गादी स्थापन केली व पन्हाळा ही राजधानी बनविली. अशावेळी घोरपडे घराण्याची पूर्ण निष्ठा महाराणी ताराबाईंकडेच होती. त्यावेळी घोरपडे घराण्याच्या तिन्ही शाखांत वयाने आणि कर्तृत्वाने सिध्दोजीराव सर्वात मोठे होते.[९१] पिराजी घोरपडेंच्या कुटूंबाचे पालकत्वही त्यांच्याकडेच होते. त्यामुळे ताराबाईंनी आपल्या राज्याचे सेनापती पद इ.स. १७१० मध्येच सिध्दोजीरावांना दिले.

ताराबाईंच्या बाजूला सिध्दोजीरावांबरोबरच अमात्य, प्रतिनिधी, सचिव, आंग्रे, थोरात यासारखे मोठमोठे सरदार होते. पण त्यांचाही व्हावा तेवढा त्यावेळी तरी उपयोग झाला नाही. परशुरामपंत प्रतिनिधी शाहू महाराजांच्या कैदेत होते. पंतसचिवांनी इ.स. १७११ मध्ये जलसमाधी घेतली होती. कान्होजी आंग्रे नंतर दोन वर्षानी म्हणजे इ.स. १७१३ मध्ये शाहू महाराजास सामील झाले. अशा परिस्थितीतही रामचंद्रपंत अमात्य, हिम्मतबहाद्दर चव्हाण आणि सिध्दोजीराव घोरपडे यांनी ताराबाईंचा पक्ष सोडला नाही. राजे सिध्दोजीराव हिंदुराव घोरपडे ताराबाईंच्या विश्वासातील होते. शाहू महाराजांनी त्यांना आपल्याकडे वळवण्याचा खूप प्रयत्न केला परंतु सिध्दोजीरावांनी त्याकडे लक्ष दिले नाही. इ.स. १७१० ते इ.स.१७१३ याकाळात सिध्दोजी राजांनी करवीर राज्यासाठी कठोर परिश्रम घेतले.

शाहू महाराजांच्या दरबारात याच दरम्यान इ.स. १७११ मध्ये बाळाजी विश्वनाथ व सेनापती चंद्रसेन जाधव यांच्यात खटके उडू लागले. एका प्रकरणात शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथाची बाजू घेतली. चंद्रसेन जाधव हा आपल्या वडिलांप्रमाणे शूर व धाडसी होता. त्याला हा अन्याय सहन न झाल्याने तो इ.स. १७११ मध्येच शाहू महाराजांचा पक्ष सोडून रहिमतपुरावरुन पन्हाळ्यास गेला

---

९०. कुलकर्णी, अ.रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड दुसरा,** आवृत्ती-१९८५, पृ. १४७.
९१. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती - ऑगस्ट १९८३, पृ. ९४.

आणि उघडपणे ताराबाईच्या पक्षात सामील झाला.[९२] त्यावेळी ताराबाईंनी सिध्दोजीरावांविषयी विशेष आस्था न दाखवता चंद्रसेन जाधवास स्वराज्याचे सेनापती पद दिले. त्यामुळे दुखावलेल्या सिध्दोजीरावांनी इ.स. १७१३ मध्ये कोल्हापूर सोडले व गजेन्द्रगडच्या परिसरातील आपल्या मूळ जहागिरीत निघून गेले, तेथेच त्यांनी आपली सत्ता वाढविली.

### ३.२.१ सोंडूर राज्याची स्थापना (इ.स. १७१४) :

इ.स. १७११ ते इ.स. १७१३ तीन वर्षे सातारा आणि कोल्हापूर या दोन्ही छत्रपती घराण्यासाठी अत्यंत अटीतटीची गेली.[९३] सिध्दोजीरावांना चंद्रसेन जाधवाला सेनापती पद मिळणे ही गोष्ट अजिबात आवडलेली नव्हती, कोल्हापूरातील इतरही सरदारांना ही गोष्ट आवडलेली नव्हती. त्यामुळेच कदाचित सिध्दोजीराव कोल्हापूरातून बाहेर पडले. तसेच कोल्हापूरात राजसबाई आणि ताराबाई यांच्या गटांमध्ये नेहमीच संघर्षाचे वातावरण असे अशा घालमेलीच्या परिस्थितीत राहण्यापेक्षा तेथून तातडीने निघून जाणेच सिध्दोजीरावांना सुरक्षित वाटले. ते आपल्या कुटूंबियांसह दक्षिणेकडील आपल्या गजेन्द्रगडच्या जहागिरीत निघून गेले.[९४] सिध्दोजीराव कर्नाटकात गेले त्यावेळी तेथील संपूर्ण राज्यात एकप्रकारची राजकीय अस्थिरताच होती. या अस्थिरतेचा फायदा सिध्दोजीराव सारख्या शुर पराक्रमी सरदाराने घेतला नसता तर नवलच होते.

सिध्दोजीरावांना बाहेरच्या कोणत्याही सत्तेचा पाठिंबा नव्हता. शाहु महाराजांची साताऱ्यातील घडी नीट बसलेली नसल्यामुळे त्यांचा अजूनही कर्नाटकात प्रवेश झालेला नव्हता. संभाजी राजे नुकतेच (इ.स. १७१४) कोल्हापूरच्या गादीवर बसले होते. तंजावरची सत्ता दुर्बल होती. कर्नाटकात त्यावेळी मोगल सरदार म्हणून नियुक्त असलेल्या नवाबांची सत्ता होती. सावनूर, कडप्पा, सिरा, कर्नूल व अर्काट या पाच ठिकाणी नवाबांचे राज्य होते. उत्तरेकडील मोगल सत्ता खिळखिळी असल्यामुळे ते पाचही नवाब आपापल्या प्रदेशात स्वतंत्र बादशहाप्रमाणे वागत तसेच म्हैसूरचा राजा दोड्ड कृष्णराज हा दुबळा असल्यामुळे त्याची सत्ता फार छोट्या प्रदेशावर होती. गुत्तीवर सिध्दोजीरावांची सत्ता स्थापन होती. कारण हा प्रदेश इ.स. १६९७ मध्येच बहिर्जीने जिंकून घेतला होता आणि त्याच

---

९२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. ७७.
९३. कुलकर्णी, अ.रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड दुसरा,** आवृत्ती-१९८५, पृ. १६५.
९४. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. १०५.

ठिकाणी असलेला गुत्तीचा किल्ला आपल्या राज्याचे व लष्करी छावणीचे मुख्य ठिकाण बनविले होते.[९५]

कर्नाटकातील अशा परिस्थितीत त्या प्रदेशातील सत्ता अनेक स्थानिक छोट्या मोठ्या पाळेगारांच्या हाती होती. त्यावेळी जर्मलीचा पाळेगार[९६] हा एक महत्वाचा सत्ताधिश होता. थोडबहूत प्रदेश प्रत्यक्ष कब्जात असलेल्या फौजबंद छोट्या संस्थानिकांना पाळेगार असे म्हणत. जर्मली हे ठिकाण सद्याच्या बेल्लरी जिल्ह्यातील कुडलिगी तालुक्यात आहे. या जर्मलीच्या पाळेगाराच्या ताब्यात सोंडूरचा प्रदेश इ.स. १७०० पासून होता.[९७] सिध्दोजीरावांनी इ.स. १७१४ च्या सुमारास पाळेगाराची सत्ता स्वत:च्या बळावर उलथून पाडली. सोंडूर आपल्या गुत्तीच्या राज्यात सामील करुन गुत्तीचे राज्य वाढविले. तेव्हापासून सिध्दोजीराव कर्नाटकातील एक महत्वाचे प्रस्थ बनले. त्यामुळेच त्यांना सोंडूर राज्याचे संस्थापक मानणे आवश्यक आहे.

### ३.२.२ राजे सिध्दोजी हिंदुराव घोरपडे व करवीर छत्रपती संबंध :

सिध्दोजीराव कर्नाटकात निघून गेल्यानंतर इ.स. १७१४ मधील ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात कोल्हापूरात राजकीय सत्तांतर घडून आले. ताराबाईंनी चंद्रसेन जाधव यासारख्या शाहूकडून फुटून आलेल्या सेनानीवर अधिक विश्वास ठेवला व त्यास करवीरचा सेनापती बनविले. त्यामुळे रामचंद्रपंत, गिरजोजी यादव यांच्यासारख्या ताराबाईंच्या पक्षातील जुन्या मुत्सद्यांमध्ये मत्सर निर्माण झाला.[९८] रामंद्रपत, गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल, शिवाजी शितोळे यांनी ऑगस्ट-सप्टेंबर च्या सुमारास राजकीय सत्तांतर घडवून आणले आणि ताराबाईंच्या हातातली सत्ता गेली.[९९] ताराबाई आणि पुत्र शिवाजी यांना कैद करुन पन्हाळावर कैदेत ठेवले गेले तर ताराबाईची सवत राजसबाई आणि तिचा पुत्र संभाजी यांच्या हाती सत्तेची सूत्रे देण्यात आली. या कटामागे छत्रपती शाहू आणि त्याचा पेशवा बाळाजी विश्वनाथ या दोघांचा हात होता. त्यांनी रामचंद्रपंत अमात्य यांना फितवून राजारामचा दुसरा पुत्र संभाजी यास कोल्हापूरच्या गादीवर आणले.[१००]

---

९५. गर्गे, स. मा., (संपा.), **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. ७३.
९६. कुलकर्णी, अ.रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला,** आवृत्ती-१९८४, पृ. ४५६.
९७. France, W., **Madras District Gazetteers,** Edition-1904, Pg. 310.
९८. पवार, ज. भा., **मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त,** आवृत्ती - १९८८, पृ. २९.
९९. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. ७९.
१००. देसाई, स. शं., (संपा.), **पोर्तुगीज मराठा संबंध,** आवृत्ती- १९८९, पृ. ११२.

या घटनेशी सिध्दोजीरावांचा दुरान्वयानेही संबंध दिसत नाही, कारण त्यावेळी ते कर्नाटकातील आपल्या जहागिरीतच होते. सिध्दोजीच्या संदर्भात म्हैसूरचा इतिहासकार विल्कच्या म्हणण्याप्रमाणे सिध्दोजीराव इ.स. १७१४ मध्ये कर्नाटकातच होते.[१०१] कर्नाटकात पक्के पाय रोवल्यानंतर राजे सिध्दोजी कोल्हापूर आणि सातारा या दोन्ही दरबारात आपले संधान बाधण्याचा प्रयत्न करु लागले. त्या काळातील पत्रव्यहार व सनदांमध्ये ही गोष्ट स्पष्ट होते. कोल्हापूरातील सत्तांतरानंतरही राजे सिध्दोजीराव व राजे संभाजी करवीर यांचे संबंध जिव्हाळ्याचे व सलोख्याचेच होते. राजे सिध्दोजीरावांशी संभाजीराजां-प्रमाणेच सातारचे शाहू महाराज यांनीही निरनिराळ्या निमित्ताने पत्रे पाठवण्याचा उपक्रम चालू ठेवला होता. शाहू दप्तरात यासंबंधी नोंद सापडते. असे असतांनाही शाहू महाराजांच्या दृष्टीने ह्या पत्रव्यवहाराचा विशेष उपयोग झाला नसावा. कारण सिध्दोजीराव सातारला न जाता कोल्हापूरला ३१ ऑगस्ट १७१६ रोजी गेले होते.[१०२]

राजे सिध्दोजीराव आणि संभाजी महाराज यांचे संबंध जिव्हाळ्याचे आणि सलोख्याचे होते हे करवीर निवासिनीच्या प्रसंगावरुन पुन्हा एकदा स्पष्ट झाले. म्हणूनच संभाजीराजे यांनी सिध्दोजीरावांना करवीर निवासिनी महालक्ष्मीची पुन:स्थापना करण्यासाठी पाचारण केले. श्री करवीर क्षेत्र हे महालक्ष्मीचे अनादि वास्तव्य स्थान आहे. परंतु मुसलमानी अमदानीत धामधुमीच्या काळात मंदिर भ्रष्ट होऊ नये, मूर्तीची मोडतोड होऊ नये म्हणून पूर्वीचे देवालय सोडून देवीची मूर्ती एका पुजाऱ्याच्या घरी ठेवली होती. अशावेळी देवीने त्या पुजाऱ्याच्या स्वप्नात येऊन साक्षात्कार दिला आणि महालक्ष्मीची पुन:स्थापना मूळ ठिकाणी मंदिरात करावी अशी इच्छा व्यक्त केली. पुजाऱ्याने ही गोष्ट संभाजी महाराजांना सांगितली. तेव्हा मूर्तीची स्थापना देवालयात करण्याविषयी छत्रपती संभाजी यांनी सिध्दोजी हिंदुराव घोरपडे यांना आज्ञा केली. आज्ञेप्रमाणे त्यांनी दि. २७ मार्च १७१५ या दिवशी महालक्ष्मीची स्थापना पूर्वस्थळी देवालयात केली.[१०३] ही घटना कोल्हापूरच्या तसेच हिंदुराव घोरपडे (सोंडूरकर) यांच्या घराण्याच्या इतिहासात महत्वाची आणि अभिमानास्पद आहे.

१०१. गर्गे, स. मा., (संपा.), **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. ९९.
१०२. **कित्ता,** पृ. १०२.
१०३. गर्गे, स. मा., करवीर रियासत, आवृत्ती- ऑक्टों. २००२, पृ. २६४.

राजश्री सिध्दोजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार ह्यांनी महालक्ष्मीची स्थापना करुन श्रीच्या पूजेचे प्रधानपद वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री सीवराम भट यांचे पुत्र नरहरीभट सावगावकर यांना बहाल केले तसेच पुजाअर्चेच्या खर्चासाठी कसबा सावगावची चौथाई त्यास नेमून दिली अशा आशयाचे पत्र सावगावकरांना पाठविले. (दि. १०-१२-१७१९)[१०४] आणि संबंधीत अधिकाऱ्यांना कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या पूजाअर्चेसाठी दिलेल्या इनामाला कोणीहि उपसर्ग देऊ नये असे सक्तीचे आदेश सिध्दोजीरावांनी दिलेले दिसतात.

कोल्हापूरचे छत्रपती संभाजीराजांची सिध्दोजींवर विशेष मर्जी असावी त्यामुळेच त्यांनी सिध्दोजीरावांना विविध वतने आपल्या कारकिर्दीत दिलेले दिसतात. संभाजीराजांनी १७-१-१७१६ रोजी दिलेल्या वतनपत्राद्वारे सिध्दोजी हिंदुराव घोरपडे ह्यांना चिकोडीचे नाडगोंडकीचे वतन वंशपरंपरागत दिले.[१०५] इ.स. १७२७ मध्ये संभाजीराजांनी सिध्दोजीरावास प्रांत वऱ्हाडमधील गावांची सरदेशमुखी दिली. त्यावेळी नाशिक आणि नगर जिल्ह्यातील काही गावांच्या सरदेशमुखीचे वतनही त्यांच्या नावे करण्यात आले. वऱ्हाडमधील वाशिम, मेहकर, माहूर इत्यादी गावांचा उल्लेख आढळतो. तर नाशिक, नगरकडील त्र्यंबकेश्वर, संगमनेर, पुणतांबे, दिंडोरी, सिन्नर, राहते, चांदवड इत्यादी गावांचा वतनाच्या सनदेत उल्लेख केलेला आहे.[१०६] अशाच आणखी सदतीस गावांच्या सनदा छत्रपती संभाजी यांनी सिध्दोजी घोरपडे यांचे नावे करुन दिल्या. (९-७-१७३१)[१०७] पुढेही या दोघांमधील संबंध चांगले व स्नेहाचे राहिलेले दिसून येतात. संभाजी राजांनी सिध्दोजीस नेहमीच मदत केलेली दिसते. कोल्हापूरच्या किल्ल्याचा आश्रय घेणाऱ्या दंगेखोर उदोजी काटकराचा पराभव केल्या नंतर सिध्दोजीस शत्रूचे किल्ले जिंकण्यासाठी कुमक पाठवावी अशा आशयाचे पत्र संभाजीराजांनी दिलेरखानास पाठविलेले होते.[१०८]

सिध्दोजींनी देखील छत्रपतींच्या चरणी आपली निष्ठा वाहिलेली दिसते. त्यांनी संभाजी राजांना लिहिलेल्या पत्रात ते स्पष्टच होते, "चित्रदुर्गच्या पाळेगाराने आपल्या बापाचे वचन मोडले

---

१०४. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड पहिला,** आवृत्ती -२०१२, पृ. ५४०.

१०५. **कित्ता,** पृ. ४५२.

१०६. गर्गे, स. मा., (संपा.), **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. १०४.

१०७. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती -२०१२, पृ. ११२.

१०८. Pawar, Appasaheb, (Edi.), **Tarabai Papers A Collection of Persion Letters,** Edi.-Apr.1971, Pg. 167.

आहे. त्याला अब्दुलनबी व इतर अफगाणाची मदत होत असून गेल्या चार वर्षापासून तो आमच्या विरुध्द कारवाया करीत आहे. ताहिरखान हरिहरमार्गे चित्रदुर्गला निघाला. त्याच्या सैन्यात सात हजार घोडदळ व सहा हजार पायदळ आहे. बिदरुरच्या पाळेगाराचा सरदार लकप्पा हा देशमुखासह आम्हाला विरोध करण्यास आला. परंतु आम्ही त्याचा पराभव करुन चित्रदुर्गच्या किल्ल्यापर्यंत धडक मारली आम्ही त्याला शरण येण्यास सांगितले, परंतु आमची आज्ञा धुडकाऊन तो लढावयास आला. त्याच्या सैन्याचा पराभव होऊन त्याचा सेनापती आम्हास शरण आला. आम्ही त्याचे हत्ती व घोड परत केले. त्यांनी आम्हास दोन लक्ष रुपये व पंचावन्न हजार होन पेषकश दाखल दिले. ही रक्कम आपणाकडे पाठविण्यात येत आहे. मी आपणाकडे काही वस्तु व चाळीस हत्ती पाठवित आहे."[१०९]

सातारच्या शाहू महाराजांनाही सिध्दोजीरावांविषयी अगत्य वाटत होते. त्यांच्या सारख्या फौजबंद सामर्थ्यशाली सेनानी आपल्या बाजूस असावा अशी त्यांची मनापासून इच्छा असावी. या साठीच त्यांनी इ.स. १७२९ मध्ये सिध्दोजी राजांसोबत पत्रव्यवहार केल्याचे दिसते.[११०] सिध्दोजींनी संभाजी राजांच्या बाजूने लष्करी हालचाली करु नये अशा आशयाची पत्रे इ.स. १७२९ च्या वर्षात शाहू राजांनी पाठविली होती. यावरुन शाहू महाराज आणि सिध्दोजी यांचे संबंध निकटचे होते असे दिसते. दोन्ही छत्रपती घराणी सिध्दोजीरावांना आपापल्या पक्षात सामील करुन घेण्यासाठी प्रयत्न करीत होते.[१११] छत्रपती संभाजींनी सिध्दोजी घोरपडे यास पत्र देऊन संताजी घोरपडेंची पत्नी सोयराबाई हिला मौजे भगावती हा गाव इनाम म्हणून व कसबे सदलगे मोकासा म्हणून दिल्याचे उल्लेख केला.[११२] यावरुन हे लक्षात येते की पिराजी कापशीकर घोरपडेंच्या मृत्यूनंतर त्यांच्या कापशीकर कुटूंबियांचे पालकत्व सिध्दोजी रावांनी उचललेले दिसते.

संभाजी व शाहू दोन्ही छत्रपतींच्या संबंधात चढ उतार दिसून येतात. शाहूंनी संभाजीच्या पराभवाकरीता फौजा तयार केल्या. त्याचवेळी बाजीराव पेशव्याने पालखेडच्या लढाईत निजामाचा पराभव केल्यामुळे संभाजीराजांची अवस्था अत्यंत वाईट झाली. इ.स. १७३० मध्ये इतिहास प्रसिध्द वारणेची लढाईत सिध्दोजीराजे कोणाच्या बाजूने होते हे मात्र स्पष्ट होत नाही. या लढाईपासून

---

१०९. Pawar, Appasaheb, (Edi.), **Tarabai Papers A Collection of Persion Letters,** Edi.-Apr.1971, Pg. 178.

११०. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. २०९.

१११. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४१६.

११२. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- नोव्हें. १९७४, पृ. २८.

सिध्दोजीराव तटस्थ असण्याचीच जास्त शक्यता दिसते, कारण कागदपत्रांमध्ये सिध्दोजीरावांचा उल्लेख आढळत नाही. परंतु या लढाईनंतर झालेल्या तहानुसार वारणेपासून तुंगभद्रेपर्यंतचा अर्धा प्रदेश आणि कोप्पलचा किल्ला संभाजी राजांना देण्यात आला. त्यावेळी कोप्पलचा किल्ला सिध्दोजीराजांच्या ताब्यात असल्यामुळे तो त्यांनी संभाजीराजांस द्यावा, असे पत्र शाहुराजांनी सिध्दोजीराव हिंदुराव घोरपडेंना पाठविले होते.[११३]

सिध्दोजीरावांनी कर्नाटकातील आपली सत्ता बळकट करण्यात आपली शक्ती मोठ्या प्रमाणात खर्च केली. दोन्ही छत्रपतींना सिध्दोंजीरावांनी आपल्या पक्षात असावे असे वाटणे म्हणजेच सिध्दोजींनी कर्नाटकात आपले स्थान बळकट केले होते याचाच पुरावा आहे. तेथे त्यांच्या सत्तेला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळालेला होता. अशावेळी छत्रपतींच्या दरबारात एखादे पद मिळावे असे वाटणे शक्य नव्हते. त्यामुळेच त्यांनी आपले पूर्ण लक्ष कर्नाटकाकडे वळविले.

### ३.२.३ राजे सिध्दोजी हिंदुराव घोरपडे यांची कामगिरी:

सिध्दोजीरावांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत स्वत:चा एक स्वतंत्र असा दरारा निर्माण केलेला होता. खऱ्या अर्थाने दक्षिणेत मराठ्यांचा वचक निर्माण करुन छत्रपती घराण्यांशी सहयोगाची, सहचार्याची भावना त्यांनी अखेरपर्यंत जपली. इ.स. १७१३ मध्ये कोल्हापूरातून स्वत:च्या जहागिरीमध्ये जेव्हा ते आले त्यावेळी दक्षिण भारतातील राजकीय अस्थिरतेमुळे त्यांना स्वत:चे स्वतंत्र स्थान स्थापन करण्यास वेळ लागला नाही. तसेच ते एकव्यक्ती म्हणून अत्यंत प्रेमळ व मनमिळावू होते, असे त्यांच्या काळातील काही प्रसंगावरुन ते दिसते.

केदारी चव्हाण हा कागल प्रांतातील मौजे बोरीवडे येथे राहणारा एक इसम होता. त्या गावावर जगदेवराव निंबाळकर आणि मानाजी पवार यांनी अचानक हल्ला केला. त्यांचा प्रतिकार करीत असतांना केदारजीचा बाप आबाजी चव्हाण हा मारला गेला. त्याच्या मुला माणसांवर बिकट प्रसंग आला. आबाजी चव्हाण हा सिध्दोजीरावाचा एकनिष्ठ होता. ह्या घटनेची माहिती मिळताच

---

११३. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती -२०१२, पृ. १०१.

सुस्वभावी सिध्दोजीरावांनी एकनिष्ठ सेवकाचा मुलगा केदारीला बोरीवडे येथील जमीन इनाम दिली आणि त्याच्या परिवाराच्या उदरनिर्वाहाची सोय करुन दिली.[११४] यावरुन सिध्दोजीरावांचे त्यांच्या सेवकांविषयीचे प्रेम स्पष्ट होते. सिध्दोजींनी मडकसिऱ्याच्या किल्ल्यात मोठी दगडी बावडी बांधलेली होती, त्यामुळे किल्ल्यावर मुबलक पाणी पुरवठा होता. ती विहीर आजही हिंदुरावांची विहीर म्हणून ओळखली जाते.[११५] येथेच सिध्दोजीरावांचा अंतिम संस्कार करण्यात आला.

इ.स. १७१० ते इ.स. १७१३ या तीन वर्षात राजे सिध्दोजी हे करवीर राज्याचे सेनापती पदावर होते. परंतु चंद्रसेन जाधवास सेनापती बनविल्यानंतर इ.स. १७१३ च्या उत्तरार्धात सिध्दोजी कर्नाटकातील आपल्या जहागिरीत निघून गेले. त्यावेळी सिध्दोजींनी सौंद्याच्या राज्यावर आक्रमण करु असे सांगून दोन लक्ष धारवाडी रुपये मागितले. या संदर्भीत घटनेविषयी नागोजी नाईक नावाच्या इसमाने गोव्याच्या व्हाईसरॉयला २५ डिसेंबर १७१३ रोजी एक पत्र लिहीले त्यामध्ये, "येथील हकीकत अशी की, सिध्दोजीराव घोरपडे यांनी सांबराणी शहर लुटले, तेथून खंडणी घेतली आणि सोंदे शहराजवळ फौजेनिशी जाऊन छावणी उभारली. सौंद्याच्या राजाकडे दोन लक्ष धारवाडी रुपये मागितले. आणि त्यांनी दिले नाही तर सौंद्यावर हल्ला करतो असा राजाला निरोप पाठविला. सोंदे शहरातील लोक भयभीत झाले, शहर सोडून पळून जाऊ लागले. सौंद्याच्या राजाने आपला कबिला कौकीगड येथे पाठविला. राजाही घाबरला आहे. गोवेकरांनी आपल्याला मदत करावी अशी तो विनंती करीत आहे. सिध्दोजीरावांना तेथून घालवून देण्यासाठी राजा काही करु शकत नाही. सिध्दोजीला जवळपासचे आणखी काही नवाब व संस्थानिक मदतीसाठी बोलावत आहेत." (ता. २५ डिसेंबर १७१३)[११६] यावरुन सिध्दोजींनी सौंद्याच्या राजाला चांगलीच जरब बसवली असे दिसते, यानंतर सिध्दोजीराव खऱ्या अर्थाने कर्नाटकात आपली सत्ता वाढविण्यासाठी प्रवेशित झाले.

सिध्दोजीरावांनी कर्नाटकात आल्यावर आपल्या जहागिरीचा म्हणजे गुत्तीच्या प्रदेशाचा विस्तार केला, स्वत:ची सत्ता बळकट केली आणि गजेंद्रगड व गुत्तीच्या परिसरात आपला चांगलाच जम बसविला. त्यावेळी म्हैसूरच्या गादीवर कंठीरावाच्या मृत्यूनंतर दोड्ड कृष्णराव हा राजा होता. त्याचा

---

११४. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ९८.
११५. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. ९२.
११६. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ९८.

प्रदेश लहान असला तरी उत्तर व पूर्व कर्नाटकाच्या तुलनेत अधिक सुपीक होता. त्यामुळे दक्षिणेत सत्तेवर असणाऱ्या नवाबांनी हा प्रदेश जिंकून घेण्याचे ठरविले. सिराचा नबाब सादुल्लाखानाने या कटात कडाप्पा व कर्नूलच्या नबाबांनाही सामिल करुन घेतले. सिध्दोजीरावांचे कर्नाटकातील वर्चस्व बघता त्यांना यापासून दूर ठेवणे शक्यच नव्हते. त्यामुळे या कटात त्यांनाही सामील करण्यात आले. म्हैसूरच्या राजास या संयुक्त सैन्यापूढे आपला निभाव लागणार नाही हे लक्षात येताच त्याने तडजोडीची भूमिका घेऊन, वाटाघाटी करण्यासाठी दूत पाठविले. म्हैसूरच्या राजाने संयुक्त मोहिमेतील प्रत्येकास बारा लाख रुपये देण्याचे कबूल केले. सिध्दोजीरावांनाही ठरल्याप्रमाणे बारा लाख रुपये प्राप्त झाले.[११७]

वरील या प्रसंगावरुन सिध्दोजीरावांच्या कर्नाटकातील प्रभावाची कल्पना येते. महाराष्ट्राच्या सीमेपासून दूर कर्नाटकात गुत्ती, सोंडूर आणि भोवतालचा प्रदेश त्यांनी आपल्या ताब्यात पक्क्या बंदोबस्ताने ठेवला. करवीर छत्रपती संभाजी आणि सातारा छत्रपती शाहू यांच्यामध्ये दुही उत्पन्न झाली नसती, तर सिध्दोजीरावांच्या कर्नाटकातील प्रयत्नास संपूर्ण मराठाशाहीचे पाठबळ मिळाले असते आणि कर्नाटक प्रांतात मुसलमानी सत्ता शिल्लक राहिली नसती. अशा या घोरपडे घराण्यातील पराक्रमी पुरुषाने सोंडूरकर सत्तेची स्थापना दक्षिण भारतात केली.

❖❖❖

११७. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. १०१.

# प्रकरण ४ थे

# राजे मुरारराव सोंडूरकर हिंदुराव घोरपडे

## [चिफ ऑफ गुत्ती]

# प्रकरण चवथे

# राजे मुराराव सोंडूरकर हिंदुराव घोरपडे

## [चिफ ऑफ गुत्ती]

सिध्दोजीरावांनी दक्षिणेत सोंडूरचा प्रदेश जिंकून घेऊन हिंदुराव घोरपडे घराण्याला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. सिध्दोजीरावांना चार बायका आणि चार मुले होती.[१] मुरारराव, दौलतराव, भुजंगराव, गोपालराव उर्फ सुभानराव अशी त्यांची नावे होती. भुजंगराव लहानपणीच मृत्युमूखी पडले, तर सुभानराव निपूत्रिक मरण पावले. त्यामुळे ज्येष्ठ पुत्र मुरारराव यांच्याकडे घराण्याचा वारसा परंपरेने चालत आला. राजे सिध्दोजीरावांनी कर्नाटकातील आपल्या पूर्वजांनी मिळविलेले राज्य तसेच मर्यादित न ठेवता त्यात इ.स. १७१४ मध्ये सोंडूर प्रदेश जिंकून घेऊन त्यात भर घातली. सोंडूरचा किल्ला पाळेगारांकडून जिंकून घेऊन त्यांना तेथून हुसकावून लावले. मुराररावांनी वडिलांनी निर्माण केलेल्या राज्याचा विस्तार केला. त्यामुळेच त्यांचा कालखंड (इ.स. १७३१ ते इ.स. १७७७ अंदाजे) सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्यासाठी उत्कर्षाचा कालखंड मानला जातो.

सिध्दोजीराजांच्या मृत्यूच्या तारखांविषयी कागदपत्रांमध्ये संभ्रम दिसतो. परंतु सिध्दोजीरावांचा तसेच सातारकर शाहू महाराजांच्या पत्रावरुन सिध्दोजीरावांचे निधन १४ नोव्हें. १७३० आणि २१ जानेवारी १७३१ या दरम्यानच्या काळात झाले असावे.[२] सिध्दोजी राजांच्या मृत्यूसमयी मुरारराव अंदाजे बत्तीस वर्षांचे होते. ते आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली अनेक लढाया लढले, इ.स. १७२६ व इ.स. १७२७ च्या दक्षिणेकडील दोन्ही स्वाऱ्यांमध्ये मुरारराव आपल्या वडीलांबरोबर हजर होते.[३] त्यांनी अठराव्या शतकात कर्नाटकातील प्रदेशात मराठ्यांचा दबदबा मोठ्या प्रमाणात वाढवला. या काळात गुत्ती हे राजे मुराररावांचे सत्तास्थान म्हणून प्रसिध्द पावले. आज गुत्ती हे ठिकाण आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यात असून कर्नाटकातील बेल्लारी जिल्ह्याला लागून आहे. गुत्ती हे नाव इतिहासपूर्व काळातील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशा खडकांना संबोधण्यासाठी वापरले जात असे, तेच नाव नंतर गुत्तीच्या अभेद्य किल्यास देण्यात आले.

---

१. France, W., **Madras District Gazetteers, Bellary,** Edi. 1904, Pg. 310.

२.गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. १०७.

३. गर्गे, स.मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. २७८.

कर्नाटकात मुरारराावांनी आपल्या वडीलांचे कार्यक्षेत्र, सत्ताक्षेत्र तर कायम ठेवलेच, पण पुढील काळात कर्नाटकातील कितीतरी मोठा मुलूख त्यांनी नव्याने मिळवला. त्याकाळी कर्नाटकाचा प्रदेश म्हणजे इंग्रज, फ्रेंच, निजाम, पेशवे, नबाब अशा अनेक सत्ताधिशांचे स्पर्धाकेंद्र बनला होता. पण त्यात पराक्रमाने व मुत्सद्देगिरीने मुरारराावांनी आपले महत्वाचे स्थान निर्माण केले. मुरारराावांनी लष्करी सामर्थ्य, लष्करातील शिस्त, सैनिकांना लष्करी शिक्षण या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले. मुरारराावांजवळ अत्यंत शिस्तबध्द आणि धाडसी घोडदळ होते, त्याचा समकालीन सत्तांना हेवा वाटत असे.[४] इंग्रज इतिहासकार हा आर्म्स मुरारराावांच्या लष्करी जाणीवेविषयी फार समर्पक लिहीतो, तो म्हणतो, "मुरारराव फार थोड्या काळात आपल्या शेजाऱ्यांच्या प्रशंसेचा आणि आदराचा विषय बनले होते. त्यांचे लष्करी साहस आणि पराक्रम केवळ त्यांच्या देशबांधवांनाच नव्हे तर इतरांनाही मान्य करावे लागत होते. ते आपल्या लष्करी अधिकाऱ्यांची ज्या पध्दतीने निवड करीत असत त्यावरुन त्यांची योग्यता लक्षात येते. त्यांच्या सैन्यातील शंभर घोडेस्वारांवरील प्रमुख देखील सर्व लष्कराचे प्रमुखत्व करु शकेल एवढ्या पात्रतेचा असे. प्रत्येकजण आपल्या पदासंबंधी समाधानी असे. ते सर्वजण एकमेकांशी सुसूत्रपणे वागत असत आणि सर्वजण आपल्या प्रमुखाच्या आज्ञेत संपूर्णपणे रहात असत. त्यांच्या सैन्यातील सर्व सैनिक हिंदुस्थानच्या इतर कोणत्याही देशी सैन्यातील सैनिकापेक्षा अधिक कार्यक्षम मानला जात असे. "[५]

कर्नाटक आणि दक्षिण भारत हा मुरारराावांच्या राजकीय प्रभावाचा आणि लष्करी कारवायांचा टापू होता. गुत्ती हे त्यांचे सत्ताकेंद्र होते. मुरारराावांच्या अमलाखाली धारवाड जिल्ह्यातील गजेन्द्रगडापासून ते रायचूर जिल्ह्यातील कोप्पलपर्यंतचा असा २५० किलोमीटर्सचा भूप्रदेश होता. तुंगभद्रानदीच्या दक्षिणेकडील भूप्रदेशावर तसेच दक्षिण आंध्रातील रायलसीमा जिल्ह्यांवर मुरारराावांची घट्ट पकड होती.[६] मुरारराावांचा सोंडूरसह गुत्तीचा प्रदेश, राज्य (Principality of State) म्हणून मान्यता पावू लागल्यामुळे ते स्वत: जहागिरदार या नात्याने आपली जहागीर असलेल्या गजेंन्द्रगडचा कारभार नीट पाहू शकत नव्हते. त्यामुळे मुरारराावांनी पेशव्यांच्या संमतीने गजेन्द्रगड जहागिरीचा कारभार आपले धाकटे बंधू दौलतराव यांच्याकडे सोपविला.[७]

४. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ९.
५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. ११०.
६. घोरपडे, मु. य., **पूर्वोक्त,** पृ. ९.
७. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ३३.

मुराररावांच्या व्यक्तिमत्वाबद्दल सुप्रसिध्द इतिहासकार जी. एस. श्रीनिवासचारी यांनी वर्णन केल्याप्रमाणे, 'उंच, भारदस्त व्यक्तिमत्वाचे आजानबाहू मुरारीराव दमदार चालीने लांब-लांब टांगा टाकत गुत्तीचा किल्ला चढून जायचे आणि तेथे गरुडासारखे एका उंच जागेवर बसायचे. त्यांच्या बसण्याच्या जागेला आजही 'मुरारीरावांचे आसन' असेच म्हणतात.* अवघड आणि आव्हानात्मक परिस्थितीत लढणे, अनावश्यक धोके टाकून, दुरदृष्टी ठेवून परिस्थितीचा अंदाज घेत लढणे ही एका चांगल्या नेत्यातील आवश्यक कौशल्ये मुराररावांच्या ठायी होती. मुख्य म्हणजे बेडरवृत्ती आणि स्वतंत्र बाणा त्यांच्या अंगी वडीलांप्रमाणेच रुजलेला होता. या गुणांमुळेच ते दक्षिणेतील एक शूर राज्यकर्ते म्हणून नावारुपास आले. आपल्या कारकिर्दीतील पहिली आठ वर्ष त्यांनी गुत्ती आणि भोवतालच्या परिसरात स्वत:ची सत्ता मजबूत करण्यात तसेच स्वत:चे खास घोडदळ विकसित करण्यात खर्ची घातली.

मुराररावांचे दक्षिणेतील प्रस्थ इतके वाढलेले होते की, इतर सर्व सत्तांना मुराररावांची गरज मोठ्या प्रमाणात भासू लागली. कोल्हापूरचे छत्रपती, सातारचे छत्रपती या दोघांसोबतही मुराररावांनी उत्तम संबंध ठेवलेले होते. पेशव्यांना तर कर्नाटकातील मोहिमेकरिता मुराररावांच्या मदतीची नेहमीच गरज भासत असे. मुराररावांच्या कार्यकाळात बाजीराव पेशवे थोरले (१७ एप्रिल १७२०), बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे (२५ जून १७४० ते १३ जून १७६१) आणि माधवराव पेशवे (थोरले) (२० जुलै १७६१ ते १८ नोव्हेंबर १७७२) ह्या पेशव्यांशी त्यांचे संबंध आले.[८] त्यांच्या बरोबरच्या संबंधात काहीवेळा चढउतार आलेले दिसतात. माधवरावांच्या काळात पेशव्यांनी मुराररावांशी मैत्रीचे संबंध जोडले कारण त्यांच्या शिवाय कर्नाटकात यश मिळणार नाही याची पेशव्यांना खात्री होती.

माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे दक्षिणेतील धोरण पुन्हा डळमळीत झाले.[९] दक्षिणेतील हैदर, निजाम, फ्रेंच, इंग्रज, नबाब अशा विविध सत्तांशी मुराररावांना एकट्यानेच संघर्ष घ्यावा लागला. अठराव्या शतकात दक्षिणेतील मराठी सत्तेचा कणा मुराररावांना म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. उत्तर पेशवाईत मुराररावांनी मोठा पराक्रम केला. दिल्लीच्या नादी न लागता दक्षिणेत

८. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.२१.
९. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती - एप्रिल २०११, पृ. ५८.
* परिशिष्ट क्र.१८.

मुराररावांसारख्या सरदाराचा पेशव्यांनी पाठपुरावा केला असता तर मराठ्यांचे राज्य कदाचित छोटेच पण भक्कम पायावर उभारले गेले असते.[१०]

### ४.१ राजे मुरारराव व छत्रपती संबंध :

राजे सिध्दोजीरावांच्या निधनांतर सोंडूरच्या प्रदेशासह गुत्ती राज्याची जबाबदारी मुराररावांवर आली ती त्यांनी आपल्या पराक्रमाने यशस्वीपणे पार पाडली. आजही गुत्ती गावच्या रहिवाशांना त्यांच्या गुत्तीच्या किल्ल्याचा आणि या किल्ल्यास ऐतिहासिक महत्व प्राप्त करुन देण्याऱ्या मुराररावांचा अभिमान आहे.[११] सिध्दोजींच्या मृत्यूनंतर लगेचच छत्रपती शाहू महाराजांनी राजे मुराररावांना आपल्या भेटीसाठी बोलावले. २७ फेब्रुवारी १७३१ रोजी वारणेच्या तहाच्या वेळी छत्रपती शाहू व छत्रपती संभाजी यांची भेट झाली. उंब्रज येथे शाहू महाराजांची छावणी पडलेली होती. तेथेच महाराजांनी राजे मुराररावांना सनद दिली. हिंदुराव किताब पूर्ववत चालू असल्याचे कळविले तसेच त्यापाठोपाठ बहिर्जी हिंदुरावांचे पंचगंगा ते रामेश्वर यासर्व प्रदेशाच्या सरदेशमुखीचे वतनाची सनदही मुराररावांना देण्यात आली. तसे मुरारराव आपल्या वडीलांच्या हयातीत इ.स. १७३० मध्ये साताऱ्यास शाहू महाराजांना भेटले होते. शाहू महाराजांनी त्यांचा गौरवही केला होता.[१२]

मराठ्यांच्या कोल्हापूर आणि सातारा या दोन गाद्यांमध्ये ज्या काही कुरबुरी आणि कटकारस्थाने चालायची त्यात पडण्यापेक्षा आपली ताकद वाढवण्यातच मुराररावांना अधिक रस होता. छत्रपतींच्या दोन्ही सत्तांमुळे दक्षिणेतील भूप्रदेशावर मराठ्यांची पकड फारशी घट्ट नव्हतीच. ती पकड मजबूत करण्यासाठी मुराररावांच्या मदतीची गरज नेहमीच छत्रपतींना भासत असे. साताऱ्यातील राज्यकारभार जर काही ठोस पावले उचलण्यास आणि पुढाकार घेऊन एखादी सांघिक कृती करण्यास अनुकूल असता, तर मुराररावांच्या रणनीतीचा, त्यांच्या अनुभवांचा आणि स्थानिक परिस्थितीचा उपयोग करुन घेऊन संपूर्ण दक्षिणेत मराठ्यांची सत्ता बळकट करणे शक्य आहे,[१३] हे छत्रपतींना पक्के माहित होते.

---

१०. आपटे, द. वि., रा. वा. ओतूरकर, (संपा.), **साधन परिचय अर्थात महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास,** आवृत्ती. १९४१, पृ. १७६.
११. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती - एप्रिल २०११, पृ. ५.
१२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृती- २०१२, पृ.२७८.
१३. घोरपडे, मु. य., **पूर्वोक्त,** पृ. ५९.

इ.स. १७४० च्या मध्यात घडलेल्या त्रिचनापल्लीच्या घटनेवरुन मुराररावांचे दक्षिणेतील स्थान पक्के झाले. कर्नाटकात दोस्त अली हा अर्काटचा नबाब होता. त्याच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन त्याचा जावई असलेल्या हुसैन दोस्तखान उर्फ चंदासाहेब याने कुठलीही तमा न बाळगता त्रिचनापल्लीच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करायला सुरुवात केली.[१४] त्रिचनापल्ली येथील किल्ल्याची सूत्रे चोक्कनाथ नावाच्या मदुराई संस्थानच्या हिंदु राजाकडे होती. इ.स. १७३१ मध्ये त्याचा मृत्यू झाल्याने त्याची पत्नी राणी मिनाक्षी हीने किल्ल्याची सूत्रे हातात घेतली. चंदासाहेबाने कपटाने तो किल्ला राणीच्या हातून काढून घेतला. चंदासाहेबाच्या ह्या वचनभंगाने राणीचा मृत्यू झाला. चंदासाहेबाने त्रिचनापल्लीचा किल्ला व त्या सभोवतालच्या प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि स्वत:स त्रिचनापल्लीचा नबाब घोषित केले. ही गोष्ट दोस्तअलीच्या लक्षात येताच त्याने चंदासाहेबांविरुध्द लष्करी हालचालीस सुरुवात केली.

कर्नाटकातील या सर्व परिस्थितीवर छत्रपती शाहू महाराज आणि बाजीराव पेशवे हे लक्ष ठेवून होते. तेथील या अनागोंदीच्या स्थितीत तेथील स्थानिक राज्यकर्त्यांनी मराठ्यांना आवाहन करुन परिस्थिती बदलण्याची विनंती केली ही गोष्ट शाहू महाराजांच्या तसेच मराठ्यांच्या दृष्टीने फार महत्वाची व फायद्याची होती. कर्नाटकातील अर्काट व त्रिचनापल्ली ही दोन्ही धनाढ्य व मजबूत ठिकाणे जिंकून कर्नाटकात मराठी साम्राज्याचा विस्तार करण्याची ही नामी संधी चालून आल्यानंतर ती शाहूंसारख्या छत्रपतीने सोडणे कठीण होते. याचवेळी बाजीराव पेशवे (थोरले) उत्तरेकडील मोहिमेत व्यस्त असल्यामुळे या मोहिमेकरीता इ.स. १७३९ मध्ये नागपूरकर रघुजी भोसले आणि अक्कलकोटचे फत्तेसिंग भोसले यांची निवड छत्रपती शाहूंनी केली. या कर्नाटकातील मोहिमेची काही महत्वाची उद्दिष्ट्ये होती, तशा आज्ञाच शाहू महाराजांनी रघुजी भोसल्यास दिलेल्या होत्या. त्यानुसार त्रिचनापल्लीचा ताबा घेऊन चंदासाहेबाचा काटा काढावा आणि शाहू महाराजांचे चूलत बंधू तंजावरकर प्रतापसिंह भोसले यांना चंदासाहेबाच्या जाचातून मुक्त करावे.

रघुजी भोसले सोबत जंगी फौजफाटा दिलेला होता. त्यात पायदळ, तोफखाना, ४० ते ५०

१४. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा**, आवृती- २०१२, पृ.११२.

हजारांचे घोडदळ होते. ही मराठ्यांची जंगी फौज अर्काटच्या प्रांतात एप्रिल १७४० मध्ये येऊन दाखल झाली. ही मोहिम म्हणजे रघुजीला स्वत:चे सामर्थ्य आणि जिगर दाखवायची उत्तम संधी होती. त्याचवेळी शाहू महाराजांनी मुरारराव हिंदुराव घोरपडेंकडे दूत पाठवून रघुजीस मदत करण्यास सांगितले. रघुजीला सुध्दा हे माहीत होते की, मुराररावांनी सहाय्य केल्यास त्रिचनापल्ली जिंकणे सहज शक्य आहे. मुराररावांनीही ह्या संधीचे सोने करण्यासाठी फौजेसह सामील होण्याचे कळवले. त्यावेळेस मुराररावांच्या पदरी दहा हजारांचे उत्तमरित्या प्रशिक्षित आणि अनुभवी घोडदळ होते.[१५] ह्या मराठ्यांच्या विशाल सैन्यास रोखण्याकरिता नबाब दोस्तअली फौजेनिशी चालून आला. कडप्पा व अर्काट या जिल्ह्यांच्या मध्ये दमलचेरीचा घाट आहे. तेथे मराठ्यांच्या सैन्यास रोखण्यासाठी दोस्तअलीने तयारी केली. त्यावेळी दहा हजार मराठा स्वारांनी ९ मे १७४० रोजी आडमार्गाने येऊन नबाबाच्या फौजेस वेढा घातला. झालेल्या युध्दात नबाब दोस्तअली सह अनेक नामांकित सरदार मृत्युमूखी पडले, मराठा सैन्याला मोठा विजय मिळाला. या लढाईलाच दमलचेरीची लढाई असे म्हणतात. (२० मे १७४०)[१६]

मराठ्यांच्या ह्या विजयामुळे दोस्त अलीचा मुलगा सफदरअली व चंदासाहेब यांची चांगलीच त्रेधा उडाली. नबाबाचा मृत्यू झाल्यामुळे चंदासाहेबास कर्नाटकाचा नबाब होण्याचे स्वप्न पडू लागले. यावेळी फ्रेंचानी या दोन्ही सरदारास मदत केली. सफदरअली व चंदासाहेब यांनी आपली बायकामुले, जडजवाहीर, खजिना मराठ्यांच्या हाती पडू नये म्हणून पाँडेचरिस फ्रेंचाच्या ताब्यात पाठविला. रघुजीने त्वेषाने अर्काटचा प्रदेश जिंकून घेतला. इ.स. १७४० च्या नोव्हेंबर महिन्यात रघुजी आणि सफदर अली यांच्यामध्ये एक गुप्त करार झाला. त्यानुसार मराठ्यांनी त्रिचनापल्ली जिंकून घ्यावी व चंदासाहेबास पकडावे, सफदर अलीला दोस्तअलीचा वारस ठरवून त्याच्या शत्रूचे निर्मूलन करावे, या कामगिरीबद्दल सफदरअलीने मराठ्यांना एक कोटी रुपये हप्त्याने द्यावेत. त्याशिवाय शाहू महाराजांचा आप्त असलेल्या तंजावरच्या राजास कोणाकडूनही उपद्रव होणार नाही याची काळजी सफदरजंगाने घ्यावी.[१७]

१५. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६०.
१६. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.११४.
१७. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.११५.

वरीलप्रमाणे झालेल्या करारामुळे सफदरअली अर्काटचा नबाब म्हणून मान्यताच मिळाली. चंदासाहेबास हे समजताच स्वत:च्या बचावाकरीता फ्रेंच सेनाधिकाऱ्याकडे मदत मागितली. फ्रेंचांना दक्षिणेतील राजकारणात हात घालण्याची संधी आपोआपच मिळाली व त्याने मदतीस होकारही दिला. मात्र त्याची मदत वेळेपर्यंत पोहोचली नाही.[१८] रघुजी भोसलेंस मुराररावांप्रमाणेच कर्नाटकातील हिंदू संस्थानिक तसेच तंजावरच्या राजांनीही तत्परतेने मदत देण्याचे मान्य केले.[१९] रघुजीने डिसेंबर महिन्यात (इ.स. १७४०) त्रिचनापल्लीस वेढा दिला. त्रिचनापल्लीच्या किल्ल्याची उंची सुमारे १०० मीटर्स असून तेथून भोवतालचा जवळजवळ ५० किलोमीटर्स पर्यंतचा टापू चहूबाजूंनी दृष्टीस पडतो. स्ट्रिंजर लॉरेन्स याने एकदा क्लाईव्हकडे याचे वर्णन 'हिन्दुस्थानचे जिब्राल्टर' या शब्दात केलेले होते.[२०] त्रिचनापल्लीचा वेढा अधिक मजबूत करण्यात आला. किल्ल्यात धान्य आणि इतर साधन सामुग्रीचा तुटवडा पडू लागला. त्यावेळी चंदासाहेबाने मराठ्यांशी तहाची बोलणी सुरु केली. परंतु स्थानिक हिंदू संस्थानिकांना तसेच तंजावरच्या राजाला तहाची बोलणी पसंत नव्हती.

अखेर चंदासाहेबासमोर शरणागती शिवाय दुसरा कोणताही उपाय शिल्लक नसल्यामुळे त्याने कसाबसा एक महिना तग धरला. आणि २१ मार्च रोजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात दिला. या विजयामुळे रघुजी भोसल्याचे सातारच्या दरबारातील प्रस्थ वाढले. किल्ला ताब्यात आल्यानंतर तो सुरक्षित ठेवण्यासाठी त्याची जबाबदारी एखाद्या भक्कम हातात असावी असे सर्वांनाच वाटत होते. अशावेळी मुराररावांखेरीज दुसरा कोणी एवढ्या तोलामोलाचा शूर सेनानी सापडणे शक्य नव्हते. शाहू महाराजांशी सुध्दा मुराररावांचे सख्य होते. त्यामुळे रघुजीने त्रिचनापल्ली आणि त्या भोवतालचा प्रदेश यावर मुराररावांची राज्यपाल म्हणून नेमणूक केल.[२१] त्रिचनापल्लीच्या किल्ल्याची सूत्रे हाती घेतल्यापासून मुराररावांना कर्नाटकाच्या राजकारणात अधिकच महत्व आले. त्यांनी आपला दबदबा कायम केला.[२२] त्यांच्या हाती त्रिचनापल्लीचा बंदोबस्त दिल्याने कर्नाटकातील मराठ्यांचे सहाय्यक निर्धास्त झाले.[२३]

---

१८. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६२.
१९. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.११६.
२०. घोरपडे, मु. य., **पूर्वोक्त,** पृ. ६३.
२१. कुलकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती- १९८६, पृ. ४१७.
२२. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ११८.
२३. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.११७.

वरील सर्व प्रसंगावरुन हे लक्षात येते की, मुराररावांनी सातारचे छत्रपती शाहूंच्या सांगण्यावरुन त्रिचनापल्लीच्या वेढ्यासाठी आपल्या लष्करासह सेवाचाकरी दिली. त्यामुळे छत्रपती घराण्याशी त्यांचे संबंध हे चांगलेच होते. असे असले तरी कोल्हापूरचे छत्रपती संभाजीराजे व राणी जिजाबाई यांनी मुराररावांना आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न चालविला होता. इ.स. १७४७ च्या अखेरीस शाहू महाराजांची प्रकृती बिघडू लागली. त्यांचे कारभारातील लक्ष कमी होवू लागले म्हणून मुराररावांनी कोल्हापूरच्या राजकारणात अधिक लक्ष घालण्यास सुरुवात केली.

मुराररावांनी त्रिचनापल्लीची सूत्रे हातात घेतल्यापासून निजामउलमुल्क (सातारा किल्ला जिंकतांना त्याने बहादुरी केल्यावरुन औरंगजेब बादशहाने त्यास विजापूरच्या सुभेदारीवर नेमले होते, चिन-किलीच-खान हा किताब त्याला दिला होता)[२४] हा अस्वस्थ होता. मोगल बादशहाचे दक्षिणेतील आपण प्रतिनिधी आहोत आणि म्हणून कर्नाटक व दक्षिणेतील इतर सर्व प्रदेशांचे आपणच मालक आहोत अशा समजूतीत निजाम वावरत होता. मुराररावांच्या पराक्रमामुळे तसेच त्यांच्याजवळील सशस्त्र लष्करी बळामुळे त्यांचे कर्नाटकातील बळ हे पूर्वीपेक्षा अधिक वाढल्याची जाणीव निजामाला झालेलीच होती. परंतु भोपाळचा संग्राम व नादिरशहाचे आक्रमण या दोन घटनामध्ये तो अडकून पडलेला होता.[२५] त्यातून बाहेर पडत नाही तोच त्याचा मुलगा नासिरजंग याने बापाविरुध्द बंड पुकारले. त्यांचा बंदोबस्त करुन निजामाने जुलै १७४१ मध्ये नासिरजंगाला पकडून कैदेत टाकले[२६] आणि सुटकेचा निश्वास सोडला.

दक्षिणेतील सत्तांची वाढलेली शक्ती मोडून स्वत:चे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी निजामाने इ.स. १७४३ च्या जानेवारीत गोवळकोंड्याहून मोठ्या फौजेनिशी कर्नाटकात प्रयाण केले.[२७] निजाम मार्च १७४३ मध्ये अर्काटला पोहोचला. अर्काटचा नबाब सफदरअलीचा चुलत भाऊ मुर्तजा याने नबाबाविरुध्द बंड करुन त्याचा खून केला व अर्काटची नबाबगिरी बळकावली.[२८] निजाम अर्काटला पोहोचला त्यावेळी त्याच्याबरोबर ८० हजार स्वार आणि दोन लक्ष पायदळ होते. इतक्या प्रचंड सैन्यापुढे नबाबाचा निभाव लागणे शक्य नव्हेत, त्याने निजामासमोर शरणागती पत्करली आणि

---

२४. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृती- २०१२, पृ.१२४.
२५. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.११७.
२६. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.११९.
२७. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.११८.
२८. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. ११९.

निजामाने अर्काटचा किल्ला ताब्यात घेतला. निजामाने त्याचा एक सेनापती ख्वाजा अब्दुल्ला याची आपला कर्नाटकामधील प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली.[२९]

त्याचवेळी मराठ्यांच्या दुर्देवाने रघुजी भोसले आणि बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्यातील मतभेद अगदी शिगेला पोहोचले होते, आणि दोघांमधील संघर्ष तीव्र झाला होता. निजामाच्या दृष्टीने ही अत्यंत आनंदाची गोष्ट होती. त्याने लगेच मुराररावांकडे निरोप पाठविला आणि त्रिचनापल्लीचा ताबा मागितला. निजामाकडे लष्करी बळ फार मोठे होते. मुराररावांनी शाहू महाराजांकडे मदतीचे आवाहन केले होते. परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. महाराष्ट्रातून लष्करी कुमक येण्याची शक्यता धुसर झाली. आता किल्ला लढविणे शक्य नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी निजामाशी वाटाघाटी सुरु केल्या. त्यात मुराररावांनी ४-५ महिने वेळ काढला. २९ ऑगस्ट १७४३ रोजी मुराररावांनी कुठलीही नामुष्की वा अप्रतिष्ठा होऊ न देता निजामासारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यास किल्ला सुपूर्त केला जे अटळ होते.[३०]

मुरारराव त्रिचनापल्लीवरील वेढ्यात अडकले असतांना त्यांना जर मराठ्यांनी असे वाऱ्यावर सोडले नसते तर परिस्थिती निराळीच झाली असती. मुरारराव या पराभवानंतर खचून न जाता गुत्तीच्या प्रदेशात निघून गेले. त्रिचनापल्लीच्या प्रदेशात मुराररावांची सत्ता अडीचवर्ष होती. याच बरोबर गुत्ती व सोंडूर हे दोन महत्वाचे प्रदेश अजूनही त्यांच्या ताब्यात होते. त्रिचनापल्ली जाण्याचे शल्य शाहू महाराजास अधिक होते. त्यांनी सदाशिवरावभाऊ यांना इ.स. १७४६ च्या अखेरीस कर्नाटकात पाठविले. बाबूजी नाईकाने कर्नाटकात निजामाच्या मदतीने कर्नाटकाचा कारभार हातात घेण्याचे प्रयत्न सुरु केले होते. ते मोडून काढण्यासाठी सदाशिवराव भाऊंची स्वारी असावी. या स्वारीतही मुराररावांनी मदत करावी यासाठी मुरारराव आणि सदाशिवरावभाऊंची भेटही झाली, दोघांनीही एकमेकांना भरपूर आश्वासने दिली पत्रव्यवहारही झाला,* पण मुरारराव प्रत्यक्ष भाऊंच्या स्वारीत सामील झाले नाही. त्यावेळी त्यांचे आणि कोल्हापूरचे संभाजीराजे यांचे मैत्रीचे संधान सुरु होते.[३१]

२९. घोरपडे, मु. य., एक **झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६६.
३०. **कित्ता,** पृ. ६६.
३१. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१२२.
* परिशिष्ट क्र. ६.

मुरारराव घोरपडे यांनी साताऱ्याबरोबरच कोल्हापूरकडेही आपले संबंध वाढविले होते. त्याचवेळी दक्षिणेच्या राजकारणाकडेही त्यांनी दुर्लक्ष केलेले दिसत नाही. कोल्हापूरकरांनाही मुराररावांसारख्या प्रबळ सेनाधिकारी आणि मुत्सद्दी आपल्या मदतीला असावा अशी इच्छा होती. त्यासाठी त्यांनी मुराररावांना करवीरकरांच्या तर्फेने दक्षिणेचा बंदोबस्त करावा यासाठी पत्रव्यवहार केला. मुराररावांनी सुध्दा संभाजी महाराजांच्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला कारण यावेळी सातारच्या शाहू छत्रपतींची तब्येत फार बिघडलेली होती. संभाजी महाराजांनी मुरारराव घोरपडे करवीरकरांच्या तर्फेने दक्षिणेचा बंदोबस्त करण्यासाठी निघाले असता त्यांच्या कुटुंबियाच्या संरक्षणाकरीता त्यांना गजेन्द्रगड तालुका इनाम दिला, तशी सनद दिली त्यात, "स्वस्ति श्री राज्यभिषेक शके ७४ प्रभवनाम संवत्सरे फाल्गुन शु ॥ ४ भानुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी यांनी राजमान्य राजश्री मुरारराव घोरपडे यास दिल्हे पत्र ऐसाजे. तुम्ही स्वामी सेवा एकनिष्टपणे करीत आहा, आतां दक्षिणप्रांती राज्य बंदोबस्ती ठेवण्यास जाणार. तरी तुमचे कुटुंब सर्व ठेवणेस पोक्त स्थळ पाहिजे. त्यास पेशजी तुमचे वडीलास कैलासवासी स्वामींनी गजेन्द्रगड तालुका दिल्हे होते ते हल्ली पूर्ववत दरोबस्त तालुका तुमच्या कुटुंबाच्या संरक्षण होणेस इनाम खर्चाबद्दल दिले आहे. तरी तुम्ही व तुमचे वंशपरंपरा आचंद्राक अनभऊन सुखरुप राहणे. जाणीजे. बहुत काय लिहीणे सुज्ञ आहा. मोर्तब सुध सु ॥ अर्बेन मया तारीख माहे जमादिलाखर." समतमंत्री समत सरकार.[३२]

वरील सनदेत संभाजी महाराजांनी स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, गजेन्द्रगडची जहागीर छत्रपती राजाराम महाराजांनी बहिर्जींना दिलेली होती. तीच सनद नव्याने देत आहोत. संभाजी महाराजांशी मुराररावांचे संबंध घट्ट होवू लागले. त्यातूनच महाराजांनी मौजे सांगवड हे गाव मुराररावांच्या वतनास इनाम दिले. याविषयी माहितीचे पत्र संभाजी महाराजांनी मौजे सांगवडच्या मोकादमास पाठविले होते. त्या पत्रात "राजश्री मुरारराव घोरपडे हुजूर आले आणि स्वामींची सेवा निष्ठेने करुन स्वामीस संतोषी केले. असा उल्लेख आहे."[३३]

संभाजी महाराजांशी मुराररावांच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. स्वत: मुरारराव १९ डिसेंबर

---

३२. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती- २०१२, पृ. २९२.
३३. कित्ता, पृ. २९०.

१७४७ रोजी कोल्हापूरास त्यांच्या भेटीसाठी गेले होते. तेथे त्यांनी छत्रपती संभाजी आणि महाराणी जिजाबाई यांची भेट घेतली होती. सामन्यत: संभाजी महाराजांचे राज्यकारभाराकडे विशेष लक्ष नसावे असे दिसते.[३४] त्यामुळे जिजाबाईंच्या हातातच कोल्हापूरच्या राज्यकारभाराची सुत्रे होती. राणोजी घोरपडे हे कोल्हापूर राज्याचे सेनापती होते.[३५] मुरारराव आणि जिजाबाई यांच्यात बरीच खलबतेही झाली. कोल्हापूरचे राज्य दुर्बल करणाऱ्यांना मुराररावांनी चांगला वचक दाखवावा अशी सुचना जिजाबाईंनी दिली होती.[३६] सावंतवाडीवर स्वारी करुन मुराररावांनी वाडीकरांचे परिपत्य करावे असेही ठरले. जिजाबाईंच्या काळात मुरारराव घोरपडे यांनी कोल्हापूरचे सेनापतीपद मिळविण्याचा प्रयत्न केला. वस्तुत: मुराररावांना प्रत्यक्ष कोल्हापूरचे सेनापतीपद लाभले नाही हे खरे, पण त्यांच्या प्रयत्नामुळे कापशीकर सेनापती घराणे मात्रे काहीसे मागे पडले.[३७]

जिजाबाई आणि मुराररावांच्या यासर्व भेटीगाठींवर कर्नाटकातील राजकारणावर लक्ष ठेवण्याऱ्या वकीलाचे बारीक लक्ष होते. त्याने पेशव्यांना या सर्व घडामोडी विषयी सविस्तर पत्र लिहीले. त्यातच श्रीरंगपट्टण, त्रिचनापल्ली, अर्काट व तंजावर येथील राजकीय हालचालींचा वृत्तांत दिला.

श्री

पै ॥ छ. २५ शाबान.

श्रीमंत राजमान्य राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी. विनंती सेवक राजो तमाजी कृतानेक सा॥ नमस्कार विनंती.

येथील कुशल श्रावण सूध दसमी रवीवासर मोकाम सावणूर जाणून स्वामींनी आपले स्वकुशल लेखन आज्ञा विरोपित गेले पाहिजे. विशेष राजश्री नारोपंताबराबरी पत्र पाठविले ते पावले असेल. सांप्रत येथील वर्तमान तर नबाब आबदूल मजीदखान याचे पुत्राचे लग्न छ. २७ रजबी आरभ तो अखेर छ. १७ शाबानी त्यांचे लोकांत साडे करीताती. यैसीयास तीकडे लग्न पत्रीका देऊन पाठवीले आहे. सांप्रत राजकी वर्तमान तोरगलास मातुश्री बाईसाहेब आले आहे. रा॥ मुराररावजी घोरपडे यास बलाऊ पाठऊन भेटी घेतली. यानी दोनी हजार रुपये नजर बाईसाहेबास रा॥ घोरपडे याना केली.

३४. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.),**कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती-नोव्हे.१९७४, पृ.११६.
३५. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड तिसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. ६४.
३६. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१२३.
३७. गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ११७.

त्यानी संतोषी होऊन पुढ मनसुबा रा॥ घोरपडे जैसे सांगतील तैसे बाईसाहेबानी यैकाव यैसी तजवीज केली आहे. रा॥ घोरपडेचे भाऊ रा ॥ सुबराव नासरजंगाकडे आहेत. त्यांनी मनसुभ करुन करवीर स्वामीस नासरजंगाचे तर्फेने पाच वस्त्रे तोरगलास पाठवीले. ते वस्त्रे घेऊन बाईसाहेब व घोरपडे उभयेता करवीर स्वामीकडे जाऊन मनसुभा करुन या प्रांतास करवीर स्वामीस घेऊन भेटी देऊ नये यैसे मनसुभा केला आहे. या बराबरी देऊन करवीर स्वामीकडे पाठवील आहेत. अंतरंग राजकारण लिहील आहे की सालाबाद पन्नास हजार रुपये देतो ते नगद देतो आणीक दाहा हजार जास्ती देतो. परंतू स्वामीचे आगमन या प्रांती होऊ नये. तहनामा लिहून दिला आहे तो परतून आणून द्यावा यैसा करार येथील्या येवनाजवळी सिवरायांनी करुन आपले विदीमानी यादोरायास करवीर स्वामीकडे रवाना केले आहेत. थोडेबहुत वर्तमान चालले होते ते रा॥ नारोपंती सेवेसी बिदीत केले असेल. रा॥ नारोपंती म्हणाले होते की झाले वर्तमान सेवेसी लिहून पाठवणे. यैसीयास लिहिले आसे. श्रीरंगपटणाकडील राजकारण अद्यापी वारले नाही. पटण मजकूर यैशी लक्ष रुपये देऊ म्हणताती. येवन म्हणतो की येक करोडी वीस लक्ष रुपये घेऊ म्हणतो. अद्यापी फैसल जाले नाही. श्रीरंगपटणकर बहुत मस्त जाले. त्रीर्चनापलीची विलायत नित्य प्रतिनित्य साधीत साधीत गेले. येवनाचे चिती आहे की मोकदमा फैसल जाल्यावर त्रीर्चनापलीचे विलायेती साधीली आहे त्याचे त्याचे गुनेगार वीस पत्रे (पचे?) वीस लक्ष घ्याव यैसा हेत आहे. चंदावरचे वर्तमान पालेगाराचे उपद्र(व) विलायेतीस अतीशले जाला आहे. कारभारी अणाजी सेटगे होता त्यास मारुन टाकीला. दुसरा मानाजीराव जाला आहे. त्याच्याने कारभार आटोपत नाही. या दोन्ही सवस्थानचे मजकूर या प्रकार आहे. अरकाडचे वर्तमान चेनपटणकराचे उपद्रव अरकाडचे विलायेतीस बहुतसा जाला असे. येथे वर्तमान आहे की स्वामीचे फौज हींदुस्तानाकडे जात आहे. या साली सावणूरचे प्रांतास येत नाहींसा नीश्चये येथील्या वकील मजकुरानी केले आहेत. यैवजास येणप्रमाणे वरचेवर आणे करीत असताती. इत:पर जाले वर्तमान सेवेसी लिहून पाठवितो. सेवेसी येतो. विशेष काय लिहीणे हे विनंती.[३८]

मुराररावांचा कर्नाटकातील वाढल्या प्रभावामुळे त्यांचे सहकार्य लाभावे याकरिता छत्रपती

३८. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. २९६-९७.

घराण्यात जणू काही चढाओढ लागली होती असे दिसते. शाहू महाराज वरचेवर आजारी पडू लागल्याने त्यांच्या थोरल्या राणी सोयराबाई ह्या राज्याचा कारभार स्वत:च्या हातात घेण्यास उत्सूक होत्या त्यासाठी शाहूंनी आपल्या पसंतीच्या मुलास दत्तक द्यावे असे सुचविले होते. परंतु पेशव्यांशी सोयराबाईचे पटत नसल्याने त्याची शक्यता कमीच होती. त्यामुळे शाहू महाराजांच्या आजारपणात पेशवे, ताराबाई, सोयराबाई आणि जिजाबाई ह्या सर्वांना मुराररावांनी आपणास मदत करावी अशी अपेक्षा होती.[३९] यावरुन मुराररावाची शक्ती दक्षिण भारतात वाढलेली होती हे लक्षात येते. मुराररावांनी सदाशिव जगज्जीवन यास आपल्या सरदेशमुखीच्या वसुलातून पंधरा रुपयाचे वर्षासन नेमून दिले होते. तसेच सदाशिव पोतदार यास शंभर रुपयाचे व एकखंडी धान्याचे वतन दिले होते.[४०] मुरारराव हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर यांनी छत्रपती घराण्याशी नेहमीच सलोख्याची भूमिका घेऊन दक्षिणेच्या राजकारणाकडे आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते.

## ४.२ राजे मुरारराव व पेशवे संबंध :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून पेशवा या अधिकारपदावर निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका झाल्या होत्या. शाहू महाराजांना छत्रपतीपद प्राप्त होऊन राज्यप्राप्ती झाल्यावर (सातारची गादी) त्यांनी श्रीवधर्नकर बाळाजी विश्वनाथ भट या आपल्या विश्वासू सेवकास[४१] पेशवेपद दिले. तेव्हापासून त्यांच्या कुटुंबास प्राधान्य मिळून उत्तरोत्तर मराठेशाहीचा एकंदर कारभार त्यांच्या तंत्राने चालू लागला. या कारभारास पेशवाई असे नाव मिळाले.[४२] बाळाजी विश्वनाथ भटाचे घराणे मुळचे कोकणातील सिद्दीच्या राज्यातील श्रीवर्धन गावचे. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत मराठी राज्यात येऊन सेवेत रुजू झाला. आणि आपल्या अंगच्या गुणांमुळे त्याने आपली लवकरच प्रगती करुन घेतली. इ.स. १६९५ ते इ.स. १७०७ या काळात तो पुणे प्रातांचा सरसुभेदार झाला. शाहूंच्या कैदेत त्याचा परामर्श घेणाऱ्या मराठी माणसांपैकी बाळाजी एक होता. त्यामुळे सहाजिकच शाहू महाराज महाराष्ट्रात आल्यानंतर तो त्यांना जाऊन मिळाला. बाळाजीने आपल्या

३९. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१२४.
४०. पवार, अप्पासाहेब, (संपा.), **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड दुसरा,** आवृत्ती-२०१२, पृ. २९३-९४.
४१. पवार, ज. भा., **मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त,** आवृत्ती-१९८६, पृ. २७.
४२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृती- २०१२, पृ. ५५.

हुशारीने, मुत्सद्देगिरीने व एकनिष्ठेने शाहूंचा विश्वास संपादन केला. इ.स. १७११ ते इ.स. १७१५ या कालखंडात शाहूंची स्थिती अत्यंत बिकट झालेली होती. त्यावेळी बाळाजीने महत्वाची कामगिरी पार पाडली. त्यामुळेच शाहूंनी बाळाजीस पेशवेपद बहाल केले ते सन १८१८ पर्यंत त्यांच्या घराण्याकडेच राहिले.[४३] पेशव्यांकडे सर्व फौजेचा व मुलखाचा बंदोबस्त करुन दुसरे दरकदार (दरकदार म्हणजे देशमुख व देशपांडे)[४४] व प्रधान यांना घेऊन राज्यकारभार चालवण्याचे मुख्य काम होते.

मुराररावांच्या इ.स. १७३१ ते इ.स. १७७७ या संपूर्ण कार्यकाळात बाळाजी बाजीराव, बाजीराव थोरले आणि माधवराव असे तीन महत्वपूर्ण पेशवे गादीवर होऊन गेले. प्रत्येकाच्या कारकिर्दीत पेशव्यांचे कर्नाटकातील घोरपडे घराण्याशी संबंध होते. बऱ्याचवेळा ते संबंध काळ, परिस्थितीनुसार भिन्न होते असे दिसते. परंतु मुरारराव घोरपडेंच्या मदतीशिवाय कर्नाटकात विजय मिळवणे सहज शक्य नाही याची जाणीव असल्यामुळे सातारा आणि कोल्हापूरच्या छत्रपतींकडून तसेच पेशव्यांकडून मुराररावांच्या मदतीची इच्छा व्यक्त करण्यात येत असे. यावरुन मुरारराव दक्षिणेतील एक मोठी शक्ती असल्याची जाणीव सर्वांनाच झालेली होती.[४५]

### ४.२.१ राजे मुरारराव हिंदुराव घोरपडे आणि थोरले बाजीराव पेशवे :

पेशवा बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूसमयी त्याचा पुत्र बाजीराव हा अवघ्या १९ वर्षांचा होता. परंतु या तरुण बाजीरावात शाहू महाराजांना कर्तृत्वाची व शौर्याची चमक दिसत होती. दरबारातील अनेक मंडळींचा विरोध न जुमानता १७ एप्रिल १७२० रोजी बाजीरावास शाहू महाराजांनी पेशवाईची वस्त्रे कऱ्हाडनजीक मसूर मुक्कामी दिली.[४६] मराठ्यांचे साम्राज्य उत्तरेत आणि दक्षिणेत वृध्दिंगत करण्याच्या ध्येयापोटी बाजीराव पेशव्याने शाहू महाराजांच्या इच्छेप्रमाणे प्रथम दक्षिण भारत जिंकून घेण्याचे ठरविले. त्यावेळी सिध्दोजी हिंदुराव घोरपडे व त्यांचे पुत्र मुरारराव हेच मुख्यत: कर्नाटकात मराठ्यांची सत्ता सांभाळत होते. तेव्हा इ.स. १७२४ च्या अखेरीस निजामाने दक्षिणेतील राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन दक्षिणेत कायमचे स्वतंत्र बस्तान मांडले. या निजामाला शह देण्याच्या इराद्यानेही पेशव्याने विजापूर-गुलबर्गा-चित्तलदुर्ग मार्गाने कर्नाटकात कूच केले. ही पेशव्यांची

४३. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. १.
४४. केळकर, य. न., **ऐतिहासिक शब्दकोश,** आवृत्ती- नोव्हे. २००६, पृ. ३७७.
४५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१२४.
४६. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृती- २०१२, पृ. २२३.

चित्तलदुर्गची मोहिम म्हणून ओळखली जाते. यावेळी ज्या ठिकाणी मराठ्यांचा अंमल उठलेला होता त्याची पूर्ववत स्थापना केली आणि पाळेगारांचा बंदोबस्त करुन त्यांच्यापासून खंडण्या वसूल केल्या.

यानंतरची पेशव्यांची दुसरी कर्नाटकातील मोहिम म्हणजे श्रीरंगपट्टणची मोहिम. ही मोहिम नोव्हेंबर १७२६ मध्ये सुरु झाली. यावेळी बेळगाव-सोंधा-लक्ष्मेश्वर-बेदनूर या मार्गाने श्रीरंगपट्टणवर स्वारी केली. सुरापूर, कनकदुर्ग, चित्तलदुर्ग, गदग, लक्ष्मेश्वर इत्यादी ठिकाणचे नायक मराठ्यांना शरण आले,[४७] या दोन्ही स्वाऱ्यांमध्ये मुरारराव हजर होते.[४८] तथापि, निजाम आणि कोल्हापूरकर संभाजी यांनी स्वराज्यात शाहूंच्या प्रदेशात लष्करी धामधूम सुरु केली. या गोष्टीची माहिती मिळताच बाजीराव पेशव्याने आपले पाऊल मागे घेतले. वाटेत कॉलऱ्याने त्याच्या लष्करातील अनेक सैनिक मृत्यूमुखी पडले, मोठी हानी झाली. या स्वारीनंतर पेशव्याने पुन्हा कर्नाटकावर स्वारी केली नाही. त्यांच्या स्वाऱ्यांचा ओघ पूर्णपणे उत्तर भारतावर केंद्रित झालेला होता.

बाजीराव पेशव्याचे नेतृत्व लाभलेले असतांना मराठे दख्खनेतील निजामाच्या सत्तेला सहज आव्हान देऊ शकले असते आणि तेथे शांतता प्रस्थापित करु शकले असते. पण त्याऐवजी बाजीराव पेशव्याने उत्तरेस सत्ता मिळण्यासाठी प्रयत्न करणे पंसत केले.[४९] बाजीरावाने कर्नाटकात पुन्हा लक्ष न घातल्याने मराठेशाहीवर तसेच घोरपडे घराण्यावर त्याचे दूरगामी परिणाम झाले. त्याची मीमांसा करतांना शेजवलकर म्हणतात, "बाजीरावाने यावेळी श्रीरंगपट्टणापर्यंत जाऊन घाटाखालील अर्काटच्या नबाबाकडेही चौथाई, सरदेशमुखी मागितली, पण नंतर बारावर्ष त्या बाजूकडे मराठे मुळीच फिरकले नाहीत यामुळे शहांजीपासून मराठ्यांच्या सत्तेखाली आलेला हा भाग त्यांच्या ताब्यातून निखळल्यासारखा झाला. तंजावरचे बध्दमूल मराठेही यामुळे स्वराज्याबाहेर फेकले गेले. अर्काटचे नबाब या काळात वाढीस लागून मद्रास व पाँडिचेरी येथील व्यापारी इंग्रज, फ्रेंच सुध्दा डोकेवर काढू लागले, कारण त्यांच्या महत्वाकांक्षेचा अंकूर मुळातच करपून जाण्यास कारण, प्रबळ वरचढ सत्तेचा प्रखरपणा त्या भागातून संपूर्ण नाहीसा झाला. त्यामुळे म्हैसूरचा पाळेगार वाढून मराठ्यास एक नवीन प्रबळ शत्रू त्या भागात निर्माण झाला. मराठी राज्याचे त्यामुळे अतोनात नुकसान झाले असे इतिहासचं सांगतो."[५०]

---

४७. पवार, ज. भा., **मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त**, आवृत्ती - १९८६, पृ. ४५.
४८. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा**, आवृती- २०१२, पृ. २७८.
४९. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६६.
५०. पवार, ज. भा., **पूर्वोक्त**, पृ. ६७.

थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या कार्यकाळात राजे मुरारराव घोरपडेंचा पेशव्यांशी विशेष संपर्क आला नाही. पेशव्यांच्या कर्नाटकातील दोन्ही स्वाऱ्यांमध्ये जरी मुरारराव हजर असले तरी त्यावेळी वडील सिध्दोजी राजे घोरपडे सुध्दा सोबतच होते. त्यामुळे मुराररावांच्या कर्तृत्वाची झळाळी खऱ्या अर्थाने नानासाहेब व थोरले माधवराव पेशवे यांच्या काळात दिसून येते.

### ४.२.२ राजे मुरारराव आणि बाळाजी बाजीराव पेशवे :

इ.स. १७४० च्या एप्रिलमध्ये बाजीराव पेशवे निवर्तले ही बातमी कर्नाटकाच्या स्वारीवर असणाऱ्या रघुजी भोसले पर्यंत पोहोचताच त्याचे सर्व लक्ष सातारकडे लागून राहिले होते. रघुजीने सुचविलेला बाबूजी नाईक बारामतीकर हा पेशवा व्हावा असे त्याला वाटत होते. २८ एप्रिल १७४० रोजी बाजीराव पेशव्यांचे निधन झाले.[५१] त्यावेळी त्याचा वडील मुलगा बाळाजी हा मोहीमेवर होता त्यामुळे २५ जून १७४० मध्ये बाळाजी बाजीराव यांना पेशवाईची वस्त्रे देण्यात आली. नानासाहेब या नावाने हे इतिहासात प्रसिध्द आहेत.[५२] मराठ्यांनी दिल्लीचा बादशहा व बादशाही यांचे संरक्षण करावे, ह्यासाठी सैन्य ठेवावे, सैन्य खर्चासाठी मोगलाईत चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी असा दिल्लीच्या बादशहाने पेशव्यांशी सन १७५१ मध्ये करार केला.[५३] त्यामुळे पेशवे दिल्लीच्या बादशहाचे सुभेदार, छत्रपतींचे प्रधान व आपल्या स्वत:च्या राज्यापुरते मालक होते. हे तीन विजातीय संबंध एके ठिकाणी असल्यामुळे पेशव्यांचे राजतंत्र बरेच बिकट व नाजूक झाले होते. थोरल्या बाजीरावांनी ज्याप्रमाणे राजकीय व लष्करीदृष्ट्या उत्तरेकडे विशेष लक्ष दिले त्याचप्रमाणे नानासाहेब पेशव्यांनी दक्षिणेकडे विशेष लक्ष दिले. 'दक्षिण मुक्त करणे' हे त्यांच्या राजकीय धोरणाचे प्रमुख सूत्र होते.

नानासाहेब गादीवर आल्यापासूनच रघुजी भोसलेंशी त्याचे वैमनस्य होते. ज्यावेळी रघुजी भोसल्याने मुराररावांना त्रिचनापल्लीचे राज्यपाल म्हणून घोषित केले.[५४] त्यावेळी दक्षिणभारतात सर्वच संबंधितांना फार आनंद झाला. निजाम-उल-मुल्क हा मोगल बादशहाचा दक्षिणेतील प्रतिनिधी होता. त्याचंमुळे तो स्वत:ला कर्नाटक आणि दक्षिण भारतातील इतर सर्व प्रदेशांचा मालकचं समजत

---

५१. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड तिसरा,** आवृती- २०१२, पृ. २७८.

५२. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. १०१.

५३. कित्ता, पृ. १०४.

५४. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६४.

होता. परंतु मराठ्यांची कर्नाटकातील स्वारी, चंदासाहेबास झालेली अटक व कैद आणि राजे मुराररावांची त्रिचनापल्लीच्या किल्ल्यावर झालेली स्थापना या सर्व घडामोडींमुळे तो नाराज झालेला होता. अशावेळी दक्षिणेतील स्वत:चे अस्तित्व टिकविणे व दाखविणे ही त्याची गरज होऊन बसली होती.[५५] त्यासाठीच त्याने इ.स. १७४३ मध्ये अर्काटवर विजय मिळवून त्रिचनापल्लीवर आक्रमण करण्याचे ठरविले. त्यावेळी नानासाहेब आणि रघुजी भोसले यांच्यातील मतभेद अगदी शिगेला पोहोचले होते आणि दोघांमधील संघर्ष तीव्र झाला होता. याचाच फायदा घेऊन निजामाने मुराररावांकडून २९ ऑगष्ट १७४३ रोजी त्रिचनापल्लीचा ताबा घेतला.[५६] यावेळी पेशव्याची कुठलीही मदत न झाल्याने गेलेले त्रिचनापल्ली मराठे अखेरपर्यंत परत मिळवू शकले नाही. कर्नाटक प्रातांत पेशव्यांच्या बाबूजी नाईकास कुठल्याही प्रकारची मदत मुराररावांनी करु नये, याकरीता पेशव्यांनी त्याच्याशी संधान बांधले, मुराररावांनी बाबूजी नाईकांचा प्रतिकार करुन पेशव्यास मदत करावी अशी सुचना केली. त्यासाठी पेशव्यांनी इ.स. १७४६ च्या डिसेंबर महिन्यात आपला चुलत भाऊ सदाशिवराव यास कर्नाटकात पाठविले. वास्तविक बंगालच्या प्रांतात ज्याप्रमाणे रघुजी भोसले याने आपला बंदोबस्त ठेवलेला होता. त्याचप्रमाणे कर्नाटकात मुरारराव घोरपडे बंदोबस्त ठेवण्यात लायक होता. त्याला पेशव्याने तशाप्रकारची सुट देऊन ही जबाबदारी देणे आवश्यक होते. परंतु मुरारराव आपल्या तंत्राने वागतील अशी पेशव्यांची खात्री नव्हती.[५७]

कोल्हापूरचे संभाजीराजे आणि त्यांची राणी जिजाबाई यांनी मुरारराव घोरपडे यास शाहू महाराजांच्या प्रदेशावर हल्ले करण्यासाठी बोलाविले होते.[५८] परंतु मुराररावांनी तसे काही केलेले दिसत नाही. त्यांना छत्रपती शाहू महाराजांबद्दल आदर होता.[५९] सदाशिवराव भाऊ कर्नाटकात मार्च १७४७ च्या महिन्यात पोहोचले. त्यावेळी निजाम ह्या मराठ्यांच्या परंपरागत शत्रूने नासिरजंगास सदाशिवरावांच्या पाठीवर रवाना केले अशावेळी मुराररावांचा पाठिंबा मिळाल्याशिवाय यश मिळणार नाही असे नानासाहेब पेशव्यांना वाटल्यामुळेच त्यांनी मुराररावांशी संधान बांधून सदाशिवराव

५५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.११९.
५६. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६६.
५७. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.१२०.
५८. गर्गे, स. मा., **करवीर रियासत,** आवृत्ती- ऑक्टो. २००२, पृ. २२२.
५९. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. १५९.

भाऊस मदत करण्याचे सुचवले.[६०] त्याप्रमाणे ३० मार्च रोजी भाऊ व मुराररावांची भेट झाली. त्यांनी प्रत्यक्षात एकमेकांना अनेक आश्वासने दिली. परंतु मुरारराव प्रत्यक्ष भाऊंच्या स्वारीत सामील झाले नाही, तर कोल्हापूरच्या राजकारणात हस्तक्षेप करीत होते. कोल्हापूरात मात्र विविध कारस्थाने चालली होती. त्यात लक्ष न घालता मुरारराव इ.स. १७४८ मध्ये कर्नाटकात परत गेले. भाऊसाहेबांनी कर्नाटकाच्या स्वारीत मुराररावांचा स्नेह कायम ठेवला म्हणजे मुरारराव घोरपडे पेशवे विरोधी गटाला तरी मिळू नये याची काळजी घेतली. नानासाहेबांचा बराच मुक्काम सातार्‍यालाच असे. त्यामुळे छत्रपतींच्या दरबारातील मराठेशाहीची सर्व कारस्थाने, व्यवहार, घडामोडी सतत डोळ्यापुढे राहून त्यांना मराठेशाहीच्या राज्यतंत्राचे उत्तम ज्ञान झाले. शाहु महराजांच्या मृत्यूनंतर मराठेशाहीची व्यवस्था लावतांना या अनुभवाचा त्यांना उत्तम उपयोग झाला.[६१]

छत्रपती शाहू महाराज १५ डिसेंबर १७४९ रोजी मृत्यू पावले. त्यापूर्वी शाहू महाराजांनी नानासाहेब पेशव्यांना सर्व कारभाराची सत्ता दिली होती. असे असले तरी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्यातील सत्तास्पर्धा सुरु झाली. तसेच कर्नाटकाच्या राजकारणावरही याचे दुरगामी परिणाम घडून आले. अशावेळी सातारच्या गादीवरील समस्येवर उपाय म्हणून ४ जानेवारी १७५० रोजी ताराबाईंचा नातू रामराजाला सातारच्या गादीवर छत्रपती म्हणून तख्तारुढ केले.[६२] सातारा आणि कोल्हापूर या दोन्ही छत्रपतींच्या गाद्यांच्या मुराररावांकडून मदतीची अपेक्षा नेहमीच व्यक्त करण्यात येत असे. तसेच कर्नाटकातील सर्व राज्यकर्त्यांना विजयाकरीता मुराररावांची गरज भासू लागली होती.

मोगल बादशहाचा दक्षिणेतील प्रतिनिधी असलेला निजाम-उल-मुल्क २१ मे १७४८ रोजी मरण पावला.[६३] त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबात सत्तासंघर्ष सुरु झाला. निजामाचा मुलगा नासिरजंग आणि निजामाच्या मुलीचा मुलगा मुज्जफ्फरजंग यांच्यात संघर्षाची स्थिती निर्माण झाली. मुजफ्फरजंगाने पेशव्याकडे संधान बांधले तर मुराररावांनी आपणास मदत करावी यासाठी दोन्ही

---

६०. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ.१२२.
६१. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. १०१.
६२. गर्गे, स. मा., **करवीर रियासत,** आवृत्ती- ऑक्टो. २००२, पृ. २२७.
६३. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.२७.

पक्ष सर्वतोपरी प्रयत्न करीत होते. परंतु मुराररावांनी चंदासाहेबांशी असलेल्या शत्रुत्वामुळे नासिरजंगास मदत करण्याचे ठरविले. कर्नाटकात यावेळी राजकारण अत्यंत गुंतागुंतीचे झालेले होते. पाच नबाब, तंजावर, सौंधे, बिदनूर, म्हैसूर आणि मुरारराव असे पाच हिंदू सत्ताधिश तसेच फ्रेंच आणि इंग्रज ह्या दोन सत्ताही कर्नाटकात आपले पाय पसरत होत्या. पेशवे आपल्या अंतस्थ कारणांमुळे कर्नाटकात तातडीने लक्षही घालू शकत नव्हते. त्यामुळे मुजफ्फरजंगाने फ्रेंचाच्या मदतीने कर्नाटक बळकवण्याचा प्रयत्न सुरु केला. पण लवकरच नासिरजंग, चंदासाहेब, मुजफ्फरजंग हे थोड्याथोड्या अंतराने मारले गेले. त्यावेळी देखील मुराररावांनी दिलेला शब्द पाळून नासिरजंगास मदत केली होती.

मुराररावांनी कर्नाटकातील राजकीय अस्थिरतेचा पुरेपुर उपयोग करुन घेतला. त्यांनी कर्नाटकातील छोट्या सेनाधिकाऱ्यांकडून खंडणी वसूल करण्यास सुरुवात केलेली होती. निजामाच्या घरातील संघर्षामुळे मुराररावांना दक्षिणेत भरपूर वाव होता. आणि त्यांना पायबंद घालू शकेल अशी एकही शक्तीशाली सत्ता दक्षिणेत त्यावेळी अस्तित्वात नव्हती. मुराररावांचे कर्नाटकातील वजन यावेळी वाढलेले होते. त्यांना पेशव्यांची मात्र भिती वाटत असावी, दुसरीकडे पेशव्यांनाही दक्षिणेत मुराररावांशिवाय दुसरा सामर्थ्यशाली दोस्त दिसत नव्हता. त्यातच दिल्लीच्या बादशहाने पेशव्याबरोबर इ.स. १७५१ मध्ये करार केला.[६४] त्यानुसार मराठ्यांनी दिल्लीचा बादशहा व बादशाही यांचे संरक्षण करावे, ह्यासाठी सैन्य ठेवावे, सैन्य खर्चासाठी मोगलाईत चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी असे ठरले.

मुरारराव महत्वाकांक्षी असल्यामुळे त्यांना कर्नाटकाचा संपूर्ण ताबा हवा होता. पेशव्यांनी त्या कर्नाटकातील महसूल वसूल करण्याचे एकमेव अधिकार देण्याचे मान्य करावे अशी त्यांची इच्छा होती.[६५] त्यासाठी मुराररावांनी आपले लष्करी सामर्थ्य चांगलेच वाढवलेले होते. ते स्वत:ला पेशव्यांचे अंकित मानत नसत.[६६] कर्नाटकातील पेशव्यांच्या वकीलाने मुराररावांच्या समार्थ्याबद्दल पेशव्यांना पत्राने कळविले होते. त्यात तो म्हणतो, "मुराररावांजवळ चार हजार घोडेस्वार, एक हजार बंदूकधारी फ्रेंच शिपाई आणि दोन-अडीचशे तोफा आहेत. आणखी तोफा जमवण्यात येत आहेत."[६७]

---

६४. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. १०४.
६५. कदम, उमेश अ., **फ्रेंच मराठा संबंध,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. १२०.
६६. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ.३६०.
६७. कुलकर्णी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४१८.

तसेच "पेशवे माझ्या सूचनेप्रमाणे इकडे (कर्नाटकात) आले आणि माझ्या सल्ल्याप्रमाणे वागले तर ठिक, नाहीतर त्यांना या मुलुखात पाय ठेवू देणार नाही असे मुराररावांचे म्हणणे आहे."[६८]

मे १७५३ मध्ये मुराररावांनी तिरुवेत्तीचा किल्ला जिंकून घेतला होता. याचवेळी झालेल्या लढाईत मुरारावांचे धाकटे भाऊ भुजंगराव घोरपडे आणि अनेक शिलेदार गमावले.[६९] नानासाहेबांची दृष्टी उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतावरच जास्त होती. ज्याप्रमाणे बाजीराव पेशव्यांनी उत्तर भारतात धडका मारुन तेथे आपले प्रस्थ निर्माण केले. त्याप्रमाणेच नानासाहेबांनाही दक्षिणेत करायचे होते. ते सातारच्या राजकारणातून थोडे मोकळे झाल्यावर त्यांनी आपले लक्ष कर्नाटकात वळविले. कर्नाटकातील मोहिमेत पेशव्यांच्या बरोबर सदाशिवरावभाऊ देखील होते. त्यांच्या सोबत असण्याचा सर्वात जास्त फायदा पेशव्यांना झाला. यावेळी म्हैसूर आणि मुरारराव यांनी पेशव्यांच्या विरुध्द फ्रेंचाशी मैत्री करुन आपले बळ संघटित केले होते.[७०] म्हैसूरच्या नंदराजाने म्हैसूरच्या सुरक्षिततेसाठी मुराररावांना मदत मागितली. कारण पेशव्यांच्या हल्ल्यांना रोखून धरण्याचे सामर्थ्य मुराररावांमध्येच आहे ह्याबद्दल त्यास खात्री होती. त्यासाठी त्याने मुरारराव आणि फ्रेंचांनी एकत्रितपणे पेशव्यांच्या लष्कराचा बंदोबस्त करावा असा आग्रह धरला. पेशव्यांनी कर्नाटकातील स्वत:चा दबदबा वाढविण्यासाठी तिकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यांनी ऑक्टो. १७५४ मध्ये सदाशिवराव भाऊंसोबत आपली फौज दक्षिणेकडे आणली. या मोहिमेत बेदनूर, सावनूर व श्रीरंगपट्टणच्या लढाया घडून आल्या.

पेशव्यांच्या दक्षिणेतील राज्य विस्तारासंदर्भात मुराररावांची नाराजी स्पष्ट दिसते कारण मुरारराव निजामाच्या मृत्यूनंतर कर्नाटकात मुखत्यारीने वागत. पेशव्यांच्या आक्रमणामुळे त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येण्याची शक्यताच अधिक होती. त्यामुळे पेशव्यांना विरोध करण्याचे धोरण मुराररावांनी अवलंबिले मात्र तेच धोरण त्यांनी शेवटपर्यंत राखले नाही. परिस्थिती पाहून वेळ मारुन नेणे आणि पुन्हा उभे राहणे हे त्यांच्या राजकीय कारकिर्दीचे वैशिष्ट्य दिसते. पेशव्यांनी सावनूर येथे विसाजी नारायण नावाच्या गृहस्थास तेथील वर्तमान सांगण्यासाठी नियुक्त केले होते. त्याने १ जानेवारी

---

६८. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१३६.

६९. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ७५.

७०. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. १३९.

१७५५ रोजी पाठविलेल्या पत्रात लिहले आहे, "मुराररावांची पत्रे सावनूरकरास आली की कडपे, कर्नूल, अदवानी वगैरे एकत्र होऊन भारी फौजेनिशी मनसुबा करावा, नाही तर दक्षिण देशचा वक्र जातो. त्यांनी पाच हजार फौज जमविली आहे, सबब पुण्याहून भारी फौज व सामान आल्याशिवाय स्थळ हस्तगत होणार नाही."[७१]

मुराररावांनी महत्वाकांक्षा व पेशव्यांचा दक्षिणेतील त्यांना न आवडणारा हस्तक्षेप यामुळे त्यांनी सावूनरकर नबाब, मुजफ्फरखान व ते स्वत: अशा दक्षिणेकडील सर्व कसलेल्या लढवय्यांना एकत्रित करुन पेशव्यांच्या विरुध्द उभे राहण्याचे ठरविले. पेशव्यांनी नबाबाकडे धमकीचे पत्र पाठवून मुजफ्फरखानाला दिलेल्या आश्रयाबद्दल जाब विचारला अन्यथा सावनूरचा फडशा पाडू असेही लिहिले. परंतु नबाबाने योग्य प्रतिसाद न दिल्याने पेशव्यांना दक्षिणेतील सर्व सरदारांना एकत्र येण्याचे कळविले तसेच उत्तर भारतातून सरदार विठ्ठल शिवदेव, मल्हारराव होळकर आणि खराडे सरदार या सर्वांना देखील बोलावून घेतले. त्याशिवाय जानोजी आणि मुधोजी भोसले हे ही पेशव्यास येऊन सामील झाले. पेशव्यांनी सुध्दा सावनूरचा पराभव करण्यासाठी आपले लष्करी सामर्थ्य वाढवून हल्ला केला.[७२]

पेशव्यांची सावनूरवरची स्वारी ही मुख्यत: मुजफ्फरखानासाठी होती. तो पेशव्यांच्या लष्करात तोफखान्याचा प्रमुख होता. मात्र पेशव्यांच्या सरदारांशी झालेल्या वादावादीतून तो नोकरी सोडून श्रीरंगपट्टणच्या राजाजवळ नोकरीस राहिला. सावनूरकरांनी त्याला आश्रय दिल्याने "बागलकोट फत्ते झाले. सावनूरकर, मुजफ्फरखान, मुरारराव एकत्र होऊन बखेडा करतात, त्यांचे पाठीवर चाललो."[७३] असा उल्लेख पेशव्यांनी पत्रात केलेला दिसतो. मुराररावांमुळे पेशव्यांची दक्षिणेत नाचक्की होण्याचा प्रसंग आला होता. त्यामुळे या स्वारीत पेशव्यांनी सावनूरकरांचा पराभव करण्यात कुठलीही कसर सोडली नाही. जानेवारी १७५६ च्या आरंभी पेशव्यांच्या सैन्याने सावनूरला वेढा घातला.

सावनूरच्या नबाबाकडून असणारा मुजफ्फरखान हा तोफखान्याच्या लढाईत तरबेज होता आणि मुराररावांकडे बंदुकधारी सैन्य होते. त्याचे सक्षम नेतृत्व ते स्वत: करीत होते. त्यामुळे किल्ल्यात

---

७१. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ. ३६०.
७२. कुलकणी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. ४१८.
७३. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ३६०.

बोट शिरवायलाही पेशव्यांना सुरुवातीच्या तीन महिन्यात संधी मिळाली नाही. पेशव्यांनी वरचेवर किल्ल्यावर तोफांचा मारा सुरुच ठेवलेला होता. परंतु तेवढ्याच निकराने सावनूरकर सैन्यानेही पेशव्यांच्या लष्करावर प्रतिहल्ले केले. अखेर आपला निभाव लागत नाही हे लक्षात येताच पेशव्यांनी फ्रेंच आणि निजामास सहाय्यास बोलावून घेतले. फ्रेंचांचा अधिकारी बुसी हा डुप्लेनंतरचा भारतातील सर्वात महत्वाचा फ्रेंच सेनानी व प्रशासक म्हणून प्रसिध्द होता.[७४] सलाबतजंग हैद्राबादचा निजाम असून तो पेशव्यांच्या करिता भली मोठी फौज घेऊन निघाला. ७ एप्रिल १७५६ रोजी ते दोघेही पेशव्यांना भेटले.[७५] बुसी व निजामाच्या येण्याने लढाईचे चित्रचं पालटले व सावनूरांवरील हल्ल्यात मोठ्याप्रमाणात भर पडली. बुसीने तात्काळ किल्ल्याभोवती मोर्चेबंदी करुन तोफांचे हल्ले किल्ल्यावर करण्यास सुरुवात केली. बुसीच्या तोफखान्याने पहिल्या दिवशीच पाच तासात सातशे गोळे आणि दुसरे दिवशी सहाशे गोळे सावनूरच्या तटावर डागले त्यामुळे सावनूरच्या किल्ल्याचा तट कोसळून पडला. सावनूरकरांना तडजोड करण्याशिवाय पर्याय उरला नाही. अखेर पेशव्यांनी सावनूरची लढाई जिंकली. यासर्व स्वारीत नानासाहेब स्वत: जातीने हजर होते.[७६] अकरा लक्ष रुपये खंडणी, मिश्रीकोट, कुंदगोळ व हुबळी हे परगणे तसेच बंकापूरचा किल्ला[७७] पेशव्यास देऊन सावनूरच्या नबाबाने हे प्रकरण मिटवले.

कर्नाटकातील प्रदेशात शांतता ठेवण्याकरीता मुराररावांची मदत किंवा पाठिंबा असणे फार आवश्यक आहे याची जाणीव पेशव्यांना होतीच यामुळे लढाई सुरु असतांनाच पेशव्यांनी मुराररावांना आपल्या बाजूने ओढण्याचे प्रयत्न सुरु केले. मल्हारराव होळकरांनी स्वत: फ्रेंच अधिकारी बुसी यास मुराररावांची समजूत घालण्यासाठी पाचारण केले होते.[७८] पेशव्यांनी मुराररावांस गुत्तीचा किल्ला, गुत्तीची जहागिर व कर्नाटकाचा स्वतंत्र कारभार कबूल केला. यामुळे मुरारराव व मुजफ्फरखान लढाई संपल्यावर पेशव्यांच्या भेटीला गेले, त्यांनी मुराररावांची समजूत काढली, अशाप्रकारे मुराररावांचे आणि पेशव्यांचे पुन्हा सख्य झाले. सावनूरच्या लढाईत मुराररावांनी सावनूरकरांस दिलेला शब्द मोडला नाही. अखेरपर्यंत ते नबाबासोबतच होते. अखेर तह करण्याशिवाय पर्याय नव्हता म्हणून

---

७४. कदम, उमेश अ., **फ्रेंच मराठा संबंध,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. ११८.
७५. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१४४.
७६. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. १०५.
७७. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ. ३६१.
७८. कदम, उमेश अ., **पूर्वोक्त,** पृ. १२३.

त्यांनी पेशव्यांकडून आपली कर्नाटकातील स्वतंत्र कारभाराची इच्छा पूर्ण करुन घेतली. पुढे पेशव्यांनी इ.स. १७५७ मध्ये कर्नाटकात श्रीरंगपट्टण येथे स्वारी केली यावेळी म्हैसूरच्या राज्यावर खंडणी लावणे आणि शहाजी राजांची कर्नाटकातील पहिली जहागिर असलेले बाळापूर, कोलार, होसकोंटे हा प्रदेश काबीज करणे हा पेशव्यांचा उद्देश होता.[७९] याप्रसंगी मुराररावांनी पेशव्यांना संपूर्ण मदत केली, यानंतर पेशव्यांच्या कारकिर्दीच्या अखेरपर्यंत मुराररावांनी पेशव्यांना सहाय्यच केलेले दिसते.

म्हैसूरचा राजा ओडियार आणि त्याचा दिवाण नंदराज यांच्यातील संबंध बिघडत चाललेले होते त्यामुळे नंदराजला शिक्षा करण्यासाठी म्हणून म्हैसूरच्या राजाने पेशव्यांना मदतीसाठी बोलविले होते. पेशवे तात्काळ सदाशिवरावभाऊंस सोबत घेऊन १ जाने. १७५७ रोजी श्रीरंगपट्टणवर चालून गेले. पेशव्यांना यावेळी मुरारराव आणि मुजफ्फरखानाचे ही सहकार्य होते. पेशव्यांनी श्रीरंगपट्टणला वेढा दिला आणि जबरदस्त खंडणी मागितली. सत्तावीस दिवस तोफांचा मारा सुरु होता. अखेर महादशेट वीरकर या सावकाराच्या मध्यस्तीने बत्तीस लाखावर तह करुन पेशव्यांनी वेढा उठविला.[८०] पुढे १४ जाने. १७६१ रोजी मराठ्यांना पानिपतच्या रणांगणावर फार मोठ्या पराजयास सामोरे जावे लागले. पानिपतच्या पराजयात सदाशिवरावभाऊ मृत्यूमुखी पडले. त्यांच्या मृत्यूचा नानासाहेबांच्या मनाला जबरदस्त धक्का बसला.[८१] २३ जून १७६१ रोजी नानासाहेब पेशवे निधन पावले.[८२]

### ४.२.३ राजे मुरारराव आणि माधवराव पेशवे :

पानिपतच्या पराभवानंतर मराठ्यांमध्ये निराशेचे वातावरण तयार झालेले होते. त्यांच्यात पुन्हा उर्जा फुंकणे आवश्यक होते अशा आवश्यकतेच्या वेळी नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू झाला त्यावेळी मराठ्यांच्या सुदैवाने दुरदर्शी व मुत्सद्दी अशा माधवरावांना २० जुलै १७६१ रोजी पेशवाईची वस्त्रे मिळाली.[८३] त्यांनी आपल्या अल्प वयातच आपले कर्तृत्व दाखवून दिले आणि मराठी सत्तेचा पुन्हा जम बसविला. या कामी पेशव्यांना दक्षिण भारतात मुरारराव घोरपडे यांचे सहाय्य मिळाले. नानासाहेब पेशव्यांच्या काळात मुराररावांनी दक्षिणेकडे आपले सामर्थ्य वाढविले होते. ही गोष्ट खुद्द

---

७९. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ. ३६४.

८०. **कित्ता,** पृ. ३६४.

८१. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१४९.

८२. गर्गे, स. मा., **करवीर रियासत,** आवृत्ती- ऑक्टो. २००२, पृ. २७७.

८३. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. ११६.

पेशव्यांच्या लक्षात आलेली होती. सावनूरच्या लढाईत मुराररावांनी जी हिम्मत दाखवली ती पेशव्यांना प्रभावित करणारी होती. त्यानंतर नानासाहेबांनी मुराररावांना न दुखविण्याचे धोरण अवलंबिलेले होते, हा अनुभव लक्षात घेऊनच माधवरावांनी मुराररावांशी सख्य जोडलेले होते, आणि वेळप्रसंगी त्यांचा सल्लाही ऐकला.[८४]

माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत रघुनाथरावांनी (राघोबा) त्यास सहाय्य केले असते तर पण सोडा, खरोखरच काहीही न करता तो हरी-हरी करीत किंवा स्नानसंध्या करीत स्वस्थ बसले असते तरी मराठी राज्याची खूपच प्रगती झाली असती.[८५] अशावेळी कर्नाटकात मुरारराव ज्यांचा पक्ष स्विकारतात तो पक्ष बळकट होतो हे माधवरावांना कळण्यास वेळ लागला नाही. त्यामुळे माधवरावांच्या कारकिर्दीत मुराररावांना महत्वाचे स्थान मिळत गेले. पेशव्यांनी आपल्या कारकिर्दीत छत्रपतींना सांगून मराठ्यांचे 'सेनापती' ह्या पदावर मुराररावांची नेमणूक केली.[८६] म्हणूनच माधवरावांच्या कारकिर्दीत मुराररराव आणि पेशवे यांच्यातील मैत्रीचे अनुबंध टिकून राहीले. कर्नाटकात यावेळी हैदरअलीचा उदय झालेला होता. हैदरचा बंदोबस्त करण्यासाठी माधवरावांना मुराररावांनी प्रत्येकवेळी मदत केलेली दिसते.

पेशवेपद घेतल्यानंतर कर्नाटकात हैदरचा बंदोबस्त करण्यासाठी पेशव्यांनी पहिली स्वारी केली. ही स्वारी करतांना मुराररावांच्या सहकार्याशिवाय ही मोहिम यशस्वी होणार नाही अशी त्यांची खात्री होती. यासाठीच त्यांनी मुराररावांशी पत्रव्यवहार करुन आपल्या स्वारीविषयी त्यांना कल्पना दिलेली होती. या संदर्भात रियासतकार सरदेसाई यांनी म्हटले आहे की, 'कर्नाटकाच्या संबंधात मुराररावाचे प्रस्थ भारी असून त्यास वश केल्याशिवाय माधवरावांचा उद्योग टिकावू होण्याजोगा नव्हता अर्थात त्यांची समजूत करुन सहाय्यास आणण्याची तजवीज पूर्वीच केलेली होती.'[८७]

हैदरने पेशव्यांच्या माघारी मुराररावांवर हल्ला करुन त्यांचा प्रदेश जिंकून घेतला होता. त्यावेळी पेशव्यांनी इ.स. १७६५ मध्ये हैदरचा पराभव करुन त्यास मुराररावांचा प्रदेश परत देऊन त्यास कधीही उपद्रव देऊ नये असा तह करण्यास भाग पाडले. त्यामुळे पेशवे व मुराररावांचे संबंध

८४. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१५१.
८५. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ.१२.
८६. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८१.
८७. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. १५४.

अधिकच घट्ट झाले. मुराररावांना दक्षिणेतील प्रदेशांची विशेष माहिती असल्यामुळे पेशवे त्यांना नेहमीच आपल्या स्वारीच्या वेळी सैन्याच्या आघाडीवरच ठेवत त्यातून पेशव्यांचा मुराररावांवरील विश्वास स्पष्ट होतो. हैदरचा पुरता बंदोबस्त न झाल्याने २६ ऑक्टो. १७६६ रोजी माधवराव पेशवे कर्नाटकाच्या मोहिमेवर निघाले त्यावेळी मुराररावांना अतिशय आनंद झाला व त्यांनी खुशीत पत्र लिहले, "पेशव्यांना पूर्ण जाणीव आहे की, आपल्या योजनेस विरोध करण्याचा विचारही माझ्या मनात येणार नाही. मी खोगीर चढवून आपणापुढे सादर होईल."[८८]

पेशव्यांनी मदगिरी काबीज केल्यावर चेन्नरायदुर्गास वेढा दिला, त्याबरोबरच मडकशिरे आणि दुसरी काही ठाणीही ताब्यात घेतली होती ती जिंकून मुराररावांच्या स्वाधिन करण्यात आली. (मार्च १७६७) रियासतकारांनी म्हटल्याप्रमाणे "नुसत्या दबकावणीने साधेल तितके पदरांत पाडून घेण्याचा तो (मुरारराव) प्रयत्न करी यामुळे एकाच पक्षास किंवा एकाच कार्यक्रमात अडकून राहणे त्याने कधी स्वीकारले नाही. पेशवा, इंग्रज, फ्रेंच, निजाम इत्यादी कोणी त्यास जरब दाखवू लागले की नरमाई धारण करुन तो केवळ वेळ मारुन नेत असे. जो कोणी त्याजकडे साह्य मागण्यास येई त्या प्रत्येकास खुष ठेवून व तोंडावर गोड बोलून समाधान करी."[८९] मात्र माधवराव पेशव्यांच्या काळात मुराररावांनी माधवरावांना सर्वतोपरी सहकार्य केलेले दिसते. त्यामुळे पेशव्याच्या दहा-अकरा वर्षाच्या कारकिर्दीत मुरारराव आणि पेशव्यांची मैत्री कायम होती.

माधवरावांच्या कारकिर्दीत रघुनाथरावांमुळे पेशव्यांच्या गृहकलहाला उघडपणे सुरुवात झाली. माधवरावांनी शिंदे, होळकर, कानडे, बिन्नीवाले वगैरे सरदारांमार्फत राजपुतांना व बुंदेलखंडात तर घोरपडे, पानसे, फडके, पटवर्धन वगैरे सरदारांमार्फत कर्नाटकात मराठ्यांचा अंमल स्थिर केला.[९०] माधवरावांनी राजघराण्याशी संबंध फार चांगले ठेवले. दरम्यान १८ नोव्हेंबर १७७२ रोजी माधवराव पेशव्यांचे अकाली निधन झाले.[९१] त्यापूर्वी त्यांनी दिल्लीपासून श्रीरंगपट्टणपर्यंत सत्ता प्रस्थापित केली. त्यांच्या कर्नाटकातील प्रत्येक स्वारीत मुरारराव माधवरावांबरोबर होते. माधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे बंधु नारायणराव यांना १३ डिसें. १७७२ रोजी सातारकर छत्रपती रामराजा यांनी

---

८८. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८३.
८९. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ. ३६३.
९०. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. १२२.
९१. गर्गे, स. मा., **करवीर रियासत,** आवृत्ती- ऑक्टो. २००२, पृ. २९३.

पेशवाईची वस्त्रे दिली.[९२] परंतु रघुनाथरावांच्या त्रासामुळे नाना फडणविसाने पुढाकार घेऊन बारभाई मंडळाची स्थापना केली. हैदर विरुध्द लढतांना मात्र पुढे मुराररावांना एकट्यानेच लढावे लागले.

## ४.३ राजे मुरारराव व परकीय सत्ता :

भारताच्या इतिहासांतील अठरावे शतक हे बऱ्याच इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासाचे शतक असल्याचे नमूद केले आहे. याच शतकात उत्तर व दक्षिण भारतात मराठ्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर आपला दबदबा निर्माण केला आणि आपले सामर्थ्यशाली राज्य स्थापन केले. याच शतकात भारतामध्ये मोगल मराठे, अनेक ठिकाणचे नबाब, निजाम, हैदरअली अशा काही प्रमुख सत्ता होत्या. त्यांच्या एकमेकांमधील संघर्षाचा फायदा मोठ्या प्रमाणात परकीय सत्तांनी घेतला. याच शतकात मराठ्यांचे एतद्देशीय तसेच परकीय सत्तांशी संबंध मोठ्या प्रमाणात येऊ लागले. राजे मुराररावांच्या कार्यकाळात त्यांचे दक्षिणेतील तंजावर वगळता जवळपास सर्वांशीच छोटे मोठे संघर्ष झाले. यामध्ये मुराररावांचा दबदबा फार मोठा होता. त्यांनी समकालीन परकीय सत्तांशी देखील उत्तम संबंध ठेवले. यामध्ये फ्रेंच, इंग्रज यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. ज्यावेळी ह्या सत्ता मुराररावांच्या तसेच मराठ्यांच्या हिताच्या आड येत त्यावेळी त्यांना मुरारराव आपल्या अजोड पराक्रमाने उत्तर देत. मुराररावांच्या पराक्रमाविषयी अनेक परकीय इतिहासकारांनी गौरवोद्‌गार काढलेले आहेत.

### ४.३.१ राजे मुरारराव व फ्रेंच संबंध :

फ्रेंचांचे मराठ्यांशी प्रथम संबंध डिसेंबर १६६८ मध्ये निर्माण झाले. राजापूर हे कोकण किनारपट्टीवरील छोटेसे बंदर शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखाली होते. फ्रेंचांनी राजापूरला आपली वसाहत केली.[९३] शिवाजी महाराजांच्या भेटीला फ्रेंच अधिकारी गेले त्यावेळी महाराजांनी त्यांना वस्त्रे दिली व सर्व राज्यात व्यापार करण्याचे फर्मान दिले. त्यापुर्वी २ ऑगस्ट १६६४ मध्ये फ्रेंच राजा चौदावा लुई याने फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली.[९४] फ्रान्सचे भारतातील आगमन हे

---

९२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृत्ती- २०१२, पृ. २९९.

९३. श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, (संपा.), **शिवकालीन पत्र-सार-संग्रह, खंड पहिला,** आवृत्ती- ऑगस्ट २००९, पृ.३४४.

९४. गर्गे, स. मा., (संपा.), **ब्रिटिश रियासत, खंड पहिला,** आवृत्ती- २०१२, पृ. ३९१.

प्रामुख्याने व्यापारी फायद्यासाठी असले तरी नंतर मात्र येथील सत्ताधिश होण्याची स्वप्ने ते पाहू लागले. ११ ऑगस्ट १६६६ रोजी मोगल बादशहा औरंगजेब याने फ्रेंचांना सुरत येथे वखार सुरु करण्यासाठीचे फर्मान देऊ केले.[९५] सोळाव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत भारतामध्ये आलेल्या पाश्‍चिमात्य राष्ट्रांमधील फ्रान्स हे शेवटचे राष्ट्र होते. भारतीय सैनिकांना युरोपीय शिस्तीचे सैनिकी प्रशिक्षण देण्यास सुरुवात पहिल्यांदा फ्रेंचांनी केली. भारतामध्ये आपल्या वसाहती निर्माण करण्याचे प्रस्ताव तसेच येथील राजकीय स्थितीचा फायदा घेऊन येथील राज्याच्या राज्यकारभारामध्ये हस्तक्षेप करण्याचे प्रयत्न डुप्ले नावाच्या फ्रेंच गव्हर्नरने सुरु केले.

इ.स. १६७३ च्या सुमारास फ्रेंचांनी एका मुसलमान अधिकाऱ्याकडून एक छोटे गाव घेतले आणि तेच पुढे पाँडेचरी या नावाने ओळखले जाऊ लागले.[९६] हीच त्यांची भारतातील सर्वोत्कृष्ट वसाहत होती.[९७] दक्षिण भारतातील राजकारणात मुराररावांचे प्रस्थ वाढलेले होते. अशावेळी कर्नाटक ताब्यात घेण्याच्या उद्देशाने चंदासाहेबाने फ्रेंच सेनाधिकारी डुप्ले यांच्याकडे मराठ्यांशी लढण्याकरिता मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. फ्रेंचही अशा प्रकारच्या संधीची वाटच पाहत असावेत. त्याने लगेच चंदासाहेबास मदतीचे आश्वासन दिले. हिंदी राजकारणात हस्तक्षेप करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.[९८] या प्रसंगात डुप्लेचे दुटप्पी धोरण स्पष्ट दिसत होते. एकीकडे चंदासाहेबाला चिथावणी देऊन तंजावरचा उपद्रव चालू ठेवायचा पण त्याचबरोबर मराठ्यांचा रोष ओढवेल एवढ्या मर्यादेपर्यंत जायचे नाही, यावरुन मुराररावांच्या सामर्थ्याची कल्पना येणे सहज शक्य आहे. चंदासाहेबाने मात्र कर्नाटकाचा नबाब अन्वरुद्दीन याच्यावर स्वारी केली. त्यात अन्वरुद्दीन ठार झाला त्याचा मुलगा महंमदअली कसाबसा त्रिचनापल्लीस निघून गेला. या विजयामुळे मुजफ्फरजंगाने स्वतःला दक्षिणेचा सुभेदार म्हणून घोषित केले आणि चंदासाहेबाला कर्नाटकची नबाबगिरी दिली.

डिसेंबर १७४९ ला छत्रपती शाहूंचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर फ्रेंच आणि चंदासाहेब यांनी तंजावरच्या पर्यायाने मराठ्यांच्या राज्याविरोधी आपल्या कारवायांस पुन्हा प्रारंभ केला होता.[९९] चंदासाहेबांच्या या भूमिकेमुळे मुराररावांचे चंदासाहेबांशी जुनेच शत्रूत्व होते. कर्नाटकात चंदासाहेबाने

---

९५. कदम, उमेश अ., **फ्रेंच मराठा संबंध,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. ३२.
९६. कुलकणी, अ.रा., **कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी)**, आवृत्ती- डिसें. २००४, पृ. ४०.
९७. कदम, उमेश अ., **पूर्वोक्त,** पृ. २८.
९८. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.११६.
९९. कदम, उमेश अ., **पूर्वोक्त,** पृ. ९२.

फ्रेंचांच्या मदतीने आपला एक गट तयार केला. चंदासाहेब, फ्रेंच आणि मुजफ्फर जंग हे स्वस्वार्थासाठी एकत्र आले. त्यामुळे सहाजिकच नासिरजंग, महंमदअली आणि मद्रासचा इंग्रज गव्हर्नर असा दुसरा गट तयार झाला. मुरारराव स्वाभाविकच नासिरजंगाच्या गटास सामील झाले. या संपूर्ण लढाईत मुराररावांनी आपल्या पराक्रमास साजेशी अशीच कामगिरी केली. डुप्लेने मुराररावांच्या खास दूतांशी संपर्क करुन त्यांच्या प्रमुखांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न सुरु केला. आनंदरंग पिल्ले याने त्याच्या टिपण वहीत नोंद केली आहे की, ''गव्हर्नर आणि मॅडम डुप्ले यांनी खाजगीत नारोपंडित, गोविंदराव आणि सुभराव यांना निराळे बोलावून घेतले व सांगितले की, त्यांनी जर काहीही करुन मुरारीरावांचे सहकार्य संपादन केले तर त्यांना इच्छित बक्षिसी देऊन खूष करण्यात येईल.''[१००]

इ.स. १७५२ पर्यंत वाटाघाटी शेवटच्या टप्प्यात पाहोचल्या होत्या. चार दिवस करारासंबंधी वाटाघाटी झाल्या आणि नंतर कराराची कलमे दोन्ही पक्षांनी मान्य केली. डुप्ले* ह्या फ्रेंच गव्हर्नरच्या चरित्रकार मार्टिन याने या कराराविषयी तपशिलवार माहिती दिलेली आहे. या करारातील कलमे पुढीलप्रमाणे होती.

१) कर्नाटकातील फ्रेंचानी मुराररावांना दरमहा दीड लाख रुपये द्यावेत.

२) ड्युप्ले मुराररावांसाठी हौसकोट, कोलार, पेनूकोंडा हे किल्ले आणि त्या किल्ल्याभोवतालची जहागरी एवढा प्रदेश मिळवून देईल.

३) किल्ला जिंकल्यानंतर किंवा लढाई जिंकल्यानंतर त्यावर जी संपत्ती आणि शस्त्रे हस्तगत होतील ती दोघांनी निम्मी-निम्मी वाटून घ्यावीत.

४) मुराररावांनी त्या प्रदेशातील बखेडे संपेपर्यंत आणि ड्युप्लेने परवानगी देईपर्यंत आपल्या सैन्यासह फ्रेंचांच्या बाजूने जय्यत तयार रहावे.

५) मुराररावांच्या सैन्याला २० डिसेंबर १७५२ पासून फ्रेंचांकडून रोजमुरा मिळावा. (यावेळी मुराररावांजवळ चार हजार घोडस्वार आणि दोन हजार पायदळ होते.)

६) मुराररावांनी याडीकी आणि ताडपत्री हे दोन तालुके मागितले होते ते लीजवर (भाडे पट्ट्यावर) देण्यात आले.[१०१]

---

१००. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ७२.
१०१. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. १३१.
* परिशिष्ट क्र. ३२.

या करारामुळे डुप्लेने मुराररावांचा कर्नाटकातील चौथ घेण्याचा हक्क मान्य केला. चौथाईचा हक्क म्हणजे नियमित कर नव्हता. तर तो प्रबळ व्यक्तीने प्रांतातील जनतेकडून वसूल करावयाचा एक जादा अधिकार होता.[१०२] यावरुन मुरारराव कर्नाटक प्रातांतील सामर्थ्यशाली व्यक्तिमत्व होते हे पुन्हा एकदा सिध्द झाले. ठरल्यानुसार १७३५ च्या जानेवारी महिन्यात मुराररावांचे तुतारीच्या निनादात, समारंभपूर्वक जल्लोषात स्वागत केले. आनंदरंग पिल्ले आपल्या डायरीत लिहतो की, "त्यावेळी फ्रेंचांनी नुकते मुर्तझाअलीस अर्काटचा नबाब म्हणून घोषित केले होते व त्याचा जेवढा जंगी पाहूणचार केला होता त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त शाही पाहूणचार मुराररावांचा केला. व्यक्तिशः त्यांना हत्ती घोडे यांचा नजराणा देण्यात आला. तसेच माणिक जडवलेल्या जवाहरांचा त्यांच्यावर वर्षाव करण्यात आला."[१०३]

फ्रेंचांनी मुराररावांना सर्वतोपरी मदत करुन एकत्र तिरुवेत्तीचा किल्ला जिंकून घेण्याचे आश्वासन तर दिले परंतु वास्तविक स्थिती वेगळीच होती. त्यांनी ऐनवेळेवर कच खाल्ली यामुळे मुराररावांना एकट्याच्या बळावर लढाई द्यावी लागली. या प्रसंगी मुरारावांचे सैन्य आणि इंग्रजांच्या लष्करी तुकड्या यांच्यात जोराची लढाई झाली. मुराररावांनी इंग्रजांचे बरेच नुकसान केले, त्यांची रसद मोडली. परंतु या लढाईत मुराररावांचे बंधू भुजंगराव मारले गेले. फ्रेंचाच्या कचखाऊ धोरणामुळे मुराररावांची निराशा झाली. मे १७५३ मध्ये मुराररावांनी किल्ला जिंकून घेतला. फ्रेंचाच्या या दुटप्पी वागण्यामुळे मुराररावांना दुःख झाले त्यांनी याबद्दल तक्रारही केली. मुराररावांनी डुप्लेस खलिता पाठवून आपली नाराजी व्यक्त केली, "फ्रेंच लोक म्हटल्याप्रमाणे मदत देत नाहीत, तुमच्या (फ्रेंचांच्या) भरवशावर आम्ही आघाडीवर गेलो, पण फिरंग्यानी आमची मदत केली नाही ते पळून गेले त्यात आमचे फार नुकसान झाले."[१०४] यापूर्वी मुराररावांनी तिरुवेत्तीचा किल्ल्या जिंकण्यासाठी फ्रेंचाकडे अनेकदा तोफांची आणि दारुगोळ्याची मागणी केली होती, परंतु फ्रेंचाकडून त्यांना फारसे सहकार्य मिळाले नाही.

हैद्राबादच्या निजामाला फ्रेंच आपला भारतातील पारंपारिक मित्र समजत असत. त्यामुळेच फ्रेंच अधिकारी बुसीने* मुजफ्फरजंग यास हैद्राबादच्या गादीवर बसण्यास मदत केली.[१०५] निजामही

---

१०२. गवळी, पी. ए., **मराठ्यांचा इतिहास,** आवृत्ती- जाने. १९९९, पृ. १३५.

१०३. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ७३.

१०४. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. १३८.

१०५. Jackson, A. V. Williams, (Edi.), **History of India,** Edition- 1907, Pg. 119.

* परिशिष्ट क्र. ३३.

फ्रेंचांना अनुकुल असेच वागत असे. त्याने फ्रेंचांची एक लष्करी तुकडी आपल्याकडे ठेवली होती. असे करणारा तो भारतातील पहिला सत्ताधिश होता.[१०६] फ्रेंचांनी दक्षिणेतील राजकारणात हस्तक्षेप करुन आपला स्वार्थ साधण्याचाच प्रयत्न केला. पेशव्यांशी त्यांनी मैत्रीचे संबंध ठेवले. हैदर आणि टिपू यांचे फ्रेंचाशी सख्य होते असे असले तरी ते एकमेकांचा स्वफायद्यासाठी उपयोग करतांना दिसतात. राजे मुराररावांच्या दक्षिणेतील प्रस्थाचा आपणास जोपर्यंत फायदा आहे तोपर्यंत फ्रेंचांनी मुराररावास मदत केली परंतु मुराररावांची फ्रेंचाबद्दलची अपेक्षा हळूहळू कमी झाली.

### ४.३.२ राजे मुरारराव व इंग्रज संबंध :

फ्रेंच भारतात येण्यापुर्वी इंग्रजांचे भारतात आगमन झालेले होते. राणी एलिझाबेथच्या कारकिर्दीत लंडनमध्ये ३१ डिसेंबर १६०० रोजी 'युनायटेड कंपनी ऑफ मर्चंटस् ऑफ इंग्लंड ट्रेडिंग टु द इस्ट इंडिया' या नावाने लंडन कंपनीची रितसर स्थापना झाली. हिलाच पुढे ईस्ट इंडिया कंपनी असे नाव पडले. या कंपनीचा मुख्य उद्देश, व्यापाराची मक्तेदारी टिकविणे, व्यापारात स्पर्धा करणाऱ्या इतर कंपन्यांना हुसकावून लावणे आणि पूर्वेकडील सत्तांकडून कमीतकमी खर्चात जास्तीत जास्त व्यापारी हक्क मिळविणे असा होता.[१०७] १६०८ साली कंपनीचा प्रतिनिधी कॅप्टन विल्यम हॉकिन्स मोगल सम्राट जहाँगीर याच्या भेटीसाठी आग्रा येथे आला. तेव्हा जहाँगीरने त्यास सुरतेस वखार घालण्याची परवागनी दिली.[१०८] तेव्हापासून इंग्रजांनी भारतातील आपल्या व्यापाराला वेग दिला. मोगल बादशाहीच्या पडत्या काळात निजाम-उलमुल्क, मराठे सरदार, इंग्रज, फ्रेंच वगैरे अनेक मंडळी राज्यप्राप्तीकरिता उत्सुक होऊन उद्योग करुन लागले.[१०९]

कर्नाटकातील राजकारणात ज्यावेळी नासिरजंग व मुजफ्फरजंग असे दोन गट पडले त्यावेळी इंग्रज व मुराररावांच्या संबंधास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या संघर्षात मुरारराव व मद्रासचा इंग्रज गव्हर्नर यांनी नासिरजंगाची बाजू घेतली होती. या प्रसंगी मुराररावांच्या पराक्रमाविषयी एक इंग्रज इतिहासकाराने अत्यंत मार्मिक वर्णन केलेले आहे. तो म्हणतो की, "नासिरजंगाने मराठ्यांच्या तीन लष्करी तुकड्यांची मदत घेतली. प्रत्येक तुकडीत दहा हजार सैन्य होते. यापैकी एका तुकडीचे

१०६. कदम, उमेश अ., **फ्रेंच मराठा संबंध,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. ३८.
१०७. कुलकणी, अ.रा., **कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी),** आवृत्ती- डिसें. २००४, पृ. ५.
१०८. गर्गे, स. मा., (संपा.), **मुसलमानी रियासत, खंड दुसरा,** आवृती- २०१२, पृ. १७१.
१०९. गर्गे, स. मा., (संपा.), **ब्रिटिश रियासत, खंड पहिला,** आवृती- २०१२, पृ.४०६.

अधिपत्य मुराररावांकडे होते... यावेळी सर्वात अवघड जबाबदारी मुराररावांना देण्यात आली. त्यांनीही ती मोठ्या हिंमतीने स्वीकारली. फ्रेंचांच्या तोफखान्याला तोंड देणे सोपे नव्हते. आधुनिक स्वरुपाचा दारुगोळा आणि शस्त्रे फ्रेंचाजवळ होती. त्यामुळे त्यांचा मारा अधिक अचूक असे. पण मुराररावांनी त्या माऱ्याला तोंड दिले. आपल्या सैन्याची अशी रचना केली की फ्रेंचाच्या दारुगोळ्याने आपले कमीत कमी नुकसान व्हावे आणि त्या बरोबरच फ्रेंचांचा जास्तीत जास्त दारुगोळा वाया जावा. मुराररावांची ही युक्ती बव्हंशी सफल झाली. फ्रेंचांना नदी ओलांडून येता आले नाही. त्यांना नदीच्या दुसऱ्या काठावर अडवून ठेवण्यात मुराररावांना यश आले."[११०]

इंग्रजांनी दक्षिण भारतात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. ते एका राज्यकर्त्याचे दुसऱ्या राज्यकर्त्यांशी भांडण लावून देऊन स्वत:चा फायदा करुन घेण्यात तरबेज होते. इ.स. १७५१ मध्ये रॉबर्ट क्लाईव्हला इंग्रज सैन्यात कॅप्टन म्हणून नियुक्त केले गेले. त्यावेळी अर्काटच्या वेढ्यात त्याने दाखविलेल्या युध्दचातुर्यामुळे तो एकदम प्रसिध्दीस आला. क्लाईव्ह अर्काटच्या वेढ्यात गुंतलेला होता. तो मोठ्या शर्थीने किल्ला लढवत होता पण त्याला यश येण्याची चिन्हे दिसत नव्हती. त्यावेळी अर्काटच्या पश्चिमेला ३० मैलावर मुराररावांची छावणी पडलेली होती. त्यांच्याजवळ सहा हजार घोडदळ हजर होते. क्लाईव्हने मदतीसाठी मुराररावांकडे निरोप पाठवला.[१११] मुराररावांनी त्यास मदत केली नसती तर त्याच्यावर व त्यांच्या सैन्यावर उपासमारीची वेळ आली असती. मुराररावांनी त्याची या वेढ्यातून सहिसलामत सुटका केली. मुराररावांकडे सैन्य थोडे पण अत्यंत व्यवस्थित होते. इंग्रजांना अनेक वेळा साह्य केल्याबद्दल इंग्रजांनी मुराररावांची स्तुती केलेली आहे.[११२]

मुराररावाचे कायम शत्रूत्व केवळ हैदरसोबत होते. त्याच्याशी त्यांचा नेहमीच संघर्ष होत असे. हैदर इंग्रजांविरुध्द गनिमी काव्याचा वापर करुन त्यांना जेरीस आणीत असे. जानेवारी १७७० मध्ये हैदरविरुध्द इंग्रजांनी युध्द सुरु केले, ही लढाई जिंकण्यासाठी इंग्रजांना मुराररावांच्या मदतीखेरीज यश मिळवणे शक्य नव्हते. त्यामुळे इंग्रजांनी मोठी फौज जमा करुन कर्नाटकात बालेघाट प्रांती आपला तळ उभारला आणि मुरारराव घोरपडेंस सहाय्य करण्याची विनंती केली. मुराररावास ही

११०. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१३०.
१११. Macfariance, Charies, **A History of British India,** Edition-1853, Pg. 26.
११२. गर्गे, स. मा., (संपा.), **ब्रिटिश रियासत, खंड पहिला,** आवृती- २०१२, पृ.४१८.

संधीच होती. हैदरचा बंदोबस्त करणे त्यांच्यासाठीही आवश्यकच होते. त्यांनी लगेच आपल्या बरोबर सहा हजार निवडक स्वार आणि काही गारदी घेतले आणि ते इंग्रजांकडे गेले.[११३] यावेळी मुराररावांनी कल्पकता आणि समयसूचकता दाखवून स्वत:चे महत्व पून्हा एकदा सिध्द केले.

मुराररावांचे कर्नाटक प्रांतातील प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्यांचे पाठबळ आपल्याला मिळावे यासाठी तत्कालीन सत्तांची चढाओढ सुरु झाली. एका इंग्रज इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे, ‘‘मुराररावांचे सामर्थ्य एवढे वाढले होते की, त्यांच्यासंबंधी दक्षिण भारतातील प्रमुख सत्ताधिशांच्या मनात एक प्रकारे दहशत बसवली होती. हैदरअली मुराररावांचा द्वेष करीत होता. पेशवे त्याची अजीजी करीत असत. इंग्रज आणि फ्रेंच ते आपल्या बाजूस यावेत यासाठी धडपड करीत असत. अर्काट, सावनूर, कडप्पा या ठिकाणचे नबाब त्याला वचकून असत.’’[११४] त्याचे कर्तृत्व तत्कालिन इतिहासाच्या चौकटीत तरी अनन्यसाधारण म्हणावे लागेल. राजे मुराररावांचे समकालीन परकीय सत्तांशी अशाप्रकारचे संबंध होते.

## ४.४ राजे मुरारराव व हैदरअली संघर्ष :

राजे मुरारराव आणि हैदरअली या दोघांमध्ये एका पिढीचे अंतर होते. उत्तरेत पानिपतची लढाई (इ.स. १७६१) झाली आणि त्यात मराठ्याचा पराभव झाला. यावेळी दक्षिणेत गुत्ती येथे आपले स्थान बळकट केलेल्या मुराररावांनी साठी पार केलेली होती.[११५] इ.स. १७२२ मध्ये कर्नाटकात एका गरीब नाईक घराण्यात हैदरचा जन्म झाला.[११६] वडील फतेह नाईक यांच्या अकाली निधनानंतर त्याच्या आईने अतिशय खडतर परिस्थितीत त्याला लहानाचे मोठे केले. हैदर निरक्षर होता. एका नेमबाजीच्या स्पर्धेत म्हैसूरचा सर्वाधिकारी नंदराज याच्या तो नजरेत भरला. इ.स. १७४९ मध्ये देवणहळ्ळीच्या वेढ्यादरम्यान हैदर पन्नास घोडे आणि दोनशे शिपायांचे नेतृत्व करीत होता. त्यावेळी सुध्दा हैदरने दाखविलेल्या पराक्रमामुळे नंदराजाचे लक्ष त्याच्याकडे आकर्षित झाले.

म्हैसूरच्या राजाचा पंतप्रधान असलेल्या नंदराज याच्या सेवेमध्ये हैदरअलीने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली.[११७] इ.स. १७५० मध्ये हैदरअली त्याच्या कारकिर्दीच्या प्रारंभीच्या काळात

११३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१६६.
११४. **कित्ता,** पृ. १८५.
११५. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ७६.
११६. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ. ७५.
११७. कदम, उमेश अ., **फ्रेंच मराठा संबंध,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. ३९.

हैदर नाईक या नावाने ओळखला जायचा. मोहम्मद अली आणि चंदासाहेबाच्या संघर्षात हैदरअली नंदराजासोबत तिरुचिरापल्लीला होता. (इ.स. १७५२ - इ.स. १७५५) तेथे त्याला खऱ्या अर्थाने युध्द कलेचे प्रशिक्षण मिळाले. एक योध्दा म्हणून त्याने सर्व कौशल्य उत्तम प्रकारे विकसित केली. येथूनच पुढे त्याचे लष्करी महत्व वाढत गेले. तिरुचिरापल्लीच्या युध्दात त्याने मोठा पराक्रम गाजविला. तेथेच त्याने पहिल्यांदा मुरारराव घोरपडेंना पाहिले. एक लष्करी नेता म्हणून हैदरने स्वत:च्या क्षमतेचा परिचय इंग्रज व फ्रेंचांनाही करुन दिला. नंदराजाने त्यास बहादूर हा किताब बहाल केला. आणि इ.स. १७५५ मध्ये हैदरअलीची दिंडिगूलचा फौजदार म्हणून नेमणूक करण्यात आली.[११८] यावेळपर्यंत हैदर अलीकडे पंचवीस हजारांचे बऱ्यापैकी मोठे घोडदळ आणि पाच हजाराचे पायदळ जमले होते.

म्हैसुरचा राजा ओडियार आणि त्याचा प्रधान दिवाण नंदराज यांचे संबंध दिवसेंदिवस बिघडत चाललेले होते. त्यामुळे ओडियार राजाने पेशव्यांना मदतीसाठी बोलावले. पेशव्यांनी देखील मुराररावांच्या मदतीने श्रीरंगपट्टणला वेढा दिला. इ.स. १७५६ च्या श्रीरंगपट्टणच्या युध्दात मुराररावांनी हैदरचा पराभव केला. नंदराजने तडजोडीची बोलणी सुरु केली आणि ३२ लाख रुपये देण्याचे मान्य केले.[११९] या पराभवामुळेच नंतर हैदर आणि मुराररावांमध्ये संघर्षाची ठिणगी पडली. तुंगभद्रा व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यातील प्रदेशांसंदर्भात हैदर अली आणि मराठ्यांमध्ये संघर्ष निर्माण झाला.[१२०] एखाद्या धुमकेतूप्रमाणे म्हैसूरच्या राज्याच्या क्षितीजावर चमकणाऱ्या ह्या बहाद्दराने अल्प काळांतच म्हैसूर राज्यात आपला वचक बसविला. हैदरअली शूर, पराक्रमी, महत्वाकांक्षी, उत्तम सेनानायक, कर्तबगार मुत्सद्दी आणि दूरदर्शी असा शासक होता. त्यांने दक्षिणेतील स्वत:चे लष्करी महत्व वाढवले.

१४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतच्या रणांगणावर मराठ्यांचा पराभव झाला. या पराभवाचा दक्षिण भारताच्या राजकारणावरही अप्रत्यक्षपणे बराच मोठा परिणाम घडून आला. मराठ्यांचे सामर्थ्य कमी झाल्याचे लक्षात येताच. कर्नाटकात मराठ्यांना नवे प्रतिस्पर्धी सुरु झाले. पानिपतच्या पराभवाचा धसका घेऊन जूनमध्ये नानासाहेब पेशव्यांचे निधन झाले. आणि २० जुलै १७६१ रोजी त्यांचे पुत्र माधवराव यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली.[१२१] हैदरने म्हैसुर प्रांतातील अंतर्गत हेवेदावे

---

११८. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ७७.

११९. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१४८.

१२०. कदम, उमेश अ., **फ्रेंच मराठा संबंध,** आवृत्ती- एप्रिल २०११, पृ. ३९.

१२१. ओक, प्रमोद, **पेशवे घराण्याचा इतिहास,** आवृत्ती- २००१, पृ. ११६.

आणि आपआपसातील मतभेदांचा फायदा घेऊन म्हैसूरचा राजा चिक्क कृष्णराज, वडियार, प्रधान नंदराज आणि खंडेराव ह्यास कैद केले व अशाप्रकारे हैदरअली म्हैसूरचा सर्वेसर्वा झाला.[१२२] येथूनच पुढे त्याचे लष्करी महत्व वाढले. त्याच्यामुळे म्हैसूरचे राज्य हे राजकीय व लष्करीदृष्ट्या दक्षिणेमध्ये महत्वाचे बनले. त्याने सत्ता हस्तगत करताच शिरे, होसकोटे, बाळापूर वगैरे मराठ्यांच्या कब्जात असलेले प्रांत हस्तगत केले. कडपे, कर्नूल, अर्काट, सावनूर येथील नबाबांकडून खंडणी घेतली तसेच सोंधे, चित्रदुर्ग, रायदुर्ग वगैरे हिंदु संस्थानिकांपासून सुध्दा कोट्यावधींची खंडणी घेतली.[१२३]

हैदरअलीला पेशवा माधवरावाने अंकुश लावण्याचा प्रयत्न केला, तसेच इंग्रज व निजामासोबत तह करुन त्याच्या वाढत्या अपेक्षांना मर्यादा घातल्या. हैदरने इ.स. १७५७ च्या पराभवानंतर झालेल्या तहानुसार ३२ लक्ष रुपये खंडणी त्याशिवाय या रकमेच्या फेडीकरीता मराठ्यांकडे १४ परगणे लावून देणे आवश्यक होते. परंतु त्याने ही कलमे मोडल्याने त्याचा समाचार घेऊन बंदोबस्त करणे आवश्यक होते. हैदर दक्षिणेत आपली शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करतो आहे हे देखील पेशव्यांच्या लक्षात आलेले होते. यावेळपर्यंत हैदरने आपले स्थान आणि लष्करी सामर्थ्य मुराररावांपेक्षा खूपच जास्त वाढवलेले होते. मुरारराव दक्षिणेतील संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून होते व एव्हाना आक्रमण आणि संरक्षण या दोन्ही बाबतीत पेशव्यांची साथ द्यायची, असे त्यांनी ठरवलेले होते. हैदरचे दक्षिणेतील प्रस्थ, प्राबल्य, सामर्थ्य वाढलेले असले तरी आपल्या गुत्ती या संस्थानामधून हैदर अलीची अजूनही उघड उघड अवज्ञा करण्याचे धाडस दाखवणारे मुरारराव हे बहुधा दख्खनेतील एकमेव राज्यकर्ते होते.[१२४]

माधवराव पेशव्यांनी कर्नाटकांवर म्हणजेच मुख्यत: हैदरच्या सत्तेवर इ.स. १७६२ मध्ये आपल्या चुलत्यासह पहिली स्वारी केली. ह्या स्वारीपूर्वी माधवराव पेशव्यांनी मुरारराव घोरपडेंशी मैत्रीचे संबंध जोडले. मुराररावांच्या सहकार्याशिवाय ही मोहिम फत्ते करणे अवघड आहे. ह्याची पेशव्यांना पुरेपुर कल्पना होती. त्यासाठी त्यांनी मुराररावांशी पत्रव्यवहार केला व त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. मात्र मुरारराव दक्षिणेतील परिस्थितीवर नजर ठेवूनच होते. त्यांनाही हैदरच्या सत्तेचा

---

१२२. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ७७.
१२३. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृत्ती- २०१२, पृ. ७६.
१२४. घोरपडे, मु. य., **पूर्वोक्त,** पृ. ७७.

धोका जाणवला होता. या संदर्भात रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई संबंधात मुराररावांचे प्रस्थ भारी असून त्यास वश केल्याशिवाय माधवरावांचा उद्योग टिकावू होण्याजोगा नव्हता. अर्थात त्यांची समजूत करुन सहाय्यास आणण्याची तजवीज पूर्वीच केलेली होती.[१२५]

पेशव्यांची ही मोहिम म्हणजे हैदरने मराठ्यांचे बळकावलेले प्रदेश जिंकून घेण्यासाठीच होती. मुरारराव घोरपडेंना पेशव्यांनी हैदरवर चालून जाण्याची सूचना केली.[१२६] त्यानुसार २० मार्च १७६२ या दिवशी मुराररावांनी ससैन्य हैदरवर हल्ला केला. दोन्ही लष्कर बाळापूर या ठिकाणी एकमेकांसमोर आली. या झालेल्या युध्दात मुराररावांनी आपल्या पराक्रमाने हैदरला चकीत केले. त्याचा पराभव झाला. यामुळे पेशवे दरबारात मुराररावांचा दबदबा वाढला. मुरारराव हैदरचा बंदोबस्त योग्य पध्दतीने करीत आहे हे लक्षात आले. तसेच थोड्याच दिवसात पावसाळा सुरु होणार होता त्यामुळे पेशव्यांनी जून १७६२ मध्ये आपल्या फौजा महाराष्ट्राकडे वळविल्या. पेशव्यांचे सैन्य कर्नाटकातून परत फिरताच हैदरअलीने मुराररावांच्या प्रदेशावर स्वारी केली. ही स्वारी नेमकी पावसाळ्यात केल्यामुळे मुराररावांना तयारीस वेळ मिळाला नाही. तसेच पेशवे अथवा इतर कोणाकडूनही मदत न आल्याने मुराररावांचा हैरदच्या प्रशिक्षित सैन्यासमोर निभाव लागला नाही. मुराररावांना हैदरसमोर पराभव स्विकारावा लागला. हैदरने मुराररावांचा बराच प्रदेश जिंकून घेतला. गुत्तीचे मुख्य ठिकाण टिकविण्यात मात्र मुरारराव यशस्वी झाले. हैदरने मुराररावांचे चुलतबंधू खंडेराव घोरपडे आणि इतर काही प्रमुख मराठा लोकांना पकडून कैदेत टाकले.

हैदरअलीच्या ह्या विजयामुळे त्याचा आत्मविश्वास बळावला. त्याला संपूर्ण कर्नाटकामध्ये आपली सत्ता असावी असे वाटू लागले. त्यासाठी त्याने म्हैसूरच्या पश्चिम घाटातील बिदनूरच्या संस्थानावर आक्रमण केले. इ.स. १७६३ च्या आरंभी हे संस्थान हैदरने जिंकून घेतले. शहराचे नाव बदलून त्यास हैदरनगर हे नवीन नाव त्याने दिले आणि तेथे तो एखाद्या स्वतंत्र सुलतानाप्रमाणे राहू लागला.[१२७] बिदनूरच्या राज्यात पश्चिम किनाऱ्यावर होन बंदरावर गोदी बांधून आपले लढाऊ आरमार बनविले. बिदनूरच्या भोवताली जी छोटी छोटी संस्थाने आणि किल्ले होते ते हैदरने जिंकून आपल्या

---

१२५. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. १५४.
१२६. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ. ७६.
१२७. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. १५५.

ताब्यात घेतले. इ. स. १७५७ च्या तहात पेशव्यांना म्हैसूरचा जो प्रदेश मिळालेला होता तो प्रदेशही हैदरने जिंकून घेतला त्यामुळे हैदरची सत्ता एका वर्षातच प्रबळ बनली.[१२८] हैदरच्या विजयाच्या बातम्या ऐकून माधवराव पेशव्यांच्या जिवाचा तिळपापड होत असे. परंतु निजामाबरोबरच्या लढाईत व्यस्त असल्यामुळे पेशव्यांना हैदरकडे लक्ष देता आहे नाही. त्याचवेळी मुराररावही हैदरच्या वाटेला जाण्याचा एकतर्फी निर्णय घेऊ शकत नव्हते. हैदरच्या विजयाचा मेरु त्यामुळेच उधळलेला होता.

निजामाबरोरच्या राक्षसभुवनच्या युध्दानंतर पेशव्यांनी लगेचच गोपाळराव पटवर्धनांना हैदरवर स्वारी करण्यासाठी इ.स. १७६३ च्या अखेरीस कर्नाटकात पाठविले आणि स्वत: फेब्रुवारी १७६४ मध्ये मोठ्या फौजेसह कृष्णानदी ओलांडून हैदरवर स्वारी केली. यावेळी देखील पेशव्यांच्या मदतीसाठी मुरारराव हिंदुराव घोरपडे आपल्या चार हजार निवडक सैन्यासह पेशव्यांच्या फौजेसोबत भेटले. सावनूरच्या प्रमुखांनीही आपली फौज पेशव्यांच्या मदतीसाठी आणली. त्यांच्या सैन्यात दोन हजाराचे घोडदळ आणि एक हजारांचे पायदळ होते. हैदरने सावनूरचा प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु एवढ्या मोठ्या फौजेसमोर त्याने माघार घेतली. एप्रिल १७६४ च्या एका मराठी वार्तापत्रात पुढीलप्रमाणे नोंद आहे, “आपले (मराठ्यांचे) सैन्य थांबत थांबत येथे येऊन पोहोचले. सावनूरकरांना वाचवण्यात आले आहे, तसे केले नसते, तर दहा हजाराचे सैन्य घेऊन मीर फैझुल्ला ‘हनगळ’ वर चाल करुन आला असता. सावनूरकरांचा खातमा करण्याचा त्याचा मनसुबा होता, मात्र पेशवे त्वरेने तेथे पोहोचले.”[१२९]

हैदरला मराठ्यांच्या सैन्याशी समोरासमोर युध्द करणे शक्य नव्हते. मुराररावांचे सैन्य, सावनूरचा नबाब, गोपाळराव पटवर्धन, विचूंरकर, तसेच स्वत: पेशवे या सर्वांचा प्रयत्न हैदरला मोकळ्या मैदानात आणून त्याचा पराभव करावा असा होता. परंतु हैदर घाईघाईने सावनूरपासून काही अंतरावर असणाऱ्या दाट झाडीत लपून बसला. समोरासमोर मैदानावर मराठ्यांशी झुंज देणे अशक्य आहे हे तो ओळखून होता. त्यामुळे त्याने डोंगरांचा व जंगलांचा आश्रय घेऊनच मराठ्यांच्या सैन्यावर छापे घालावेत आणि त्यांना हैराण करावे हे धोरण आपल्या सरदारांस सांगितले होते.[१३०] मराठ्यांशी

---

१२८. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ. ७७.
१२९. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८१.
१३०. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ७९.

हैदरला हुलकावणी देण्यासाठी चित्रदुर्ग आणि हरदनहल्ली या संस्थानात जाण्याचा बहाणा केला. त्यामुळे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हैदरने आपल्या छावणीपासून काही अंतरावर चाल केली त्यावेळी पटवर्धन आणि विंचूरकर यांच्या सैन्याने त्याला चांगलेच घेरले, परंतु सायंकाळची वेळ असल्यामुळे हैदर संधीचा फायदा घेऊन निसटला आणि आपल्या छावणीत पोहोचला.[१३१]

माधवराव पेशव्यांना हैदरचा पूरता बंदोबस्त करणे आवश्यक होते, कारण अनेक मराठे सरदार पेशव्याशी फटकून वागत होते.[१३२] त्यासाठी कर्नाटकातील महत्वाचे प्रस्थ असलेले मुरारराव हैदरच्या विरोधातील एक महत्वाचे शस्त्र होते. माधवरावांनी मुराररावांचा पुरेपुर उपयोग करुन घेतला. दुसरे दिवशी मराठ्यांच्या फौजेने हैदरच्या छावणीवर सरळ हल्ला केला यावेळी मुराररावांनी विशेष पराक्रम गाजवला. त्यावेळी आधिक वेळ न घालवता पेशव्यांनी सातारच्या छत्रपतीस पत्र लिहून मराठ्यांचे सेनापती पद मुराररावांच्या नावे करार करुन दिले.[१३३] पदाच्या सनदा सप्टेंबर १७६५ रोजी दिल्या. मुराररावांचे चुलत आजोबा संताजी घोरपडे जेव्हा औरंगजेबाच्या सेनापतीच्या विरोधात निकराने लढले. त्यांनी हेच पद विशेष कर्तृत्व दाखवत भूषवले होते.[१३४]

हैदर व मराठ्यांच्या ह्या लढाईत हैदरला पराभव स्विकारावा लागत होता. त्या अवधीतच एकदा हैदरचा अधिकारी मीर फैझुल्ल्याने वरदा नदीच्या तीरावरील हवेरी या ठिकाणी मराठ्यांवर हल्ला चढवला. मुरारराव घोरपडे जर मदतीला धावून आले नसते आणि त्यांनी फैझुल्लाच्या माणसांना रणांगणातून पिटाळून लावले नसते तर या लढाईत मराठ्यांना पराभव पत्कारावा लागला असता. मुराररावांसारख्या पराक्रमी राज्यकर्त्यामुळे मराठ्यांवर पराभवाची नामुष्की आली नाही. पुढे पेशव्यांनी महाराष्ट्रातून कर्नाटकात येण्यासाठीचे प्रवेशद्वार समजले जाणाऱ्या धारवाडच्या किल्ल्यास वेढा दिला. दोन महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर ६ नोव्हे. १७६६ रोजी मराठ्यांनी धारवाडचा किल्ला जिंकून घेतला, आणि किल्ल्यावर मराठ्यांचे निशाण चढले. [१३५] यावेळी मुराररावांच्या फौजेने मोठा पराक्रम गाजविला. पेशवे या विजयानंतर सावनूरला परतले. ह्यावेळी हैदर मराठ्यांच्या राहूट्या ज्या सपाट प्रदेशात टाकलेल्या होत्या त्याला लागून असलेल्या घनदाट अरण्यामध्ये दबा धरुन बसला

---

१३१. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१५६.

१३२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ. ८०.

१३३. सोवणी, अविनाश, **स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान,** आवृत्ती- एप्रिल १९९८, पृ. १०८.

१३४. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८१.

१३५. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ८३.

होता. त्याने पेशवे सावनूरकडे परतल्या नंतर ३० नोव्हेंबर रोजी बेसावध मराठ्यांवर सशस्त्र गोळीबार केला. त्याप्रसंगी अत्यंत धिरोदात्तपणे समोरच्या प्रसंगाला मुरारराव सामोरे गेले. त्यांच्याजवळ शे-दोनशे रायफलीचा समावेश असलेले घोडदळ होते. पटवर्धन आणि विंचूरकरांच्या सहकाऱ्यांनी रणांगणात गोंधळून जाऊन पळ काढला. संपूर्ण जबाबदारी एकट्या मुराररावांच्या तुकडीवर येऊन पडली. सुदैवाने पेशव्यांच्या सैन्याचा तळ जवळच्याच टेकडीच्या पायथ्याशी असल्यामुळे त्यांनी स्वत:चे खाजगी घोडदळ घेऊन हैदरवर प्रतिहल्ला केला. त्यामुळे हैदरला आपल्या तोफा रणांगणावर सोडून अरण्यात माघार घ्यावी लागली. या प्रसंगामुळे पेशवे व मुरारराव यांचे मैत्रीचे अनुबंध घट्ट झ-ाले. ३० नोव्हेंबर १७६४ रोजीच्या लढाईच्या संबंधी वासुदेव शास्त्री खरे यांनी पटवर्धन घराण्याच्या कागदपत्रांच्या आधारे तपशीलाने वर्णन केले आहे.[१३६]

ह्या युध्दामुळे हैदरचे खुप नुकसान झाले होते. मराठे मधूनमधून हैदरच्या सैन्यावर हल्ले करीत होते. १ डिसेंबर १७६४ रोजी हैदरच्या अनवडी येथील छावणीवर पेशव्यांनी जोरदार हल्ला केला.[१३७] हैदरबरोबर झालेल्या हातघाईच्या लढाईत हैदर स्वत:च थोडा जखमी झाला. जखमा फारशा गंभीर नसल्यामुळे तो तेथून निसटला, परंतु त्याचे एक हजाराहून जास्त गारदी मारले गेले आणि सहा तोफा मराठ्यांच्या हाती लागल्या. त्यात मुराररावांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी पुनश्च एकदा स्वत:तील श्रेष्ठ गुण सिध्द करुन दाखवले. मराठ्यांचा उत्साह वाढलेला असल्यामुळे पेशव्यांना बिदनूर सर करण्याची आशा होती. परंतु त्याचवेळी हैदरने समेटाची बोलणी करण्यासाठी आपले वकील पाठवले. त्याचवेळी रघुनाथराव मराठ्यांच्या छावणीत येऊन दाखल झाले. त्यांच्या दुहेरी भुमिकेमुळे पेशव्यांना तह करावा लागला याविषयीचे पत्र पेशव्यांनी आपले मंत्री फडणवीस यास लिहिले होते,"अनंतपूर सर केल्यानंतर आमचा बिदनूर काबीज करण्याचा विचार होता. हैदरने आपला वकील पाठवून फार घाईघाईने वाटाघाटी सुरु केल्या. बोलणी फार लांबवू नयेत, असे रघुनाथरावांचे म्हणणे पडले. त्यामुळे आम्ही तह केला."[१३८]

३० मार्च १७६५ रोजी तह करुन पेशव्यांनी कर्नाटकची ही स्वारी आटोपली. बोलाचाली

१३६.. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१५६.
१३७. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ. ८४.
१३८. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८३.

होऊन मीर फैजुल्लाच्या मार्फत जो तह ठरला त्याचा मजकूर ता. ३० मार्चच्या पत्रात माधवरावाने रामशास्त्रास कळविला, "हैदर नायकाचे परिपत्य करावे या अर्थी स्वारी बिदनूर प्रांती अनंतपूरास आली. ते ठाणे घेतल्यावर त्याशी गाठ घालावी इतक्यात त्यांनी वकील पाठवून बहुत आर्जव केले. तीर्थरुपांचे विचारे मसलत लांबवू नये, त्यावरुन तह केला. १) तीस लक्ष रुपये, २) बंकापूर कोटे तुंगभद्रेच्या उत्तरेकडील सर्व मुलूख आणि ३) मुरारराव घोरपडे आणि सावनूरकर यांचे तालुके देऊन तह करुन घेतला."[१३९] हैदर इतर दोन तरतुदींवर तयार होता. परंतु मुराररावांविषयीची अट त्यास मान्य नव्हती. 'मुरारराव आमचा शेजारी असून त्यापासून आम्हाला नेहमी उपद्रव होतो. म्हणून त्यास जरबेत ठेवण्याची आम्ही त्याची ठाणी घेतली ती त्यास परत देता येत नाहीत. ही आमची अट मंजूर झाली तर पेशव्यांना आम्ही बारा लक्ष रुपये खंडणी देऊ.' याच अटीत सिऱ्याचा सुभा आणि संस्थानिकांच्या खंडण्या याबद्दलची माफी मिळावी अशी हैदरने विनंती केली.[१४०] परंतु पेशव्यांनी हैदरची विनंती धुडकावून लावली. हैदरच्या वेळकाढू धोरणामुळे पेशव्यांचा त्यांच्यावरील अविश्वास वाढतच चालला होता. १२ फेब्रुवारी १७६७ रोजी माधवराव पेशवे शिऱ्यास पोहोचले त्या ठिकाणी असणाऱ्या किल्ल्यावर हैदरचा मेहुणा मीर रेझा सुभेदार होता. पेशव्याने किल्ल्यावर हल्ला करुन दहा दिवसात किल्ला जिंकून घेतला. ह्या हल्ल्याच्या वेळी मुरारराव पेशव्यांना आपल्या लष्करासह येऊन मिळाले. या मोहिमेत बाळापूर, मदगिरी हे बळकट किल्लेसुध्दा मराठ्यांनी जिंकून घेतले. ०४ मार्च १७६७ रोजी जिंकून घेतलेल्या मदगिरीच्या किल्ल्यात बिदनूरच्या राणीला हैदरने कैद करुन ठेवले होते. तिची बहुमानपूर्वक मुक्तता करण्यात आली.[१४१]

यानंतर चेनरायदुर्ग, मडकशिरे, दोड्डु, बाळापूर, चिक्क बाळापूर, मिडगेसी, देवनहळ्ळी, होसकोंटे, कोलार वगैरे महत्वाची अनेक ठाणी मराठ्यांनी जिंकून घेतली आणि कर्नाटकातील प्रमुख मराठा मुराररावांच्या स्वाधीन करण्यात आली. (मार्च १७६७) हैदरच्या ताब्यात केवळ श्रीरंगपट्टण व बिदनूर एवढाच प्रदेश राहिला. यावेळी निजामअली व इंग्रजांची मदत घेऊन हैदरचा कायमाचा बंदोबस्त करण्याचा विचार पेशवे करीत होते. त्यावेळी हैदरने लगेच पेशवे सांगतील त्या अटीवर तह

१३९. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड चवथा,** आवृती- २०१२, पृ. ८४.
१४०. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१५८.
१४१. कित्ता, पृ. १५८.

करण्यास होकार दिला. अखेर नानासाहेब पेशव्यांच्या वेळी जितका मुलूख मराठ्यांच्या ताब्यात होता तो त्यास हैदरने द्यावा, मराठ्यांनी जिंकलेला मुलूख परत द्यावा, तेहतीस लक्ष रुपये हैदराने खंडणी द्यावी व मुराररावास उपद्रव देऊ नये. त्यांचा प्रदेश परत द्यावा, या अटीवर हैदरने कबुली दिली. (७ मे १७६७)[१४२] असे असले तरी पेशवे मे १७६७ मध्ये पुण्यास परतल्यानंतर हैदरने पुन्हा दक्षिणेत मुराररावांच्या विरोधात कट कारस्थाने सुरु केली. यावेळपर्यंत निजाम व म्हैसूर राज्याकडून मुरारराव जवळपास ७ लक्ष रुपये मोकासा* (मराठ्यांची जमाबंदीची पध्दत)[१४३] वसुल करीत होते.[१४४]

मुरारराव व हैदर यांचे वैमनस्य वाढतच होते. त्यावेळी हैदरच्या हे लक्षात येत होते की, मुराररावांचा आपण पराभव करु शकत नाही. हैदर हा युध्दशास्त्रातले सर्व डाव जाणून होता. त्याने ऑक्टोंबर १७६९ मध्ये मुराररावांच्या प्रदेशावर स्वारी करुन त्यांची काही ठाणी ताब्यात घेतली व त्यांना भेटीला येण्याचे सक्तीचे निमंत्रण दिले न आल्यास, "मी तुझे राज्य बुडवण्यासाठीच आलो आहे"[१४५] असे कळवले. मुराररावही मुत्सद्देगिरी मध्ये तरबेज होते त्यांनी पुर्णपणे परिस्थितीचा विचार करुन ही वेळ मारुन नेण्यासाठी हैदरची भेट घेण्याचे ठरविले. मुरारराव हैदरच्या भेटीस गेले त्यावेळी हैदरने त्यांना कैद न करता मोठा सन्मान करुन पंचवीस हजार रुपये, शिरपेच, मोत्याची कंढी, तीन हत्ती व वस्त्रे दिली. यावरुन हैदरला देखील मुराररावांनी आपल्या विरोधकांना मदत करुन नये असे वाटत होते. दरसाल पन्नास हजार रुपये खंडणी घेण्याचा करार या भेटीत केला.

मुराररावांनी भेटीला जाण्याआधी शिवराव घोरपडे व बक्षी इनीसखान यांच्याकडे फौज देऊन ठेवली होती.[१४६] या भेटीत दगाफटका झाला तर हैदरचा सुड घेता यावा याकरीता मुराररावांनी ही योजना आखलेली होती. परंतु हैदरने आदरातिथ्य करुन त्यांना सन्मानाने जाऊ दिले. जानेवारी १७७० मध्ये माधवरावांनी कर्नाटकात स्वारी केली, त्यावेळी हैदरने मुराररावांना 'तुम्ही आम्हास येऊन मिळावे. नसल्यास शत्रुकडे तरी जाऊ नये असा संदेश पाठवला.'[१४७] मुरारराव आपल्या सैन्यासह माधवराव पेशव्यांच्या मदतीला उतरले व त्यांनी हैदरच्या राज्यापैकी एक कोटी रुपये उत्पन्नाचा

---

१४२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती- २०१२, पृ. ९१.
१४३. कोलारकर, शं. गो., गो. मा. पुरंदरे, **नागपुर राज्याचा अर्वाचिन इतिहास,** आवृत्ती- २००५, पृ. ७.
१४४. Forrest, George, W., (Edi.), **Maratha Series, Vol. I, Part-III,** Edition-1885, Pg. 667.
१४५. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१५९.
१४६. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८६.
१४७. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. १६३.
* परिशिष्ट क्र. २१.

मुलूख जिंकला. मार्च १७७० मध्ये मराठ्यांचे सैन्य चिकबाळापूर येथे पोहोचले. चौथ्या दिवशीच किल्लेदाराने शरण येऊन किल्ला मराठ्यांच्या ताब्यात दिला.

या विजयानंतर मराठ्यांनी भोवतालचे गणेशगड व नंदीदुर्ग हे किल्ले घेतले कारण त्याशिवाय बंगलोरला शह बसू शकत नव्हता. यावेळी हैदर तरिकिऱ्यास होता परंतु तेथूनही तो निसटला अशाप्रकारे दोन-तीन महिने मराठे व हैदर यांच्यात झटापटी सुरु होत्या. पावसाळ्याचे दिवस नजिक येत असल्यामुळे पेशव्यांनी मुराररावांशी चर्चा करुन एखाद्या मातब्बर सरदाराच्या हाती छावणीस फौज देण्याचे ठरविले. आणि पेशवे पुण्याकडे निघुन गेले. त्यावेळी हैदरच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी मुरारराव घोरपडे, त्र्यंबकराव पेठे आणि पटवर्धन यांच्यावर जबाबदारी सोपविली.

पेशव्यांची पाठ वळताच हैदर व मुराररावांनी देखील एकमेकांवर हल्ले, स्वाऱ्या करण्याची तयारी सुरु केली. हैदरअलीने आपली छावणी श्रीरंगपट्टणात असतांना मराठ्यांच्या मुलूखात आपल्या सैन्याच्या टोळ्या पाठवल्या. मराठ्यांच्या ताब्यात असलेला चिकबाळापूरचा किल्ला हैदरने जिंकून घेण्यासाठी किल्ल्यावर तोफा डागण्यास सुरुवात केली. किल्ल्यावरील जानराव धुळपाने ही वार्ता मुरारराव आणि गोपाळराव पटवर्धनांना कळवली. मुराररावांनी आपल्या चपळ व सदा युध्दास तत्पर असणाऱ्या घोडदळाच्या सहाय्याने एका दिवसात ऐंशी किलोमीटर अंतर कापून किल्ल्याजवळ येऊन पोहोचले.[१४८] यावेळी तोफा, बंदुका, दारुगोळा आणि पाचशे घोडे मराठ्यांच्या हाती लागले. ऑगस्ट १७७० मध्ये मराठ्यांनी कडप्पाजवळील गुर्रुमकोंडा किल्ल्यावर हल्ला चढवला. हा भाग मुराररावांना परिचित होता. त्यामुळे तेच आघाडीवर होते. किल्ल्यावरील मीर रेझा आणि त्याचा भाचा सैदुंमिया होते. मराठ्यांच्या आक्रमणाची तिव्रता जाणवल्यामुळे त्यांनी जीवनदान मागितले आणि किल्ला देण्यास तयार झाले. परंतु मध्यस्थी मुराररावांनी करावी अशी त्यांनी विनंती केली. मुराररावांनीही वेळ ओळखून कामगिरी केली. १८ ऑक्टो. १७७० रोजी गुर्रुमकोंडा किल्ल्यावर मराठ्यांचे निशाण लावले गेले. ह्या विजयात मुराररावांचा सिंहाचा वाटा होता. या विजयामुळे कर्नाटकात मुराररावांचे वर्चस्व पून्हा एकदा सिध्द झाले.

१४८. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ८७.

हैदरचा बंदोबस्त करण्यासाठी मुराररावांनी इंग्रजांना देखील मदत केली. हैदर व मुराररावांमधील वैरत्व वाढतच चालले होते. त्यात कधी मुराररावांना तर कधी हैदर याला माघार घ्यावी लागत होती. हैदर सोबतच्या युध्दाच्या प्रसंगी अनेकदा मुराररावांनी दाखवलेली कल्पकता आणि समयसूचकता अनन्यसाधारण होती. जेथे बळाचा उपयोग होत नाही अशा ठिकाणी युक्तीचा वापर करुन मुरारराव यशाची चव चाखत असत. ह्या गोष्टीची जाणिव हैदर अलीला होती त्यामुळे तो मुराररावांशी वचकून रहात असे. त्यातच भरिसभर म्हणून पेशवे देखील मुराररावांना पुर्णत: सहकार्य करीत असल्यामुळे कर्नाटकात हैदरला नामुष्की पत्करावी लागत असे.[१४९] अशावेळी माधवराव पेशव्यांची तब्येत खराबच होती आणि अचानक १८ नोव्हे. १७७२ रोजी त्यांचे निधन झाले.[१५०] त्यांच्या निधनानंतर राघोबादादांमुळे मराठ्यांमध्ये पुन्हा फाटाफुटीचे राजकारण सुरु झाले. या सर्व अनुकूल स्थितीचा फायदा घेण्याइतपत हैदर नक्कीच हुशार होता त्याने मराठ्यांविरुध्द हालचालींना सुरुवात केली. मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ याने एका वाक्यात माधवरावांचे यथार्थ मूल्यमापन केले आहे. तो म्हणतो, ‘‘पानिपतच्या पराभवाने मराठ्यांचे जेवढे नुकसान झाले, त्यापेक्षा अधिक नुकसान माधवरावांच्या अकाली मृत्युने झाले.’’[१५१] मुराररावांच्या बाबतीत हे तंतोतंत ठरले.

हैदरच्या दक्षिणेतील हालचालींची मुराररावांना कल्पना झालेली होती. त्यांनी तेव्हा १२ जून १७७४ रोजी बारभाईंना पत्र लिहून कळवले की, ‘हैदर काय करायच्या बेतात आहे हे आपणास सांगण्याची गरज आहे असे नाही. त्याने शिऱ्याच्या किल्ल्यात ठाणे घेतले आहे, त्याचप्रमाणे बाळापूर व मदगिरी या आधीच काबीज केलेले आहे. बापूजी शिंदे यास कैदेत ठेवलेले आहे. वरकड ठाण्यास उपसर्ग द्यावयास कमी नाही. आता इतर ठाणी घेण्याची त्याची तयारी सुरु आहे. मी स्वत: तुंगभद्रेच्या तीरावर होतो, पण आता रायदुर्ग-गुत्ती परिसरात परत आलो आहे. आपल्या फौजा येथे येताच त्याचा समाचार घेऊ. आता ताबडतोब कुठलाही धोका नाही.’[१५२] त्यांच्या या पत्रावरुन त्यांना अजुनही हैदरच्या धोक्याची कल्पना आलेली नव्हती असे जाणवते. पेशव्यांची मदत लवकर येत नाही हे लक्षात येताच हैदरने या संधीचा पुरेपुर उपयोग करुन घेतला. त्याने एका तडाख्यात आदवानी आणि

१४९. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१६९.
१५०. गर्गे, स. मा., **करवीर रियासत,** आवृत्ती- ऑक्टो. २००२, पृ. २९३.
१५१. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड पाचवा,** आवृती-.२०१२, पृ.१४.
१५२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड सहावा,** आवृती- २०१२, पृ.२९९.

बेल्लारी ही दोन्ही ठिकाणे ताब्यात घेतली आणि कर्नुलचे ठाणेही काबीज केले. अशाप्रकारे हैदरने तुंगभद्रेच्या पूर्वेस आपला विस्तार करुन मुराररावांकडे लक्ष केंद्रित केले.

मुरारराव यावेळी गुत्तीच्या किल्ल्यात आपल्या परिवारासह हजर होते. हैदरने कर्नूलच्या नबाबाकडून तीन लाख रुपयांची खंडणी वसूल केली आणि गुत्तीकडे कुच केले. गुत्तीच्या भोवतालचे मुराररावांना मदत करणाऱ्यांचे सर्व रस्ते अडवून त्याने मुराररावांना निरोप पाठवला, "मोती तलावाच्या लढाईत तुम्ही आमच्या तोफा घेतल्या आहेत त्या परत द्या शिवाय कडाप्पाच्या नबाबाच्या ताठमरी तालुका तुम्ही घेतला आहे तो परत करा. आम्ही मागू तेवढी खंडणी देऊन आमच्या भेटीस या. आमची लष्करी ताबेदारी करा. आम्ही आता तुंगभद्रेपलीकडे मराठी मुलखात स्वारी करणार आहोत या स्वारीत तुम्ही आमच्या फौजेच्या आघाडीस राहून आमची चाकरी केली पाहिजे."[१५३]

हैदरचा हा निरोप मिळाल्यावर मुरारराव रागाने लालेलाल झाले व त्यांनी ठाम व काहीसे प्रक्षोभक प्रत्युत्तर पाठवले, "मी तुला हाताखाली केवळ पाच माणसे असलेला साधा नायक म्हणून बघितले आहे, याउलट मी मुरारीराव हिंदुराव, मराठा साम्राज्याचा सेनापती आहे. तू तेव्हापासून आतापर्यंत बराच मोठा झाला असशील, परंतु मी कधीही तुझ्याशी चार हात करु शकतो. आता तू मागितलेल्या खंडणीबाबत बोलायचे, तर मला खंडणी वसूल करण्याची सवय आहे, देण्याची नाही."[१५४] असे मनाविरोधी उत्तर येताच हैदरने गुत्तीवर स्वारी केली. तेव्हा लगेच मुराररावांनी काही फौज व कुटुंबांची माणसे चुलत पुतण्या शिवराय घोरपडे याच्याबरोबर मडकशिऱ्यावर पाठवून स्वत: तीन चार हजार निवडक सैन्यासह शांतचित्ताने व आत्मविश्वासाने हैदरची वाट बघत बसले. यावेळी पेशव्यांची किंवा पटवर्धनांची काहीतरी मदत येईल अशी त्यांची आशा होती. परंतु त्याचवेळी बारभाईंची इंग्रज वकिलांशी पुरंदरावर तहाच्या वाटाघाटी सुरु होत्या, करवीरकर छत्रपती पटवर्धनांवर उठले होते, अशा अनेक अकल्पित कारणांनी मुराररावांच्या मदतीस पुण्याकडून कोणीच जाऊ शकले नाही.[१५५]

---

१५३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१७३.
१५४. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ९२.
१५५. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड सहावा**, आवृती- २०१२, पृ.३०१.

गुत्तीचा सुप्रसिध्द व ऐतिहासिक डोंगरी किल्ला* म्हणजे उजाड टेकड्यांचा समूह असून या टेकड्या किल्ल्याच्या तटबंदीने जोडलेल्या आहेत. तटबंदीच्या आत मोठा सपाट भूप्रदेश असुन त्यात मूळ गुत्ती गावाचापण समावेश होते. मुराररावांनी हैदर विरुध्द लढण्यासाठी गुत्ती ह्या किल्ल्याची निवड केली. हा अत्यंत उपयुक्त असा किल्ला होता. किल्ल्याची चढण आणि एकंदर रचना आतील लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपकारक ठरणारी होती. तुंगभद्रेच्या प्रदेशातील अभेद्य दुर्ग असे त्याचे वर्णन केले जात होते. त्यामुळे या किल्ल्यावरुन चार सहा महिने हैदरला रोखता येईल, तो पर्यंत कुठूनही मदत येईलच, असा मुराररावांचा अंदाज होता. मरारराबांकडे किल्ला लढवण्यासाठी निवडक चार हजार माणसे होती. किल्ल्यावर तोफा, दारुगोळा, अन्नधान्य आणि चारा यांचा भरपूर साठा केलेला होता.[१५६] हैदरने जानेवारी १७७६ च्या अखेरीस किल्ल्यावर निकराचे हल्ले केले पण किल्ल्यावरुन तोफांचा प्रचंड भडिमार सुरु झाल्याने त्यास माघार घ्यावी लागली. या हल्ल्यात त्याची शेकडो माणसे ठार झाली.[१५७]

हैदरच्या हल्ल्याला मुरारराव अत्यंत त्वेषाने उत्तर देत होते. परंतु किल्ल्याच्या आत मोठ्या संख्येने राहणाऱ्या बिनलष्करी जनतेमुळे मुरारराव अडचणीत येत होते. त्यांच्या संरक्षणाबरोबरच किल्ल्यावरील पाण्याच्या साठ्याची समस्या निर्माण झालेली होती. असे वाटत होते की, जणू निसर्गही मुराररावांना अडचणीत आणण्यास मदतच करीत होता. पुण्यावरुन कोणत्याही प्रकारची मदत येत नव्हती. त्यामुळे मुरारराव लढाई व त्याचवेळी तहाची बोलणी करुन वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करीत होते. हैदरने तेव्हा गुत्ती नगरावर कब्जा केला होता व तेथेच पाण्याचा मुख्य साठा होता. मुराररावांनी तीन महिने पराकाष्ठा करुन किल्ला झुंजविला. मराठ्यांचे बखरकार व बातमीपत्रांनी नोंद केली आहे, "आता मात्र सेनापती काचाट्यात सापडले आहेत, पण ते कुणाही पुढे मान तुकवणारे नाहीत, तसेच शुर आणि युध्दनिपुण आहेत. ते कधीही घाबरुन शरणागती पत्करणार नाहीत. मात्र बाहेरुन मदत आल्याविना वेढ्याचा मुकाबला कसा करता येईल?"[१५८]

ज्या शूर पुरुषाने ३०-३५ वर्षे दक्षिण भारतात आपल्या कर्तृत्वाने श्रेष्ठस्थान मिळवले, ज्याची

---

१५६. घोरपडे, मु. य., एक झुंज शर्थीची, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ९३.
१५७. गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१७४.
१५८. घोरपडे, मु. य., पूर्वोक्त, पृ. ९४.
* परिशिष्ट क्र. १९.

मदत मिळावी म्हणून फ्रेंच आणि इंग्रज लोक अनेक प्रयत्न करीत असत, ज्याने आपल्या स्वारीचे नेतृत्व करावे अशी पेशवे इच्छा करीत असत, आणि ज्याच्या पाठबळामुळे कर्नाटकातील अनेक छोटे संस्थानिक आणि नबाब स्वत:ला सुरक्षित समजत असत अशा मुराररावांना हैदरपुढे अपमानित होऊन शरणागतीच्या भूमिकेवर उभे राहावे लागले. पण परिस्थितीच इतकी प्रतिकुल होती की, त्या प्रसंगी दुसरा कोणताही पर्याय स्विकारता येणे शक्य नव्हते.[१५९] या झालेल्या निकराच्या लढाईत हैदरचे किमान हजार ते बाराशे सैनिक गारद झाले आणि दोन ते अडीच हजार जायबंदी झाले. आणि उरलेले प्रचंड गोंधळून गेले विखुरले. त्यामुळे किल्ला सर करण्याचा प्रयत्न सोडून देण्यात आला. परंतु १० मार्च १७७६ रोजी हैदरने निकराचा हल्ला केला आता काही होणे शक्य नाही हे लक्षात येऊन मुरारराव पाच जणांना सोबत घेऊन गड उतरले आणि १५ मार्च १७७६ रोजी गुत्तीच्या किल्ल्यावर हैदरचा ध्वज उभारला गेला.[१६०]

हैदरने गुत्तीच्या किल्ल्यावरील धनासाठी मुराररावांचे हालहाल केले. १ एप्रिल १७७६ रोजी मुरारराव व त्यांची बायकामुले यांना श्रीरंगपट्टणास रवाना केले व गुत्तीच्या किल्ल्यावर आपल्या माणसांची नेमणूक केली. हैदरने कमालीचा नीचपणा करुन सत्तर वर्षाच्या या शूर पुरुषास कपालदुर्गच्या किल्ल्यावर कैदेत ठेवले.[१६१] हैदरने मुरारराव त्यांची मुले व्यंकटराव व नरसिंगराव यांना हालहाल करुन ठार मारले. मुराररावांनी इ.स. १७३१ पासून इ.स. १७७७ पर्यंत सुमारे चाळीस वर्षे दक्षिण भारतात कर्तबगारी गाजवली.

मुराररावांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन तसेच गुणांचे वर्णन अनेक इतिहासकारांनी करुन ठेवलेले आहे. मुरारराव म्हणजे कर्नाटकातील मराठेशाहीचे मूर्तिमंत प्रतिक होते. त्यांचे युध्दकौशल्य, संघटनचातुर्य, राजकारणातील मुत्सद्देगिरी आणि समयसूचकता, शत्रू व मित्र ओळखण्याचे तारतम्य, स्वाभिमान आणि शौर्य अशा अनेक गुणांची प्रशंसा इतिहासकारांनी मुक्त कंठाने केली आहे. मराठी राज्याच्या उत्तरार्धाचा विस्तृत इतिहास लिहिणारे वासुदेवशास्त्री खरे यांनी मुराररावांच्या दु:खद अंतकाळासंबंधी वर्णन करतांना म्हटले आहे, ‘‘सेनापतीच्या पायात चांदीच्या बेड्या घालून हैदराने

१५९. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. १७०.
१६०. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ९६.
१६१. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड सहावा**, आवृती- २०१२, पृ. ३०१.

त्यांना कपालदुर्गावर कैदेत ठेवले, तेथेच या पराक्रमी पुरुषांचा अंत झाला. मुरारराव हा मराठ्यांच्या शिपाईगिरीचा अत्यंत तेजस्वी तारा होय. त्यांचा असा शेवट व्हावा हा केवढा दैवदुर्विपाक.''[१६२] रिसायतकारांच्या शब्दातच सांगायचे तर मुराररावांचे बाणेदार वर्तन अद्यापी या देशात ताजे आहे त्यांना गुत्तीच्या वेढ्यात अडकून पडावे लागले आणि पराभवही पत्करावा लागला. पण तो पत्करीत असतांना त्यांनी शरणागती स्विकारली नाही की अपमानकारक तडजोड केली नाही. त्यांच्या या गुणांमुळेच रियासतकारांनी मुराररावांना शूर राष्ट्रपुरुषांच्या मालिकेत समाविष्ट केले आहे.[१६३]

### ४.५ राजे मुराररावांनंतरचे राज्यकर्ते :

राजे सिध्दोजीरावांच्या मृत्युनंतर सोंडूर राज्याची सुत्रे मुराररावांकडे आली. कर्नाटकातील वडीलांकडून प्राप्त सत्ताक्षेत्र त्यांनी कायम ठेवलेच आणि पुढील काळात त्यात नव्या मुलुखांची भर घातली. मुराररावांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर दक्षिणेत इतका दरारा निर्माण केला की दक्षिणेत मुराररावांची सत्ता विचारात घेणे सर्वांनाच अपरिहार्य होते. मात्र हैदर आणि निजाम मुराररावांचा द्वेष करीत होते. दिवसेंदिवस मुरारराव आणि हैदर यांच्यातील संघर्षात वाढ होऊन हैदरअलीने इ.स. १७७६ मध्ये गुत्तीच्या किल्ल्याला वेढा दिला. त्यात मुराररावांचा पराभव होऊन त्यांच्या बरोबर दोन मुलांना कपालदुर्गच्या किल्ल्यात बंदी बनवून ठार मारण्यात आले. यामध्ये व्यंकटराव व नरसिंगराव ही मुराररावांची दोन मुले ठार झाली.

गुत्तीचा वेढा सुरु असतांनाच मुराररावांनी त्यांची धर्मपत्नी सगूणाबाई आणि इंतर कुटुंबीय चुलत पुतण्या शिवराव घोरपडे यांच्या सोबत मडकशिऱ्यावर पाठविले. या वेढ्यातच मुरारराव व त्यांच्या दोन मुलांच्या मृत्यूनंतर या घराण्याचा वंश पुढे चालू रहावा. याउद्देशाने मुराररावाच्या पत्नीने दत्तक घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दत्तवाडकर घोरपडे घराण्यातील यशवंतराव घोरपडे यांचे पुत्र शिवराव मुराररावांचा वारस म्हणून दत्तक घेण्यात आले.

---

१६२. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. १८६.
१६३. **कित्ता,** पृ. १८९.

**४.५.१ शिवराव पहिले हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर** (इ.स. १७७९ ते इ.स. १७८५) :

मुराररावांच्या निधनानंतर हिंदुराव घोरपडे घराण्याचा वंश पुढे चालविण्यासाठी सगुणाबाईंनी शिवराव यांना दत्तक घेतले. राजे शिवराव पहिले इ.स. १७७९ मध्ये मुराररावांच्या गादीवर बसले.[१६४] तत्पुर्वी हैदरने गुत्तीला वेढा दिला. त्यावेळी शिवराव मुराररावांसोबतच होते. मुराररावांनी शिवराव हे धाडसी, पराक्रमी असल्यामुळे त्यांची धर्मपत्नी व इतर कुटुंबीय यांना सुरक्षित स्थळी म्हणजे मडकशिऱ्याला घेऊन जाण्याची महत्वाची जबाबदारी शिवराववर सोपवली होती. हैदरने गुत्ती जिंकल्यावर मडकशिऱ्यावर हल्ला केला तेथे शिवराव घोरपडे होता. हैदरशी लढतांना तो पराभुत झाला व तेथून मुराररावांच्या कुटूंबियांसह पळून जाण्यात यशस्वी झाला. [१६५]

हैदरने गुत्तीवर आक्रमण केल्यानंतर उत्तरेतुन आपल्याला मदत मिळेल अशी मुराररावांना अपेक्षा होती. परंतु यावेळी पेशव्यांची मोहिम गुजरातच्या प्रदेशामध्ये सुरु होती. इंग्रजांशी लढण्यात त्यांच्या फौजा गुंतलेल्या होत्या. त्यामुळे ते मुराररावांस मदत करु शकले नाही. मात्र हेस्टिंगचा वकील कर्नल अॅप्टन याच्यासोबत वाटाघाटी होऊन १ मार्च १७७६ रोजी पुरंदरचा तह[१६६] झाल्यानंतर बारभाई मंडळाने हरिपंत पटवर्धन यास हैदरचा बंदोबस्त करण्याचा हुकुम दिला.[१६७] हरिपंत पटवर्धनाने पांडुरंगराव व कान्हेरराव पटवर्धन यांना हैदरचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. त्यांच्या सोबत शिवराव, मुराररावांचा भाऊ दौलतराव घोरपडे, निळकंठराव सिंदे, मानोळीकर, नरगुंदेकर भावे वगैरे सरदार होते. या फौजांनी हुबळी, कुंदगोल्ड व मिश्रकोट अशी ठाणी हस्तगत करुन इ.स. १७७६ च्या अखेरीस धारवाड नजीक येऊन पोहोचले. यावेळी हैदरचा सरदार महंमद अली कुमदान व पटवर्धनांच्या फौजा एकमेकांच्या हालचालीवर लक्ष ठेऊन होते. दोन्हीही सैन्य जानेवारी १७७७ च्या आरंभी युध्दाच्या पवित्र्याने तयार होते.

महंमद अली कुमदान ८ जानेवारी १७७७ रोजी बंकापूराहून निघून पटवर्धनावर एकदम छापा घालण्याच्या उद्देशाने सावशीस येऊन राहिला. सावशी हे ठिकाण शिरहट्टीकर देसायांचे असुन तो देसाई हैदर यास मदत करीत असे. त्याच दिवशी पटवर्धन व इतर मराठा सरदार मंडळी सावशीपासून

---

१६४. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. १९२.

१६५. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड सहावा,** आवृती- २०१२, पृ. ३०२.

१६६. कुलकर्णी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. १३७.

१६७. गर्गे, स. मा., (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ३०४.

दोन कोसावर येऊन थांबलेले होते. दुसऱ्या दिवशी सावशी येथे युध्दास सुरुवात झाली. कुमदान हा कसलेला सेनापती असल्याने त्याने शेतात लपवून ठेवलेल्या व किल्ल्यावरील तोफांनी मराठ्यांवर हल्ले चढविले. त्यात कान्हेरराव पटवर्धन ठार होऊन पांडुरंगराव, निळकंठराव सिंदे, शिवराव व दौलतराव घोरपडे मंडळी जखमी होऊन पकडल्या गेली.[१६८] त्यावेळी हैदरने शिवराव घोरपडे यास कपालदुर्ग किल्ल्यावर कैद करुन ठेवले त्याच किल्ल्यावर मुराराव घोरपडे यांनाही कैद करुन ठेवलेले होते. लवकरच मुरारराव कैदेतच मरण पावला. शिवरावने हैदरकडे दंड भरुन स्वत:ची सुटका करुन घेतली.

मुराररावांच्या मृत्यूनंतर शिवराव यांना दत्तक घेण्यात आले. शिवराव पहिले यांनी सोंडूर राज्यामधील विस्कळीत झालेली परिस्थिती स्थिर स्थावर केली. दरम्यानच्या काळात डिसेंबर १७८२ मध्ये हैदर मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू सूलतान म्हैसूरच्या गादीवर बसला. इ.स. १७८४ पासून मराठे व टिपू यांच्यातील संघर्षास सुरुवात झाली.[१६९] टिपूच्या सैन्याने सोंडूरच्या किल्ल्याला इ.स. १७८५ मध्ये हल्ला केला तो परतवून लावण्यासाठी राजे शिवराव यांनी निकराची लढाई केली. त्या लढाईत शिवरावांचे निधन झाले.[१७०] त्यावेळी टिपू सुलतानाने सोंडूरचा किल्ला जिंकून घेतला.[१७१]

### ४.५.२ सिध्दोजीराव दुसरे हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर : (इ.स. १७९० ते इ.स. १७९६)

इ.स. १७८५ मध्ये राजे शिवराव यांचे निधन झाले. राजे शिवराव यांना सिध्दोजीराव आणि मुरारराव अशी दोन मुले होती. शिवरावांच्या नंतर सिध्दोजीराव दुसरे सोंडूरच्या राजगादीवर बसले. त्यावेळी त्यांचे वय केवळ दोन वर्षांचे होते. राजे सिध्दोजीराव अल्पवयीन असल्याने त्यांचे चुलते व्यंकटराव घोरपडे यांनी सिध्दोजीरावांच्या नावे कारभार चालविला. व्यंकटरावांनी टिपूचे मांडलिकत्व न स्विकारता सोंडूर आणि दत्तवाड या दोन्ही राज्यांचा कारभार व्यवस्थित सांभाळला. सिध्दोजीराव आणि सोंडूर राज्याच्या सुरक्षिततेसाठी व्यंकटरावांनी चांगले प्रयत्न केले. ऐवढेच नव्हे तर टिपूच्या सैन्याने इ.स. १७८५ मध्ये जिंकून घेतलेल्या सोंडूरचा किल्ला त्यांनी इ.स. १७९० मध्ये लढाई करुन

---

१६८. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड सहावा,** आवृती- २०१२, पृ. ३०२.
१६९. कुलकर्णी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. १३७.
१७०. गर्गे, स. मा.,हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.११६.
१७१. Mawjee, P. V., D. B. Parasnis, (Edi.), **Kaifiyats, Yadis & C,** Edition-1913, Pg. 43.

परत जिंकून घेतला. मात्र हा किल्ला फार काळ त्यांच्या ताब्यात राहिला नाही.

इ.स. १७९२ मध्ये इंग्रज आणि टिपू यांच्यातील संघर्षाला सुरुवात झाली. या संघर्षामध्ये इंग्रजांना मराठे आणि निजाम यांनी सहकार्य केले. इंग्रज आणि टिपू यांच्या ६ फेब्रुवारी १७९२ रोजी युध्द झाले. व श्रीरंगपट्टण ब्रिटीशांनी जिंकून घेतले.[१७२] टिपूने शरण येऊन ब्रिटीशांशी श्रीरंगपट्टणचा तह केला. या तहानुसार टिपूने आपले अर्धे राज्य व ३ कोटी रुपये खंडणी म्हणून इंग्रज, मराठे व निजाम यांना देण्याचे मान्य केले.[१७३] तसेच या तहानुसार मुरारराव हिंदुराव घोरपडे यांच्या घराण्याकडे त्यांचा प्रदेश म्हणजेच सोंडूर इलाखा परत देण्यात आला. त्या घराण्याची पुरातन भूमी म्हणून तो प्रदेश सिध्दोजीरावांकडे कायम ठेवण्यात आला.[१७४] पण हा तह टिपू कितपत पाळेल या विषयी सिध्दोजीराव आणि व्यंकटराव यांना शंका होती म्हणून त्यांनी तो प्रदेश सोडला व टिपू जिवंत असेपर्यंत ते आपल्या प्रदेशात परत आलेच नाही. त्यानंतर लवकरच म्हणजे इ.स. १७९६ मध्ये सिध्दोजीराव दुसरे निधन पावले. त्यावेळी त्यांचे वय केवळ १३ वर्षाचे होते. त्यामुळे राज्याच्या सुरक्षिततेची आणि घराण्याच्या भवितव्याची सर्व जबाबदारी व्यंकटराव यांच्यावर येऊन पडली.

**४.५.३ शिवराव दुसरे हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर** (इ.स. १७९६ ते इ.स. १८४०) :

सिध्दोजीराव दुसरे वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी मृत्यू पावल्याने सोंडूर घराण्याच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला. या घराण्याची संपूर्ण जबाबदारी पालक म्हणून व्यंकटराव यांच्यावर असल्याने त्यांच्या सुचनेवरुन सिध्दोजीरावांच्या पत्नीने गजेन्द्रगडकर दौलतरावांकडे त्यांचा मुलगा दत्तक देण्याविषयी विनंती केली. दौलतराव राजे मुराररावांचे सावत्र भाऊ होते. त्यामुळे त्यांच्या मुलाला दत्तक घेऊन सोंडूरच्या घराण्याची परंपरा पुढे चालू ठेवावी अशी योजना व्यंकटरावांची होती. मात्र दौलतरावांनी हा प्रस्ताव नाकारला.

नंतर सिध्दोजीरावांच्या पत्नीने दत्तवाडकर यशवंतराव घोरपडे यांचेकडे मुल दत्तक देण्यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनीही नकार दिला. परंतु त्यांचे भाऊ राजे खंडेराव यांनी आपले पुत्र

---

१७२. गर्गे, स. मा., (संपा.), **ब्रिटिश रियासत, खंड दुसरा,** आवृती- २०१२, पृ. १३८.

१७३. कुलकर्णी, अ. रा., ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड तिसरा,** आवृत्ती-१९८६, पृ. १५६.

१७४. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१९२.

शिवराव यास दत्तक देण्याचे मान्य केले. अशा पध्दतीने शिवराव दुसरे यांचे दत्तक विधान इ.स. १७९६ मध्ये होऊन ते सोंडूरकर घराण्याच्या गादीवर विराजमान झाले.[१७५]

राजे शिवराव दुसरे यांच्या कारकिर्दीमध्ये कर्नाटक तसेच महाराष्ट्रात फार मोठ्या घटना घडल्या. शिवराव हे त्यावेळी अल्पवयीन असल्यामुळे या घटनांचा प्रत्यक्ष संबंध त्यांच्याशी नसला तरी अप्रत्यक्षपणे त्याचा परिणाम सोंडूर राज्यावर झालेला दिसतो. एकीकडे टिपू आणि दुसरीकडे पेशवे अशा दुहेरी संकटात हे राज्य सापडलेले होते. त्यात कोणताही कर्तबगार पुरुष नसल्यामुळे राज्याची स्थिती अधिकच खालावलेली होती. टिपूच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्यासाठी इंग्रज, निजाम आणि पेशवे यांचे फार मोठे संघटन निर्माण झाले. कारण टिपूचा पराभव केल्याशिवाय दक्षिणेकडे आपले स्थान बळकट होणार नाही. याची जाणीव इंग्रज व पेशव्यांना होती. दक्षिणेकडील मुसलमानी नबाबांचे राज्य ताब्यात घेण्यासाठी टिपूचा पराभव करणे निजामासाठी महत्वाचे होते अशा विविध उद्देशाने ह्या तीन सत्तांनी एकत्र येऊन टिपूवर संयुक्त फौजेने हल्ला केला. तेव्हा झालेल्या श्रीरंगपट्टणच्या लढाईत ४ मे १७९९ मध्ये टिपूचा पराभव होऊन तो मरण पावला.[१७६] टिपूच्या मृत्यूमुळे हिंदूराव घोरपडे घराण्याचे हैदर तसेच टिपू यांच्यात दोन पिढ्यांपासून सुरु असलेल्या सत्ता संघर्षाला पुर्णविराम मिळाला.

टिपूच्या मृत्यूने त्याचे संपूर्ण राज्य इंग्रजाच्या ताब्यात गेले. या लढाईनंतर इंग्रज अधिकारी मि. जॉन सलिव्हन आणि म्हैसूर राज्याची त्यावेळची राणी यांच्या दरम्यान करार झाला. करारातील १६ व्या कलमानूसार हैदर आणि टिपू यांनी राजे मुरारराव घोरपडेंचा जो प्रदेश जिंकला होता तो इंग्रजांकडे देऊन नंतर तो इंग्रजांनी मुराररावांच्या वशंजांना द्यावा असा हक्क कंपनी सरकारने आपल्याकडे राखून ठेवला.[१७७] सोंडूरकर घराण्याच्या दुर्देवाने करारानुसार इंग्रजाकडील प्रदेश मागू शकेल असा कर्तबगार व्यक्ती घराण्यात नव्हता, त्यामुळे तो प्रदेश इंग्रजाकडे तसाच राहिला.

शिवराव राजे दुसरे हे मुरारराव हिंदुराव घोरपडे यांच्या राहिलेल्या सोंडूर राज्याचे अधिकारी झाले. त्याचवर्षी म्हणजे ५ डिसेंबर १७९६ रोजी बाजीराव दुसरा पेशवे पदावर विराजमान झाले.[१७८]

---

१७५. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१९३.
१७६. गर्गे, स. मा., (संपा.), **ब्रिटिश रियासत, खंड दुसरा**, आवृती- २०१२, पृ. १७६.
१७७. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त**, पृ. १९४-९५.
१७८. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड आठवा**, आवृती- २०१२, पृ. ५७.

या दोघांमध्ये मूळ फरक इतकाच होता की, यावेळी शिवराव हा अल्पवयीन असून कोणत्याही कर्तबगार पुरुषाचे त्यास सहकार्य नव्हते. तर दुसरीकडे बाजीराव दुसरा सज्ञान असून नाना फडणविसांसारखे मुत्सद्दी कारभार पाहत होते. तसेच परशुरामभाऊ पटवर्धनासारखे लढवय्ये त्याच्या बाजूने होते. मात्र नाना फडणविसांच्या मृत्यूनंतर बाजीराव पेशव्यावर कोणाचेच नियंत्रण राहिलेले नव्हते. त्याने विठोजी होळकराला हत्तीच्या पायी दिले. त्यामुळे चिडून जाऊन इ.स. १८०२ मध्ये यशवंतराव होळकरांनी पुण्यावर हल्ला चढवून बाजीराव पेशव्यास पलायन करण्यास भाग पाडले. बाजीराव इंग्रजाच्या आश्रयास जाऊन शेवटी इंग्रजांशी १८०२ साली वसईचा तह केला. या तहानुसार इंग्रजांनी स्वत:च्या प्रदेशाप्रमाणे बाजीरावच्या प्रदेशाचे रक्षण करण्याचे मान्य केले. त्याचबरोबर दक्षिण भारतात मराठ्याची जी लष्करी ठाणी होती तेथे बाजीरावांनी आपला हक्क प्रस्थापित केलाच पण मुराररावांच्या स्वतंत्र प्रदेशावरही आपली सत्ता असल्याचा दावा केला, कारण माधवराव पेशव्यांच्या काळात मुराररावांना छत्रपतीकडून सेनापती पद दिले होते. त्या आधारावर तो प्रदेश पेशव्यांच्या सत्तेचा भाग आहे असे त्याचे म्हणणे होते. त्यामुळे सोंडूरचा प्रदेश बळकविण्याचे त्याचे प्रयत्न सुरुच होते.

सोंडूरचा प्रांत ताब्यात घेण्याचे प्रयत्न बाजीरावाने सुरु केले. घोरपडे घराण्यातील काही लोकांना हाताशी धरुन शिवराव दुसरे यांना गादीवरुन पदच्यूत करण्यासाठी बाजीरावाने प्रयत्न सुरु केले. त्यामध्ये वसईच्या तहानुसार बाजीराव पेशव्यांच्या राज्याचे रक्षण करण्याची जबाबदारी इंग्रजांवर असल्याने त्याने इंग्रजांकडे तसे प्रयत्न सुरु केले. सोंडूरचा प्रदेश हा आपल्या अधिपत्याखाली असून गजेन्द्रगडकर घराण्यातील यशवंतराव घोरपडे यांना देण्याचे निश्चित केले. यशवंतराव घोरपडे हा गजेन्द्रगडच्या घोरपडे घराण्याच्या शाखेतील असून शिंद्याच्या लष्करात अधिकारी पदावर होता. शिंदे आणि पेशवे यांच्यातील निरोपाची आदानप्रदान करण्याचे काम तो करीत असे. इ.स. १८०३ मध्ये इंग्रज आणि शिंदे यांच्यात झालेल्या सुर्जी अंजनगावच्या तहाची[१७९] बोलणी करण्याचे काम यशवंतरावाने केले. सुर्जी अंजनगावचा तह ठरवून दिल्याबद्दल इंग्रजांनी यशवंतराव घोरपडेस दरमहा १००० रुपये नेमणूक करुन दिले होते.[१८०]

१७९. काळे, या. मा., नागपुर प्रांताचा इतिहास, आवृत्ती- १९३४, पृ. ३४६.
१८०. गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.१९९.

या घटनेनंतर यशवंतराव घोरपडे शिंद्यांना सोडून बाजीराव पेशव्याकडे आला व त्याची मर्जी संपादन केली. सोंडूरचे संस्थान बाजीरावाने आपणास द्यावे असा तगादा त्याने लावला. त्यामुळे बाजीरावाने सोंडूर राज्य यशवंतरावाला मिळवून द्यावे असा इंग्रजाकडे आग्रह धरला. सततच्या आग्रहामुळे एलफिन्स्टनने* कर्नल मन्रो याने इ.स. १८१७ मध्ये सोंडूरवर स्वारी केली. ब्रिटीशांच्या फौजेपुढे शिवराव दुसऱ्याच्या फौजा टिकणे शक्य नसल्यामुळे सोंडूर मन्रोच्या ताब्यात गेले. मन्रोने सोंडूर ताब्यात येताच यशवंतरावाच्या ताब्यात दिल्याचे जाहीर केले. परंतु यशवंतरावाने सोंडूरचा ताबा घेण्यापूर्वीच शिवरायने सोंडूर पुन्हा हस्तगत केले व आपले राज्य टिकवले.

सोंडूर घेण्याचा बाजीरावाचा बेत फसल्यानंतर सोंडूर ताब्यात घेण्यासाठी पेशवा सोंडूरच्या सरहद्दीवर येऊन पोहोचला. सोंडूर प्रांताची भौगोलिक रचना अशा तऱ्हेची आहे की प्रदेशात बाहेरच्या शत्रुला फौजेसह घुसणे अशक्य आहे. भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने सोंडूर हा पृथ्वीच्या आवरणाचा फार पुरातन थर आहे. त्याच्या भावेतीच्या संरक्षक टेकड्यामुळे सोंडूरला शांतता आणि सुरक्षिततेचं वरदान लाभलेले आहे. कानडी मध्ये 'संडू' म्हणजे 'खिंड' किंवा खंडार आणि 'डर' म्हणजे 'वस्ती' म्हणेच सोंडूर याचा अर्थ टेकड्यामध्ये वसलेले असे गाव जिथे फक्त खिंडीतून जाता येते.[१८१] अशाप्रकारे या प्रांताच्या सभोवताली नैसर्गिक तटबंदी असल्याने सोंडूरच्या सैन्याने बाजीरावच्या फौजेला रोखुन धरले. बाजीरावाने आपला हेतू बदलून या खोऱ्यातील कार्तिकस्वामीच्या दर्शनासाठी आपल्याला यायचे आहे असा निरोप शिवराव राजांकडे पाठविला. त्यावर शिवरावांनी सांगितले की, आपण दर्शनाला अवश्य यावे मात्र आपल्या काही मदतनिसांसह पायवाटेने मंदीरास यावे.[१८२] पेशव्यांसमोर हा पर्याय मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हते त्यांनी काही मदतनिसासह कार्तिकस्वामींचे दर्शन घेतले आणि तो परतला.

मन्रो व सोंडूर राज्याचे मैत्रीचे संबंध होते. केवळ वरिष्ठांची आज्ञा पालनाच्या दृष्टीने मन्रोने सोंडूरवर स्वारी केली असावी. मात्र इ.स. १८१८ मध्ये पेशवाई संपल्यानंतर मन्रो एलफिन्स्टनला पाठविलेल्या पत्रात म्हणतो, "भारतातील इतर कोणत्याही राजाप्रमाणे शिवराव सोंडूरच्या खोऱ्यात

---

१८१. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. १३.
१८२. France, W., **Madras District Gazeetters, Bellary,** Edition-1904, Pg. 312.
* परिशिष्ट क्र. ३४.

सार्वभौम सत्ताधिश होते. इतर मराठे अधिपती ज्या अर्थाने आणि अधिकाराने स्वतंत्र होते त्याच अधिकाराने शिवरावही स्वतंत्र असल्यामुळे त्यांना पेशव्यांचा मांडलिक म्हणने बरोबर नव्हते. म्हणूनच त्या तहाअन्वये सोंडूरचे राज्य खालसा करण्याची इंग्रज कंपनी सरकारची जबाबदारी नाही.''[१८३] अशाप्रकारे इंग्रजांनी सोंडूरच्या राज्याचे दक्षिणेतील स्वतंत्र स्थान मान्य केले.

१ जुलै १८१८ रोजी कंपनी सरकारने राजे शिवराव यांच्याबरोबर मित्रत्वाचा तह केला. तत्पुर्वी १ मार्च १८१८ रोजी मन्रोने एलफिन्स्टनला एक पत्र लिहिले होते* त्यात त्याने असे म्हटले की, 'सोंडूरचे अधिपती शिवराव यांना १० हजारापर्यंत जहागिरी देण्याच्या आश्वासना पलिकडे मी आपला शब्द अधिक गुंतविला नाही. वस्तूत: यात शिवरावांचे मोठे नुकसान झाले आहे. ते हिंदूस्थानातील इतर कोणत्याही राजाप्रमाणे सोंडूरच्या खोऱ्यात स्वतंत्र राजे होते. त्यांचा स्वतंत्र किल्ला होता. हा किल्ला अतिशय बळकट होता. कोणत्याही मराठी सैन्यास तो काबिज करता आला नसता. अशा किल्ल्यावर शिवराव यांनी आपल्या बालपणापासून एकविस वर्ष सत्ता केली या सर्व गोष्टींचा मी जेंव्हा विचार करु लागलो तेव्हा माझ्या मनात असे येते की, शिवराव यांनी मागीतलेली बारा हजाराची जहागिरी देखील त्याच्या नुकसानीच्या मानाने फार थोडी आहे.'

सोंडूरचा प्रदेश इतर संस्थानिकांप्रमाणेच पूर्ण अधिकारासह शिवरावांना मिळालेला होता.

इ.स. १८१८ ला मराठ्यांची सत्ता संपल्यानंतर संपूर्ण दक्षिण भारतावर ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाली. कर्नल मन्रोच्या+ प्रयत्नाने सोंडूरचे राज्य कायम ठेवण्याचे धोरण इंग्रज कंपनी सरकारने जाहीर केले. त्याला अनुसरुन इ.स. १८२६ मध्ये मन्रोने इंग्रजांच्या वतीने शिवरावांना सोंडूर राज्याची सनद दिली. सनदेप्रमाणे सोंडूरच्या सर्व प्रदेशाला राज्य म्हणून वंशपरंपरागत मान्यता मिळाली. त्यासाठी शिवरावांकडे खंडणी किंवा नजराणा मागितला नाही. ऐवढेच नव्हे तर सोंडूर प्रदेशाच्या महसुलासंबंधी सर्व कारभार सोपविला. त्याशिवाय पोलीस आणि न्यायखाते त्यांच्याकडे ठेवण्यात आले. अर्थात या सर्वांच्या मोबदल्यात शिवरावांनी इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले पाहिजे अशी अट घातलेली होती.[१८४] अशाप्रकारे शिवराव दुसरे यांची कारकिर्द अतिशय संघर्षमय होती. यासर्व

१८३. गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२०१.

१८४. कित्ता, पृ. २०४.

* परिशिष्ट क्र. ४०.

\+ परिशिष्ट क्र. ३५.

संघर्षात सोंडूरचे राज्य टिकवून ठेवण्यात ते यशस्वी ठरले. शिवरावांची कारकिर्द ही ४४ वर्षाची असुन त्यांचे निधन २ मे १८४० रोजी झाले.[१८५]

**४.५.४ व्यंकटराव हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर** (इ.स. १८४० ते इ.स. १८६१):

राजे शिवराव दुसरे यांच्या निधनानंतर त्याचा पुतण्या व्यंकटराव यास २ मे १८४० रोजी दत्तक घेतले गेले. व्यंकटराव हा भुजंगराव खंडेराव घोरपडे यांचा मुलगा होता.[१८६] इ.स. १८४० मध्ये दत्तक विधान झाल्यानंतर राजे शिवराव दुसरे यांना ब्रिटीशांनी दिलेली सोंडूरची सनद इ.स. १८४१ मध्ये व्यंकटरावांना पुन्हा प्रदान करण्यात आली. राजे व्यंकटराव यांच्या काळात इ.स. १८४७ मध्ये ब्रिटीशांनी एक मोठे आरोग्यधाम बांधले.[१८७] रामगड उर्फ रामणदुर्ग हे एक छोटेसे थंड हवेचे ठिकाण आहे. ते समुद्रसपाटीपासून १००० मीटर्स उंचीवर आहे.[१८८] हा प्रदेश थंड हवेचा असल्यामुळे तेथे सैनिक व अधिकाऱ्यांना राहण्यासाठी घरे बांधण्याची परवानगी राजे व्यंकटराव यांनी दिली. या संदर्भातला करार बेल्लारी जिल्ह्याचे कलेक्टर ए. मेलोर यांच्याशी करण्यात आला. या करारानुसार रामगडच्या प्रदेशाची, तेथील फळझाडे, जंगले, शिवाय कर वसुल करण्याचे संपूर्ण अधिकार राजे व्यंकटरावांकडे राहील असे ठरले.[१८९]

राजे व्यंकटराव यांना सहा बायका व चौदा मुले होती, त्यापैकी शिवषण्मुखराव, रामचंद्रराव, खंडेराव, भुजंगराव, मालोजीराव आणि श्रीमंतराव अशी सहा मुले आणि सुभाबाई, अक्कुबाई, येसाबाई, अंबाबाई, शहाहाबाई, हौसाबाई, बजाबाई आणि बुकाबाई अशा आठ मुली होत्या.[१९०] राजे व्यंकटराव यांचा मृत्यू इ.स. १८६१ मध्ये झाला.

**४.५.५ राजे शिवषण्मुखराव हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर*** (इ.स. १८६१ ते इ.स. १८७८) :

राजे व्यंकटराव पहिले आणि त्यांची तिसरी पत्नी क्रिष्णाबाई यांच्या पोटी १७ ऑक्टो. १८४७ मध्ये शिवषण्मुखरावांचा जन्म झाला. इ.स. १८६१ मध्ये वडिलांच्या मृत्यूनंतर शिवषण्मुखराव

---

१८५. France, W., **Madras District Gazeetters, Bellary**, Edition-1904, Pg. 312.
१८६. **www.royalark.net.**
१८७. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२०५.
१८८. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ. १३.
१८९. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त**, पृ. २०५-०६.
१९०. **www.royalark.net.**
* परिशिष्ट क्र. २२.

सोंडूरच्या गादीवर बसले त्यावेळी ते अल्पवयीन असल्यामुळे इ.स. १८६३ मध्ये सोंडूरची सत्ता खऱ्या अर्थाने त्यांच्या हातात आली. शिवषण्मुखरावांना ११ मार्च १८६२ रोजी एक सनद देण्यात आली. या सनदेद्वारे शिवषण्मुखराव आणि त्यांचे वारस यांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला गेला. ही सनद त्याकाळी जे महत्वाचे संस्थानिक होते आणि ज्यांना पूर्ण अधिकार मिळालेले होते अशा संस्थानिकांनाच त्यावेळचा व्हाईसरॉय लॉर्ड कॅनिंग याने वरील सनदा दिल्या होत्या.[१९१] राजे शिवषण्मुखरावांनी सोंडूरच्या अधिकाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर मिस्टर मॅकार्टनी यास आपले एजंट व सल्लागार म्हणून नियुक्त केले ते बेल्लारी येथील लंडन मिशनशी संबंधीत होते. मॅकार्टनी हा २२ वर्षापर्यंत सोंडूरच्या कारभाराशी संबंधीत असून राज्यकारभारामध्ये त्याने महत्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या. इ.स. १८८५ मध्ये तो लंडनला परत निघून गेला. त्याच्या कामाची इंग्लंड सरकारने देखील प्रशंसा केलेली आहे. शिवषण्मुखरावांच्या कारकिर्दीत इ.स. १७७६ ला सोंडूरकर घोरपडे घराण्याला **राजे** हा वंशपरंपरागत किताब बहाल करण्यात आला. शिवषण्मुखराव ३ मे १८७८ रोजी दिर्घकालीन आजारानंतर मरण पावले.[१९२]

**४.५.६ रामचंद्रराव हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर*** (इ.स. १८७८ ते इ.स. १८९२):

शिवषण्मुखराव यांच्या निधनानंतर त्यांचा लहानभाऊ रामचंद्रराव गादीवर बसले. त्यांचा जन्म इ.स. १८४९ मध्ये झाला[१९३] असून तो व्यंकटराव शिवराव घोरपडेंचा दुसरा मुलगा होता. ५ फेब्रुवारी १८७९ ला रामचंद्ररावाला राज्यधिकारी म्हणून इंग्रज सरकारने मान्यता दिली.[१९४] मॅकार्टनीच्या जागी सप्टेंबर १८९५ मध्ये बेल्लारीचे एक निवृत्त तहसिलदार मिस्टर जे. जी. फर्थ यांची राजे रामचंद्ररावांचा एजंट म्हणून नेमणूक झाली.

राजे रामचंद्रराव यांना जुलै १८९२ मध्ये CIE हा किताब देण्यात आला. पण लवकरच ते आजारी पडले. बेल्लारी येथे औषधोपचारासाठी गेले असता ३ डिसेंबर १८९२ मध्ये त्याचा मृत्यु झाला. राजे रामचंद्ररावांना व्यंकटराव आणि शहाबाबाई अशी दोन मुले होती.[१९५]

---

१९१. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२०६.
१९२. Lethbridge, Sir, Roper, **The Golden Book of India,** Edition-1893, Pg. 476.
१९३. **कित्ता,** पृ. ४७६.
१९४. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. २०७.
१९५. **www.royalark.net.**
* परिशिष्ट क्र. २३

**४.५.७ व्यंकटराव दुसरे हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर*** (इ.स. १८९२ ते इ.स. १९२७):

राजे रामचंद्र यांच्या निधनानंतर सोंडूर राज्याचा अधिकार त्यांचे पुत्र व्यंकटराव दुसरे यांच्याकडे आला. त्यांचा जन्म १० जुलै १८९२ रोजी झाला.[१९६] वडिलांच्या निधनाच्यावेळी म्हणजेच अधिकार प्राप्तीच्यावेळी तो केवळ सहा वर्षाचा होता. इंग्रजांनी इ.स. १८९३ मध्ये त्याला सोंडूरचे राजे म्हणून मान्यता दिली. व्यंकटराव दुसरे अल्पवयीन असल्यामुळे त्याचा काका मालोजी उर्फ बालासाहेब यांनी सोंडूर राज्याचा कारभार पाहिला. त्यावेळी सोंडूर राज्याचे दिवाण पद मिस्टर फर्थच्याकडे होते. फर्थ ह्याने एप्रिल १८९७ मध्ये निवृत्ती घेतल्यानंतर त्याच्या जागी टी. कोंदडराव नायडू यांची दिवाण म्हणून नेमणूक करण्यात आली. टी. नायडू हा बेल्लारी जिल्ह्याचा तहसिलदार देखील होता. मद्रास सरकारच्या आदेशावरुन इ.स.१९०१ मध्ये मालोजीराव उर्फ बालासाहेब यांना अधिकारपदावरुन मुक्त करण्यात येऊन सर्व अधिकार दिवाणाच्या हाती सोपविण्यात आले.[१९७]

राजे व्यंकटराव यांच्या कारकिर्दीमध्ये इंग्रज सरकारने नव्या राजकीय सुधारणा अमलात आणल्या. मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड सुधारणामधील अहवालात अशी शिफारस करण्यात आली होती की, भारतात सर्व महत्वांच्या संस्थानाचे राजकीय संबंध भारत सरकारशी प्रत्यक्ष जोडलेले असावे. या आधी या संस्थानांना संबंधीत प्रातांच्या गर्व्हनराशी व्यवहार करावे लागत होते. या अहवालातील तरतुदी १० सप्टें. १९२३ ला मद्रासच्या गर्व्हनरने सोंडूरच्या राजास कळविल्या. त्यानुसार १ ऑक्टो. १९२३ पासून सोंडूरच्या संस्थानचा राजकीय संबंध प्रत्यक्षपणे भारत सरकाशी जोडला गेला.[१९८] संस्थान व भारत सरकार यांच्यात संबंध जोडण्यासाठी गर्व्हनर जनरल चा एक विशेष अधिकारी नेमण्यात आला. या अधिकाऱ्याची कचेरी त्रिवेन्द्रम येथे ठेवण्यात आली.[१९९] या सुधारणांमुळे दक्षिण भारतातील त्रावणकोर, कोचीन आणि सोंडूर या राज्याला नवे स्थान मिळाले.

व्यंकटराव यांचा विवाह अक्कलकोटची राजकन्या ताराराणी यांच्याशी झाला. त्या २४ जुलै १९२६ रोजी मरण पावल्या. तर २४ जुलै १९२७ रोजी राजे व्यंकटराव दुसरे यांचे निधन झाले. त्यांना पुत्र संतती नव्हती. त्यामुळे त्यांच्यानंतर राजकीय प्रथेप्रमाणे गजेन्द्रगडचे जहागिरदार भुजंगराव यशंवतराव घोरपडे यांचे जेष्ठपुत्र श्रीमंत यशवंतराव घोरपडे हे सोंडूरच्या गादीवर विराजमान झाले.

---

१९६. France, W., **Madras District Gazeetters, Bellary,** Edition-1904, Pg. 315.
१९७. **कित्ता,** पृ. ३१६.
१९८. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. २०८.
१९९. **कित्ता,** पृ. २०८.
* परिशिष्ट क्र. २४.

# प्रकरण ५ वे

# सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्यातील राज्यकर्ते

## [स्वातंत्र्योत्तर काळातील]

## प्रकरण पाचवे

# सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्यातील राज्यकर्ते

## (स्वातंत्र्योत्तर काळातील)

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचा जो भाग खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला, त्याला त्याकाळी 'ब्रिटिश इंडिया' या नावाने संबोधले जात असे. सोंडूर संस्थानचा राजकीय संबंध हा पुर्णपणे १९२३ पासून भारत सरकारशी जोडला गेलेला होता. भारत स्वतंत्र झाल्यापासून सोंडूर संस्थानातील राज्यकर्त्यांनी स्वतंत्र भारताच्या आधुनिक विकासात योगदान दिलेले दिसते, सोंडूर संस्थानाचे भारतात विलीनीकरणही करण्यात आले. आता हे संस्थान कर्नाटक राज्यातील बेल्लारी जिल्ह्यात आहे. सोंडूर संस्थानचे विलीनीकरण झाले, त्यावेळी श्रीमंत यशवंतराव हिंदुराव घोरपडे हे गादीवर विराजमान होते. त्यांनी नेहमीच स्वहितापेक्षा जनतेचे व पर्यायाने देशाचेच हित जपण्याचा प्रयत्न केला. खऱ्या अर्थाने सोंडूर संस्थानात बदललेल्या काळाप्रमाणे सुधारणा केल्या. ते स्वत: उच्चविद्याविभूषित होते. त्यांनी आपल्या मुलांना देखील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.

**५.१ यशवंतराव सोंडूरकर हिंदुराव घोरपडे*** (इ.स. १९२८ ते इ.स. १९९६) :-

राजे यशवंतराव गादीवर येण्यापूर्वी राजे व्यंकटराव दुसरे सोंडूरचे राजे होते. २४ जुलै १९२७ रोजी व्यंकटरावांचे निधन झाले.[१] त्यावेळी ते निपूत्रिक होते, अशावेळी राजगादीस वारस असावा याकरिता घराण्यातील तत्कालीन राजकीय प्रथेप्रमाणे भाऊबंदकीतूनच मुल दत्तक घेण्याचे ठरले. मुरारराव हिंदुराव घोरपडे यांच्या मृत्युनंतर गजेन्द्रगडची जहागीर त्यांचा भाऊ दौलतराव यास पेशव्यांनी देऊन त्यास स्थानापन्न केले.[२] याच गजेन्द्रगडच्या शाखेतील जहागिरदार श्रीमंत सरदार भुजंगराव यशवंतराव घोरपडे यांचे जेष्ठ पुत्र यशवंतराव यांची सोंडूरच्या गादीवर वारस म्हणून बसविण्यासाठी ब्रिटिश शासनाने निवड केली. यशवंतरावांचा जन्म १२ नोव्हें. १९०८ रोजी बडोदा येथे झाला.[३] यशवंतरावाचे शिक्षण बेंगलोर येथील युरोपीय पब्लिक स्कूलमध्ये झालेले होते. इंदौरच्या होळकर

१. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२०९.
२. गर्गे, स. मा., (संपा.), **मराठी रियासत, खंड सहावा,** आवृती- २०१२, पृ.३०४.
३. गर्गे, स.मा., **पूर्वोक्त,** पृ. २१०.
* परिशिष्ट क्र. २५

कॉलेजमध्ये त्यांनी उच्चशिक्षण संपादन केले. त्यांचा आवडता विषय अर्थशास्त्र होता. त्यांनी आपल्या या आवडीचा उपयोग आपल्या संस्थानात विविध सुधारणा करण्यासाठी केलेला दिसतो. ते अलाहाबाद विद्यापीठाचे पदवीधर होते. १९२८ साली इंग्रज सरकारनी यशवंतरावांची सोंडूरचे राजे म्हणून निवड केली.[४]

'सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या अनुमतीने भारत सरकारने गजेन्द्रगडचे श्रीमंत भुजंगराव यशवंतराव घोरपडे यांचे सुपुत्र श्रीमंत यशवंतराव घोरपडे यांची सोंडूरच्या गादीवर वारस म्हणून निवड केली.' असा जाहीरनामा राज्यारोहण प्रसंगी गव्हर्नर जनरल त्यावेळचे दक्षिणेतील एजंट ले. क. क्रासवेट यांनी ब्रिटिश राजाच्या वतीने घोषित केला.[७] ५ फेब्रुवारी १९३० रोजी खास दरबार भरुन त्यात यशंवतरावांनी आपल्या राज्याचा संपूर्ण कारभार हाती घेतला. त्यांचा विवाह २२ डिसेंबर १९२९ रोजी ग्वाल्हेरच्या शितोळे देशमुख घराण्यातील सरदार राजराजेन्द्र मालोजीराव नरसिंहराव शितोळे राजा देशमुख[६] यांची सर्वात मोठी मुलगी सुशिलादेवी यांच्याशी झाला. श्रीमंत यशवंतराव आणि सुशिलादेवी यांना मुरारराव, रणजितसिंहराव, विजयसिंहराव, शिवराय, गजेन्द्रराव आणि व्यंकटराव असे सहा पुत्र आणि निर्मलादेवी व विजयादेवी ह्या दोन मुली होत्या.

महाराजांनी आपल्या सोंडूरच्या छोट्याशा गावातील घनदाट झाडीतील घर असलेल शिवपूर हे घर इ.स. १९४० मध्ये बांधून घेतल तोच शिवविलास पॅलेस* म्हणून ओळखले जाते. यशवंतरावांनी आपल्या मुलांच्या करीता शिक्षक म्हणून महाराष्ट्रातील कोल्हापूर परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे यांची निवड केली होती. शिवविलास पॅलेसमधील दुसऱ्या मजल्यावर एका प्रशस्त खोलीत बापूजी महाराजांच्या मुरारराव, रणजितसिंह, विजयसिंह व शिवराय या चार राजपुत्रांना आणि निर्मलादेवींना इंग्रजी, मराठी, गणित हे विषय शिकवित असत.[८] यशवंतराव महाराजांनी गादीवर आल्यावर आपल्या संस्थानाला एक आदर्श संस्थान बनविण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच छोटेसे असले तरी अनेक सुधारणावादी गोष्टी तेथे पुर्णत्वास गेल्या.

---

४. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ. ५.
५. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१०-११.
६. शितोळे देशमुख, सौ. सु. प्र., **पुणे प्रांताचे राजा देशमुख शितोळे घराण्याचा इतिहास**, आवृत्ती- मे २०१०, पृ. ७८.
७. **www. royalark.net.**
८. पाटील बाबासाहेब, **डॉ. बाबुजी साळूंखे**, आवृत्ती - डिसें. १९८६, पृ. २७.
* परिशिष्ट क्र. ३०

सोंडूरच्या राणी महाराज सुशिलादेवी घोरपडे यांच्या सूचनेवरुन बापूजी महाराजांच्या सल्लागार मंडळाचे एक सन्माननीय सदस्य बनले. महाराजांच्या ३५ व्या वाढदिवसाप्रित्यर्थ त्यांचे यथोचित गुण गौरव करणारे एक कवन बापूजींनी रचले होते.[९] या कवनात त्यांनी महाराजांचे सोंडूर संस्थानला वंद्य, रणांगणात झगडणाऱ्या मर्दवीर घोरपड्यांची परंपरा राखणारे, गुणवंतांना आश्रय देणारे, हिंदुपदपातशाहीचा शकट चालविणारे एक घटक, औदार्यशाली, जनतेच्या सर्वांगिण उन्नतीसाठी आनंदाने तनमनधन वेचणारे, प्रजाहितदक्ष, उन्मत्तांना शिक्षा ठोठावणारे, मधुर भाषणाने हितशत्रूंची वाट लावणारे, विद्यादानासाठी छत्रपती विद्यामंदिर उघडणारे, प्रथम हरिजनांना मंदिर प्रवेश करु देणारे, दक्षिण भारतातील अस्पृश्योध्दारकांचे अग्रणी राजे, असे वर्णन केले आहे. प्रस्तुत कवन हे 'बहु असोत सुंदर संपन्न की महा' या सुप्रसिध्द गीताच्या चालीवर आहे.

'सोंडूरभूदेवीपती वंद्य सर्वदा
प्रिय अमुचा नृप यशवंतराव हा ॥
घोरपडे मर्दवीर झगडले रणी
देइल इतिहास अशी ग्वाही या क्षणी
राखुनिया थोर अशी ती परंपरा
प्रिय अमुचा नृप यशवंतराव हा ॥
लोकशाही शिवशाही शूरवीर हे
हिंदू पदपादशाही शकट घटक हे
साधण्यात तेच कार्य झटतसे सदा
प्रिय अमुचा नृप यशवंतराव हा ॥
उच्चनीच भेदाचे भूत गाडुनी
औदार्य हेच क्षात्रब्रीद राखले जनी
गुणवंता देऊनिया खास आश्रया
प्रिय अमुचा नृप यशवंतराव हा ॥

---

९. सुर्वे, गजानन, शिक्षण महर्षी परमपुज्य बापुजी साळूंखेः व्यक्ति आणि कार्य, आवृत्ती - मार्च १९८१, पृ.४०.

विद्यामृतदानास्तव उघडले नवे

छत्रपती विद्यामंदीर भव्य हे

विद्धन्नृप विद्येवर ठेवि लोभ हा

प्रिय अमुचा नृप यशवंतराव हा ॥

हरिजन मंदीरप्रवेश प्रथम देत हा

अस्पृश्योध्दाराग्रणी दख्खनातला

पुरोगामी होऊनिया आज राहिला

प्रिय अमुचा नृप यशवंतराव हा ॥'[१०]

**५.१.१ राज्यात लोकशाहीकरणाला बळकटी :**

श्रीमंत यशवंतराव हिंदुराव घोरपडे, राजे सोंडूर हे आपले काम व जबाबदाऱ्या अतिशय चोखपणे निभावत.[११] त्यांनी आपल्या राज्यकारभारात अनेक महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. सोंडूर हे एक आदर्श संस्थान व्हावे यासाठी कायद्यामध्ये विविध प्रागतिक बदल करण्याकडे त्यांचा ओढा होता. आपल्या राज्यात लोकशाहीकरणाला बळकटी प्राप्त व्हावी यासाठी यशवंतरावांनी शेवटपर्यंत प्रयत्न केलेले दिसतात. त्यात त्यांना मोठ्या प्रमाणात यशसुध्दा मिळाले. हे नंतरच्या काळात सोंडूर राज्यात करण्यात आलेल्या कायदेविषयक सुधारणांवरुन लक्षात येते. त्यांच्या राज्यात प्रशासनाच्या लोकशाहीकरणाची आणि विकेंद्रीकरणाची सुरुवात इ.स. १९३१ मध्येच झाली. त्याची परिणती इ.स. १९४६ सालच्या सोंडूर संस्थान घटनेमध्ये (Sandur State Constitution Act) झालेली दिसते. या कायद्यान्वये संस्थातील प्रजेला जात, पंथ, लिंग, निरपेक्ष स्वातंत्र्याचा आणि समतेचा अधिकार मिळाला.

यशवंतरावांच्या काळात सोंडूरमध्ये अनेक सुधारणावादी कायदे लागू करण्यात आले. इ.स. १९३२ साली वतनदारी बरखास्तीचा कायदा लागू केला गेला.१२ इ.स. १९३४ साली शेतकऱ्यांना

---

१०. सुर्वे, गजानन, **शिक्षण महर्षी परमपुज्य बापुजी साळूंखे: व्यक्ति आणि कार्य,** आवृत्ती - मार्च १९८१, पृ.४१.

११. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. ६.

१२. **कित्ता,** पृ. ७.

कर्जमुक्त करण्याचा प्रश्न महाराजांनी हाती घेतला. त्यासाठी सर्व आवश्यक गोष्टींचा पाठपुरावा करुन दोन वर्षातच म्हणजे इ.स. १९३९ मध्ये आपल्या संस्थानात 'सोंडूर कर्ज निवारण कायदा' पास करुन घेतला.[१३] या कायद्यान्वये बरखास्ती कायदा आणि कर्ज निवारण कायद्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. यालाच 'डेट कन्सिलिएशन ॲक्ट' असेही म्हणतात. या कायद्यामुळेच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. सोंडूरमधील कायदा आणि सुव्यवस्था उत्तम होती. न्यायव्यवस्थेत जनतेवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होवू नये याकरिता इ.स. १९३२ मध्ये सोंडूरच्या न्यायखात्याची पुनर्रचना करण्यात आली. सोंडूरच्या 'चीफ कोर्ट ॲक्ट १९३२' प्रमाणे उच्च न्यायालयाचे अधिकार असलेले स्वतंत्र उच्च न्यायालय स्थापन करण्यात आले. त्यामुळे न्यायसंस्थेची निस्पृहता, कायदा व सुव्यवस्थेची पारदर्शकता, जिज्ञासा आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांची जोपासना सोंडूर राज्यात झाली. आपल्या कारकिर्दीत सोंडूरच्या किर्तीला एकाही फाशीचा कलंक लागू नये, अशी यशवंतरावांची स्वाभाविक इच्छा होती. त्यामुळेच त्यांनी कोर्चर मार्ग्य नावाच्या अट्टल गुन्हेगाराला आपल्या अधिकारात दया दाखवली. त्याने देखील पुन्हा सोंडरमध्ये गुन्हेगारी कृत्य केले नाही.[१४] सोंडूरच्या चीफ कोर्टकरिता बेल्लारी जिल्ह्याचे जज यांची नेमणूक मद्रास सरकारच्या अनुमतीने झाली.[१५]

सोंडूर राज्यात जनतेला लोकशाही विषयीची जाणीव निर्माण व्हावी. याकरिता राज्यात इ.स. १९३९ मध्ये दरबार व प्रजामंडळ अशा दोन सभागृहांची स्थापना करण्यात आली. सन १९४६ च्या सोंडूर संस्थानच्या घटना कायद्याप्रमाणे महाराजांनी स्वत:कडे फक्त आपत्कालीन आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार राखून ठेवलेला होता. तर सोंडूरच्या प्रजेला प्रौढ मतदानाचा अधिकार मिळालेला होता.[१६] कोणतेही विधेयक कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यावर महाराजांची त्यावर स्वाक्षरी होताच त्या विधेयकाचे रुपांतर कायद्यात केले जात असे. नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य सुरक्षित ठेवणे; जात, धर्म, लिंग इत्यादी भेद न मानता समता प्रस्थापित करणे आणि नागरिकांना प्रौढ मताधिकार प्राप्त होणे अशा मूलभूत तरतुदीही घटनेत केलेल्या होत्या. नागरिकांचे कल्याण,

---

१३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१३.

१४. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. ८.

१५. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. २१२.

१६. घोरपडे, मु. य., **पूर्वोक्त,** पृ. ७.

शिक्षण आणि सुरक्षितता यासाठी आर्थिक तरतूदही करण्यात आलेली होती. आजच्या काळात या मुलभूत गरजांसाठी आंदोलने व संघर्ष करावा लागतो, मात्र महाराजांनी स्वयंस्फूर्तीने प्रजेला कुठलेही आंदोलन करायला न लावता त्याबाबतीत पुढाकार घेऊन सर्व तरतुदी केल्या व त्या शेवटपर्यंत कायम राखल्या.[१७] सोंडूर हे राज्य छोटे असले तरी कार्यक्षमता आणि रयतेच्या समाधानाचे एक लक्ष्यवेधी उदाहरण झाले होते. छोट्याशा प्रशासकीय मुलखात किती कार्यक्षमता आणि सुखसमाधान नांदू शकते हे त्यातून दिसून येते.[१८]

### ५.१.२ सोंडूर संस्थानचे विलीनीकरण :

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र हिंदुस्थानात संस्थानाचा प्रश्न निर्माण झाला. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यात भारताला स्वातंत्र्य दिल्यानंतर ब्रिटिश सरकारचा संस्थानावरील सार्वभौम हक्क संपुष्टात येईल असे नमूद करण्यात आले. भारतीय संस्थानांचा प्रश्न यशस्वीपणे हाताळण्याचे श्रेय सरदार वल्लभभाई पटेल आणि व्ही. पी. मेनन यांना द्यावे लागेल. भारतीय सचिवालायाची स्थापना (स्टेटस् मिनिस्ट्री) भारतीय गृहमंत्रालयांतर्गत ५ जुलै १९४७ रोजी करण्यात आली. त्याचे काम भारतीय केंद्र सरकार आणि भारतीय राज्य संस्थाने यांच्यात उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या समस्या किंवा बाबींमध्ये समन्वय साधणे हे होते. सरदार वल्लभभाई पटेलांची प्रमुख म्हणून त्यावर नियुक्ती केलेली होती. सरदार पटेल आणि भारताचे त्यावेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांनी संस्थानांना भारत देशात सामील व्हावे असा सल्ला दिला.[१९] सर्व संस्थानिकांना मान्य होईल असा सामीलनामा तयार करण्यात आला आणि त्याच्या प्रती सही करण्यासाठी संस्थानिकांना देण्यात आल्या.

भारतीय संघराज्यात संस्थानांचे झालेले सामीलीकरण हा संस्थानांच्या विलीनीकरणाच्या प्रक्रियेतील पहिला टप्पा होता, तो ऑगस्ट १९४७ मध्ये संपला. भारताला खऱ्या अर्थाने एकसंघी बनवायचे असेल तर संस्थानच्या सीमा रद्द करुन तेथील प्रजेला भारतीय नागरीकांचा दर्जा देणे

१७. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१३.
१८. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. ७.
१९. Kumar, B.B., **Small States Sundrome in India,** Edi. 1998, Pg. 40.

आवश्यक होते. संस्थानांच्या संपूर्ण विलीनीकरणाच्या दृष्टीने भारत सरकारने सन १९४७ नंतर महत्वाची पावले उचलली आणि संपूर्ण विलीनीकरणाचे उद्दिष्ट सिध्दीस नेले. सोंडूर संस्थानच्या १९४६ च्या घटनात्मक कायद्याप्रमाणे राज्याच्या दरबार व प्रजामंडळ अशा दोन्ही सभागृहात दिनांक १० ऑगस्ट १९४७ रोजी सामीलनामा (Instrument of Accession) एकमताने मंजूर झाला. भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी सामीलनामा स्विकारला*.

या सामीलनाम्यासंबंधी प्रजामंडळात ठराव मांडला गेला. या सभागृहापुढे चर्चेसाठी आणि शिफारस करण्यासाठी मांडण्यात आलेल्या घटनात्मक स्वरुपाच्या महत्वाच्या विषयाबाबत सोंडूरचे महाराज आणि प्रजाजन यांच्या हितसंबंधात संपूर्ण सारखेपणा होता, याचा हा भक्कम पुरावाच म्हणावा लागेल. प्रजामंडळात या सामीलनाम्यासंबंधी चर्चा झाली. त्यानुसार राज्याचे विलीनीकरण कशा पध्दतीने व्हावे यासंबंधी सरदार वल्लभभाई पटेलांशी चर्चा करण्याकरिता एक शिष्टमंडळ पाठवण्यात यावे असे ठरले. या शिष्टमंडळाने विलीनीकरणाच्या कार्यपध्दती बरोबरच, हे राज्य मद्रासच्या ऐवजी लगतच्या म्हैसूर राज्यात विलीन करणेच योग्य होईल या मुद्यावर भर दिला, कारण सोंडूरचा प्रदेश प्रामुख्याने कन्नड प्रदेश होता. या ठरावाला राज्य विधीमंडळानेही मंजूर केले.[२०]

राज्याच्या कायदेमंडळाने ठराव मंजूर केल्यानंतर स्वत: श्रीमंत यशवंतराव घोरपडे यांनी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना दि. ७ मार्च १९४९ रोजी याच संदर्भात एक पत्र लिहीले. त्यात, 'सोंडूर राज्य मद्रासऐवजी म्हैसूर राज्यात विलीन होणेच मी अधिक पसंत करतो.' असे सांगून त्यामध्ये सोंडूर राज्य मद्रास ऐवजी म्हैसूर राज्यात विलीन करणे कसे सोईचे व आवश्यक आहे याबाबत सविस्तर विचार मांडले. या पत्राच्या शेवटी महाराज लिहीतात, औद्योगिक दृष्ट्या अत्यंत प्रगत असे म्हैसूर राज्य सोंडूरच्या लगत त्याला मदत देण्यास निकटचे असतांना ते म्हैसूरमध्ये विलीन करण्याच्या बाबतीत आपल्या सचिवालयाने (States Ministry) त्याचा विचार का करु नये? याबाबतीत ही बाब मी पूर्णपणे आपल्यावरच सोपवतो.[२१] या पत्राबाबत सरदार पटेलांनी देखील सौहार्दाची भूमिकाच घेतली. परंतु यावेळी विलीनीकरणाच्या प्रक्रियेत

२०. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१५.
२१. **कित्ता,** पृ. २१६.
* परिशिष्ट क्र. ४४.

सरदार पटेलांबरोबरच महत्वाची भूमिका बजावणारे श्री. व्ही. पी. मेनन यांनी सरदार पटेलांच्या पत्रातील मुळ हेतुकडेच दुर्लक्ष केले. त्यामुळे १ एप्रिल १९४९ रोजी श्रीमंत यशवंतरावांनी विलीनीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केली व त्यांचे राज्य (संस्थान) मद्रास राज्यात विलीन करण्यात आले.[२२]

इ.स. १९५० च्या भारतीय राज्यघटनेनुसार म्हैसूर राज्याला 'ब' दर्जा देण्यात आला. १ नोव्हें. १९५६ पासून सर्व कन्नडभाषिक प्रदेश एकत्र होऊन म्हैसूर (विद्यमान कर्नाटक) राज्य अस्तित्वात आले.[२३] या राज्यपुनर्रचनेच्या वेळी बेल्लारी जिल्हा म्हैसूर राज्याशी जोडला गेला. तसेच सोंडूरचा प्रदेशही म्हैसूर राज्यात विलीन झाला.[२४] सोंडूर संस्थानचे बेल्लारी जिल्ह्यात विलीनीकरण झाल्यामुळे सोंडूरचा एक स्वतंत्र मतदार संघ तयार करण्यात आला. ज्यात सोंडूर, चिरनूर, तोरणगल्लू आणि फिरके या सर्व प्रदेशांचा समावेश केला गेला. या घटनेमुळे सोंडूर या मतदारसंघाला म्हैसूर कायदेमंडळात हक्काची एक जागाही मिळाली.[२५]

### ५.१.३ सोंडूरच्या विकासात योगदान :

५ फेब्रुवारी १९३० रोजी खास दरबार भरुन श्रीमंत यशवंतराव घोरपडे यांनी आपल्या राज्याचा संपूर्ण कारभार हातात घेतला. त्यांनी सोंडूर संस्थानचा सर्वांगिण विकास व्हावा, सोंडूर हे एक आदर्श संस्थान व्हावे यासाठी धडपड केली. इ.स. १९३२ मध्ये आपल्या कारभारासंबंधी धोरणात्मक जाहीरनामा घोषित केला. त्यांनी घोषित केलेल्या जाहीरनाम्यामुळे भारतातील अस्पृश्यता निवारणाच्या प्रयत्नांना मदत झाली. या जाहीरनाम्यामुळे राज्यातील सर्व देवालयातून सर्व जाती धर्माच्या लोकांना प्रवेशाचा आणि पूजेचा समान हक्क प्राप्त झाला. त्यांनी १९३४ मध्ये संस्थानातल्या हरिजनांसाठी मंदिर प्रवेश खुला करण्याचा अधिनियम जारी केला.[२६] त्यांच्या ह्या प्रगतीकारक कायद्याकडे महात्मा गांधी सारख्या थोर व्यक्तीचे लक्ष वेधले जाणे सहज शक्य होते. महात्मा गांधींनी १९३४ मध्ये सोंडूरला भेट दिली. महाराजांच्या धाडसी व दूरदर्शी धोरणाची प्रशंसा केली.[२७] त्यावेळी ते म्हणाले

---

२२. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१६.

२३. जोशी, पं. लक्ष्मणशास्त्री, **मराठी विश्वकोश, खंड तेरावा,** आवृत्ती - १९८६, पृ. १३२८.

२४. Sadashivan, S.N., **Political and Administrative integration of Princely States,** Edition-2005, Pg. 37.

२५. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. २१९.

२६. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. ६.

सोंडूर म्हणजे एक मरुद्यानच (वाळवंटातील हिरवळ) आहे. दक्षिण भारतातल्या एका छोट्याशा संस्थानाने आपल्या राज्यातील सर्व मंदिर हरिजनांसाठी खुली केली, पण म्हणून काही आभाळ कोसळल नाही.[२८]

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंडीत जवाहरलाल नेहरुंनी राष्ट्र उभारणीकरिता इच्छा व्यक्त केली होती की, विलीन झालेल्या संस्थानांनी भारताच्या आधुनिक विकासात मोलाचा हातभार लावावा आणि स्वत:साठीपण उज्ज्वल भवितव्य साकार करावे.[२९] महाराजांनी देखील राज्याचा कारभार भारत सरकारकडे विलीनीकरणामुळे हस्तांतरित झाल्यामुळे आपले लक्ष सोंडूरच्या प्रदेशाची औद्योगिक प्रगती करण्यावर केंद्रित केले. सोंडूर परिसरात भरपूर प्रमाणात लोह व मॅगनीजच्या खाणी आहेत. त्या खनिजापासून धातू वेगळा करण्यासाठी एक विद्युतधातुशास्त्रीय प्रकल्प उभा करता यावा व त्यासाठी अगदी शास्त्रशुध्द पध्दतीने खाणकाम करावं असा महाराजांचा विचार होता.[३०] तसेच सोंडूर परिसरातील लोकांना रोजगार मिळावा, कामधंद्याची संधी अधिकाधिक उपलब्ध व्हावी यासाठी १८ जानेवारी १९५४ रोजी त्यांनी 'सोंडूर मॅगनीज ॲण्ड आयर्न ओर्स प्रायवेट लिमिटेड'* या नावाची एक कंपनी स्थापन केली.[३१] १९६४ मध्ये त्याची एक 'पब्लिक लिमिटेड कंपनी' करण्यात आली. या कंपनीनेच इ.स. १९६९ मध्ये 'मेटल ॲन्ड फेरो अलॉईड प्लँट' हा कारखाना सुरु केला. याचा उपयोग सोंडूर परिसरातील रहिवाशांच्या जीवनाची प्रत सुधारण्यासाठी व्हावा यासाठीच नवनवीन उद्योग सुरु करण्यात महाराजांनी लक्ष घातले. त्यांनी १९५३ मध्ये सोंडूरच्या खोऱ्यात, देवगिरी आणि रामगडच्या टेकड्यांवरील मॅगनीज खणून काढण्यासाठी परवाना सुध्दा मिळवला. त्यांच्यापूर्वी एक बेल्जिअमची कंपनी हे काम करीत होती. महाराजांनी मात्र पर्यावरणाची हानी होणार नाही याची देखील काळजी घेतली.

महाराजांना शैक्षणिक क्षेत्रातही विशेष रुची होती असे दिसते. सोंडूर परिसरातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले ते स्वत: राजे असले तरी त्यांच्या सर्व मुलांचे

---

२७. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास,** आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ.२१२.
२८. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. ६.
२९. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ११.
३०. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. २९.
३१. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. २१९.
* परिशिष्ट क्र. ३७.

प्राथमिक शिक्षण सोंडूर येथे १९४२ साल स्थापन केलेल्या विद्यामंदिर याच शाळेत पुर्ण झाले. सोंडूर परिसरात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा, कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी महाराजांनी ७ ऑक्टों. १९५८ रोजी 'सोंडूर एज्यूकेशन सोसायटीची' स्थापना केली.[३२] या संस्थेच्या वतीने सोंडूर येथे छत्रपती विद्यामंदिर ही शाळा चालविण्यात येते. या लावलेल्या शिक्षणाच्या रोपट्याचा आज मोठा वटवृक्ष झाला आहे. त्याच्या शाखा एकोणावीस शिक्षण संस्थांच्या रुपाने सोंडूर, होस्पेट व आसपासच्या अनेक गावात पसरलेल्या आहेत. १९३८ साली बेल्लारीला कर्नाटक साहित्य परिषदेचे उद्घाटन करतेवेळी महाराजांनी सर्व भारतीयांसाठी एक समान भाषा असावी असा विचार व्यक्त केला. तसेच मातृभाषेच्या प्रेमाच्या भरात आपण हे विसरणे योग्य नाही की सर्वप्रथम आपण भारतीय आहोत, हा विचार सांगितला.[३३] १० मे १९८० रोजी मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठा परिषदेचे ते अध्यक्ष होते.[३४] ११ ऑक्टोबर १९९६ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी शिवविलास महाल सोंडूर येथे त्यांचा मृत्यू झाला.[३५]

## ५.२ मुरारराव दुसरे सोंडूरकर हिंदुराव घोरपडे (इ.स. १९९६ ते इ.स. २०११):

सोंडूरचे राजे व्यंकटराव इ.स. १९२७ ला निधन पावल्यानंतर इंग्रज सरकारने इ.स. १९२८ मध्ये यशवंतराव घोरपडे यांना सोंडूरच्या राजगादीवर विराजमान केले. इ.स. १९२८ ते इ.स. १९९६ या त्यांच्या मोठ्या कारकिर्दीमध्ये यशवंतरावांनी सोंडूरचा कारभार उत्तम रितीने चालविला. इ.स. १९९६ मध्ये त्यांच्या निधनानंतर त्यांचे ज्येष्ठपुत्र श्रीमंत मुरारराव घोरपडे गादीवर बसले. राजे यशवंतराव आणि ग्वाल्हेरचे सरदार एम. एन. शितोळे यांची मोठी मुलगी सुशिलादेवी यांच्या पोटी ७ डिसेंबर १९३१[३६] रोजी बेंगलोर येथे मुराररावांचा जन्म झाला. मुराररावांची आई राजमाता सुशिलादेवी घोरपडे ह्या शितोळे घराण्यातील असून त्यांचे आजोळ हे ग्वाल्हेरचे शिंदे घराणे होते. महादजी शिंदे हे सुशिलादेवींचे मामा होते. शितोळे व शिंदे या दोन्ही सरदार घराण्यातील शिस्त, वैभव आणि सरंजामी थाट याचा खूप मोठा प्रभाव सुशिलादेवींवर असल्याने मुरारराव आणि त्यांच्या भावंडांनी

---

३२. गर्गे, स. मा.,हिंदुराव घोरपडे घराण्याचा **दक्षिणेतील इतिहास,** आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२२०.

३३. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. ३२.

३४. गर्गे, स. मा., **पूर्वोक्त,** पृ. २२०.

३५. **www. royalark.net.**

३६. घोरपडे, मु. य., पूर्वोक्त, पृ. २.

तशाच प्रकारच्या राजशिष्टाचारामध्ये असायला हवे हा राजमातांचा आग्रह असे. त्यामुळे आईची शिस्त, शिष्टाचार व विनम्रतेचा प्रभाव मुराररावांच्या व्यक्तिमत्वावर पडलेला दिसतो.

मुरारराव घोरपडे यांचे संपूर्ण शालेय शिक्षण सोंडूर येथे वडिलांनी सुरु केलेल्या विद्यामंदिरातच झाले. तत्पूर्वी रामगड या थंड हवेच्या ठिकाणी इंग्रजांनी काही बराकी व इमारती बांधल्या होत्या. तिथे शाळा चालविण्याचा प्रयोग केला गेला. परंतु लवकरच तो प्रयोग फसला आणि राजे यशवंतराव घोरपडे यांनी १९४२ साली सोंडूरमध्ये 'विद्यामंदिर' नावाची शाळा सुरु केली.[३७] तेथे चार वर्ग आणि पाच सहा शिक्षक नियुक्त केलेले होते. ही शाळा खास करुन मुरारराव व त्यांच्या इतर भावंडांच्या शिक्षणासाठी उभारली असली तरी ज्यांना कुणाला शिक्षणाची इच्छा असेल त्या सर्वांसाठी शाळेची सोय केलेली होती. विशेष म्हणजे या शाळेत सर्व जातीधर्माच्या मुलांना प्रवेश असून संस्थानिकांचा मुलगा म्हणून मुराररावांना कोणतीही विशेष वागणूक मिळत नसे. या शाळेची शिस्त अतिशय कडक होती. एकदा मुराररावांनी वर्गातील विद्यार्थ्यांविषयी काहीसा अनुदार शब्द वापरल्याने त्यांचे वर्गशिक्षक मुथ्थुकृष्ण यांनी त्यांना शाळेच्या मैदानाला ३ फेऱ्या मारायला लावल्या आणि यानंतर अश्याप्रकारचे अपशब्द वापरायचे नाहीत अशी तंबी दिली.[३८] शाळेतील या विशेष शिस्त व समान वागणूकीमुळे मुराररावांच्या आचार, विचार आणि वाणी यामध्ये सुसंस्कृतपणा निर्माण होण्यास मदत झाली.

इ.स. १९४५ साली सोंडूर संस्थानातील पाच विद्यार्थ्यांनी बनारस हिंदू युनिर्व्हसिटीमधून मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण केली आणि बेंगलोर येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये इ.स. १९४६ मध्ये प्रवेश घेऊन सन १९४८ मध्ये इंटरची परिक्षा पास केली.[३९] त्यानंतर इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र याबरोबर इंग्रजी आणि संस्कृत या दोन भाषा घेऊन मुरारराव सन १९५० मध्ये पदवीधर झाले. त्या दरम्यान म्हणजेच इ.स. १९४८ ला या महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांनी विद्यार्थी संघटनेच्या निवडणूकीला पहिल्यांदा परवानगी दिली. मुरारराव विद्यार्थी संघटनेच्या कार्यामध्ये सक्रिय असल्याने आणि सहकारी मित्रांच्या आग्रहावरुन अध्यक्षपदाची निवडणूक लढवून जिंकले, आणि उपाध्यक्षपदी

---

३७. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ. १७.

३८. **कित्ता**, पृ. २०.

३९. **www. royalark.net.**

त्यांचाच मित्र एस. एम. कासिम हे निवडून आले. खऱ्या अर्थाने या निवडणुकीपासून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली असे म्हणता येईल.[४०]

बेंगलोर येथे पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी लंडन येथील केंब्रिज विद्यापीठात त्यांनी उच्च शिक्षण घेतले.[४१] तेथील सेंट जॉन कॉलेज मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता त्यांनी प्रवेश घेतला. तेथे विशेष अभ्यासासाठी सार्वजनिक वित्तपुरवठा (Public Finance) आणि आंतरराष्ट्रीय कायदा (International Law) हे विषय निवडले होते. केंब्रिजमध्ये सी. डब्ल्यू. गिलीबो यांनी मुराररावांना मार्गदर्शन केले. तेथे असतांना इ.स. १९५२ मध्ये केंब्रिजच्या मजलिस सोसायटीचे ते अध्यक्ष होते, त्याच बरोबर केंब्रिज विद्यापीठाच्या मजूर संघाचे ते सक्रिय सदस्य होते. त्यामुळे त्यांच्यावर समाजवादाचा मोठा पगडा असल्याचे आपल्याला दिसून येते. इ.स. १९५२ मध्ये मुारराव केंब्रिज विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयाची पदव्युत्तर पदवी घेऊन सोंडूरला परत आले.

केंब्रिज विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर इ.स. १९५३ मध्ये बडोद्याच्या गायकवाड घराण्यातील राजे प्रतापराव गायकवाड आणि राणी शांतादेवी यांची कन्या व राजे सयाजीराव गायकवाड आणि महाराणी चिमणाबाई यांची पणती वसुंधरादेवी यांच्या मुराररावांचा विवाह झाला.[४२] हा विवाह ५ मार्च १९५३ रोजी पुण्यामध्ये पारंपारिक पध्दतीने झाला. मुारराव व वसुंधरादेवी यांना अजयसिंह, सुजयसिंह, कार्तिक अशी तीन मुले तर अनुराधा ही एक मुलगी अशी एकुण चार मुल होती.*

### ५.२.१ प्रदिर्घ राजकीय कारकिर्द :

मुराररावांची राजकीय कारकिर्द फार मोठी आहे. विद्यार्थी दशेपासूनच बेंगलोर आणि केंब्रिज विद्यापीठात शिक्षण घेत असतांना त्यांनी तेथील विद्यार्थी संघटना आणि चळवळीचे नेतृत्व केले. विद्यार्थी दशेतच त्यांनी आपल्या नेतृत्व गुणांची चुणूक दाखविली. बेल्लारी जिल्हा कॉंग्रेसचे जिल्हा प्रमुख टेकूर सुब्रमण्यम् यांनी जून १९५४ मध्ये मुराररावांना कॉंग्रेस पक्षात प्रवेश दिला. १९५६ च्या

---

४०. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ. २१.
४१. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. १०.
४२. ४०. घोरपडे, मु. य., **पूर्वोक्त,** पृ. २१.
* परिशिष्ट क्र. ५०.

भाषावार प्रांत रचनेच्या वेळी बेल्लारी म्हैसूर राज्याशी जोडला गेला. त्यामुळे सोंडूरही म्हैसूर राज्यात विलीन झाले.[४३] त्यानंतर इ.स. १९५७ मध्ये होऊ घातलेल्या निवडणुकांसाठी सोंडूर हा नवीन मतदारसंघ निर्माण करण्यात आला. त्यावेळी मुराररावांचे तिकीट नाकारुन रायनगौड यास तिकीट दिले गेले. तरी देखील मुराररावांनी रायनगौडचा प्रचार करुन प्रचंड बहुमतांनी त्यास निवडून आणले. इ.स. १९५८ साली सोंडूर रहिवाशांच्या आग्रहाखातर त्यांनी सोंडूर पंचायतीचे अध्यक्षपद स्विकारले. ह्या पदचा जनसेवेचे साधन म्हणून त्याचा त्यांनी उपयोग केला. याचदरम्यान मुराररावांच्या वडीलांनी म्हणजेच यशवंतराव घोरपडेंनी स्थापन केलेल्या विजया को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षपदी मुराररावांची बिनविरोध निवड झाली.[४४] इ.स. १९५९ ते इ.स. २००४ या काळात त्यांनी सातवेळा सोंडूर विधानसभा मतदारसंघातून तर रायचूर मतदारसंघातून एकदा लोकसभेवर निवडून गेले. ४५ वर्षांपर्यंत कर्नाटक राज्याच्या राजकारणात त्यांचा सक्रिय सहभाग असलेला दिसून येतो.

इ.स. १९५४ ला काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर ते राजकारणात सक्रिय झाले. इ.स. १९५७ च्या सोंडूर विधानसभा मतदारसंघातून तिकीट मिळावे यासाठी मुराररावांनी प्रयत्न केले परंतु ते राजकारणात नवखे आहे म्हणून तिकीट डावलून नवख्या असणाऱ्याचं रायनगौड यास वरिष्ठांनी उमेदवारी दिली. तरीही मुराररावांनी स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवला आणि रायनगौड यांच्या प्रचाराची धुरा सांभाळून त्यांना निवडून आणले. मात्र अवघ्या दोन वर्षातचं रायनगौड यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने सोंडूर विधानसभा पोटनिवडणूकीची उमेदवारी मुराररावांना मिळावी याकरिता टेकूर सुब्रमण्यम् आणि कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री बी.डी. जत्ती यांनी प्रयत्न केले व त्यांना उमेदवारी मिळाली. या पोटनिवडणूकीत मुराररावांचा विजय झाला, तेव्हापासून इ.स २००४ पर्यंत सोंडूरच्या मतदारसंघाचे नेतृत्व त्यांनी सक्षमपणे केले.

११ मार्च १९५९ रोजी सोंडूर विधानसभा मतदारसंघाचा नवनिर्वाचीत आमदार म्हणून मुराररावांनी शपथ घेतली.[४५] त्यांनी विधानसभेमध्ये शिक्षण, ग्रामविकास तसेच नियोजन या महत्वपूर्ण विषयावर भाषणे दिली. जून १९६० मध्ये नंदी हिल्स येथे आमदार व खासदारांचे एक अभ्यास

४३. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१७.
४४. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ.३६.
४५. **कित्ता**, पृ. ४७.

शिबीर आयोजित केले गेले होते. मुरारराव त्या नियोजनाच्या सुकाणू समितीचे सदस्य होते. त्यामध्ये गाव आणि ब्लॉक पातळीवरील नियोजनावर आणि स्थानिक संस्थांना सरकारी निधी उपलब्ध करुन देण्यावर भर होता. नेहरु आणि डे यांच्या पुढाकाराने वस्ती विकासाची मोहिम सुरु करण्यात आली होती. ती मोहिम तळागाळापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी नेहरुंनी डे यांच्यावर सोपविली. एस. के. डे आणि मुराररावांचे संबंध उत्तम असल्याने ह्या दोघांनी ग्रामविकास आणि वस्तीविकासाचे तालुका पातळीवरचे नियोजन राज्य व देश पातळीवरील नियोजनात कसे समाविष्ट आणि लोकाभिमुख करायचं याकडे प्रामुख्याने लक्ष पुरविले.[४६]

देशातील लोकशाहीचे विकेंद्रिकरण करण्याच्या दृष्टीने बळवंतराव मेहता समितीने एक अहवाल सादर केला त्यामध्ये विकासाचे उपक्रम सुसंघटीतपणे राबवायचे असतील तर ते तालुक्या सारख्या छोट्या पातळीवर राबवायला हवे या पासून प्रेरणा घेऊन एप्रिल १९५९ साली म्हैसूर विधानसभेमध्ये 'म्हैसूर ग्रामपंचायत आणि स्थानिक मंडळे'[४७] याविषयीचे विधेयक मांडण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये मुराररावांनी सहभाग घेऊन विधेयक पारित करण्यात महत्वाची भूमिका बजावली. हे विधेयक म्हणजे म्हैसूरच्या स्थानिक स्वप्रशासनाच्या इतिहासात अतिशय महत्वपूर्ण आहे. कारण विकासकार्याची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी याकरिता लोकसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने कसे महत्वपूर्ण आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून पटवून दिले. म्हैसूर सरकारने इ.स. १९६२ मध्ये एक ठराव घेऊन पाच सदस्यांचा अभ्यास गट तयार केला, त्यामध्ये मुराररावांच्या नावाचा समावेश असून एस. के. डे समितीचे प्रमुख तर राज्यसभेचे एक सदस्य के. सन्थानम समितीचे अध्यक्ष होते.[४८] या समितीच्या माध्यमातून पंचायत राज संस्थांची साधने आणि त्यास उपलब्ध करुन द्यावयाचा निधी हा या गटाचा अभ्यासाचा मुख्य हेतू होता. मुरारराव आणि इतर सदस्यांनी ऑक्टों. १९६२ ते जून १९६३ याकाळात आंध्रप्रदेश, राजस्थान, म्हैसूर, पंजाब, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, ओरिसा, केरळ, बिहार आणि मध्यप्रदेश ह्या राज्यांचे दौरे केले. या अभ्यासगटाच्या अहवालातून पंचायतराज संस्थानच्या कामगिरीविषयीचे व निधीविषयीचे महत्वपूर्ण निर्णय स्पष्ट केलेले आहेत.

---

४६. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ.४८.
४७. **कित्ता**, पृ. ५०.
४८. **कित्ता**, पृ. ५३.

मुरारराव‍ांना राजकारण आणि समाजकारणाबरोबरच शेतीची प्रचंड आवड होती. सोंडूर जवळ असलेली शेती ते स्वत: पाहत असत. शेतीमध्ये ते नवनविन प्रयोग करीत, पशुपालन, फळशेती आणि लावगवडीचे अनेक नविन प्रयोग त्यांनी केले. भारतीय कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन आणि मुरारराव यांचा स्नेह केंब्रिज विद्यापीठातील शिक्षणापासूनच होता. स्वामीनाथन यांनी अधिक उत्पादनासाठी संकरित बियाणे तयार करण्याचे फार मोठे कार्य केले आहे. स्वामीनाथन यांच्या शेतीविषयक शास्त्रीय ज्ञानाची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी, या दृष्टीने मुराररावांनी इ.स. १९६५ मध्ये त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याकडून संकरित बियाणे आणि त्यांची संपूर्ण माहिती घेतली. स्वत:च्या शेतीमध्ये त्यांची प्रत्यक्ष लागवड करुन लोकांना प्रात्यक्षिक दाखविले आणि नविन शेतीविषयक शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करुन उत्पादन वाढविण्यासाठी प्रोत्साहित केले. त्याचा परिणाम असा झाला की सोंडूर आणि बेल्लारी याभागात या संकरित बियाण्यांनी फार मोठी क्रांती घडवून आणली.[४९]

तळागाळात काम करण्याचा अनुभव असणाऱ्या व प्रशासनात सर्वात वरच्या पातळीवर कामाचे नियोजन करणारे यांच्यात परस्पर विचार विनिमय व्हावा या हेतूने इ.स. १९६५ मध्ये भारत सरकाराने राष्ट्रीय नियोजन सल्लागार मंडळाची स्थापना केली. त्यामध्ये सदस्य म्हणून मुरारराव‍ांची देखील नियुक्ती करण्यात आली. हे काम मुरारराव‍ांच्या अतिशय आवडीचे असल्यामुळे या कार्यामध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला. त्यानंतर मार्च १९६७ मध्ये अंदाजी समितीचा अध्यक्ष तर १९६८ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय पत सल्लागार मंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती केलेली होती. या मंडळाचे अध्यक्ष हे अर्थमंत्री होते तर उपाध्यक्ष रिझर्व बँकेचे गव्हर्नर होते आणि नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष हे देखील या सल्लागार मंडळाचे सदस्य होते. या मंडळात मुरारराव‍ांचा समावेश असणे म्हणजे त्यांच्या विद्वत्ता व कर्तृत्वाची पावतीच होती.

या पत सल्लागार मंडळाचे सदस्य असतांना मुरारराव‍ांनी पंतप्रधान इंदिरा गांधींना कृषी, लघुउद्योग, निर्यात, रोजगार, आर्थिक विकेंद्रीकरण, परकीय चलनाची प्राप्ती या सर्व क्षेत्रांना आवश्यक

४९. घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ.५७.

तेवढा पतपुरवठा होणे आवश्यक आहे आणि त्याचबरोबर शेतीसाठी संस्थांकडून वाढीव निधी उपलब्ध करुन आणि शेती क्षेत्राच्या पत विषयक गरजा काय आहेत यांचे व्यवहारीक पातळीवर खरे मूल्यमापन करावे असे पत्र लिहून कळविले. उलटटपाली इंदिरा गांधींनी सुध्दा त्यांना त्यांच्या पत्राबद्दल धन्यवाद दिले. या पत्रात इंदिरा गांधी लिहितात, "आपल्याला माहितीच आहे की, अनेक विषयावरचे आपले विचार मला मोलाचे वाटतात. आपण जेव्हा कधी दिल्लीला याल तेव्हा आपण जरुर भेटू. म्हैसूरमधील राजकीय परिस्थिती विषयी आपणास काय वाटते हे जाणून घेण्यात मला अर्थातच अधिक रस आहे. त्याचबरोबर देशातील शेतीशी निगडीत काही समस्यांवर मला आपणाशी चर्चा करावयाची इच्छा आहे."[५०] यावरुन मुरारराव आणि इंदिरा गांधी यांच्यातील संबंधाबरोबर त्यांचे शेतीविषयक आणि विविध क्षेत्रातील ज्ञान किती प्रगल्भ होते हे स्पष्ट होते.

मार्च १९७२ ला झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत चौथ्यांदा प्रचंड बहूमतांनी निवडून आले. देवराज अर्स ह्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या मंत्रीमंडळात मुराररावांचा अर्थमंत्री म्हणून समावेश करण्यात आला. मुरारराव अर्थखात्याचे मंत्री झाल्यानंतर राज्याचा समतोल विकास व्हावा या हेतूने त्यांनी शेती, उद्योग व्यवसाय, शिक्षण, वीज, पोलाद उद्योग, रसायन या सारख्या अनेक क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. प्रामुख्याने त्यांचा भर शेतीविकासावर होता. राज्यातील बहुसंख्य जनतेचा आधार शेती असल्यामुळे शेतीच्या विकासाशिवाय उद्योगधंदे आणि इतर कुठल्याही क्षेत्रात राज्याला प्रगतीपथावर जाता येणे शक्य नाही. यासाठी त्यांनी सिंचन विकास साधण्यासाठी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय याकडे सुध्दा पुरेसे लक्ष दिले. १९७२ चा दुष्काळ दुर करण्यासाठी अर्थमंत्री म्हणून त्यांनी महत्वपूर्ण कामगिरी केली. त्यांनी राज्याच्या दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये मृदुसंरक्षण, छोट्या प्रमाणावरील जलसिंचन, वनीकरण आणि दळणवळण यासारखे उपक्रम हाती घेतले. पायाभूत सुविधांमध्ये विकास साधायचा असेल तर वीज ही अत्यंत महत्वाची आहे. वीजेशिवाय आधुनिक काळात विकास होणे शक्य नाही हे ओळखून मुराररावांनी

५०. घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ.६८.

'म्हैसूर स्टेट पावर कार्पोरेशन' च्या माध्यमातून वीज प्रकल्प उभारुन संपूर्ण राज्याचे विद्युतीकरण केले.[५१]

मुरारराव अर्थमंत्री असतांना त्यांनी आखलेल्या प्रत्येक योजना सर्व सामान्यांपर्यंत कशा पोहोचतील याकडे त्यांचे विशेष लक्ष असल्याचे दिसून येते. १९७२ च्या दुष्काळापासून तर इ.स १९७६ पर्यंत 'गर्भवती माता योजना' आपल्या राज्यामध्ये अत्यंत सुनियोजित पध्दतीने राबविली.[५२] याच दरम्यान घरबांधणी खात्याचा अतिरिक्त भार त्यांच्याकडे असल्याने त्यांनी स्वत:च्या मतदार संघात प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ३०० घरकुले एवढ्या मोठ्या प्रमाणात जनता आवास किंवा आश्रय घरकूल योजना राबविणे अतिशय कठीण असतांना त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक ही योजना पूर्णत्वास नेली. मुराररावांनी इ.स. १९७२-७७ या काळात म्हैसूर राज्याचे अर्थमंत्री असतांना अनेक नाविण्यपूर्ण योजना राबवून राज्याचा सर्वसमावेशक विकास साधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

इ.स. १९८० मध्ये कॉंग्रेसपक्षात फुट पडून इंदिरा गांधींनी इंदिरा कॉंग्रेसची निर्मिती केली त्यावेळी मुरारराव मात्र जुन्याच कॉंग्रेसमध्ये राहिले. इ.स. १९८० मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणूकीमध्ये बेल्लारी मतदार संघातून मुराररांवाचे धाकटे बंधू रणजितसिंहला त्यांच्याच विरोधात कॉंग्रेस (आय) च्या तिकीटावर उभे केले, त्यात मुराररावांचा पराभव झाला. १९८० ते १९८४ या दरम्यान मुरारराव सक्रिय राजकारणापासून काहीसे अलिप्त राहिले. मात्र संजय गांधीच्या निधनानंतर इ.स. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या आग्रहावरुन कॉंग्रेस (आय) पक्षात प्रवेश घेतला. इ.स. १९८६ मध्ये मुराररावांकडे राजीव गांधीच्या आग्रहावरुन रायचूर लोकसभा संघातून कॉंग्रेसतर्फे पोट निवडणूक लढविली त्यात त्यांचा विजय झाला[५३] आणि ते प्रथमच लोकसभेत निवडून गेले.

पुनश्च: इ.स. १९८९ मध्ये म्हणजे तब्बल दहा वर्षांनी सोंडूर मतदार संघातून कर्नाटक विधानसभेवर मुरारराव निवडून आले. या निवडणूकीत कॉंग्रेस पुन्हा सत्तेवर येऊन नोव्हें. १९८९ मध्ये विरेन्द्र पाटील मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रीमंडळात मुराररावांनी ग्रामविकास आणि पंचायत राज खात्याचा मंत्री म्हणून शपथ घेतली. ग्रामविकास हा मुराररावांचा ध्यास असल्याने त्यांनी या खात्यामध्ये

---

५१. घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ.७५.
५२. घोरपडे, मु. य., एक झुंज शर्थीची, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ६२.
५३. घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ.११५.

अतिशय भरीव स्वरुपाची कामगिरी केली आहे. ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये स्वच्छता, डांबरी रस्ते, नवीन गटार योजना, शौचालये, निर्धूरचुली, तळी व बांध याद्वारे पाणी अडवा पाणी जिरवा योजना व स्त्रीशिक्षण यांवर लक्ष केंद्रित करुन ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून नवीन योजना राबविल्या. त्याचबरोबर राज्यसरकारच्या योजनेबरोबर केंद्रसरकारच्या योजना विशेषत: सुवर्ण जंयती ग्रामीण रोजगार योजना, स्वच्छता ग्राम अभियान इत्यादी योजना खेड्यातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. या योजना यशस्वी करण्यासाठी जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणात मिळविला. या खात्याच्या माध्यमातून त्यांनी १३०० खेड्यांमध्ये स्वच्छता ग्राम योजना पोहोचविली.[५४] जलरक्षण व जलसंवर्धनाच्या माध्यमातून लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन दिला. त्यांच्या कार्यकाळात दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी घरकूल योजना राबविली.[५५] अशा विविध योजनांच्या माध्यमातून मुराररावांनी कर्नाटकातील ग्रामीण भागाचा विकास घडवून आणला.

सत्तेचे विकेंद्रिकरण व त्याचबरोबर पंचायत राज संस्थांच्या कामकाजामध्ये लोकांचा सक्रिय सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने इ.स. १९९३ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्ती प्रमाणेच १९९३ सालीच पंचायत राज विधेयक संमत करणारे व त्यानुसार ग्रामपंचायतीच्या निवडणूका घेणारे कर्नाटक हे पहिले राज्य होय.[५६] हे विधेयक संमत करत असतांना स्त्रिया व दुर्बल घटाकांना देखील अध्यक्षपदासाठी आरक्षण दिले. कर्नाटक राज्यातील पंचायत राज व्यवस्थेला आकार देण्याचे महत्वपूर्ण कार्य मुराररावांनी केले आहे. पंचायत राज समितीचे सदस्य म्हणून देशातील १२ राज्य व ४ केंद्रशासित प्रदेशांमधील पंचायत समित्या, जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायतींना भेटी देऊन त्यांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन त्यांना कोणते अधिकार किती निधी आणि साधन सामुग्री द्यायची या विषयीच्या शिफारशी राज्य सरकारला सादर केल्या. या खात्याचे मंत्री म्हणून कार्य करीत असतांना प्रत्येक योजनेमध्ये जनतेचा सहभाग विशेषत: सर्व जातीधर्मातील स्त्री पुरुषांचा समान सहभाग हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य होते.

---

५४. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. १२.
५५. **कित्ता,** पृ. १२.
५६. घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ.५१.

### ५.२.२ सामाजिक, शैक्षणिक कार्यातील योगदान :

मुराररावांना राजघराण्याचा वारसा असून देखील समाजविकासाची तळमळ त्यांच्यामध्ये होती. स्वतः संस्थानिक असले तरी दीनदुबळ्या जनतेचे दु:ख, भावना, गरजा ओळखून त्यांनी राजकारण आणि समाजकारण केले. सतत ४५ वर्ष सक्रिय राजकारणात राहूनही सर्वसामान्य जनतेच्या अवस्थेमध्ये कशाप्रकारे सुधारणा करता येऊ शकते यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी आमदार, खासदार आणि मंत्रीपदाच्या कारकिर्दीमध्ये सर्व समावेशक विकासावर भर दिला. राजकीय क्षेत्रात राहूनही समाजकार्य करणाऱ्या मोजक्या लोकांपैकी ते एक होते. सर्वसामान्य जनतेचे सामाजिक व आर्थिक जीवनमान सुधारणे यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील त्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे, ते पुढीलप्रमाणे.

सोंडूर व आसपासच्या परिसरातील मुलामुलींना आपल्या घराजवळच उत्तम शिक्षण मिळावे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून मुराररावांचे वडील राजे यशवंतराव घोरपडे यांनी इ.स. १९४१ मध्ये सोंडूर येथे श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदिर स्थापन केले. याच शाळेमध्ये मुराररावांचे १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. यशवंतरावांनी ७ ऑक्टों. १९५८ रोजी सोंडूर एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेच्या वतीने सोंडूर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदीर ही शाळा चालविण्यात येते.[५७] इ.स. १९७३ पर्यंत सोंडूर येथे पहिली ते प्री-विद्यापीठापर्यंतचं शिक्षणाची सोय उपलब्ध होती. सोंडूर व परिसरातील विद्यार्थ्यांना पदवी मिळविण्याची कोणतीच सोय नसल्याने मुराररावांनी सोंडूर एज्यूकेशन सोसायटीच्या अंतर्गत आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स वरिष्ठ महाविद्यालयाची निर्मिती करुन पदवी पर्यंतच्या शिक्षणाची सोय सर्वसामान्यांना उपलब्ध करुन दिली.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता आधुनिक, दर्जेदार आणि स्पर्धेच्या युगासाठी आवश्यक असणारे इंग्रजी शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून मुरारराव घोरपडेंनी शिक्षणाच्या व्यवस्थेवर विशेष लक्ष दिले. वडिलांनी सुरु केलेल्या शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी इ.स. १९५९ मध्ये मुराररावांनी शिवपूरा शिक्षण समितीची स्थापना केली. या माध्यमातून एक

५७. गर्गे, स. मा.,हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२२०.

निधर्मी, इंग्रजी माध्यमाची, मिश्र आणि निवासी असे सोंडूर रेसिडेन्शियल स्कूल हे विद्यालय सुरु केले. त्यासाठी एफ. जी. पिअर्स ह्या निष्णात इंग्रज शिक्षणतज्ञाचे मार्गदर्शन घेतले.[५८] इ.स. १९५९ साली मुठभर विद्यार्थ्यांना घेऊन सुरु झालेल्या सोंडूर रेसिडेन्शियल स्कूलचे त्यांनी अद्यावत परिपूर्ण अशा खाजगी निवासी शाळेमध्ये रुपांतर केले.[५९]

सोंडूर आणि भोवतालच्या परिसरातील शिक्षणाचा आणि जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी या शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून इ.स. १९७० मध्ये श्री शिवाजी ज्यूनिअर कॉलेज ची स्थापना करण्यात आली. या कॉलेजमधील मुलींची वाढती संख्या लक्षात घेता या ज्यूनिअर कॉलेजला मुलींची माध्यमिक शाळा जोडण्यात आली. या शाळेमुळे सोंडूरमधील मुलांबरोबर मुलींच्याही शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. मुलामुलींना दर्जेदार शिक्षण मिळणे हेच प्रगतीचे आणि खऱ्या विकासाचे गमक आहे, हे ओळखून इ.स. १९९१ साली आंतरराष्ट्रीय बालिकावर्षात हॉस्पेट या ठिकाणी भगिनीं संस्था म्हणून मुलींसाठी एक निवासी शाळा सुरु केली.[६०] या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मुराररावांनी सोंडूर, होस्पेट व आसपासच्या अनेक गावांमध्ये संगणक, लँग्वेज लॅब्ज यांनी सुसज्ज असणाऱ्या अनेक शाळांची निर्मिती करुन सर्वसामान्य घरातील मुलामुलींना दर्जेदार शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली.[६१]

सोंडूर परिसरातील मुलामुलींना उत्कृष्ठ दर्जाच्या शिक्षणाबरोबर उद्योग व्यवसायाचेही शिक्षण मिळावे यासाठी मुराररावांनी तंत्रनिकेतन, व्यवसाय केंद्रे, उद्योगभवन, स्थानिक कलांना प्रोत्साहन व रोजगार मिळावा यासाठी कला केंद्रे, रुग्णालय अशा अनेक उपक्रमाचे जाळेच विणले होते. मुराररावांनी केवळ मुलामुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली नाही तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे गुणवत्ता असूनही शिक्षण घेऊ न शकणाऱ्या होतकरु विद्यार्थ्यांसाठी सोंडूर एज्यूकेशन सोसायटीने SMIORE FREESHIP हा उपक्रम सुरु केला. मुराररावांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता उच्च दर्जाची आहे. ते केवळ शिक्षण संस्था स्थापन करुन थांबले नाही तर विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी अखेरच्या क्षणापर्यंत प्रामाणिक प्रयत्न केले. वयाच्या ८२ व्या

५८. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. १०.
५९. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर,** आवृत्ती- जून २०१०, पृ.३९.
६०. **कित्ता,** पृ. ३९.
६१. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. १०.

वर्षापर्यंत कंपवाताने हालचालीवर बंधने आली असतांनाही शाळांमधील मुलांना इंग्रजी शिकविण्याचा परिपाठ सुरुच होता.* घोरपडे घराण्यातील राज्यकर्त्यांनी सोंडूर मधील मुलामुलींच्या शिक्षणासाठी पुढील प्रमाणे संस्था स्थापन करुन विविध शाळा व महाविद्यालयांची निर्मिती केली.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १. | **सोंडूर एज्यूकेशन सोसायटी** | |
| | १. श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदिर, सोंडूर | इ.स. १९४२ |
| | २. श्री छत्रपती शिवाजी ज्यूनिअर कॉलेज, सोंडूर | इ.स. १९७० |
| | ३. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सोंडूर | इ.स. १९७३ |
| | ४. मुलींचे विद्यालय, सोंडूर | इ.स. १९८१ |
| २. | **शिवपूरा शिक्षण समिती** | |
| | १. सोंडूर रेसिडेन्शियल स्कूल, सोंडूर | इ.स. १९५९ |
| | २. सोंडूर रेसिडेन्शियल ज्यूनिअर कॉलेज, सोंडूर | इ.स. १९५९ |
| | ३. सोंडूर पॉलिटेक्नीक कॉलेज, यशवंत नगर | इ.स. १९८८ |

मुराररावांना समाजाप्रतीच्या कर्तव्याची सुस्पष्ट जाणिव होती. त्यांनी सत्ता, संपत्तीचा उपयोग पुर्णत: समाज विकासासाठी केला. त्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती व सर्वसामान्यांचे जीवनमान कसे उंचावेल यासाठी कसोशीने प्रयत्न केले. सोंडूर एज्यूकेशन सासोयटी, शिवपूरा शिक्षण समिती या दोन शिक्षण संस्थांच्या माध्यमातून सोंडूर विभागातील लोकांना शिक्षणाची सोय करुन दिली. एवढ्यावरच न थांबता आदर्श समाज केंद्र, आरोग्य केंद्र, सोंडूर कुशल कला केंद्राच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. मुराररावांनी सोंडूर येथे आदर्श समाज केंद्राची निर्मिती केली.[६२] या समाजकेंद्राच्या माध्यमातून सर्वधर्मसमभाव निर्माण व्हावा यासाठी त्यांनी समाजकेंद्राच्या इमारतीतील सर्व भिंतींवर सर्व धर्मातील वचने कोरुन ठेवली. जेणेकरुन

६२. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ.३९.
* परिशिष्ट क्र. ४८.

समाजामध्ये चांगल्या विचारांचा प्रभाव निर्माण होऊन नवीन पिढीवर सर्वधर्मसमभावाचे व राष्ट्रीय एकात्मतेचे संस्कार होतील हा मुख्य उद्देश त्यांचा होता. सार्वजनिक आरोग्य उत्तम असल्याशिवाय विभागाचा विकास शक्य नाही याची जाणिव असल्यामुळे त्यांनी तळागाळातील सर्वसामान्य माणसाला आरोग्याची उत्तम सोय उपलब्ध व्हावी म्हणून आरोग्य केंद्राची देखील निर्मिती केली.[६३] या केंद्राच्या माध्यमातून नियमित स्वरुपात आरोग्य तपासणी व नेत्रतपासणी शिबीरांचे आयोजन करण्यात येतात. या केंद्राच्या उभारणीमुळे या विभागातील जनतेला आरोग्य सोई नि:शुल्क उपलब्ध झाल्या.

मुराररावांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक उत्तम व दर्जेदार केंद्राची निर्मिती केली. त्यांनी इ.स. १९८४ साली त्यांच्या सोंडूर मॅगनिज ॲण्ड आयर्न ओर्स लिमीटेड (SMIORE) या त्यांच्या कंपनीतर्फे सोंडूर कुशल केंद्राची स्थापना केली. या केंद्राला कर्नाटक सहकारी संस्था कायदा १९६० द्वारा इ.स. १९८८ मध्ये नोंदणीकृत संस्था म्हणून मान्यता मिळाली. सोंडूर कुशल कला केंद्राच्या निर्मिती मागे महत्वाचे कारण म्हणजे मुरारराव हे याच परिसरातील असल्यामुळे आपल्या परिसराचा विकास व्हावा व या परिक्षेत्रातील लोप पावत चाललेल्या पारंपारीक कलांचे पुनरुज्जीवन करुन त्याचा उपयोग लोकांच्या नियमित उत्पन्नामध्ये वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावले जावे हा उद्दात्त हेतू समोर ठेऊन या केंद्राची निर्मिती केली गेली.

सदर केंद्राच्या माध्यमातून परिसरातील पारंपारिक कलांचा विकास व्हावा म्हणून परिसरातील महिलांना प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध करुन दिली. या केंद्राच्या माध्यमातून पांरपारिक वस्त्रे, काचेचे भरतकाम आणि जीवनावश्यक असणाऱ्या कलाकुसरीच्या व शोभेच्या वस्तूंची निर्मिती केली जाते. त्यासाठी SMIORE कंपनी कडून प्रोत्साहना बरोबरच आर्थिक सहकार्य दिले जाते. या केंद्राचे विशेष म्हणजे येथून प्रशिक्षण मिळालेली आणि केंद्रातच काम करणारी एक लमाणी कारागीर शांतीबाई हिला १२ डिसेंबर २००३ रोजी तत्कालीन राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते राष्ट्रीय पारितोषिक प्रदान करण्यात आले होते.* तसेच या केंद्राला उत्कृष्ट कामगिरीबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून इ.स. २०१२ मध्ये या केंद्रास युनेस्को तर्फे

६३. घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ.३९.
* परिशिष्ट क्र. ४५.

'अवार्ड ऑफ एक्सलंस'* हा पुरस्कार मिळाला आहे. मुरारराव या कुशल कला केंद्राचे निर्माते व मुख्य आश्रयदाते होते. या केंद्राच्या माध्यमातून रोजगाराच्या विशेषत: महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देऊन सोंडूर विभागाच्या विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी निर्माण केलेले हे केंद्र आज आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेले आहे.

मुराररावांनी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातच योगदान दिले असे नाही तर औद्योगिक विकास आणि पर्यावरण संवर्धन याकडे देखील त्यांनी विशेष लक्ष दिले. आधुनिक भारताच्या विकासामध्ये तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि सोंडूर भागातील प्रचंड खनिज संपत्ती उपयोगात आणली जावी त्यासाठी १८ जाने. १९५४ रोजी मुराररावांचे वडील यशवंतराव यांनी 'सोंडूर मॅगनिज ॲण्ड आयर्न ओर्स लिमीटेड' या नावाची कंपनी स्थापन केली.[६४] या कंपनीची जबाबदारी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून मुराररावांनी उत्तम पध्दतीने सांभाळली. या कंपनीच्या वतीने उत्तम दर्जाचे मॅगनिज निर्यात केले जाते. १९६९ मध्ये मुराररावांनी याच कंपनीच्या माध्यमातून 'मेटल ॲण्ड फेरो अलाइड प्लँट' हा कारखाना सुरु केला आणि एक नवीन उद्योग शाखा सुरु केली. या कंपनीच्या माध्यमातून केवळ नफा मिळवणे हा त्यांचा उद्देश नसुन सोंडूर खोऱ्यातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणे व शिक्षण व आरोग्याच्या सोई पुरविणे हा होता.

SMIORE या कंपनीचा उपयोग सोंडूर भागातील रहिवाशांचे जीवनमान सुधारण्यासाठी व्हावा असे असेल तरी या खाण कामामुळे पर्यावरणाची कुठलीही हाणी होणार नाही याबाबतही त्यांनी अतिशय दक्षता घेतली. खाणीतून बाहेर पडणारे प्रत्येक वाहन ताडपत्रीने झाकुणच बाहेर पडते. जेणेकरुन त्यातील माती रस्त्यावर पडत नाही व धुळीकण वातावरणात पसरत नाहीत तसेच खाणीतील धातू वेगळा केल्यानंतर निरुपयोगी मातीचे ठिग तसेच टाकून देऊन परिसर भकास उजाड करण्याचा प्रमाद SMIORE कधीही करित नाही.[६५] विशेष म्हणजे निकामी झालेल्या खाणीचे सपाटीकरण करुन तेथे तात्काळ वृक्षारोपण करण्यात येते. सोंडूर खोऱ्यात आज दृष्टीस पडणारी अनेक ठिकाणची वनराई म्हणजे पूर्वीच्या खाणी होत्या. यावरुन मुराररावांनी केवळ सामाजिक

---

६४. गर्गे, स. मा., **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ.२१९.
६५. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ११.
* परिशिष्ट क्र. ४६.

संस्था व उद्योग उभारणीच केली नाही तर पर्यावरणाचे संतूलन साधण्याचे देखील महत्वपूर्ण कार्य केलेले आहे.

श्री. मुराररराव घोरपडे यांचा वन्यजीवनाचा व्यासंग सर्वज्ञात असून ते निष्णात छायाचित्रकार होते. त्यांच्या छायाचित्रांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील छायाचित्र प्रदर्शनामध्ये अनेक पारितोषिके मिळालेली आहेत. इ.स. १९७६ साली त्यांना 'रॉयल फोटोग्राफिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटनचे' सदस्यत्व बहाल करण्यात आले. (FRPS) १९७६ साली 'एक्सलन्स द फेडरेशन इंटरनॅशनल दल आर्ट फोटोग्राफिक' हा सन्मान देऊन त्यांना गौरवण्यात आले. हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवणारे ते पहिले वन्यजीवन छायाचित्रकार आहेत. ते उत्कृष्ठ लेखकही आहेत. त्यांनी 'सनलाईट ॲण्ड शॅडोज: ॲन इंडियान वाइल्ड लाईफ फोटोग्राफर्स डायरी' हे पुस्तक लिहिले.[६६] 'डेव्हलपमेंट इथॉस ॲण्ड एक्सपिरिअन्स' (१९७१), 'द ग्रॅण्ड रेझिस्टन्स: मुरारीराव घोरपडे ॲण्ड एटीन्स सेन्चुरी डेक्कन' (१९९२), 'डाऊन मेमरी लेन' (२००४) हे आत्मचरित्र लिहीले. त्यांचे 'स्मरण यात्रेच्या वाटेवर' नावाने मराठी अनुवादीत झालेले आहे. २००६ साली म्हैसूर विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेट देऊन सन्मानित केलेले आहे.[६७]

मुराररावांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी होते. चतुरस्त्र राजकारणी, उत्तम समाजसेवक, उत्कृष्ठ लेखक, निष्णात छायाचित्रकार आणि पर्यावरण रक्षक हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खास पैलू होते. ४५ वर्षाच्या राजकीय कारकिर्दीमध्ये म्हैसूर आताचे कर्नाटक राज्याच्या विकासामध्ये बहुमोल योगदान राहीले आहे. कर्नाटकामधील पंचायत राज व्यवस्थेला आकार देण्याचे व ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून संतूलित विकास साधण्याचे कार्य त्यांनी केले. अत्यंत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण सोंडूर परिसरातील सर्वसामान्यांना उपलब्ध व्हावे यासाठी शैक्षणिक संस्थांची निर्मिती करुन सुसंस्कृत समाज निर्माण केला. सार्वजनिक आरोग्य व समाजस्वास्थ उत्तम राहीले पाहीजे म्हणून विविध केंद्राची निर्मिती केली. आपल्या विभागाचा समतोल विकास साधला जावा या हेतूने रोजगाराभिमूख शिक्षण देऊन कुशल कला केंद्र व SMIORE कंपनीच्या माध्यमातून जनतेला रोजगार उपलब्ध

६६. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ.१०४.
६७. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची**, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ११.

करुन देऊन त्यांचे जीवनमान उंचविण्याचे कार्य केले. विलासी आणि चैनीचे जीवन जगणे शक्य असुनही समाजाप्रती असलेल्या कर्तव्याच्या जाणीवेने त्यांनी सत्ता व संपत्तीचा उपयोग केवळ समाजाच्या विकासासाठी केला. सन २००४ मध्ये मंत्रीपदाचा कालावधी संपला की, मी सक्रिय राजकारणातून निवृत्त होणार हे त्यांनी स्पष्ट केलेले होते.[६८] २००४ नंतर त्यांनी स्वत:ला सोंडूर येथे समाजसेवेच्या कामात गुंतवूण ठेवले. समाज विकासाच्या सर्वच क्षेत्रात योगदान देणाऱ्या मुरारराववांचे वयाच्या ८२ व्या वर्षी २९ ऑक्टों. २०११ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

### ५.२.२.१ कार्तिकस्वामी/कुमारस्वामी मंदिर* :

सोंडूर पासून जवळच असलेल्या लोहाचल पर्वताच्या शिखरावर कुमारक्षेत्र आहे. तेथे कार्तिकेयाचे प्राचीन आणि सुविख्यात देवालय आहे. सोंडूरचे महाराज या देवालयाचे वंशपरंपरेने विश्वस्त आहेत. कुमारस्वामी, कार्तिकेय किंवा त्यालाच षण्मुख असेही म्हणतात, हे सोंडूरचं ग्रामदैवत आहे.[६९] हे मंदिर चालुक्य घराण्यातील राज्यकर्त्यांनी बांधलेले आहे आणि आता हे मंदिर एक संरक्षित स्मारक आहे. या मंदिरातील मूर्ती कृष्ण पाषाणाची असुन एकमुखी आहे. तिच्या जवळ क्रौंच पक्षाची उभी मूर्ती आहे. हिंदुराव घोरपडे घराण्याचे संस्थापक राजे बहिर्जी हिंदुराव यांनी इ.स. १६८९ मध्ये दिलेल्या एका आज्ञापत्रावर त्यांची राजमुद्रा आहे. त्यामध्ये षण्मुखाचा उल्लेख करुन त्यांनी त्यात आपल्या इष्ट देवतेचा समावेश केला आहे. सोंडूरचे दैवत षण्मुख अथवा कुमारस्वामी म्हणजेच सुब्रमण्यम् हे हिंदुराव घोरपडे घराण्याचे कुलदैवत आहे.[७०]

देवालयाच्या मालकीच्या जमिनीवर कायम कुळाचे हक्क अबाधित ठेवण्याच्या हेतूने इ.स. १९४८ मध्ये सोंडूर संस्थान देवालयाचा जाहीरनामा मंजूर करण्यात आला. जाहीरनाम्यातील योजनेप्रमाणे देवालयाच्या मालकीच्या शेतजमिनी सरकारच्या मालकीच्या करण्यात आल्या. त्याबद्दल देवालयाच्या व्यवस्थेसाठी जेवढे अर्थसहाय्य लागेल तेवढे देवालयाच्या निधीला प्रतिवर्षी देण्याची हमी घेतलेली आहे. भारत सरकारनेही ह्या योजनेस संमती दिली. महाराज यशवंतरावांच्या मृत्यूनंतर वारसाहक्काने

---

६८. घोरपडे, मु. य., **स्मरण यात्रेच्या वाटेवर**, आवृत्ती- जून २०१०, पृ.१४४.

६९. **कित्ता**, पृ. ३०.

७०. गर्गे, स. मा.,**हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, आवृती- ऑगस्ट १९८३, पृ. ८८.

* परिशिष्ट क्र. ३६.

देवस्थानचे विश्वस्तपद राजे मुराररावांकडे चालून आले.[७१] भारतामध्ये जातीयतेबरोबरच स्त्री ही अतिशय दुर्लक्षीत घटक होती. तत्कालीन परिस्थितीत अस्पृश्यांबरोबर स्त्रियांनाही धार्मिक स्थळी प्रवेशबंदी होती, असाच विचित्रपणा कार्तिकेय मंदिरात देखील होत होता. स्त्रियांनी या मुख्य देवतेचे दर्शन घेऊ नये अशी अत्यंत कर्मठ स्थानिक परंपरा होती. कुणालाही दर्शन घेण्यापासून वंचित ठेवण्याचा कुठल्याही प्रकारचा कायदेशीर किंवा नैतिक अधिकार नाही. मग ती व्यक्ती कुठल्याही जाती, पंथाची स्त्री वा पुरुष असो राजे मुराररावांनी तात्काळ ही कर्मठ परंपरा बंद केली आणि त्यासाठी त्यांनी सर्व मंदिरे स्त्रियांसाठी खुली केली. एवढेच नाही तर स्त्रियांनी मंदिरप्रवेश करण्याविषयीच्या अंधश्रध्दा आणि संकोच दूर व्हावा, यासाठी आपल्या परिवारातील सर्व स्त्रियांना आवर्जून देवस्थानांना भेटी देण्यास उद्यूक्त केले. मुराररावांनी ऑक्टो. १९९६ मध्ये ही बंदी काढून घेतली ही बंदी उठविल्यानंतर जवळजवळ ३००० स्त्रियांनी या मंदिरात पुजा केली. आज सोंडूर परिसरातील सर्व मंदिरांमध्ये स्त्रिया आपणहून देवदर्शनासाठी जातात.[७२]

यावरुन मुराररावांनी सर्वसामान्यांची जीवनप्रत सुधारण्याबरोबर सामाजिक समता प्रस्थापित करण्यात देखील महत्वपूर्ण योगदान दिले.

### ५.३ अजयसिंह मुरारराव घोरपडे :

२९ ऑक्टों. २०११ रोजी मुराररावांच्या निधनानंतर त्यांचे जेष्ठपुत्र अजयसिंह घोरपडे राजगादीवर विराजमान झाले. अजयसिंहाचा जन्म १६ डिसे. १९५४ रोजी मुरारराव व वसुंधरादेवीच्या पोटी झाला.[७२] त्यांचे प्राथमिक शिक्षण सोंडूर रेसिडेन्शियल स्कूल तर उच्च शिक्षण ख्रिश्चन महाविद्यालय, मद्रास येथे झाले. ते वन्यजीव छायाचित्रकार म्हणून प्रसिध्द आहेत. वडिलांच्या निधनानंतर सोंडूर मॅगनिज ॲण्ड आयर्न ओर्स लिमीटेड कंपनीचे संचालक तर कुमारस्वामी मंदिराचे विश्वस्त म्हणून कार्यरत आहेत. मुराररावांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थेची जबाबदारी देखील ते योग्य पध्दतीने त्याच हेतूने पुढे नेत आहेत. त्यांना बहिर्जी व एकांबर ही दोन मुले आहेत.

---

७१. घोरपडे, मु. य., **एक झुंज शर्थीची,** आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. १२.
७२. कित्ता, पृ. १२.
७३. **www.royalark.net.**

# संदर्भ ग्रंथ सूची

# - संदर्भग्रंथ सूची -

## प्राथमिक साधने

### (मराठी)


१) आपटे, द. वि., १६ मार्च १९३४, **मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास,** आर्यभूषण प्रेस, पुणे.

२) आपटे, द. वि., रा. वा. ओतुरकर, (संपा.), १९४१, **साधन परिचय अर्थात महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास,** अ. वि. ग्रह प्रकाशन, पुणे.

३) आपटे, द. वि., स.म. दिवेकर, (संपा.), २००९, **शिवचरित्र प्रदीप,** भा. इ. सं. मंडळ, सदाशिव पेठ, पुणे-३०.

४) कुंटे, भ. ग., (अनु.), मे १९८२, **गुलशने इब्राहिमी,** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई-३२.

५) केळकर, य.न., नोव्हें.२००६, **ऐतिहासिक शब्दकोश,** डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०.

६) गर्गे, स. मा., (संपा.), मार्च १९७०, **करवीर रियासतीचे कागदपत्रे, खंड पहिला,** सदाशिव मार्तंड गर्गे, ज्ञानेश, १२०५/४, शिवाजी नगर, पुणे.

७) गर्गे, स. मा., (संपा.), मार्च १९७२, **करवीर रियासतीचे कागदपत्रे, खंड दुसरा,** सदाशिव मार्तंड गर्गे, ज्ञानेश, १२०५/४, शिवाजी नगर, पुणे.

८) गर्गे, स. मा., (संपा.), मार्च १९७३, **करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड तिसरा,** सदाशिव मार्तंड गर्गे, ज्ञानेश, १२०५/४, शिवाजी नगर, पुणे-४.

९) गर्गे, स. मा., (संपा.), मार्च १९८२, **करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड चवथा,** सदाशिव मार्तंड गर्गे, ज्ञानेश, १२०५/४, शिवाजी नगर, पुणे-४.

१०) गायकवाड, खं. आ., (संपा.), १९७१, **करविर सरदारांच्या कैफियती,** खंडेराव आनंदराव गायकवाड, न्यूपॅलेस, कोल्हापूर.

११) घोरपडे, मुराररराव यशवंतराव, (अनु. करुणा गोखले), जून २०१०, **स्मरणयात्रेच्या वाटेवर,** दिलीपराव माजगावकर, राजहंस प्रकाशन, पुणे, ३०.

१२) घोरपडे, मुराररराव यशवंतराव, (अनु. करुणा गोखले), एप्रिल २०११, **एक झुंज शर्थीची,** मुरारीराव घोरपडे व अठराव्या शतकातील दख्खन, राजहंस प्रकाशन, पुणे, ३०.

१३) चौबळ, ज. स., (अनु.), १९७४, **असे होते मोगल,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई -३२.

१४) जोशी, पं. महादेवशास्त्री, (संपा.), नोव्हे. १९७६, **भारतीय संस्कृतीकोश, खंड नववा,** भारतीय संस्कृतीकोश मंडळ, शनिवारपेठ, पुणे-३०.

१५) जोशी, पं. महादेवशास्त्री, (संपा.), नोव्हे. १९७६, **भारतीय संस्कृतीकोश, खंड दहावा,** भारतीय संस्कृतीकोश मंडळ, शनिवारपेठ, पुणे-३०.

१६) देसाई, स. शं., (अनु.), १९६८, **पोर्तुगीज दप्तर, खंड तिसरा,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

१७) देसाई, स. शं., (संपा., अनु.), १९७८, **करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज,** गोवा पुराभिलेख संग्रहालयातून निवडलेले कागद, न्यू पॅलेस, कोल्हापूर.

१८) दीक्षित, मो. ग., वि.गो. खोबरेकर, (संपा.),१९६९, **मराठे कालीन प्रसिध्द व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे,** पुराभिलेख विभाग, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

१९) पगडी, सेतु माधवराव, (संपा.), १९६२, **मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द (तारिखे खाफीखान),** जोशी आणि लोखंड प्रकाशन, पुणे.

२०) पगडी, सेतु माधवराव, (संपा.), १९६३, **मोगल आणि मराठे, (तारिखे दिल्कुशा)**, ठोकळ प्रकाशन, पुणे.

२१) पगडी, सेतु माधवराव, (संपा.), १९६४, **मोगल-मराठा संघर्ष, (फुतुहाते आलमगिरी),** चित्रशाळा प्रेस, पुणे.

२२) पगडी, सेतु माधवराव, (अनु. व संपा.), १९७८, **मोगल दरबारची बातमीपत्रे, खंड पहिला,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-३२.

२३) पगडी, सेतु माधवराव, (अनु. व संपा.), जाने. १९८३, **मोगल दरबारची बातमीपत्रे, खंड दुसरा,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-३२.

२४) पगडी, सेतु माधवराव, (संपा.), १९९३, **मोगल आणि औरंगजेब, (मासिरे आलमगिरी),** ठोकळ प्रकाशन, पुणे.

२५) पगडी, सेतु माधवराव, १९९३, **अहकामे आलमगिरी,** (**औरंगजेबाची आज्ञापत्रे-इ.स. १७०२ ते इ.स. १७०७**), परचुरे प्रकाशन मंदिर, मेहता भवन, गिरगाव, मुंबई-४.

२६) पगडी, सेतू माधवराव, २०१२, **शिवचरित्र एक अभ्यास,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२७) पवार, अप्पासाहेब, (संपा.), २०१२, **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड पहिला,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-०४..

२८) पवार, अप्पासाहेब, (संपा.), २०१२, **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड दुसरा,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-०४.

२९) पवार, अप्पासाहेब, (संपा.), २०१२, **ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड तिसरा,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-०४.

३०) पवार, सुधाकर, (संपा.), डिसें. १९७८, **मराठेशाहीतील पत्ररुप गद्य,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३१) बेंद्रे, वा. सी., शके १८५३, **छत्रपती राजाराम महाराज यांचे चरित्र-जिंजीचा प्रवास,** दत्तोवामन पोतदार, सरदार जी. एम. मुजुमदार, सचिव, भा. इ. सं. मं. पुणे.

३२) भावे, विनायक लक्ष्मण, (संपा.), **शके १८३९ मराठी दप्तर, रुमाल पहिला,** वि. ल. भावे, मराठी दप्तर कचेरी, ठाणे.

३३) भावे, विनायक लक्ष्मण, (संपा.),**शके १८४४ मराठी दप्तर, रुमाल दुसरा,** वि. ल. भावे, मराठी दप्तर कचेरी, ठाणे.

३४) मोडक, बाळाजी प्रभाकर, ३१ डिसेंबर १८८०, **कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास, उत्तरार्ध, भाग २,** शिवाजी हरी सामंत, बेळगाव समाचार छापखाना, बेळगाव.

३५) रेगे, मे. पुं., (संपा.), १९९९, **मराठी विश्वकोश, खंड सोळावा,** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

३६) राजवाडे, वि. का., (संपा.), १९०९, **मराठ्यांच्या इतिहासांची साधने, खंड आठ**, वि. गो. आपटे व कृ. प. खाडीलकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे चिटणीस, पुणे.

३७) वर्टिकर, श. ह. (संपा.), १९७१, **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे**, श. ह. वर्टिकर, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

३८) सरदेसाई, गो. स., या. मा. काळे, वि. स. वाकणकर, (संपा.), १९३०, **काव्येतिहास संग्रहात प्रसिध्द झालेले ऐतिहासिक पत्रे**, यादी वगैरे लेख, चित्रशाळा प्रेस, पुणे.

३९) सरदेसाई, गो. स., (संपा.), १९३९, **ऐतिहासिक पत्रबोध, मराठशाहीतील निवडक पत्रे,** श्रीसमर्थ सदन प्रकाशन, मुंबई-४.

४०) श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ, (संपा.), ऑगस्ट २००९, **शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड पहिला,** टिळक स्मारक मंदीर, पुणे-३०.

४१) श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ, (संपा.), ऑगस्ट २००९, **शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड दुसरा,** टिळक स्मारक मंदीर, पुणे-३०.

४२) श्री. शिवाजी रायगड स्मारक मंडळ, (संपा.), ऑगस्ट २००९, **शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड तिसरा,** टिळक स्मारक मंदीर, पुणे-३०.

४३) शिरोडकर, प्र. पां.,(संपा.), १९७९, **कोल्हापूर-पोर्तुगीज संबंध**, गोवा पुराभिलेख संग्रहलयातून निवडलेले लेख, यशवंतराव श. तस्ते, द्वारा न्यू पॅलेस, कोल्हापूर.

## पुणे पुराभिलेखागार

१) शाहू दप्तर, दप्तर अंक-१, पुडके क्र. १५, पत्र क्र. ४४८.

२) शाहू दप्तर, दप्तर अंक-२, पुडके क्र. १, पत्र क्र. ११४७.

३) शाहू दप्तर, दप्तर अंक-४, पुडके क्र. १-अ, पत्र क्र. ३०५७.

४) शाहू दप्तर, दप्तर अंक-४, पुडके क्र. १-अ, पत्र क्र. ०८२.

५) शाहू दप्तर, दप्तर अंक-४, पुडके क्र. ४, पत्र क्र. ६८१.

६) शाहू दप्तर, दप्तर अंक-६, पुडके क्र. २, पत्र क्र. १२४.

७) शाहू दप्तर, दप्तर अंक-८, पुडके क्र. ४, पत्र क्र. ०५३.

८) शाहू दप्तर, दप्तर अंक-९, पुडके क्र. १, पत्र क्र. २८५.

९) शाहू दप्तर, दप्तर अंक-९, पुडके क्र. २, पत्र क्र. १०४००.

## (इंग्रजी)

i) Ball, Upendra Nath, 1919, **A Short History of the The Marathas,** Ramkrushna & Sons, Anarkali, Lahore.

ii) Capon, Captain David, (Tran.), January 1830, **History of the Marathas by Grant Duff**, Bombay.

iii) Forrest, George W., (Edi.), 1885, **Selections from the Letters, Despatches and other state papers. Prserved in the Bombay Secretatiate, Maratha Series, Vol I., Part II.,** Government Central Press, Bombay.

iv) Forrest, George W., (Edi.), 1885, **Selections from the Letters, Despatches and other state papers. Prserved in the Bombay Secretatiate, Maratha Series, Vol I., Part III.,** Government Central Press, Bombay.

v) France, W.1904, **Madras District Gazetteers, Bellary,** The Superintendent, Government press, Madras.

vi) Ghorpade M.Y, 1992, **A Profile in Courage, Murarirao Ghorpade & The 18th Century Deccan**, Ravi Dayal Publisher, Delhi.

vii) Lethbridge, Sir Roper., 1893, **The Golden Book of India,** Macmillan and Co. London.

viii) Pagadi, Setu Mahadeorao, 1913, **Studies in Maratha History, Vol. II,** Registrar, Shivaji University, Kolhapur-04.

ix) Pawar Appasaheb, April 1971, **Tarabai Papers,** Shivaji University Publication, Kolhapur, Dr. Usha Ithape, Registrar.

x) Pawar, A. G., 2013, **Studies in Maratha History, Vol I,** Registrar, Shivaji University, Kolhapur-04.

xi) Scott, Jonathan, 1794, **Farishta's History of Dekkan,** (Edi.), VOI-I, J and W. Eddowes, London.

xii) Wheeler, J. TalBoys, 1878, **Summary of Affairs, of the Maratha States,** Supreintendent of Government Printing, Calcutta.

## Unpublished Doctoral Thesis

1) Ghorpade, Dr. Manjushri, 2004, **History of Mudhol State,** Shivaji University, Kolhapur.

## Unpublished M.Phil. Dissertation

१) घोरपडे, डॉ. मंजूश्री, १९९६, **विसाव्या शतकातील मुधोळ संस्थान,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# दुय्यम साधने

## (मराठी)


१) ओक, प्रमोद, २००१, **पेशवे घराण्याचा इतिहास,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०

२) ओतूरकर, राजाराम विनायक, १९३७, **मराठ्यांचे साम्राज्य,** पुणे अ. वि. ग्रहाचा महाराष्ट्र मुद्रण शाळा छापखाना, सदाशिव पेठ, पुणे-३०.

३) कदम, डॉ. उमेश अ., एप्रिल २०११, **फ्रेंच मराठा संबंध,** १६६८ ते १८१८, पुष्पनंद प्रकाशन, पुणे-३८.

४) काळे, या. मा., १९३४, **नागपूर प्रांताचा इतिहास,** या. मा. काळे, वकील, बुलढाणा.

५) कुंटे, भ. ग., (अनु.), ३१ मार्च १९६२, **अहमदनगरची निजामशाही,** अनिलकुमार हजारे, मुरली प्रकाशन, रानडे रोड, दादर.

६) कुंटे, भ. ग., जुलै १९६६, **बहामनी राज्याचा इतिहास,** केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई-०४.

७) कुळकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), १९८४, **मराठ्यांचा इतिहास खंड पहिला,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०.

८) कुळकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), १९८५, **मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०.

९) कुळकर्णी, अ. रा., ग. ह. खरे, (संपा.), १९८६, **मराठ्यांचा इतिहास खंड तिसरा,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०.

१०) कुळकर्णी, अ. रा., डिसेंबर २००४, **कंपनी सरकार** (ईस्ट इंडिया कंपनी), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०.

११) कुळकर्णी, अ. रा., एप्रिल २०११, **पुण्याचे पेशवे,** राजहंस प्रकाशन प्रा.लि., सदाशिव पेठ, पुणे-३०.

१२) कुळकर्णी, भाऊ श्रीधर, जानेवारी १९२४, **छत्रपती राजाराम,** दामोदर लक्ष्मण लेले, मोदवृत्त छापखाना, वाई.

१३) कुळकर्णी, मधुकर, जुन १९९९, अक्षरलेणी, **मराठ्यांच्या इतिहासातील ओजस्वी पत्रांचा मोडी- मराठी लिप्यंतर संग्रह,** मानसन्मान प्रकाशन, कर्वेपथ, पुणे-०४.

१४) कुळकर्णी, म. रा., ऑक्टो. २००९, **महाराष्ट्रातील प्रसिध्द सरदार घराणी, शिवकाल-पेशवेकाल,** डायमंड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे-३०.

१५) केळकर, न. चिं., १९१८, **मराठे व इंग्रज (मराठेशाहीचें शतसांवत्सरिक वाङ्मयश्राध्द)** धी प्रिंन्टीग एजन्सी, पुणे शहर.

१६) केळूसकर, कृष्णराव अर्जुन, मे २०१०, **छत्रपती शिवाजी महाराज**, वरदा प्रकाशन, पुणे-१६.

१७) कोलारकर, श. गो. (अनु.), १९९९ **औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास**, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांतीदुर्गा निवास, नागपूर-१०.

१८) कोलारकर, श. गो., गो. मा. पुरंदरे, २००५, **नागपूर राज्याचा अर्वाचिन इतिहास**, मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर.

१९) कोलारकर, श. गो., (अनु.) २००६, **औरंगजेब**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०

२०) खरे, ग. ह., १९७६, **मुसलमानकालीन महाराष्ट्र**, (हुतात्मा वि. ग. पिंगळे स्मारक व्याख्यानमाला), विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर-०१.

२१) गर्गे, स. मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), नोव्हें. १९७४, **कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास**, सदाशिव मार्तंड गर्गे, ज्ञानेश १२०५/४, शिवाजीनगर, पुणे.

२२) गर्गे, स. मा., ऑगस्ट १९८३, **हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास**, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, रविवार पेठ, पुणे-०२.

२३) गर्गे, स. मा., ऑक्टों. २००२, **करवीर रियासत**, श्री शाहू छत्रपती महाराज, न्यू पॅलेस, कोल्हापूर.

२४) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत**, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड पहिला, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

२५) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड दुसरा**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

२६) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड तिसरा**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

२७) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड चवथा**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

२८) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड पाचवा**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

२९) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड सहावा**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३०) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड सातवा,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३१) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड आठवा,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३२) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मुसलमानी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड पहिला,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३३) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **मुसलमानी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड दुसरा,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३४) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **ब्रिटीश रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड पहिला,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३५) गर्गे, स. मा., (संपा.), २०१२, **ब्रिटीश रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड दुसरा,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६.

३६) गवळी, डॉ. पी. ए., जाने. १९९९, **मराठ्यांचा इतिहास**, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद-०५.

३७) गायकवाड, आर. डी., बी. एन. सरदेसाई, टी. डी. थोरात, व्हि. एन. हनमाने, १९९०, **मराठे कालीन संस्था व विचार,** फडके बुक सेलर्स, कोल्हापूर-१२.

३८) गोडबोले, रवींद्र, २००६, **औरंगजेब-शक्यता आणि शोकांतिका,** देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स), प्रा. लिमिटेड, पुणे-३०.

३९) घोरपडे, श्री. बा. बा. राजे, मार्च १९८०, **राजे घोरपडे घराण्याचा इतिहास,** सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-३२.

४०) घोरपडे, राजमाता सुशिलादेवी, १९९८, **राजा शितोळे आणि महाराज महादजी शिंदे,** शिवविलास राजमहाल, सोंडूर.

४१) घाणेकर, प्र. के., नोव्हें. २००७, **साद सह्यांद्रीची ! भटकंती किल्ल्याची !,** स्नेहल प्रकाशन, पुणे-३०.

४२) डोओफोडे, सुधाकर, जुलै २०१४, **हिंदुस्थानातील संस्थानाचे विलीनीकरण कसे झाले?,** संगत प्रकाशन, विवेक नगर, नांदेड.

४३) तेंडुलकर, महेश., २०१२, **रणझुंजार सेनापती संताजी घोरपडे,** रविंद्र कृष्ण घाटपांडे, स्नेहल प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे-३०.

४४) देशमुख, विजयराव, ऑक्टो. २०१०, **शककर्ते शिवराय, खंड पहिला,** छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर.

४५) देशमुख, विजयराव, ऑक्टो. २०१०, **शककर्ते शिवराय, खंड दुसरा,** छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर.

४६) देसाई, स.श., १९८९, **पोर्तुगीज-मराठा संबंध,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-३२.

४७) देशपांडे, प्र. न., ऑगष्ट २००२, **छत्रपती शिवाजी महाराज**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-१४.

४८) पवार, जयसिंगराव भाऊसाहेब, ऑगस्ट १९७५, **महाराणी ताराबाई,** ताराराणी विद्यापीठ, राजारामपुरी, कोल्हापूर.

४९) पवार, जयसिंगराव भाऊसाहेब, १९८६, **मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त,** अनिल मेहता, अजब पुस्तकालय, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

५०) पवार, जयसिंगराव भाऊसाहेब, १९८८, **मराठी सत्तेचा उदय,** सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई-०२.

५१) पवार, जयसिंगराव भाऊसाहेब, डिसें.२००८, **सेनापती संताजी घोरपडे,** सुमेरु प्रकाशन, डी-६, राजहंस सोसायटी, टिळकनगर, डोंबीवली (पूर्व)-०१.

५२) पवार, जयसिंगराव भाऊसाहेब, जाने. २००९, **छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ,** रिया पब्लिकेशन, राजारामपुरी, कोल्हापूर-०८.

५३) पवार, जयसिंगराव भाऊसाहेब, जाने. २०१०, **छत्रपती संभाजी- एक चिकित्सा,** सुमेरु प्रकाशन, डि-६, डोंबीवली पूर्व-०१.

५४) पटवर्धन, वि. अ., १९६६, **दक्षिणी संस्थानांच्या विलीनीकरणाची कथा,** आर्यभूषण प्रकाशन, पुणे.

५५) पाटील, बा. द., डिसें. १९८६, **डॉ. बापूजी साळूंखे,** (व्यक्ती: कार्य आणि आठवणी), सौ. मनिषा बाबासाहेब पाटील, ४०२/२, बेळगांव.

५६) पारसनिस, दत्तात्रय बळवंत, नोव्हेंबर १९०९, **मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार,** निर्णयसागर छापखाना, तुकाराम जावजी, मुंबई.

५७) पिर्सुलेकर, प्रा.प्रा. स., मे १९६७, **पोर्तुगेज-मराठे संबंध अर्थात पोर्तुगेजांच्या दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास,** कै.न.चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ, पुणे-०७.

५८) बेंद्रे, वा. सि., (संपा.), नोव्हे. १९६८, **विजापूरची आदिलशाही,** श्री. वा. वी. भट्ट, प्रमुख कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई.

५९) बेंद्रे, वा. सी., मार्च २०१३, **मालोजीराजे आणि शहाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र,**पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर.

६०) बेंद्रे, वा. सी., मार्च २०१३, **श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र,** पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर.

६१) भोसले, प्रविण वसंतराव, ऑक्टो.२०१२, **मराठ्यांची धारातीर्थे,** नरसिंह पब्लिकेशन्स, विश्रामबाग, सांगली-१५.

६२) मगदूम, दामोदर, फेब्रु. २०१४, **स्वराज्याचे शूर सेनानी, शहाजीराजांपासून.... यशवंतराव होळकरांपर्यंत,** मराठीदेशा फौंडेशन, कोल्हापूर-१२.

६३) रानडे, न्यायमूर्ती म. गो., जाने. १९९५, **मराठी सत्तेचा उत्कर्ष,** वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६.

६४) विधाते काका, मार्च २०१४, संताजी, प्रफुल्लता प्रकाशन, नारायण पेठ, पुणे-३०.

६५) वैद्य, डॉ. सुमन, डॉ. शांता कोठेकर, जाने. १९९८, **आधुनिक भारताचा इतिहास,** किताब महल, नागपूर.

६६) शेजवलकर, त्र्यं. शं., डिसे.१९६३, **निजाम पेशवे संबंध,** (अठरावे शतक) कै. न. चिं. केळकर, स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ, पुणे-०७.

६७) शितोळे देशमुख, सौ. सुनिलाराजे, मे २०१०, **पुणे प्रांताचे राजा देशमुख शितोळे घराण्याचा इतिहास,** नरसिंह वाचनालय, कसबापेठ, पुणे-११.

६८) शिवदे, डॉ. सदाशिव, ऑक्टो. २००८, **ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा,** डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-३०.

६९) सुर्वे, डॉ. गजानन, मार्च १९८१, **शिक्षणमहर्षी परमपूज्य बापूजी साळुंखे, व्यक्ती आणि कार्य,** शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे षष्ठ्यब्दपूर्ती समिती, कोल्हापूर.

७०) सोवनी, अविनाश, एप्रिल १९९८, **स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान,** पुर्वा प्रकाशन, कोथरुड, पुणे-२९.

७१) सैंदाणे, आसाराम, जाने.२०१४, **छत्रपती थोरले शाहू महाराज (सातारा)**, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०.

७२) हनवते, डॉ. उत्तम एस., २०००, **सेनापती धनाजी जाधव,** अभिजीत पब्लिकेशन, लातूर.

७३) हेरबाडकर, र. वि. ऑगस्ट १९७२, **श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे,** सदाशिव कृष्ण पाध्ये, व्हिनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

७४) **श्री शिवचरित्र कार्यालयाने प्रसिध्द केलेले शिव-चरित्र-निबंधावली,** फाल्गुन वद्य ३ शके १८५१, न. चि. केळकर आणि द. वि. आपटे, चिटणीस श्री शिव-चरित्र-कार्यालय, ३१४, सदाशिवपेठ, पुणे शहर.

## (हिंदी)

१) चन्द्र, सतीश, २००३, **मध्यकालीन भारत (सल्तनत से मुगल काल तक), प्रथम भाग, दिल्ली सल्तनत,** जवाहर पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली-१६.

२) चन्द्र, सतीश, २००३, **मध्यकालीन भारत (सल्तनत से मुगल काल तक), दुसरा भाग, मुगल सल्तनत**, जवाहर पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली-१६.

३) महाजन, विद्याधर, २००१, **मध्यकालीन भारत,** एस. चन्द्र ॲण्ड कंपनी, लिमीटेड, रामनगर, नई दिल्ली-५५.

४) महाजन, विद्याधर तथा सावित्री महाजन, १९९१, **भारत १५२६ से आगे,** एस. चन्द्र ॲण्ड कंपनी, लिमीटेड, रामनगर, नई दिल्ली-५५.

५) लूनिया, बी. एन., १९८५, **मराठा प्रभुत्व (१७६१-१८१८) भाग ३,** लक्ष्मीनारायण अग्रवाल, प्रकाशक, आगरा-३.

६) लूनिया, बी. एन., १९९१, **भारत मे ब्रिटीश साम्राज्य (सन १७००-१९००),** कमल प्रकाशन, इन्दौर-०४.

७) वर्मा, हरिश्चंद्र, २००१, **मध्यकालीन भारत (७५०-१५४०), भाग एक,** हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, नई दिल्ली-०९.

८) त्रिपाठी, रामप्रसाद, वासुदेव उपाध्याय, १९४५, **विजयनगर साम्राज्य का इतिहास,** मार्तंड उपाध्याय, मंत्री, सस्ता साहित्य मंडळ, नई दिल्ली.

९) श्रीवास्तव, आशीर्वादीलाल, अगस्त १९५९, **दिल्ली सल्तनत, (७११ से १५२६),** शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी, आगरा-०३.

# संदर्भग्रंथ सूची

## (इंग्रजी)


i) Jackson, A. V. Williams, (Edi.), 1907, **History of India,** The Grolier Society Publishers, London.

ii) Kumar, B. B., 1998, **Small States Syndrome in India,** Concept Publishing Company, New Delhi-59.

iii) **List of Ruling Princes and Chiefs in Poltical Relations with the Government of Bombay and their Leading officials Nobles and Person ages,** 1931, Government of India Central Publication Branch, Calcutta.

iv) Macfarlane, Charles, 1853, **A History of British India,** George Routledge & Co Farringdon street, London.

v) Mawjee, Purshotam Vishram, D. B. Parasnis, 1913, **Kaifiyats,** Yadis & C, Published with the permission of the Government of Bombay.

vi) Muddachari, B., 1969, **Musore-Maratha Relation,** Prasaranga University of Mysore, Mysore.

vii) Puranik, G. K., (Edi.), 1940, **Rural India, Vol III, Issue-3,** English Journal.

viii) Sardesai, G.S., May 1940, **Role of Ghorpades in Maratha History (Article), Modern Review (Journal), Vol-IXVII, Issue-5,**Ramesh Chandra Roy Choudhary, Calcutta.

ix) Sadasivan, S. N. 2005, **Political and Administrative Integration of Princely States,** A Mittal Publications, New Delhi-59.

x) Takakhav, N. S. 1921, **The life of Shivaji Maharaj,** Manoranjan Press, Bombay.


❖❖❖


# परिशिष्टये

# परिशिष्टांची यादी

| अ.क्र. | परिशिष्टये |
|---|---|
| १. | 'राजा घोरपडे बहाद्दर' हा किताब बहामनी बादशहाने बहाल केल्याचे पत्र. |
| २. | शिवाजी महाराजांचे मालोजी घोरपडेस स्वराज्याच्या कामास यावे याकरिता लिहिलेले पत्र. |
| ३. | शहाजीपुत्र संभाजी महाराजांचे म्हाळोजी घोरपडेंस पाटीलकी कायम केल्याचे निकालपत्र. |
| ४. | रामचंद्र अमात्य यांचे संताजी घोरपडेंच्या पराक्रमाचे वर्णन करणारे पत्र. |
| ५. | संताजी घोरपडेंनी आपल्या राजनिष्ठेविषयी रामचंद्रपंतास लिहिलेले पत्र. |
| ६. | मुरारराव हिंदुराव घोरपडेंचे सदाशिवराव भाऊस लिहिलेले स्वहस्ताक्षरातील पत्र. |
| ७. | मुधोळकर घोरपडे घराण्याच्या मानचिन्हाचे छायाचित्र. |
| ८. | कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याच्या मानचिन्हाचे छायाचित्र. |
| ९. | हिंदुराव घोरपडे घराण्याच्या मानचिन्हाचे छायाचित्र. |
| १०. | दत्तवाडकर अमीर-उल-उमराव घोरपडे घराण्याच्या मानचिन्हाचे छायाचित्र. |
| ११. | भाळवणी येथील म्हाळोजी घोरपडे यांच्या वाड्याचे अवशेष, संताजीचे जन्मस्थान. |
| १२. | कापशीकर सेनापती संताजी घोरपडे यांचे स्मारक (कापशी, कोल्हापूर) |
| १३. | कापशीकर सेनापती संताजी घोरपडे यांच्या मुद्रांची छायाचित्रे. |
| १४. | राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांच्या मुद्रेचे छायाचित्र. |
| १५. | राजे मुरारराव हिंदुराव घोरपडे यांची मुद्रेचे छायाचित्र. |
| १६. | राजे सिध्दोजी आणि मुरारराव घोरपडे यांच्या पराक्रमाचा साक्षीदार असलेल्या गजेन्द्रगड किल्ल्याचे छायचित्र. |
| १७. | गजेन्द्रगडावरुन दिसणाऱ्या हिंदुराव घोरपडेंच्या वाड्याचे छायाचित्र. |
| १८. | गुत्तीच्या किल्ल्यावरील मुराररावांच्या आसनाचे छायाचित्र. |
| १९. | गुत्तीच्या बालेकिल्ल्याचे छायाचित्र. |
| २०. | राजे मुरारराव यांच्या राज्यातील प्रदेश, गड, किल्ले याविषयीचे विवरणपत्र. |
| २१. | राजे मुरारराव निजाम व हैदरकडून मोकासा वसूल करीत असल्याचे विवरणपत्र. |
| २२. | राजे श्रीमंत शिवषण्मुखराव घोरपडे महाराजांचे छायाचित्र. |
| २३. | राजे श्रीमंत रामचंद्रराव घोरपडे महाराजांचे छायाचित्र. |
| २४. | राजे श्रीमंत व्यंकटराव घोरपडे महाराजांचे छायाचित्र. |

| अ.क्र. | परिशिष्टचे |
| --- | --- |
| २५. | राजे श्रीमंत यशवंतराव घोरपडे महाराजांचे छायाचित्र. |
| २६. | राजे श्रीमंत मुरारराव यशवंतराव घोरपडे महाराजांचे छायाचित्र. |
| २७. | पंतप्रधान इंदिरा गांधीचे स्वागत करतांना आ. मुरारराव घोरपडेंचे छायाचित्र. |
| २८. | पंतप्रधान राजीव गांधीचे स्वागत करतांना आ. मुरारराव घोरपडेंचे छायाचित्र. |
| २९. | राष्ट्रपती सी. व्यंकटरमण यांचे स्वागत करतांना आ. मुरारराव घोरपडेंचे छायाचित्र. |
| ३०. | सोंडूर येथील १९४० मध्ये बांधलेल्या शिवविलास पॅलेसचे छायाचित्र. |
| ३१. | सोंडूर येथील शिवविलास पॅलेसचे पंचतारांकीत हॉटेलमध्ये रुपांतर झाल्यानंतरचे छायाचित्र. |
| ३२. | फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर डुप्ले यांचे छायाचित्र. |
| ३३. | पाँडेचरीचा गव्हर्नर व प्रशासक बुसी यांचे छायाचित्र. |
| ३४. | मुंबईचा गव्हर्नर माऊंटस्टुअर्ट एलफिस्टन याचे छायाचित्र. |
| ३५. | ईस्ट इंडिया कंपनीचा आर्मी ऑफीसर सर थॉमस मन्रो याचे छायाचित्र. |
| ३६. | सोंडूरचे ग्रामदैवत कार्तिकस्वामी/कुमारस्वामी मंदिराचे छायाचित्र. |
| ३७. | सोंडूर मॅगनीज ॲण्ड आयर्न ओर्स लिमिटेड कंपनीच्या मानचिन्हाचे छायाचित्र. |
| ३८. | सोंडूर रेसिडेन्शियल स्कूलच्या मानचिन्हाचे छायाचित्र. |
| ३९. | सर थॉमस मन्रोचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्टन यास १ नोव्हे. १८१७ रोजी लिहिलेले पत्र. |
| ४०. | सर थॉमस मन्रोचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्टन यास १ मार्च १८१८ रोजी लिहिलेले पत्र. |
| ४१. | मद्रास हायकोर्टाने २१ ऑक्टोंबर १८६७ रोजी इंग्रज आणि सोंडूर राज्याच्या संबंधाबाबत दिलेले निकालपत्र. |
| ४२. | यशवंतराव महाराजांच्या राज्यारोहणप्रसंगी गव्हर्नर जनरलचे प्रतिनिधी मि. केटर यांचे भाषण. |
| ४३. | राजे श्रीमंत यशवंतराव घोरपडे यांचे मि. केटर यांच्या भाषणास उत्तर देणारे भाषण. |
| ४४. | सोंडूर राज्याचा भारत देशातील सामीलनामा (Instrument of Accession). |
| ४५. | सोंडूर कुशल कला केंद्रातील शांतीबाई पुरस्कार स्विकारतांनाचे छायाचित्र. |
| ४६. | सोंडूर कुशल कला केंद्रास युनेस्को तर्फे अवार्ड ऑफ एक्सलन्सच्या प्रमाणपत्राचे छायाचित्र. |
| ४७. | सोंडूर रेसिडेन्शियल स्कूलच्या प्रार्थनेच्या वेळचे छायाचित्र. |
| ४८. | सोंडूर रेसिडेन्शियल स्कूलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांनाचे मुरारराव घोरपडेंचे छायाचित्र. |
| ४९. | राजे मुरारराव घोरपडे यांचे धर्मपत्नी वसुंधरादेवींसोबतचे छायाचित्र. |
| ५०. | राजे मुरारराव घोरपडे यांचे आपल्या कुटुंबासोबत छायाचित्र. |

## परिशिष्ट क्र-१



घोरपडीच्या सहाय्याने खेळण्याचा किल्ला जिंकल्याबद्दल राणा कर्णसिंह व राणा भिमसिंह यांना बहामनी बादशहाने **'राजा घोरपडे बहाद्दर'** हा किताब बहाल केला. (शके १३९३) सदर पत्राचा मराठी अनुवाद पुढील पृष्ठावर.


**संदर्भः** कुलकर्णी, मधुकर, अक्षर लेणी, मराठ्यांच्या इतिहासातील ओजस्वी पत्रांचा मोडी-मराठी लिप्यंतर संग्रह, आवृत्ती. जून १९९९, पृ. २.

# मराठी अनुवाद

हु खलिल सके १३९३

मलिक उतजार महमद याच्या सांगण्यावरुन आमच्या ध्यानांत आले की उग्रसेनचा मुलगा करनसिंघ आणि त्याचा मुलगा भिमसिंघ याणी कोकणच्या मोहिमेत विलक्षण शौर्य प्रगट केले यांनी काही घोरपडीच्या कमरेस दोर बांधून कड्यावर काही शूर लोक पाठविले. पहारेकरी गाफिल असलेने त्यांना समजले नाही तेव्हा वर आलेल्या लोकानी दरवाजे उघडण्यास अडथला करणाऱ्या लोकास कापून काहाडीले किला दस्त केला त्यात करनसिंघ कामास आला त्याचे शौर्य निष्ठा स्वामी सेवा लक्षात घेऊन पूर्वीच्या गावांसह रायबाग व वाई परगणा बहाल करतो व राणा अैवजी राजा घोरपडे हा किताब देतो आणि घोरपडीच्या रंगाचे निशाण देतो ते त्यानी हमेशा स्वारीत ठेवावे. बक्षिस त्यांनी घेऊन पिढी दर पिढी चाकरीत गर्क असावे.

## परिशिष्ट क्र-२




मुधोळकर राजे मालोजी घोरपडे यांस स्वराज्यासाठी सोबत येण्याकरीता शिवाजी महाराजांनी हरतऱ्हेने केलेला प्रयत्न म्हणजे हे पत्र. (इ.स. १६७०) सदर पत्राचा मराठी अनुवाद पुढील पृष्ठावर.

**संदर्भ:** कुलकर्णी, मधुकर, अक्षर लेणी, मराठ्यांच्या इतिहासातील ओजस्वी पत्रांचा मोडी-मराठी लिप्यंतर संग्रह, आवृत्ती. जून १९९९, पृ. ४८.

# मराठी अनुवाद

मालोजी घोरपडे प्रती शिवाजी राजे जोहार उपरी पूर्वी निजामशाईतून आमचे बाप कैलासवासी माहाराज ईब्राईम आदिलशाहाचे कारकिर्दीत ईकडे आले तो पादशाने कारभाराची मदार महाराजाचे शिरी टाकिला तो माहाराजांनी विचार केला की आपले जातीचे मराठे याला हाताशी धरुन सरदारकी करुन पोटे भरतात ते पातशाही वजिर करावे थोर इजत पावेत ते करावे अैशियात माहाराजाने तुमच्या बापास ईतके बरे केले हे स्मरण न धरुन मुस्तफाखाने माहाराजास दगे करुन कैद केले ते समई तुमचे बाप बाजी घोरपडे हमी जाहाले त्या दिवसापासोन तुमच्या आणि आमच्या घराण्याचाकजिया वाढत चालला. तुम्ही आमचे आणि आम्ही तुमचे लोक मारिले तुमचे बाप झगडीयात मारीले अैसा दावा पर स्परे चालीला हाली अदलशाई बहलोल खान पठाणे घेतली. पातशाहा लहान लेकरु ते आपले कैदेत ठेविले आणि तख्त व विजापूरचा कोट पठाणाने काबीज केला. दक्षिणेत पातशाईस पठाण जाला. हे गोष्ट बरी नव्हे. दक्षिणीयाची कुली घरे बुडविल कोणास तगो देणार नाही अैसे आम्ही समजोन कुतबशाहीसी रुजूवाते राखली होती. त्याची भेटी घेतली भेटी समई बादशाई आदब की तसलीम करावी परंतू आम्ही आपणावरील छत्र धरीले ही गोष्ट मान्ये होऊन तसलिम माफ.

## परिशिष्ट क्र-३



म्हाळोजी घोरपडे यांची कसबेवांगी येथील पाटिलकी कायम केल्याचे शहाजी पुत्र संभाजी राजे यांचे निकाल पत्र. (२ फेब्रु. १६५२) सदर पत्राचा मराठी अनुवाद पुढील पृष्ठावर.

**संदर्भः** वर्टिकर, श. ह. (संपा.), कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे, आवृत्ती-१९७१, पृ. ९.

# मराठी अनुवाद

सेनापती दप्तर : ३२२/ता. २ फेब्रु. १६५२

अजरा दख्याने राजेश्री संभाजी राजे साहेब बाम दौलत लुबाजाने हली कारकूनानी का॥ बालाघाट, किले पन्हाळा बिहानद सु॥ इसने खमसेन अलफ मसुर्ले अनाम म्हालोजी घोरपडे नवकस इहि हुजूर मालूम केले जे आपली पाटीलकी कसबे वांगी का॥ मजकर निमे चालत आली होती. दरम्यान हवलदार कसबा मजकूर व आपला मुतालीक या दोहीमध्ये कलागती जाली. आपले मुतालिकाची बेबनाई करुन त्या पासून घोडे हिरोन घेऊन त्यास बाहेर घातले. त्यावरी तैशीच पाटीलकी अनामत कमावीस करु लागले. त्या दिवसापासून अमा.... चालत आले आहे. साहेबी आपली खबर घेऊन आपली पाटीलकी आपले दुमाले केले नाही. बरे साहेब धणी आहेत. आपला रयेतगिरीचा अमल आह. साहेबी गैरवाजे होऊन पाटिलकी आपले दुमाले केली पाहिजे. ऐसे खुद खतही दिघले पाहिजे. जे दाभाडे पाटीलकी निमे करिताती व आपलेस निमे होती ती त्यास निमे देणे. त्याचा मुतालीक कारभार करील. दोन्ही तरफा आहेत. तेथे आपलाले तरफेस नांगर..... व माबर व पान मान दोघे जणी वाटून घेणे. आणि मोकदमीचा हक बराबरी निम निमे द्यावा. दोघेजणी मुख्य वायदे ऐकावे. येसे खुदखत लिहिले पाहिजे म्हणोन मालूम केले, तरी मा॥र निलेची पाटिलकी पेशजी सालाबाद चालत आली होती तेने प्रमाणे निमेनिमे जैसे चालत आले असेल तेणे प्रमाणे दुमाले करणे. ते आपले तरफेने नांगर करतील. ये साली वाढ होऊन जैसे चालत आले असेल तैसेच चालवणे. पान मान निमेनिमे प्रमाणे द्यावे व माबरही निमे निमे प्रमाणे द्यावे. येणेप्रमाणे दोघांचे दुमाला करून पाटिलकीचे काम व्हावे. मशार निलेचा मुतालिक गावी पाटिलकी करील. त्याचे हाते कारभार होऊन सदरहू पहिले प्रमाणे याचा नांगर व मान पान व म्हाबर चालो देणे. कोणतेही उजूर न कीजे. तालीक होऊन असल खुद खत मा॥र निल्हेच्या मुतालिकाच्या हवाली करणे. मशार निलेचा घरवाडा याच्या मुतालिकाचे दुमाला करणे. जो पाटिलकीचा हक पडेल तो न असेल तो निमे दुमाला करणे. मोर्तब सुद सुरु सुद.

२ तेरीख रबिलावल.

## परिशिष्ट क्र-४



संताजी घोरपडेंच्या मिरजच्या सरदेशमुखी संबंधी तसेच त्यांच्या पराक्रमाबद्दल माहिती देणारे रामचंद्रपंत अमात्य यांचे पत्र. (दि. २९ जुलै १६९२) सदर पत्राचा मराठी अनुवाद पुढील पृष्ठावर.

**संदर्भ:** वर्टिकर, श. ह. (संपा.), कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे, आवृत्ती-१९७१, पृ. १०.

## मराठी अनुवाद

राजश्री खंडोबा येदेव (यादव ?)

देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी


पाा माहाल मिरज प्रांत गोसावी यासी -

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक रामचंद्र निळकंठ अमात्य नमस्कार सु॥ सलाम तीसेन आलफ. राजश्री संताजी बिन म्हाळोजी घोरपडे सेनापती लष्करी याची राजश्री छत्रपती स्वामी कर्नाटकात जाते समई या प्रांत ठेऊन गेले. त्या समई ईकडे गनिमाची धामधूम बहुत होऊन कुल देश व दुर्गे हस्तगत केली होती. राज्यामध्ये काही अर्थ उरला नाही. कुल मऱ्हाटे याही इमानास खता करुन गनिमाकडे गेले. याही राजश्रीच्या पायासी बहुतच एकनिष्ठा धरुन इमानास खता न करता जमाव करुन खेम निजाम व सर्जाखान व रणमस्तखान व जानखारखान येसे उमदे वजीर बुडविले. जागा जागा गनिमास कोटगा घालून नेस्तनाबूद केला आणि देश सोडविला. राज्य रक्षणतेच्या प्रसंगास असाधारण श्रम केले. औरंगजेबास दहशत लाविली. पुढे कितेक स्वामी कार्याचे ठायी हिंमत धरितातीं. याकरिता यावरी संतोषी होऊन मामले मिरज कार्यात सत्तावीस येथील देशमुख होते ते नेस्तनाबूद जाले. त्यांचे वंशी कोणी नाही. याचे मुतालिक होते ते बळाऊन देशमुखी वतन खात होते. (ते) तेहडी बुध्दी धरुन गनिमास मिलोन फिसात केली. एकनिष्ठा धरुन इकडे येऊन भेटले नाहीत. म्हणून त्याची देशमुखी दूर करुन मशारनिल्हेस अजरामरामहत देशमुखी मामले मजकुरची आवलाद व अफलाद पुत्रपौत्रा दिल्ही असे. तरी मामले मजकुरीची देशमुखी यांचे दुमाला करणे.......

.................................................................................................

........................................................................ जाणिले. निदेश समक्ष (शिक्का)

## परिशिष्ट क्र-५



संताजी घोरपडे यांनी रामचंद्रपंत अमात्य यांस स्वत:च्या राजनिष्ठेविषयी लिहिलेले पत्र. (इ.स. १६९४) सदर पत्राचा मराठी अनुवाद पुढील पृष्ठावर.


**संदर्भ:** कुलकर्णी, मधुकर, अक्षर लेणी, मराठ्यांच्या इतिहासातील ओजस्वी पत्रांचा मोडी-मराठी लिप्यंतर संग्रह, आवृत्ती. जून १९९९, पृ. ७७.

## मराठी अनुवाद

राजश्री पंत अमात्य स्वामीचे सेवेसी

सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राज मा.न्ये श्री. संताजी घोरपडे जप्तन मुळीक दंडवत विनंती. स्वामीचा प्रताप जाणून स्वानंद वैभव लेखन केले पाा विशेष राजश्री सिंदे याजबराबरी बुधीवाद सांगो न पाा की आपली भेटी घेतली नाही परस्परे निघुन गेलेत म्हणून शब्द लावीला. यैसियास स्वामींची आमची क्रिया यैसी नाही. जे स्वामीनी द्वैतभाव धरावा स्वामीचे आज्ञे व्यतरीक्त आम्ही काहीच नव्हतो. विश्वासाची जाती म्हणावी तरी, स्वामीचे आमचे शफत बेलाचे श्रीहरिवरील आहेत. स्वामीचे मांडीवरी आम्ही उसे ठेऊन निजावे. आमचे मांडीवरी स्वामींनी उसे ठेवावे. शरिर मात्र भिन्न आत्मा अेक. यैसे असता हे गोष्ट द्वेताची होऊन आली म्हणून वितरागे येणे जाहाले. असे या उपरी तऱ्ही राज्यात डोहणा न होये तो पदार्थ केला पाा स्वामींनी अेक शब्द लावीला की राजश्री छेत्रपति स्वामीची भेटी जाहाली ते समई बहुमान जाहाला तेव्हा आमचा मान काढला नाही म्हणून शब्द लावीला. यैसियासी स्वामीची.

## परिशिष्ट क्र-६



मुरारराव सोंडूरकर हिंदुराव घोरपडे यांचे हस्ताक्षर. (सदाशिवरावभाऊ यांस लिहिलेले पत्र-इ.स. १७५१) सदर पत्राचा मराठी अनुवाद पुढील पृष्ठावर.

**संदर्भः** गर्गे, स. मा. (संपा.), मराठी रियासत, खंड पाचवा, आवृत्ती-२०१२, पृ. ४१.

## मराठी अनुवाद

मध्यस्तीस दोष न लागावा
या प्रकार सुचविल तर उभय
ता ही आपण आमास वडिल
या प्रांती आलेवर आमचा दुसरा
विचार किमपि घडणार नाही.
आमच मानस जे होणार राजकारण
होतच आहेत. परंतु आपले
दरशणचा लाभ हेच मुख्य.
बहुत लिहिणे तर सूज्ञ असा हे विनंती.

लेखनावधी

## परिशिष्ट क्र-७




**मुधोळकर घोरपडे घराण्याचे मानचिन्ह**

(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त.)

## परिशिष्ट क्र-८




**कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचे मानचिन्ह**

(संदर्भ: गर्गे, स.मा., श. ह. वर्टिकर, (संपा.), कापशीकर सेनापती घोरपडे घण्याचा इतिहास, आवृत्ती- नोव्हे. १९७४, पृ. १६.)

## परिशिष्ट क्र-९




**हिंदुराव घोरपडे घराण्याचे मानचिन्ह**

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती- ऑगस्ट १९८३, पृ. २४)


## परिशिष्ट क्र-१०




**दत्तवाडकर अमीर-उल-उमराव घोरपडे घराण्याचे मानचिन्ह**

(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त.)

## परिशिष्ट क्र-११



**भाळवणी येथील म्हाळोजी घोरपड्यांच्या वाड्याचे अवशेष - संताजीचे जन्मस्थान**

(संदर्भ: विधाते काका, संताजी, आवृत्ती-मार्च २०१४, पृ. ९०५.)


## परिशिष्ट क्र-१२



**कापशीकर सेनापती संताजी घोरपडे यांचे स्मारक (कापशी, कोल्हापूर)**

(संदर्भ: मगदूम, दामोदर, स्वराज्याचे शूर सेनानी, आवृत्ती-फेब्रु. २०१४, पृ. १७७.)


## परिशिष्ट क्र - १३




**कापशीकर सेनापती संताजी घोरपडे यांच्या मुद्रा.**

(संदर्भः विधाते काका, संताजी, आवृत्ती-मार्च २०१४, परिशिष्ट - ८.)


## परिशिष्ट क्र - १४




**राजे बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांची मुद्रा.**

(संदर्भः पवार, अप्पासाहेब, (संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड पहिला, आवृत्ती-२०१२, पृ. १०३)

## परिशिष्ट क्र - १५




**राजे मुरारराव हिंदुराव घोरपडे यांची मुद्रा.**

(संदर्भः पवार, अप्पासाहेब, (संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड दूसरा, आवृत्ती-२०१२, पृ. १०९)

## परिशिष्ट क्र - १६



**सिध्दोजी आणि मुरारराव हिंदुराव घोरपडे यांच्या पराक्रमाचा साक्षीदार (गजेन्द्रगड, कर्नाटक)**

(संदर्भ: मगदूम, दामोदर, स्वराज्याचे शूर सेनानी, आवृत्ती-फेब्रु. २०१४, पृ. १७८.)


## परिशिष्ट क्र - १७



**गजेन्द्रगडावरुन दिसणारा घोरपडेंचा वाडा.**

(संदर्भ: मगदूम, दामोदर, स्वराज्याचे शूर सेनानी, आवृत्ती-फेब्रु. २०१४, पृ. १७८.)


## परिशिष्ट क्र - १८



**मुरारराव हिंदुराव घोरपडे यांची गुत्ती किल्ल्यावरील बसण्याची जागा - मुराररावांचे आसन**

(संदर्भ: घोरपडे, मु. य., एक झुंज शर्थीची, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ५७.)

## परिशिष्ट क्र - १९



**गुत्तीचा बालेकिल्ला**

(संदर्भ: घोरपडे, मु. य., एक झुंज शर्थीची, आवृत्ती-एप्रिल २०११, पृ. ९३.)

## परिशिष्ट क्र - २०

## राजे मुराराव हिंदुराव घोरपडे यांच्या राज्याचा प्रदेश, गड, किल्ले

-श्री-

यादी राजश्री मुराराव हिन्दुराव घोरपडे ममलकतमदार सेनापती यांख मुलुख महाल व गड व किल्ले सु॥ तिस्सा सबैन मया व अलफ (इ.स. १७७९)

**अजमासे बेरीज -**

| | | |
|---|---|---|
| ८०,००० | गुत्ती हवेली | |
| १,५०,००० | पो ताडपत्री | |
| १,२०,००० | पो माडकी | |
| ९०,००० | पो यकनूर | |
| ८०,००० | सिगनमल्ले | |
| ८०,००० | पो पामडी | |
| १,५०,००० | पो बडत्र केरुर व होतूर व उहरी पकोग व हावलगी | |
| १,००,००० | कुडतत्री | |
| १,६०,००० | पो ताडमरी स दुर्ग | |
| ३,५०,००० | पिन्नगोंड व मडकसिरे | |
| | २,५०,००० | संमतार |
| | १,००,००० | मडकसिरे व उत्तामहेश्वर दुर्ग व सक्करगल |
| | ३,५०,००० | |
| ४०,००० | पो कोन कडले व गुंतगल | |
| ४०,००० | व्यंकटगिरी व विजेदुर्ग व घाटमीया किल्ला | |
| ४०,००० | पो बुदीकोट व कोप | |
| ५०,००० | लतूर व मालूर व सिवनापूर व नडगिनहल्ल व यशवंतपूर व करगीहल्ली व कचगारपल्ली व कोलदासपूर जहागीर हिरदरीम जमातदार | |
| ७५,००० | सोंडूर व हिरलाल किल्ला व येतीनहट्टी | |
| ४०,००० | प्यापल्ली | |
| २०,००० | मुनीमडू पेठ गुजराती | |
| ३०,००० | यरदम रायचेस | |
| २५,००० | गोर बिदनूर | |
| २०,००० | उदयभानगिरी उर्फ इट्टगीदुर्ग व मार्गानकुटे वगैरे | |
| २५,००० | नुकदोंडी | |
| २०,००० | सरजमायत मारामाग | |

| | |
|---|---|
| १०,००० | महाराजगड तळघाटचा किल्ला |
| १२,००० | पददूर रामेश्वर जहागीर इसनखान |
| १०,००० | आडगल गवनपल्ली सरंजाम-मल्हार कृष्ण |
| ६,००० | दावनगिरी तालुके चिमदुर्ग |
| ५,००० | जहागीर नागोराव श्रीनिवासराव तालुके बाळापूर संमत गोर बिदनूर पैकी देहे १ |
| २०,००० | उलतकल व बेमनहाल व नेमकल तालुके रायदुर्ग |
| ४०,००० | परेवल्ली हवेली |
| २५,००० | चनेपल्ली किल्ला |
| १५,००० | तुपगेरे |
| २५,००० | निंठूर भोग समुद्र तो ा आवुक (१) |
| १०,००० | कृष्णपाड |
| ७,००० | कलजनहल्ली व मसकल वगैरे पो. चित्रदुर्ग |
| ४,००० | चापनहाल तो आदवानी |
| ४,००० | नंदीबेऊर व बेलमुलदरी व बासापूर व रिगाडे तो हारपनहल्ली |
| ५,००० | आसुडी तो बल्लारी |
| ५,००० | मोलमामड खुर्द |
| ५,००० | पेठ मजीदपूर व रायर हुबली सरंजाम नागोराव श्रीनिवास |
| १,५०० | जकायत हवेली |
| ५,९०० | फुटगाव तो कोल्हार व मुलबगल व तायलूर पैकी खेडी सरंजाम मल्हार कृष्ण |
| २,००० | कालापूर तो चिटणीस |
| ३२,००० | अमरापूर |
| ९,००० | जुगडहल्ली व विभूतहल्ली व नरसींगपूर व श्रीनिवासपूर तो चिक बाळापूर देवस्थान व धर्मादाय अग्रहार |
| **२०,५४,०००** | |
| | पेशकसी रुजू सनद सरकार रुपये |
| ४०,००० | रायदुर्ग संस्थान |
| २०,००० | बिडगल व रत्नागिरी व पावनगड व होसकोट संस्थाने ४ |
| २५,००० | मंदागिरे पाले, तालुके अदवानी |
| ८५,००० | |

नेहमी सालाबादप्रमाणे वसूल रुपये

| | |
|---|---|
| ६०,००० | अदवानी |
| | ३५,००० मोकासबाब खेडी |
| | २५,००० नख्त |
| | ६०,००० |
| ४०,००० | श्रीरंगपट्टण |
| १२,००० | कोटकोडा व कपटराल वगैरे पंचाळी |
| ३,००० | मदकेर पाली |
| २,००० | आऊमपाली |
| २०,००० | रायदुर्ग संस्थान |
| १८,००० | हरपनहल्ली संस्थान |
| ५,००० | नडगल व होसकौट व रत्नागिरी व पावनगड |
| ६०,००० | आनेगुंदी |
| ४,००० | केंचनगुड |
| ५,००० | बल्लारी |
| ५,००० | अनंतपूर |
| ६,००० | कर्नोल |
| ६,००० | गलवाल |
| १,००० | चित्रदुर्ग |
| ५,००० | - - |
| १,९३,००० | तेरीज एकंदर रुपये |
| **२०,५४,०००** | **कमविसी पा महाल व गडकिल्ले वगैरे फुटगावदेखील** |
| **८५,०००** | **पेशकसी सरकारबद्दल** |
| **१,९३,०००** | **नेहमी सालाबादप्रमाणे** |
| **२३,३२,०००** | **एकूण रुपये** |

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. १४,१५,१६)

परिशिष्ट क्र - २१

# SELECTIONS

FROM THE

# Letters, Despatches and other State Papers preserved in the Bombay Secretariat, Maratha Series, Vol. I., - Part III

**Edited by George W. Forrest (1885 Edition)**

**GENEALOGY OF THE MARATHA CHIEFS**

**BHONSLA GHORPADE HINDURAV**

***Page 667***

This being the elder branch of the family retains the title of Hindurav, supposed to be of such antiquity as to defy modern research; it is probable if some of the Persian documents of the family were examined, the truth might be discovered. MURARRAV and DAVLATRAV GHORPADE, the sons of Sidajirav, are distinguished in the Maratha annals for their courage and enterprise against the Mysore and Nizam States. At one time, they levied Mokassa-

| | | Rs. |
|---|---|---|
| From the Nizam | - | 2,00,000 |
| Territory conquered from Mysore and retained | - | 4,00,000 |
| Besides Mahals on the Nizam's borders for the maintenance of 700 horse | - | 90,000 |
| | | **6,90,000** |

The whole of which have from time to time been resumed by the Peshwas.

THE FAMILY NOW HOLDS THE FOLLOWING ESTATE IN ITS POSSESSION ANTERIOR TO MARATHA SOVEREIGNTY.

| | Rs. |
|---|---|
| GAJENDRAGAD | 25,000 |
| SONDOOR | 20,000 |
| **Total** | **45,000** |

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. १९)

## परिशिष्ट क्र-२२




1861 - 1878 Raja Shrimant Shiva Shanmukharao Venkatarao Raje Sahib Ghorpade, Hindurao, Mamlukatmadar Senapati, Raja of Sandur
[Ref.:www.royalark.net.sandur.3.]

## परिशिष्ट क्र-२३




1878 - 1892 Raja Shrimant Ramchandrarao Vithalrao Ghorpade, Hindurao, Mamlukatmadar Senapati, Raja of Sandur
[Ref.:www.royalark.net.sandur.3.]

## परिशिष्ट क्र-२४




1892 - 1927 Raja Shrimant Venkatarao Ramchandrarao Ghorpade, Hindurao, Mamlukatmadar Senapati, Raja of Sandur
[Ref.:www.royalark.net.sandur.3.]

## परिशिष्ट क्र-२५



1928 - 1996 Major Shrimant Maharaj Shri Yeshwantrao Hindurao Ghorpade, Hindurao, Mamlukatmadar Senapati, Raja of Sandur
[Ref.:www.royalark.net.sandur.3.]

## परिशिष्ट क्र-२६



1996 - 2011 Shrimant Maharaj Shri Murarao Yeshwantrao Ghorpade, Hindurao, Mamlukatmadar Senapati, Raja of Sandur.
[Ref.:www.royalark.net.sandur.3.]

## परिशिष्ट क्र-२७



पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे स्वागत करतांना आमदार मुरारराव यशवंतराव घोरपडे

(संदर्भ: घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती-२०१०, पृ. ४, छायाचित्र क्र. २)


## परिशिष्ट क्र-२८



पंतप्रधान राजीव गांधी यांचे स्वागत करतांना आमदार मुरारराव यशवंतराव घोरपडे

(संदर्भ: घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती-२०१०, पृ. ५, छायाचित्र क्र. १)

## परिशिष्ट क्र-२९



राष्ट्रपती सी. व्यंकटरमण यांचे स्वागत करतांना मुरारराव यशवंतराव घोरपडे

(संदर्भ: घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती-२०१०, पृ. ७, छायाचित्र क्र. १)


## परिशिष्ट क्र - ३०



**सोंडूर येथील सन १९४० मध्ये बांधलेला शिवविलास राजवाडा.**

(संदर्भ: घोरपडे, मु. य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती-जून २०१०, पृ. २, छायाचित्र क्र. १)

## परिशिष्ट क्र - ३१



**सोंडूर येथील सन १९४० मध्ये बांधलेल्या शिवविलास पॅलेसचे रुपांतर केलेले सद्यास्थितीतील पंचतारांकित हॉटेल.**


(संदर्भ: संशोधन क्षेत्र)

## परिशिष्ट क्र-३२



**भारतातील फ्रेंच इतिहासातील सर्वात महान व महत्वाकांक्षी फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर डुप्ले.**
**[१ जाने. १६९७ ते १ नोव्हे. १७६३]**
(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)

## परिशिष्ट क्र-३३




**फ्रेंच वसाहत पाँडेचरीचा गव्हर्नर, सेनानी व प्रशासक बुसी**
**[सन १७१८ ते ७ जाने. १७८५]**
(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)

## परिशिष्ट क्र-३४




**माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन**
**मुंबईचा गव्हर्नर**
**[६ ऑक्टो. १७७९ ते २० नोव्हें. १८५९]**
(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)

## परिशिष्ट क्र-३५



**सर थॉमस मन्रो**
**ईस्ट इंडिया कंपनी आर्मी ऑफीसर**
**[२७ मे १७६१ ते ६ जुलै १८२७]**
(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)

## परिशिष्ट क्र - ३६



**कार्तिकस्वामी मंदिर, सोंडूर, जि. बेल्लारी (कर्नाटक)**

(संदर्भ: संशोधन क्षेत्र)

## परिशिष्ट क्र - ३७




**सोंडूर मॅगनीज ॲण्ड आयर्न ओर्स लि. कंपनीचे मानचिन्ह.**

(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)

## परिशिष्ट क्र - ३८




**सोंडूर रेसिडेन्शियल स्कूलचे मानचिन्ह.**

(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)

परिशिष्ट क्र - ३९

# Letter dated 1st November 1817 From Sir Thomas Munro to the Hon'ble M. Elephinstone

**To,**

**The Honorable M. Elephinstone,**
**Camp, Near Tamberahalli,**
**1st November 1817**

Sir,

My letters of the 27th and 31st October will have informed you of the quiet surrender of Sundoor by its Chief Shiv Rao, I wrote to him on the 18th October apprising him of the object of my march, and offering him a jagheer of eight thousand Rupees in any part of the company's territory. I did not consider this sum as being an adequate compensation for the loss of his district, but as I was aware that many demands would be brought forward for relations and dependents, I thought it best to begin upon a low scale.

On the 22nd October, I received his answer, which expressed in a general way, that it was his wish to conform to the desires of the British Government, and stated that he would send two Vakeels to treat with me. The Vakeels arrived in camp on the 24th October, bringing with them a paper containing a long list of Shiv Rao's demands, among which were a jagheer of twelve thousand rupees for himself, smaller ones for his brother and sister, and provision for his principal servants. I promised that he should have a jagheer of nine thousand rupees; that the Vakeels should each receive an allowance of fifteen star pagodas monthly, and that the other claims should be taken into consideration on my arrival at Sandur. The Vakeels objected to the smallness of the jagheer; they said that their master might submit, but that he would not consent to the arrangement. They were dispatched from camp on the 25th October with my answer and were directed to inform Sheo Rao, that if he intended to submit, I should expect him to meet the detachment on the outside of the Pass which leads into the Valley.

On the 27th October, the detachment, on approaching near the Pass, was met by Sheo Rao, attended by a few horsemen and Peons. He conducted it through the defile and barrier which defends the entrance into the Valley of Sundoor. On reaching the glacis of the Fort, he drew up his party, and as he delivered the keys, he said, that he threw himself entirely on the protection of the British Government. He then asked leave to go away, and having obtained

it, he called out to me so as to be beard by all his followers, "Think of my situation, have some consideration for us all."

He went through all the ceremony of surrendering his Fort and abdicating the Government of his little valley with a great deal of firmness and propriety; but, next day when he came to my tent with his brother and number of his old servants and dependents, to solicit some provision for them, and to make arrangements for the removal of his family to the Company's territory, he was so agitated and distressed that he was obliged to let his brother speak for him. It was finally settled that the two Vakeels should each have an allowance of fifteen pagodas, and that his jagheer, instead of nine thousand, should be ten thousand rupees, from which he should make such allowance as he chose to his relations and followers, and that the pensions and jagheer should be granted in whatever part of the Company's possessions they might be required.

Though I deemed it advisable to limit myself in promising a jagheer to ten thousand rupees, yet when I consider what Sheo Rao has lost, that he was as much a Sovereign in his own Valley as any Prince in India, that it contained a regular fort built by Haider and Tippu Sultan at a great expense, that it was besides so strong by nature that no Mahratta power could have taken it from him, and that he had ruled over it from his infancy, for the space of twenty nine years without interruption, I cannot think that even the twelve thousand rupees which he has demanded would be more than a very inadequate compensation for the sacrifice he has been compelled to make.

From the information which I have been able to collect both from the inhabitants of Sundoor and those of the neighboring districts under the British Government, concerning Sheo Rao, his claims to Sundoor seem to be in one respects better founded than they are stated to be in your letter to Mr. Strachey of the 10th December 1816. Sandur formed a part of the Principality of Morar Rao, the Mahratta Chief of Gooty, who was deprived of his dominions by Hyder Ally. His adopted son, Sheo Rao Bapa fell in battle, leaving a son Seddajee only two years old, under the guardianship of his uncle Venkat Rao. In 1790, Vankat Rao and his nephew Seddajee, with a party of their own adherents, assisted by the inhabitants of Sundoor, expelled Tippu Sultan's killedar, and got possession of the Palace. Which they were allowed to retain after the peace of 1792, as part of the ancient inheritance of the family. Seddajee died without issue in 1796, on which his uncle, Venkat rao applied to Daulat Rao, the half brother of Morar Rao, for one of his sons to be adopted by the widow, which was refused. He then made the same request of Eshwant Rao, who also refused, but said that he might have one of the sons of his younger brother,

Kundy Rao. An application being made to Kundy Rao, he consented and gave his son Sheo Rao, he present Chief. None of the descendants of Murar Rao ventured to reside in Sundoor during the life of Tipu, because, being completely surrounded by his dominions, they were afraid of being seized by treachery, but, on his death in 1799, Venkarrao and Sheo Rao went to Sundoor. The Peshwa about the same time issued a sunned granting Sundoor as a jagheer to Eshwant Rao. No use was made of this sunned until some years after, when Eshawant Rao sent a copy of it with a letter to prevent descensions in their families. Venkat Rao therefore, sent for Narsingh Rao the second son of Eshwant Rao in 1804, and gave him an allowance of hundred pagodas monthly; but as Narsing Rao attempted to form a party, he was dismissed in 1808.

It would appear as f Eshwant Rao had acknowledged the ciaim of Sheo Rao from his permitting his son to serve under him. Whatever may be the question of right, there can be none of possession. Sheo Rao has held it during the long period of twenty one years. He was, in fact, in independent Prince by the same right that so many other Mahratta Chiefs have become so. He was independent before the treaty of Bassein, and can hardly therefore, be included among the refractory vassals, whom the British Government are bounded by that treaty to reduce, any more than many other greater vassals, who have before that time shaken off their allegiance to the Peshwas. It is true that the Peshwa has always regarded him as a rebellious vassal, and has never admitted his right to Sundoor.

I trust however, that on considering the long possession of Sheo Rao his claim as the descendent of Morar Rao to a small corner of the dominions of his ancestors, and his patient and moderate conduct the most Noble the Governor-General will be disposed to grant him a more liberal compensation for the loss of his little principality than which I have thought myself at liberty to promise.

**I have the honour to be & c.**
**Thomas Munro**

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. २२२,२३,२४,२५.)

## परिशिष्ट क्र - ४०

# Letter of Sir Thomas Munro to the Hon'ble M. Elephinstone, Vide Glieg's Life of Munro

**To,**

**The Honorable M. Elephinstone,**
**Camp, six miles W. of Bagracottah,**
**1st March 1818**

Sir,

I have the honour to receive, on the 28th February, your letter of the 18th and two letters of the 19th of the month.

Considering the circumstances under which Sundoor was occupied, that it was done in order to gratify the Peshwa at the very moment when he was secretly conspiring against the British Government, that the late Jagheerdar had been long in undisturbed possession of the district, and that his removal must have been felt as an injury by all the members of the Gorpurray family, I am satisfied that the best course would be to restore him to his jagheer. The measure would, I believe, be highly acceptable not only to the numerous branches of his own family but to most of the Mahratta chiefs. The great inconvenience which formerly attented Sundoors being in the hand of a Jahageerdar was the Peshwa's visits to it at the head of an army. On pretence of religious pilgrimage, but in reality as much with the view of endeavoring to seize it by treachery. This inconvenience is now done away, and I see no other that can attend the restoration of the Jagheerdar; none was ever felt during the long period that he was in possession. The only stipulations which it might be necessary to make are, for a free passage to troops, and the surrender of offenders from the Company's territory; they should be no interference whatever with his internal administration.

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. २२६.)

## परिशिष्ट क्र - ४१

# Extract from the Judgement of the High Court of Judicature at Madras dated 23rd October 1867.

We have then in the first place to consider whether there is any support for the contention that the Raja is no in the position of the Chief of a State. The History of Sandur appears to be this. It was until the conquest of Hyder Ally part of the domination of the Mahratta Ruler of Gooty, and in 1790 it was retaken from Tipu Sultan's Kiledar, and passed into the possession of Sheo Rao, who held it during the Second Matratta War in 1817. He had maintained his independence against the Peshwa, but in that year surrendered to General Munro, whose stipulations for the grant of a Jagheer in Exchange for his territory were confirmed by the Government but not acted upon. In the succeeding year, his former territory was restored to Sheo Rao by the Governor-General, and eighty year after he received a Sunnad from the Government, the form of which is given in Aitchinson's Collections of Treaties and C. Vol. V p. 340.

From these facts it clearly appears that on the restoration the territory of Sandur became, as it had been before, the State of a Native Chief of Ruler, and that it has so continued to the present time. The Sanads do, no doubt, grant the lands in Jaghir, and establish a relation of subordination to the paramount British Government. But, the powers recognized and the obligations enjoined by the stipulations in the Sannads are wholly incompatible with the position of an ordinary Jaghirdar, and consistent only with that of the Ruler of a State. A strong confirmation of the territory being the State of Ruling Prince of Chief (if confirmation was wanted) is afforded by the Sunnad addressed to the Rajah by Earl Canning in 1862 to the effect that the British Government would recognize the adoption of a successor made by himself or any future Chief of his State; and by himself or any future Chief of his State; and by the Order of the present Viceroy in Council published in February 1867; declaring under the Statute 27 and 28 Vict. Cap. 15, the original criminal jurisdiction to extend to European British subjects being Christians resident in the Native States and

Chief ships named there of which Sandur in one.

It is hardly necessary in this case to cite authority to show that international Law recognizes Semi-Sovereign State that is States which are placed in subordination to another protecting State in regard to the exercise of some sovereign powers of Government. The public law of Europe and America is clearly so. And India furnishes numerous instances of the recognition of such States the Rules holding Sunnads from the Government.

Having arrived at the conclusion that Sandur is the State of a Native Ruler, though Subordinate to the British Power, we have next to consider what is the meaning of the Tahnamha*(*Treaty of 1847 between the Sandur Darbar and the company Sirkar regarding Ramandrug jurisdiction) give by the Raja in 1847.

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. २२७,२८.)

## परिशिष्ट क्र - ४२

# Speech of Mr. A. N. L. Cater, Ecq., C.I.E., I.C.S., Agent to the Governor-General at the Darbar convened by the Ruler to assume full Ruling Powers on 5th February 1930.

Your Highness,

I have come here to-day by command of His Excellency the Viceroy and Governor-General of India to invest you with full Ruling Powers in your State. It is a great pleasure to me that my first visit to Sandur coincides with this auspicious occasion and great day in your life. It is a day which I hope will be marked with a white stone not only in your life but also in the annals of the Sandur State. You come to the gadi well equipped for the task which lies before you. You have had an excellent education and have passed your University Examinations with distinction. You have also been Companion His Highness the Maharaja Holkar and have thus had a social upbringing appropriate to your station. You have moreover had the dvantage of being trained in administration during the last year or two under the guidance of your experienced Diwan M. R. Ray, T. Ramachandra, Aiyr Avergal. You have regularly attended his Court and have had the benefit of being coached in law by a Graduate of the Madras University. It is a great satisfaction to me that during this period of training you have shown both keenness and aptitude for the duties which you are now called upon to discharge. Your State is in a prosperous financial condition. The revenues have been steadily improving in recent years and there is still considerable scope for development in various directions. The future, therefore, is bright with hope for you and for your State. I hope and believe that you will devote yourself to administering the State with a single eye to the welfare of your subjects and will find your true happiness and best reward in their prosperity and contentment. Like everyone else who is called in youth to a position of responsibility and privilege you will have to learn by experience, and I wish to assure you that in your difficulties you any may count upon obtaining my advice and assistance whenever you solicit them, and I hope that you will not hesitate to consult me freely in all questions upon which you may require such advice and assistance.

I now proceed to incest. You're Highness with full Ruling Powers of Sandur State with my best wishes for a long, happy and successful rule.

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. २३०,३१.)

परिशिष्ट क्र -४३

## His Highness' reply to the speech of Mr. A. N. L. Cater, Ecq., C.I.E., I.C.S., Agent to the Governor- General at the Darbar on 5th February 1930.

I heartily welcome you, Mr. Cater, as the representative of the Paramount Power, and express how glad I feel that your first visit to my State happily coincides with such a momentous occasion in my life.

I am thankful to you for the kind references made about me. It is really a joy to me to think that my efforts during the minority to equip myself for the responsibilities I have now to sholder have been so well appreciated. Before I proceed further I cannot but pause for a moment to say how deeply greateful I am to His Highness the Maharaja Yeshwantrao Holkar in whose company I have had the privilege to learn the practical side of life most essential to my order. I must also make mention of M. R. Ry, T. Ramchandra lyer Avgl., and my Law Coach for all the efforts they have taken to give me the necessary training. Last but not the least, I am thankful to your predecessors Mr. C.W.E. Cotton and Lt. Col. Crosthwaite and Rao Bahadur E. K. Govindan Avgl., the Political Agent for my State during my minority who have been of immense help to me from time to time, and their names shall be always foremost fn my memory, because it was they who first launched me on my new career and have all along been so keen about my welfare. I trust my efforts to improve the State would continue to be thus appreciated as an encouragement to me to put forth the best in me for the advancement of my subjects. I feel confident that with your valuable advice, assured to me, I shall be able to raise equal to the occasion, and justify the hopes reposed in me. I shall make it a point to freely consult you, and take you advice, so that I might be sure of treading the path of progress. I am well aware that nothing would please the Paramount Power so much as the Well-being of my subjects. I invoke the blessings of the Almighty to endow me with the strength, fortitude and intelligence to be of great use to my dear subjects, whose advancement and many-sided progress shall be the end and aim of my administration.

It is a pleasure to note that the State which is now entrusted to my charge is in a prosperous condition, and that there is much scope for its improvement. I believe the potential resources of the State could not be sufficiently tapped for want of expert advice. It shall, therefore, be my first endeaevour to find out the ways and means to secure such expert advice to exploit the resources of the State on the fullest extent. I am also alive to the present condition of the peasantry here and shall era along think of the measures to be adopted for their better-ment.

Before I take my seat, I request you t convey - through His Excellency the Viceory, my loyalty and unswerving allegiance to the Parson and Throne of His Majesty the King Emperor and how glad I fell at His Majesty's happy recovery after his recent illness. May the Almighty spare His Majesty to us for many a long years to come, and I am sure my Officers, Darbaris and my subjects will join with me in this fervent prayer.

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. २३२,३३.)

## परिशिष्ट क्र -४४

# Instrument of Accession of Sandur State

Whereas the Indian Independence Act, 1947, provides that as from the fifteenth day of August, 1947, there shall be set up an independent Dominion known as INDIA, and that the Government of India Act, 1935, shall, with such omissions, adaptations and modification as the Governor-General may be order specify be applicable to the Dominion of India:

And whereas the Government of India Act, 1935, as so adapted by the Governor-General provides that an Indian State may accede to the Dominion of India by an Instrument of Accession executed by the Ruler therof:

**NOW THEREFORE:**

I Raja Shrimant Yeshwantrao Hindurao Ghorpade, Mamlukatmadar Senapati, Rule of Sandur, in the exercise of my sovereignty in and over my said State Do hereby execute this my Instrument of Accession and

1. I hereby declare that I accede to the Dominion of India with the intent that Governor-General of India, the Dominion Legislature, the Federal Court and any other Dominion authority established for the purposes of the Dominion shall by virtue of this my Instrument of Accession, but subject always to the terms thereof, and for the purposes only of the Dominion, exercise in relation to the State of Sandu (hereinafter referred to as "this State") such functions as may be vested in them by or under the Government of India Act, 1935, as in force in the Dominion of India on the 15th day of August 1947 (which Act as so in force is hereinafter referred to as "the Act")
2. I hereby assume the obligation of ensuring that due effect is given to the provision of the Act within this State so far as they are applicable there - in by virtue of this my Instrument of Accession.
3. I accept the matters specified in the Schedule hereto as the matters with respect to which the Dominion Legislature may make law for this State.
4. I hereby declare that I accede to the Dominion of India on the assurance that if an agreement is made between the Governor-General and the Ruler of this State whereby any functions in relation Legislature shall be deemed to form part of the State, then any such agreement shall be deemed to form part of this Instrument and shall be construed and have effect accordingly.

5. The terms of this my Instrument of Accession shall not be varied by any amendment of the Act or of the Indian Independence Act, 1947 unless such amendment is accepted by me by an Instrument supplementary to this Instrument.

6. Nothing in this Instrument shall empower the Dominion Legislature to make any law for this State authorizing the compulsory acquisition of land for any purpose, but I hereby undertake that should then Dominion for the proposes of a Dominion law which applies in this State acquire the land at their expense or if the land belongs to me transfer it to them on such terms as may be agreed, or, in default of agreement determined by an arbitrator to be appointed by the Chief Justice of India.

7. Nothing in this Instrument shall be deemed to commitme in any way to acceptance of any future constitution of India or to fetter my discretion to enter into agreements with the Government of India under any such future constitution.

8. Nothing in this Instrument affects the continuance of my sovereignty in and over this State, or, save as provided by or under this Instrument the exercise of any powers, authority and right now enjoyed by me as Ruler of this State of the validity of any law at present in force in this State.

9. I hereby declare that I execute this Instrument on behalf of this State and that any reference in this Instrument to me or to the Ruler of the State is to be construed as including a reference to my heirs and successor.

Given under my hand this tenth day of August, Nineteen hundred and forty seven.

**(Seal of State)** **Sd/-**

**(Y. R. Ghorpade)**

**Lekhan Sim a Sea**

I do hereby accept this Instrument of Accession.

Dated this sixteenth day of August, Nineteen hundred and forty seven

**Govt. of India** **Sd/-**

**Seal** **Mountbatten of Burma**

**Governor-General of India**

(संदर्भ: गर्गे, स. मा., हिंदुराव घोरपडे घराण्याचा दक्षिणेतील इतिहास, आवृत्ती-ऑगस्ट १९८३, पृ. २३४,३५,३६.)

## परिशिष्ट क्र - ४५




**भारताचे राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचे हस्ते पुरस्कार स्विकारतांना शांतीबाई (सोंडूर कूशलकला केंद्र)**

(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)


## परिशिष्ट क्र - ४६




**सोंडूर कूशलकला केंद्रास युनेस्को तर्फे अवार्ड ऑफ एक्सलन्स**

(संदर्भ: गुगल वरुन प्राप्त)


## परिशिष्ट क्र - ४७



**सोंडूर रेसिडेन्शियल स्कूल**

(संदर्भः संशोधन क्षेत्र)


## परिशिष्ट क्र - ४८



**सोंडूर रेसिडेन्शियल स्कूलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मुरारराव यशवंतराव घोरपडे.**

(संदर्भः संशोधन क्षेत्र)


## परिशिष्ट क्र - ४९



**राजे मुरारराव यशवंतराव घोरपडे आपल्या धर्मपत्नी सोबत**

(संदर्भ: घोरपडे, मु.य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ. ४, छायाचित्र क्र. १)

## परिशिष्ट क्र - ५०





**राजे मुरारराव यशवंतराव घोरपडे आपल्या कुटुंबासमवेत**

(संदर्भ: घोरपडे, मु.य., स्मरण यात्रेच्या वाटेवर, आवृत्ती- जून २०१०, पृ. ५, छायाचित्र क्र. ३)

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

समाज विज्ञान विद्याशाखेतील इतिहास विषयातील आचार्य या पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंध.

## - संशोधनाचा विषय -

## *"सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा इतिहास : एक चिकित्सक अध्ययन"*



: मार्गदर्शक :

**प्रा. डॉ. ग. का. माने**

इतिहास विभाग प्रमुख

केशरबाई लाहोटी महाविद्यालय,

अमरावती.

: संशोधक :

**नितीन उल्हासराव सराफ**

सहाय्यक प्राध्यापक

श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय

अंजनगाव सुर्जी.

जानेवारी २०१६

प्रकरण ६ वे

# उपसंहार

# - उपसंहार -

सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याने दक्षिण भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त केलेले आहे. मराठ्यांच्या इतिहासात तर भोसले, निंबाळकर, जाधव, मोरे, शिर्के, माने, सावंत अशा अनेक मराठा घराण्यांप्रमाणे दैदिप्यमान लौकिक आणि प्रतिष्ठा या घराण्याला लाभलेली आहे. मराठ्यांचे स्वराज्य आणि साम्राज्य यांच्या सीमा उल्लंघन करुन कर्नाटकामध्ये आपले स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचे श्रेय या घराण्याला जाते. इ.स. च्या सतराव्या आणि अठराव्या शतकात दक्षिणेत घडलेल्या सर्व महत्वाच्या ऐतिहासिक घटनांशी सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध आलेला आहे.

घोरपडे घराण्याचे पूर्वज चित्तोडच्या सिसोदे घराण्यातील आहेत. सिसोदे हे भारतातील राजपूत घराण्याशी संबंधीत आहेत, ते सुर्यवंशी राजघराण्यातील छतरी प्रकारात मोडत असून त्यांनी राजस्थानातील मेवाडच्या राज्यावर शासन केले. घोरपडे घराण्याचा मूळ पुरुष सुजनसिंह आहे, त्याचे वडील राणा अजयसिंहाने सिसोदे येथील जहागीरी आपला पुतण्या राणा हमीर यास सोपविल्याने दु:खी होऊन सुजनसिंह स्वपराक्रम सिध्द करण्याच्या हेतूने इ.स. १३३४ मध्ये आपल्या विश्वासू सहकाऱ्यांसह दक्षिणेत आला व स्वपराक्रमाने दक्षिणेत स्थाईक झाला. इ.स. १३०३ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेतील देवगिरीचे राज्य जिंकून घेतले होते. नंतर मात्र इ.स. १३२० ला दिल्लीतील खिलजी घराण्याची सत्ता संपुष्टात येऊन तुघलक घराणे सत्तेवर आले. सुलतान तुघलकाच्या अव्यव्हार्य व धरसोडीच्या धोरणामुळे दक्षिण भारतात अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाली. या राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन ३ ऑगस्ट १३४७ रोजी अल्लाउद्दीन हसन बहामनशहा याने दौलताबाद येथे बहामनी राज्याची स्थापना केली.

सुजनसिंह व त्याचा मुलगा दिलीपसिंह या पितापुत्रांनी बहामनी सत्तेची स्थापना तसेच विस्तार करण्याच्या कामी अल्लाउद्दीन हसन बहामनशहा उर्फ हसन गंगू यास अतिशय महत्वपूर्ण सहकार्य केले. या पितापुत्रांनी बहामनशहाने सोपविलेल्या अनेक मुलकी व लष्करी कामगिऱ्या यशस्वी पार पाडल्या. बहामनी साम्राज्याच्या चिरस्थाईत्वासाठी आणि विस्तारासाठी या पितापुत्रांनी केलेल्या कामगिरीवर खुश होऊन हसन बहामनी सुलतानाने इ.स. १३५२ साली सुजनसिंहाचा मुलगा

दिलीपसिंहास देवगड तर्फेपैकी मेहरठ मधील दहा गावे बक्षिस म्हणून दिली. या पितापुत्रांनी बहामनी साम्राज्यासाठी खुप पराक्रम केला.

सुजनसिंहाच्या मृत्यूनंतर दिलीपसिंहाने महंमदशहा च्या कारकिर्दीमध्ये झालेल्या अनेक संघर्षात पराक्रम गाजविला त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र सिध्दजी यास जहागीर कायम करुन दिली. वडिलांप्रमाणेच सिध्दजी हा देखील पराक्रमी होता. महंमदशहाच्या मृत्यूनंतर फिरोजशहा बहामनी साम्राज्याच्या गादीवर आला. फिरोजशहाच्या कारकिर्दीमध्ये अंतर्गत संघर्ष निर्माण झाल्यामुळे राणा सिध्दजी व राणा भोसाजी या पितापुत्रांनी सागर येथे झालेल्या लढाईत फिरोजशहाला मोलाचे सहकार्य दिले, या लढाईत सिध्दजी मरण पावला. राणा भोसाजीने अखेरपर्यंत फिरोजशहाची साथ सोडली नाही. या पितापुत्रांनी केलेल्या पराक्रमामुळे आणि सहकार्यामुळे फिरोजशहाने त्यांना इ.स. १३९८ मध्ये रायबागतर्फेतील ८४ गावांची जहागीर दिली यात मुधोळचा समावेश होता. तेव्हापासून सिसोदे घराण्यातील सुजनसिंहाच्या वंशजांची सत्ता दक्षिण भारतात सुरु झाली. राणा भोसाजीच्या नावावरुन सिसोदे वंशाच्या या शाखेस भोसले हे नाव रुढ झाले. पुढे महाराष्ट्रातील मराठ्यांच्या स्वराज्याची निर्मिती करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या वंशाचे मूळपूरुष म्हणून भोसाजींचा उल्लेख येतो.

महंमद तुघलकाच्या कारकिर्दीत निर्माण झालेल्या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन दक्षिणेतील हरीहर व बुक्क या दोन भावांनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगर या हिंदु राज्याची स्थापना केली, तर इ.स. १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना झाली. दक्षिणेत साम्राज्यविस्तार या दोन्ही सत्तांना करावयाचा असल्याने या दोन्ही राज्यांमध्ये सतत संघर्ष झाले. बहामनी सुलतान व विजयनगर सम्राट देवराय यांच्यामध्ये झालेल्या विजयनगरच्या लढाईत भोसाजीपूत्र देवराज व कर्णसिंह यांनी पराक्रम गाजवून विजयनगरचा राजा देवराय याचा पराभव केला. त्यानंतर बहामनी साम्राज्याच्या गादीवर अहमदशहाला बसविण्यात राणा देवराज याने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

राणा भोसाजीचा नातू आणि राणा देवराजचा मुलगा इंद्रसेन याने विजयनगरच्या लढाई बरोबरच बहामनशहाच्या वतीने अनेक संघर्षामध्ये पराक्रम गाजविला. राणा इंद्रसेनाचा मुलगा कर्णसिंह दुसरा हा विशेष पराक्रमी निघाला. त्याने व त्याचा पुत्र राणा भीमसिंह या दोघांनीही

बहामनी राज्याच्या संरक्षणासाठी व विस्तारासाठी अनेक मोठ्या लढाया जिंकल्या. या पितापुत्रांनी तेलंगणा, ओरिसा, गुजरात, माळवा आणि कोकण अशा विविध प्रदेशांमध्ये पराक्रम गाजवून बहामनी साम्राज्याचा दक्षिण भारतात वचक निर्माण केला. या पराक्रमामुळे कर्णसिंह दुसरा व भीमसिंह बहामनी साम्राज्याचे महत्वाचे घटक बनले.

बहामनी साम्राज्याचा वजीर महंमद गवान याने कोकणात इ.स. १४७० मध्ये स्वारी केली. या स्वारीमध्ये कर्णसिंह आणि भीमसिंह हे महंमद गवानासोबत होते. या स्वारीच्या वेळी कोल्हापूरच्या वायव्येस गजापूर पर्वत श्रेणीत विशाळगड (खेळणा) हा किल्ला आहे. हा किल्ला सह्याद्रीच्या पर्वताच्या अवघड जागी बांधलेला असून तो अजिंक्य होता. कोकण मोहिमेवर येणाऱ्या बहामनी सैन्याला रोखण्यासाठी संगमेश्वर आणि खेळणा परिसरातील राजांनी लढाईची तयारी केली. राणा कर्णसिंहाने पराक्रम गाजवून विशाळगडच्या किल्ल्याला वेढा दिला. हा किल्ला अभेद्य आणि मजबूत असल्याने अजिंक्य होता. लष्करी डावपेच व मुत्सदेगिरी या दोन्ही बाबीत तरबेज असलेल्या वजीर महंमद गवानला किल्ल्याची अभेद्य तटबंदीपासून हा किल्ला घेणे शक्य नाही असे वाटत होते. अशा कठीण प्रसंगी राणा कर्णसिंहाने किल्ला जिंकून देण्याची हमी घेतली. राणा कर्णसिंहाने हा किल्ला जिंकण्यासाठी नाविण्यपूर्ण पण साहसी मार्गाचा अवलंब केला. त्याने अतिशय कल्पकतेने अनेक घोरपडींच्या कमरेला दोर बांधून त्या किल्ल्यावर सोडल्या. स्वत: कर्णसिंह आणि भिमसिंह त्यांच्या काही निवडक सैनिकांसह घोरपडीच्या सहाय्याने किल्ल्यावर चढले. या दोघांही पितापुत्रांनी अद्‌भूत पराक्रम गाजवून विशाळगड किल्ला जिंकला. सतत दोन वर्ष संघर्ष करुन महंमद गवानासारख्या पराक्रमी वजीरास हा किल्ला जिंकता आला नव्हता. तो किल्ला कल्पकता, साहसीवृत्ती आणि अद्वितीय शौर्याच्या भरवश्यावर जिंकून घेतला. राणा कर्णसिंहाने बहामनी राज्याच्या विस्तारासाठी आपल्या प्राणाची आहुती या युध्दात दिली. या विजयानंतर महमंदशहा बहामनी या बादशहाने राणा कर्णसिंहाचा मुलगा राणा भीमसिंह यास सनद दिली. त्याता 'राणा' ऐवजी 'राजा घोरपडे बहाद्दर' हा किताब बहाल करुन ८४ गावांसह मुधोळचा प्रदेश त्यांच्याकडे कायम केला. तेव्हापासून कर्णसिंहाच्या वंशजांना 'घोरपडे' या नावाने तर 'शुभकृष्ण' यांचे वंशज 'भोसले' या नावाने ओळखले जाऊ लागले.

इ.स. १४७१ मध्ये सिसोदे वंशाच्या भोसले आणि घोरपडे अशा दोन शाखा निर्माण

झाल्या. या दोन्ही घराण्यांनी दक्षिण भारतात आपल्या पराक्रमाच्या जोरावर स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. नंतरच्या काळात म्हणजे इ.स. १४८१ ला महंमदशहा तिसरा याने बहामनी साम्राज्याचा सर्वश्रेष्ठ वजीर असलेल्या महंमद गवानला ठार केले. त्याच्या मृत्यूनंतर बहामनी साम्राज्याच्या अस्ताला सुरुवात झाली. बहामनी राज्यातील अनेक सरदारांनी या अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्याला स्वतंत्र करुन घेतले. इ.स. १४८४ मध्ये वऱ्हाडमध्ये इमादशाही, इ.स. १४८९ मध्ये अहमदनगर येथे निजामशाही, इ.स. १४९१ मध्ये विजापूर येथे आदिलशाही, इ.स. १४९२ मध्ये बिदर येथे बरिदशाही आणि गोवळकोंडा येथे कुतूबशाही अशी पाच राज्य उदयास आली.

बहामनी राज्यातील अंदाधूंद स्थितीमुळे राजा भीमसिंह घोरपडे पहिला याने आदिलशाहीचा संस्थापक युसूफ आदिलशहा याच्या दरबारात चाकरी स्विकारली. भीमसिंहाबरोबरच त्याचा मुलगा खेलोजी याने सुध्दा आदिलशाही राज्यात पराक्रम गाजवून उत्तमप्रकारे सेवा दिली. भीमसिहांचा नातू, राजा खेलोजीचा पुत्र महालोजी घोरपडे वडिलांसोबत अनेक युध्दात सहभागी होता. कासिम बरिद याने निजामशहा व कुतूबशहाच्या मदतीने आदिलशहावर आक्रमण केले. त्यावेळी आदिलशहा संकटात सापडला असतांना स्वत:चा जीव धोक्यात घालून महालोजीने आदिलशहाचा जीव वाचविला. तसेच विजयनगरचा राजा तोमराज याच्याशी लढतांना आदिलशहा गोंधळून आणि घाबरुन गेला होता, त्या आणीबाणीच्या परिस्थितीतही स्वत:चा जीव धोक्यात घालून महालोजीने आदिलशहाचा जीव वाचविला. त्याच्या कामगिरीवर खुष होऊन कुर्निसात न करण्याचे तसेच मोर्चेलची राजचिन्हे वापरण्याची परवानगी बादशहाने त्यास दिली. राजा महालोजीनंतर त्याचा पुत्र अखयसिंहने देखील आदिलशहाच्या सैन्यामध्ये विशेष पराक्रम गाजविला.

अखयसिंहानंतर त्याची दोन्ही मुले राजा कर्णसिंह तिसरा व राजा भीमसिंह दुसरा यांनी देखील आदिलशहाकडे उत्कृष्ठ कामगिरी बजावली. याकाळात विजयनगरचा साम्राज्य विस्तार व दरारा दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात वाढला होता. विजयनगरच्या वाढत्या सामर्थ्यांने अस्वस्थ होऊन विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा व बिदर ह्या दक्षिणेतील मुस्लीम सत्ता एकत्र आल्या. विजयनगर आणि मुस्लीम सत्तांची संयुक्त सेना यांच्यात राक्षसतागडी (तालीकोट) येथे भीषण

संग्राम झाला. हे युध्दा दक्षिण भारताच्या इतिहासात निर्णायक युध्द ठरले असून त्यात बलाढ्य विजयनगरचे साम्राज्य नष्ट  झाले. झालेल्या या संषर्घामध्ये कर्णसिंह तिसरा व त्याचा भाऊ भीमसिंह दुसरा या दोघांनीही आदिलशहाकडून अवर्णनिय पराक्रम गाजविला. या लढाईत राजा कर्णसिंह ठार मारला गेला. त्यांच्यानंतर कर्णसिंहाचा मुलगा चोलराज यास सप्तहजारी मनसब आणि पूर्वीची जहागीर बहाल करण्यात आली.

राजे चोलराज घोरपडे यांना पिलाजी, कानोजी व वल्लभजी अशी तीन मुले होती. चोलराज नंतर त्याच्या मुलांमध्ये भाऊबंदकीचा वाद उत्पन्न झाला व घोरपडे घराण्याच्या दोन प्रमुख शाखा निर्माण झाल्या. एक मोठा मुलगा पिलाजीची वंशशाखा जी मुधोळकर घोरपडे म्हणून तर दुसरी वल्लभसिंहाची वंशशाखा जी पुढे कापशीकर, गजेन्द्रगडकर व दत्तवाडकर घोरपडे अशा नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. पिलाजीची वंशशाखा मुधोळकर घोरपडे या नावाने इतिहासप्रसिध्द झाली. पिलाजी, प्रतापराव, बाजी घोरपडे, मालोजी घोरपडे ह्या सर्व मुधोळकर घोरपड्यांनी प्रथम आदिलशहा व नंतर मोगलांकडे चाकरी करुन शहाजी महाराज, शिवाजी महाराज, संभाजी महाराज या मराठा स्वराज्याच्या निर्मात्यांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात योगदान तर दिले नाहीच शिवाय प्रचंड विरोधाची भूमिका त्यांनी घेतली, मालोजीनंतर हे घराणे निष्प्रभ झाले.

वल्लभजीचा नातू व बर्हिजीचा मुलगा म्हाळोजी यांच्यापासूनच घोरपडे घराण्याचा मराठा स्वराज्याशी संबंध आला. म्हाळोजी पूर्वीचे या घराण्यातील पुरुष शुर पराक्रमी व निष्ठावंत होते. त्यांचे शौर्य, निष्ठा आणि युध्द कौशल्य प्रथम बहामनी व नंतर आदिलशाही राजवटीशी संबंधीत आहे. म्हाळोजी प्रथम शहाजी राजांसोबत लष्करात होते. म्हाळोजी आणि शहाजी यांच्यात चांगले सख्य असल्याने शहाजीमुळे त्यांना आदिलशहाकडून मुधोळची अर्धी जहागीर मिळाली. ही जहागीर कर्नाटकात असल्यामुळे त्यांच्या वारसांनी तेथे घोरपडे घराण्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला. म्हाळोजींचे भोसले घराण्यातील तिन्ही पिढ्यांशी अतिशय निकटचे संबंध असल्याने मराठ्यांच्या इतिहासात म्हाळोजींचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. म्हाळोजींनी स्वराज्याला संरक्षण देण्यासाठी पराक्रमाची पराकाष्ठा केली. संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे रक्षण करतांना त्यांनी प्राणांची आहूती दिली.

म्हाळोजी घोरपडेंना संताजी, बहिर्जी आणि मालोजी अशी तीन मुले होती. संभाजी महाराजांच्या वधानंतर औरंगजेबाशी झालेल्या प्रदिर्घ स्वातंत्र्य लढ्यात या घोरपडे बंधूनी अद्वितीय पराक्रम गाजविला. छत्रपती राजाराम महाराजांनी तिनही बंधूंच्या कार्याची दखल घेऊन संताजीस ममलकतमदार, बहिर्जीस हिंदुराव तर मालोजीस अमीर-उल-उमराव ह्या उपाध्या दिल्या, त्यामुळे घोरपडे घराण्याच्या तीन शाखा निर्माण झाल्या. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठे आणि औरंगजेब यांच्यामध्ये जो २७ वर्ष संघर्ष चालला तो फार मोठा राष्ट्रीय संघर्ष होता. या संघर्षातील मराठ्यांच्या विजयाचे मुख्य श्रेय घोरपडे घराण्याकडेच जाते.

घोरपडे घराण्यातील चोलराज पुत्र वल्लभजी हा कापशीकर घोरपडे घराण्याचा मूळ पुरुष आहे. विजापूरच्या आदिलशहाकडून वल्लभजींना कापशीचा प्रदेश प्राप्त झाल्याने हे घराणे कापशीकर घराणे म्हणून प्रसिध्दीस पावले. या घराण्याला संताजी घोरपडेने स्वपराक्रमाने प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठा राज्यात निर्माण झालेल्या असाधारण अस्थिर राजकीय परिस्थितीमध्ये संताजींनी प्रचंड पराक्रम गाजविला. औरंगजेब बादशहाच्या तंबूचे कळस कापले, गनिमी काव्याच्या युध्दपध्दतीचा वापर करुन औरंगजेब बादशहास व त्याच्या पराक्रमी सरदारांसमोर मोठे संकट उभे केले. छत्रपती राजारामास पन्हाळगडावरुन सुखरुप जिंजीस पोहोचता यावे यासाठी महाराष्ट्रात संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण या दोन सरदारांनी मोगल सैन्याची दाणादाण उडविली. संताजीच्या पराक्रमावर खूश होऊन इ.स. १६९१ मध्ये त्यास राजाराम महाराजांनी सेनापतीपद बहाल केले. तेव्हापासून ते घोरपडे घराणे सेनापती कापशीकर घोरपडे घराणे म्हणून प्रसिध्द आहे.

म्हाळोजी पुत्र संताजी, बहिर्जी आणि मालोजी या तिन्ही बंधूंच्या संयूक्त मोहिमांनी मराठ्यांच्या स्वराज्याच्या संरक्षणामध्ये महत्वाची भूमिका बजावलेली आहे. संताजींनी महाराष्ट्रात मोगलांना सळो की पळो करुन सोडले तर बहिर्जी आणि मालोजी यांनी छत्रपती राजारामासोबत राहून त्यांचे संरक्षण करण्याचे महत्वाचे कार्य केले. या जिंजीच्या प्रवासातील घोरपडे बंधूंचे शौर्य आणि साहस अद्वितीय होते. या घोरपडे बंधूंच्या पराक्रमावर खुश होऊन छत्रपती राजारामांनी मालोजीरावांना अमीर-उल-उमराव व बहिर्जींना हिंदुराव अशा उपाध्या देऊन सन्मानित केले. मालोजी घोरपडे यांच्या पासूनच दत्तवाडकर अमीर-उल-उमराव घोरपडे घराण्याची शाखा तर बहिर्जींपासून हिंदुराव

गजेन्द्रगडकर घोरपडे घराण्याची शाखा सुरु झाली.

म्हाळोजींच्या मृत्यूनंतर तीघेही घोरपडे बंधू अत्यंत सलोख्याने राहिले. तिघांनी मिळून संयूक्त मोहिमांचे संचालन केले. छत्रपती संभाजींच्या वधानंतर बहिर्जींनी छत्रपती राजारामांना जिंजीस पोहोचविण्यासाठी अनेक संकटातून मार्ग काढला. मालोजींनी तर या प्रवासामध्ये स्वत:च्या प्राणाची आहूती दिली आणि संताजीने तर मराठ्यांचा छत्रपती सुरक्षित रहावा यासाठी पराक्रमाची शर्थ केली. या तिन्ही घोरपडे बंधूंनी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दात अतिशय महत्वाची कामगिरी बजावली पण असे दुर्देवाने संताजीचा मृत्यू मराठ्यांच्या अंत:स्थ दुहीने घडून आला. त्यामुळे हे बहिर्जीच्या अत्यंत जिव्हारी लागले त्यातून छत्रपतींशी त्यांचे वैमनस्य निर्माण झाले. तरीपण स्वराज्यरक्षणाचे व्यापक उद्दिष्ट लक्षात घेऊन बहिर्जींनी मतभेद विशेष न ताणता दक्षिणेत निघून गेले. छत्रपतींशी वैमनस्य उत्पन्न झाल्यानंतर ते शत्रूपक्षाला सामील झाले नाही आणि मराठ्यांच्या राज्यात दूही निर्माण होईल असे कोणतेही वर्तन त्यांच्या हातून घडले नाही. उलट दक्षिणेकडे मराठ्यांचे स्थान बळकट करण्याचाच त्यांनी प्रयत्न केला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखाली अभूतपुर्व स्वातंत्र्ययुध्द इ.स. १७०० ते इ.स. १७०७ पर्यंत सुरु होते. यावेळी ताराबाईंनी बहिर्जी हिंदुराव घोरपडे यांचा पराक्रम लक्षात घेऊन त्यांच्याकडे स्वराज्याच्या रक्षणासाठी मोगलांविरुध्दाच्या युध्दकार्यामध्ये सहकार्याची मागणी केली. बहिर्जींनी देखील स्वराज्य रक्षणासाठी प्रतिसाद देऊन स्वातंत्र्य युध्दामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. मराठ्यांच्या इतिहासात म्हाळोजींना स्वराज्याचा सहकारी तर बहिर्जींना स्वराज्याचा संरक्षक म्हणून महत्वाचे स्थान आहे.

राजे बहिर्जी व सिध्दोजी या पितापुत्रांनी छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा राज्याच्या संरक्षणामध्ये महत्वपूर्व भूमिका बजावली. बहिर्जी हिंदुराव यांनी गुत्तीचा किल्ला जिंकून हिंदुराव घोरपडे घराण्याच्या स्वतंत्र सत्तेचा पाया घातला. तर सिध्दोजींनी स्वत:च्या कर्तृत्वाने दक्षिणेतील मराठ्यांच्या सत्तेला बळकटी प्राप्त करुन दिली. इ.स. १७१० ते इ.स. १७१३ या काळात राजे सिध्दजी हे करवीर राज्याच्या सेनापतीपदी विराजमान होते. त्यानंतर इ.स. १७१४ मध्ये गुत्ती राज्याचा विस्तार करतांना सिध्दोजीराजांनी कर्नाटकातील जर्मलीच्या पाळेगारांचा पराभव करुन सोंडूरचा प्रदेश जिंकून घेतला आणि सोंडूर राज्याची स्थापना केली. करवीर येथील राजकीय सत्तांतरानंतरही

राजे सिध्दोजीराव व छत्रपती संभाजी करवीर त्यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. त्याचबरोबर सातारचे छत्रपती शाहू यांच्या सोबतही त्यांचे संबंध निकटचे होते. सिध्दोजीरावांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत स्वत:चा एक स्वतंत्र असा दरारा निर्माण केला होता. महाराष्ट्राच्या सीमेपासून दुर गुत्ती, सोंडूर आणि त्या भोवतालच्या प्रदेशामध्ये स्वतंत्र राज्य स्थापन केले. सिध्दोजीरावांनी दक्षिण भारतात मराठ्यांचा वचकच निर्माण केला नाही तर दोन्ही छत्रपती घराण्याशी सहयोगाची, सहचार्याची भावना कायम ठेवली. सिध्दोजीरावांचा कालखंड हा सोंडूरकर हिंदुराव घोरपडे घराण्याच्या इतिहासात उत्कर्षाचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

राजे सिध्दोजीरावांनी दक्षिणेत सोंडूरचा प्रदेश जिंकून घेऊन हिंदुराव घोरपडे घराण्याला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. राजे सिध्दोजीरावांच्या मृत्यूनंतर सोंडूर सह गुत्ती राज्याची जबाबदारी त्यांचा मुलगा मुराररावांवर आली. मुराररावांनी कोणत्याही राज्याचे मांडलिकत्व पत्करले नाही तसेच कोणाच्या आश्रयाने राज्य राखले नाही तर त्यांच्या सोंडूर राज्याला स्वतंत्र दर्जा प्राप्त करुन दिला. त्यांच्या सत्तेचा आणि पराक्रमाचा धाक तत्कालीन दक्षिणेतील सर्वच सत्ताधिशांना होता. त्यांच्या राज्याचा विस्तार सौंधा, बिदनपूर, सावनूर, शिरे, श्रीरंगपट्टणम, चितळदुर्ग, गुत्ती, सोंडूर, गुटकलं, कडाप्पा, त्रिचनापल्ली, मद्रास आणि पाँडेचरी इ. प्रदेशामध्ये होता, म्हणजेच कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू च्या प्रदेशामध्ये आपल्या सत्तेचे प्रभावक्षेत्र मुराररावांनी निर्माण केलेले होते. त्यामुळे मुराररावांची सत्ता विचारात घेणे दक्षिणेतील सर्व सत्तांना अपरिहार्य होते. त्यांचे लष्करी सामर्थ्य त्यांच्या लष्करातील शिस्त आणि सैनिकांचे लष्करी शिक्षण यामुळे हिंदुस्थानच्या इतर कोणत्याही देशी सैन्यापेक्षा त्यांचे सैन्य अधिक कार्यक्षमच होते. मुरारराव आणि त्यांचे बंधू दौलतराव या दोघांनी म्हैसूर आणि निजाम या दोन राज्यांविरुध्द धैर्य आणि धाडस दाखवून मराठ्यांच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण स्थान व नावलौकिक मिळविला.

राजे मुरारराव घोरपडे यांचे सातारचे छत्रपती शाहू व कोल्हापूरचे छत्रपती संभाजी या दोन्ही सत्ताधिशांशी सलोख्याचे संबंध होते. मुराररावांच्या रणनितीचा, अनुभवाचा आणि पराक्रमाचा उपयोग केल्याशिवाय दक्षिणेत मराठ्यांची पकड घट्ट करणे शक्य नाही याची जाणीव छत्रपती शाहूंना होती. छत्रपती शाहूंनी अर्काटचा नबाब चंदासाहेबांच्या विरुध्द आखलेल्या कर्नाटक मोहिमेत

मुरारराव घोरपडेंनी अतिशय पराक्रम गाजविला व विजय संपादन केला. मुराररावांची त्रिचनापल्ली व त्या भोवतालच्या प्रदेशावर राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. त्यामुळे कर्नाटकच्या राजकारणात मुराररावांना अधिकच महत्व प्राप्त झाले. त्याचप्रमाणे कोल्हापूरकरांनाही मुराररावांसारखा प्रबळ सेनाधिकारी आणि मुत्सद्दी आपल्या मदतीला असावा अशी इच्छा होती. एवढेच नव्हे तर मुराररावांच्या कर्नाटकातील वाढत्या प्रभावामुळे त्यांचे सहकार्य लाभावे यासाठी छत्रपती घराण्यांमध्ये जणू चढाओढच लागलेली होती असे दिसते. मुराररावांनी देखील दोन्ही छत्रपती घराण्यांशी सलोख्याची भूमिका घेऊन दक्षिणेच्या राजकारणावर आपली पकड अधिक घट्ट केली.

इ.स. १७३१ ते इ.स. १७७७ या मुराररावांच्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये बाजीराव पहिले, बाळाजी बाजीराव आणि थोरले माधवराव या तिन्ही पेशव्यांचे घोरपडे घराण्याशी संबंध होते. बऱ्याचवेळा ते संबंध काल परिस्थितीनूसार भिन्न होते. मुराररावांच्या पराक्रम आणि कर्तृत्वामुळे त्यांच्या मदतीशिवाय कर्नाटकात विजय मिळविणे शक्य नाही याची जाणीव असल्यामुळे सातारा व कोल्हापूरचे छत्रपती तसेच पेशव्यांकडूनही मुराररावांच्या मदतीची इच्छा व्यक्त करण्यात येत होती. मुरारराव ही दक्षिणेतील एक मोठी शक्ती असल्याने छत्रपती व पेशव्यांच्या कर्नाटकातील मोहिमा मुराररावांशिवाय पूर्ण होऊ शकल्या नाहीत. निजाम आणि मुराररावांच्या संघर्षात पेशवे नानासाहेब यांनी मुराररावांना मदतीची गरज असतांना कोणतीही मदत न दिल्यामुळे त्रिचनापल्ली मराठ्यांच्या ताब्यातून नेहमीकरिता निघून गेले. वास्तविक पाहता बंगालमध्ये रघुजी भोसलेंना ज्याप्रमाणे स्वातंत्र्य दिले होते, त्याचप्रमाणे कर्नाटकात मुराररावांना दिले असते तर कर्नाटकातील मराठ्यांचा इतिहास अधिक वैभवशाली राहिला असता.

दक्षिण भारतामध्ये मुराररावांच्या दबदबा फार मोठा होता. त्यांचे समकालीन फ्रेंच आणि इंग्रज या परकीय सत्तांशीही उत्तम संबंध होते. इंग्रज आणि फ्रेंच ह्या दोन्हीही परकीय सत्ता मुराररावांस वचकून होत्या. मुरारराव त्रिचनापल्लीवर आक्रमण करणार असे कळताच गव्हर्नर डुप्लेने मुराररावांशी वाटाघाटी करुन कर्नाटकात चौथाई गोळा करण्याचा, सरदेशमुखीचा व महिन्याला दिड लाख रुपये देण्याचे मान्य केले, तसेच इंग्रज अधिकारी रॉबर्ट क्लाईव्ह अर्काटच्या वेढ्यात अडकलेला असतांना मुराररावांनी त्यास योग्यवेळी मदत करुन सोडविले. मुराररावांनी इंग्रजांना अनेक अशा कठीण प्रसंगी मदत केलेली आहे.

मुराररावांचे कायमचे शत्रूत्व केवळ हैदरअली बरोबर होते. हैदरशी नेहमीच त्यांचा संघर्ष होत असे. दक्षिणेतील मुराररावांच्या वाढत्या सामर्थ्यामुळे हैदरअली अस्वस्थ होता. त्याने दक्षिणेत मुराररावांच्या विरोधात कटकारस्थाने केली. मुरारराव आणि हैदर यांच्यात अनेकवेळा संघर्ष होवून हैदरला पराभव स्विकारावा लागला. वास्तविक पाहता हैदरचे सामर्थ्य मुराररावांपेक्षा अधिक होते. त्यांच्यातील संघर्ष वाढत जावून इ.स. १७७६ मध्ये मुराररावांच्या गुत्तीच्या किल्ल्यावर हैदरने आक्रमण केले. पेशवे, छत्रपती आणि इतर कोणत्याही सत्तांनी या अडचणीच्या वेळी मुराररावांना सहकार्य केले नाही. तरीही मुराररावांनी पराक्रमाची शर्थ केली, पण त्यांना या युध्दात पराभव स्विकारावा लागला. हैदरने मुराररावांना कपालदुर्गच्या किल्ल्यावर कैद करुन तेथेच त्यांना ठार केले. अशाप्रकारे मुराररावांनी इ.स. १७३१ ते इ.स. १७७७ या काळात दक्षिण भारतात कर्तबगारी गाजविली.

दक्षिणेतील एत्तेद्देशिय सत्तांबरोबरच परकीय सत्तांवरही मुराररावांचा वचक होता. त्यांचे प्रस्थ इतके मोठ्या प्रमाणात वाढले होते की, त्यांचे पाठबळ आपल्याला मिळावे यासाठी तत्कालीन सत्तांमध्ये चढाओढ होती. एक इंग्रज इतिहासकार त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन करतांना म्हणतो की, "मुराररावांचे सामर्थ्य एवढे वाढले होते की त्यांच्या संबंधी दक्षिण भारतातील प्रमुख सत्ताधिशांच्या मनात एकप्रकारे दहशत बसली होती. हैदरअली मुराररावांचा द्वेष करीत होता, पेशवे त्यांची अजिजी करित असत. इंग्रज आणि फ्रेंच मुरारराव आपल्या बाजूने यावेत यासाठी धडपड करीत असत. अर्काट, सावनूर, कडप्पा या ठिकाणचे नबाब त्याला वचकून असत." यावरुन मुराररावांच्या कर्तृत्वाची कल्पना आल्याशिवाय राहत नाही.

मुराररावांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन अनेक इतिहासकार अभ्यासकांनी केलेले आहे. त्यांचे युध्दकौशल्य, संघटन चातूर्य, राजकारणातील मुत्सद्देगिरी, समयसूचकता, स्वाभिमान आणि शौर्य असे अनेक गुण मुराररावांमध्ये होते. इ.स. १७३१ ते इ.स. १७७७ या कालखंडात मुराररावांनी दक्षिण भारतात फार मोठी कर्तबगारी गाजविली. इंग्रज आणि फ्रेंच यांचा सत्ता संघर्ष, पेशवे हैदर यांच्या लढाया, निजाम आणि कर्नाटकातील नबाब यांची भांडणे यासर्व प्रसंगाशी मुराररावांचा प्रत्यक्ष संबंध आला. दक्षिण भारतातील प्रत्येक राजकीय व लष्करी हालचाली मुराररावांना वगळून क्वचितच झाली असेल असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरु नये. इ.स. १७७७ मध्ये मुराररावांच्या

निधनाने दक्षिणेतील मराठ्यांचे फार मोठे कर्तृत्वस्थान संपले. मुरारराव म्हणजे दक्षिणेतील मराठेशाहीचा मुर्तीमंत इतिहास आहे.

मुराररावानंतर त्यांचे दत्तकपुत्र शिवराव यांनी सोंडूर राज्याची विस्कळीत झालेली परिस्थिती स्थिरस्थावर केली. हैदरच्या मृत्यूनंतर मराठी आणि टिपू यांच्यात संघर्ष होवून शिवराव लढाईत ठार झाले. राजे शिवरावानंतर सिध्दोजीराव दुसरे, शिवराव दुसरे सोंडूरच्या राजगादीवर विराजमान झाले. शिवराव दुसऱ्याच्या काळात सोंडूर संस्थान बाजीराव पेशवा दुसरा याने आपणास मिळावे यासाठी इंग्रजांकडे तगादा लावला. एलफिन्स्टनच्या सांगण्यावरुन कर्नल मन्रोने इ.स. १८१७ मध्ये सोंडूर जिंकून घेतले, परंतु शिवरावने सोंडूर पुन्हा हस्तगत करुन घेतले आणि इंग्रजांनी देखील सोंडूर राज्याचे दक्षिणेतील स्वतंत्र स्थान मान्य केले. राजे शिवराव दुसऱ्यानंतर त्यांचा पुतण्या व्यंकटराव सत्तेवर आले. राजे शिवषण्मुखराव, राजे रामचंद्रराव आणि राजे व्यंकटराव दुसरे ह्यांनी त्यानंतर अनुक्रमे राजगादी सांभाळली.

इ.स. १९२८ मध्ये श्रीमंत यशवंतराव हिंदुराव घोरपडे सोंडूरच्या राजगादीवर विराजमान झाले. त्यांच्या कारकिर्दीत सोंडूर राज्याच्या कारभारात महत्वाच्या सुधारणा झाल्या. किंबहूना असेही म्हणता येईल की, त्यांच्या राज्याच्या शासनव्यवस्थेचा विकास म्हणजे प्रजेचे जास्तीत जास्त राज्यकारभारात सहभागी होवून केलेल्या कार्याचा इतिहास होय. त्यांनी आपल्या राज्यामध्ये शासनाच्या विक्रेंद्रीकरणावर व लोकशाहीकरणावर भर दिला. इ.स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर व भारतातील संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर राजे यशवंतरावांनी ७ मार्च १९४९ रोजी सोंडूर संस्थान म्हैसूर राज्यात विलीनीकरणाच्या ठरावावर स्वाक्षरी करुन लोकशाहीच्या बळकटीकरणात महत्वाची भूमिका बजावली. सोंडूर राज्याचा राज्यकारभार इ.स १९४९ मध्ये भारत सरकारकडे हस्तांतरित झाल्यानंतर श्रीमंत यशवंतराव महाराजांनी आपले लक्ष सोंडूरच्या प्रदेशाची औद्योगिक प्रगती करण्यावर केंद्रित केले. १८ जाने. १९५४ रोजी 'सोंडूर मॅंगनिज अॅन्ड आयर्न प्रा.लि.' या नावाची कंपनी स्थापन केली. या कंपनीमुळे सोंडूर परिसरातील हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करुन देवून राज्याच्या आर्थिक विकासात मोलाची भर घातली. यशवंतरावांनी राजकीय व औद्योगिक प्रगती बरोबरच शैक्षणिक, क्रिडा विषयक व सांस्कृतिक इ. अनेक क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केले आहे.

राजे यशवंतरावानंतर त्यांचा मोठा मुलगा श्रीमंत मुरारराव दुसरे हे इ.स. १९९६ मध्ये राजगादीवर विराजमान झाले. मुराररावांना सत्ता आणि संपत्तीचा प्रचंड मोठा वारसा लाभलेला होता. त्याचबरोबर ते उच्चशिक्षीत असुनही त्यांना समाजप्रतीच्या कर्तव्याची सुस्पष्ट जाणीव होती. त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. मुरारराव घोरपडे यांची राजकीय कारकिर्द फार मोठी आहे. कर्नाटकात विधानसभेवर ते सलग सात वेळा म्हणजे ३५ वर्ष निवडून गेले. त्यातील १३ वर्ष त्यांनी मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळ्ली. त्यामध्ये अर्थमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री म्हणून भरीव स्वरुपाचे योगदान दिले आहे. एकवेळा ते लोकसभेवरही निवडून गेले होते. या प्रदिर्घ राजकीय कारकिर्दीमध्ये केंद्र व राज्य सरकारांनी घोषित केलेली प्रत्येक योजना कर्नाटक राज्यात कानाकोपऱ्यापर्यंत कशी योग्य प्रकारे लागू केली जाईल याकडे त्यांचा कटाक्ष होता. इ.स. १९७२ च्या भीषण दुष्काळादरम्यान तसेच इ.स. १९७६ पर्यंत शाळातून गर्भवती माता व बालकांसाठी त्यांनी भारतातील सर्वात मोठी माध्यान्ह भोजन योजना आपल्या राज्यात अत्यंत सुनियोजित पध्दतीने राबवून दाखविली. यावरुन ते कुशल प्रशासक तसेच प्रजाहितदक्ष राजकारणी होते.

मुरारराव पंचायत राज व ग्रामविकास खात्याचे मंत्री असतांना लोकशाही विकेंद्रिकरणाची व लोककल्याणासाठी भरीव कार्य केले. कर्नाटक राज्यात पंचायत राज व्यवस्थेला सुव्यवस्थित आकार देण्याचे महत्वपूर्ण कार्य मुराररावांनी केले. राज्याचा समतोल विकास व्हावा या हेतूने सोंडूर एज्यूकेशन सोसायटी व शिवपूर शिक्षण समिती स्थापन करुन सर्व सामान्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. त्यांनी शिक्षणाबरोबरच आरोग्य, रोजगार निर्मिती व सर्वसामान्यांचे जीवनमान कसे उंचावेल यासाठी कसोशीने प्रयत्न केले. त्यांनी सर्वसामान्यांच्या विकासासाठी आदर्श समाज केंद्र, आरोग्य केंद्र, सोंडूर कुशल कला केंद्राच्या माध्यमातून महत्वपूर्ण योगदान दिले. मुराररावांनी पारंपारिक प्रथेला दूर सारुन अस्पृश्यांबरोबर स्त्रियांनाही कार्तिक स्वामीच्या मंदिरात प्रवेश देऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे महत्वाचे कार्य केले.

आधुनिक भारताच्या विकासासाठी तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून वडिलांप्रमाणेच इ.स. १९६९ मध्ये 'मेटल ॲण्ड फेरो अलॉइड प्लांट' हा कारखाना सुरु केला. त्यांनी

केवळ औद्योगिक विकासावरच लक्ष केंद्रित केले नाही तर पर्यावरण संवर्धनाकडे विशेष लक्ष दिले. मुराररावांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी होते. चतुरस्त्र राजकारणी, उत्तम समाजसेवक, उत्कृष्ठ लेखक, निष्णांत छायाचित्रकार आणि पर्यावरणरक्षक हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खास वैशिष्ट्य होते. अत्यंत विलासी व चैनीचे जीवन जगणे शक्य असतांनाही केवळ समाजाप्रती असलेल्या कर्तव्याच्या जाणीवेमुळे त्यांनी बुध्दी, संपत्ती आणि सत्ता याचा उपयोग केवळ समाजाच्या विकासासाठीच केला आहे.

मराठ्यांच्या इतिहासात हिंदुराव घोरपडे घराण्याने बजावलेली कामगिरी अनेक अर्थाने गौरवास्पद ठरलेली आहे. उत्तरेकडील या घराण्याने दक्षिण भारतात येऊन स्वपराक्रमाने स्वतंत्र राज्य निर्माण केले. या घराण्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या घराण्याच्या मूळपुरुषापासून सर्व राज्यकर्त्यांनी एकनिष्ठतेचा परिचय दिला. या घराण्याने जवळपास पाच शतके दक्षिण भारतात आपल्या उत्तुंग पराक्रमाची परंपरा निर्माण केली. स्वातंत्र्यपूर्व काळातील पूर्वजांप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातील वंशजांनीही राष्ट्रहितालाच प्राधान्य दिले.

❖❖❖